# कृष्ण परमात्मा


6



श्रीपरमानंदस्वामी

"ज्याप्रमाणे सर्व अंगांना शुद्ध रक्ताचा पुरवठा करणाऱ्या खुद्द हृदयालाही कार्यरत रहाण्यासाठी त्या शुद्ध रक्ताची आवश्यकता असतेच आणि त्यासाठी त्या हृदयातीलच शुद्ध रक्त हृदयाला पुरविण्याची व्यवस्था जशी परमेश्वराच्या नियतीत निसर्गानेच करुन ठेवलेली आहे, त्याचप्रमाणे सर्वांना खऱ्या व शुद्ध प्रेमाचा अनुभव देणाऱ्या कृष्णालाही त्या प्रेमाची आवश्यकता होतीच. अशा खऱ्या प्रेमाचा अनुभव त्याला कोणी आणून दिला की नाही? कृष्णाचेच शुद्ध प्रेम घेऊन कोणीतरी तेच प्रेम भक्तिभावाने कृष्णाला अर्पण केले की नाही ? "

कोमल
प्रकाशन



# कृष्णपरमात्मा

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकाला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे.

ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते.

मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# कृष्णपरमात्मा

## लेखक : श्रीपरमानंदस्वामी

प्रस्तुती : प्रतिमा आठवले

pratimathavale@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

ई साहित्य प्रतिष्ठान

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604


**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रकाशन २३ फ़ेब्रुवारी २०१८



नारद व लक्ष्मी यांच्या संवादातून

उलगडलेले कृष्णाच्या अंतरंगातील गुज

# कृष्ण परमात्मा

## भाग ६


**श्री.अविनाश मोरेश्वर लिमये**

**एम.एस्सी.**

**उर्फ**

**श्रीपरमानंदस्वामी**



**सर्व हक्क स्वाधीन :**



सौ.अनुपमा अविनाश लिमये

१३, नवलकर बिल्डिंग, न.चिं.केळकर रोड,

दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८

दूरध्वनी : ०२२ - २४३६ १५१४

मोबाईल : ९९६९८ ७६८५०

# अनुक्रमणिका

२७. अर्जुन-द्रौपदी विवाहाचा प्रस्ताव

२८. द्रौपदी स्वयंवराची योजना


२९. कर्णाचा प्रयत्न - द्रौपदीची स्पष्टोक्ती

३०. अर्जुनाने केला मत्स्यभेद

३१. अर्जुन-द्रौपदी विवाहातील पेचप्रसंग

३२. महात्मा व्यास-धर्मराज संवाद

३३. कृष्ण-अर्जुन संवाद



# अर्जुन-द्रौपदी विवाहाचा प्रस्ताव


लक्ष्मीच्या बोलण्यावर नारदाने मंदस्मित केले आणि त्याने बोलावयास सुरूवात केली.

“अगं लक्ष्मी, मनःस्थिती मोकळी व सबळ असेल तर बाह्य परिस्थितीत प्रतिकूलता निर्माण झाली तरी त्याचा मनावरती जराही परिणाम न होता मन निश्चल व संयमी अवस्थेत राहू शकते. परंतु मन जर कमकुवत अवस्थेत असेल तर बाह्य परिस्थितीत निर्माण झालेली थोडीशी प्रतिकूलताही मनावरती बराच परिणाम करू शकते आणि त्यामुळे मन निराश व हतबल होऊ शकते. अशा वेळेलाच श्रद्धा व प्रेम या दोन्ही निष्ठांची कसोटी लागते. त्या दोन्हीचा संयोग झाला तरच कोणत्याही परिस्थितीत मनःस्थिती ही संतुलित रहाते. त्यामुळे केवळ प्राप्त परिस्थितीतून पार पडणे घडते एवढेच नव्हे, तर ईश्वरावरील प्रेम व श्रद्धा अधिकच वाढून ईश्वराविषयीचा भक्तिभाव अधिकच उत्कट होतो आणि भक्तिभावातील हीच आर्तता त्या ईश्वराची प्राप्ती हमखास करून देतेच देते. अर्जुन व द्रौपदी यांच्या विवाहाच्या व त्यांच्या पुढील जीवनाच्या निमित्ताने याच गोष्टींकडे प्रकर्षाने निर्देश होतो.

हे लक्ष्मी, तुझ्या ठिकाणी मूळ कथेचे सूत्र कायम आहे आणि त्याचेच मला अत्यंत कौतुक आहे. कारण निरूपणाच्या ओघात कथासूत्र हरवण्याची शक्यताच जास्त असते. सगुणकथा ही व्यक्ती व प्रसंग यांच्या रूपाने साकार होत असते, तर त्या कथेवरील निरूपण हे व्यक्ती व प्रसंग यांच्यामधील अरूप भावांना प्रगट करून दाखवीत असते. अरूप भाव त्या सगुणकथेतील चैतन्यस्वरूप आहे, तर सगुणकथा ही त्या चैतन्याचे रूपसौंदर्य आहे. परंतु चैतन्यामुळेच सौंदर्य आहे हे जेवढे मूलभूत सत्य आहे तेवढेच सौंदर्य हे त्या चैतन्याचाच आविष्कार आहे

हेही सत्यच आहे. त्या दोन्हीच्या संयोगातूनच अंतःकरणातील आनंदाचा अनुभव प्रगट होतो हे मात्र खरे आहे. असो. द्रौपदीशी तिच्या भावी पतीविषयी व पुढील जीवनासंबंधी बोलत असताना कृष्णाच्या मनात अर्जुनाचाच विचार असणार हा तुझा कयास तर बरोबरच आहे. परंतु कृष्णाठायी तसा विचार आधीपासूनच होता असे अगदी ठामपणे म्हणता येणार नाही. एखादे वेळेस द्रौपदीशी बोलता बोलताच आणि तिची विचारसरणी जाणून घेता घेताच कृष्णाच्या मनासमोर अर्जुनाची मूर्ती हळूहळू येऊ लागली असेल. द्रौपदीला अपेक्षित असलेले प्रेम व श्रद्धा कृष्णावरती असणारा आणि कृष्णाच्या जास्तीत जास्त जवळचा असलेला असा अर्जुनच होता. त्यामुळेच द्रौपदीला पती म्हणून अनुरूप असलेली व्यक्ती शोधताना कृष्णाला अजिबात दूरवर जावे लागलेच नाही. त्याच्या मनात अगदी प्रथम व अंतिम विचार अर्जुनाचाच आला आणि तोच विचार कृष्णाठायी दृढ झाला. परंतु तो विचार द्रौपदीला सांगण्याच्या आधी कृष्णाने द्रौपदीशी बोलून तिची मनोभूमी व पार्श्वभूमी तयार केली.

हे लक्ष्मी तसे बघायला गेले तर सकृत् दर्शनी असेच दिसेल की निर्णय घेताना कृष्णाने केवळ द्रौपदीच्याच हिताला व तिच्या जरूरीला प्राधान्य दिले होते. कृष्णाच्या प्रेमभावाने अर्जुनही कृष्णाच्या जवळचा झालेला होताच. परंतु द्रौपदी ही मनाने कृष्णाच्या अत्यंत जवळची झालेली होती आणि म्हणूनच बाह्य जवळीकतेची नितांत आवश्यकताही तिला जाणवत होती. त्यामुळेच अर्जुनाशी विवाह केल्याचा जास्तीत जास्त लाभ द्रौपदीलाच मिळणार होता हे तर अगदी स्पष्टच होते. पण त्याचबरोबर कृष्णाचे खरे माहात्म्य जाणून घेण्यासाठी द्रौपदीच्या सहवासाचा उपयोग अर्जुनालाही होणार होता हेही खरेच होते. कारण कृष्णाचे माहात्म्य द्रौपदी केवळ जाणूनच नव्हती, तर तिच्याठायी त्याचा पूर्ण निश्चय होता. म्हणूनच तर तिला कृष्णाचे सांगणे हे अगदी अंतःकरणापासून प्रमाण असे. द्रौपदीच्या या दृष्टीचा व भूमिकेचा लाभ अर्जुनालाही होणारच होता. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कृष्ण हे सर्व जाणून



होता. कृष्णाला त्याच्या पुढील धर्मकार्यात अर्जुनाचे साहाय्य आवर्जून घ्यायचे होते. कृष्णाच्या अंतरात तसा ठाम पण सुप्त निश्चयच होता. ते व्यवधानही कृष्णाठायी होते आणि म्हणूनच कृष्णाठायी अगदी हेतूपुरस्सरच अर्जुन व द्रौपदी यांच्या विवाहाची योजना हळूहळू आकाराला येत होती. धर्मकार्याचे कंकण हातात बांधलेल्या कृष्णाचे अंतःकरण अत्यंत निर्मल व सबळ होते आणि त्यामुळेच त्याचा निश्चयही अगदी दृढ होता. त्या धर्मकार्यासाठी अर्जुनाची साथ मिळेल याची खात्री कृष्णाला होती आणि त्यासाठीच कृष्णाचे प्रयत्न चालू होते. अर्जुनाचा विवाह द्रौपदीशी करून देण्यामागेही कृष्णाचा जरी हाच हेतू होता तरीही तो विवाह अर्जुन व द्रौपदी या दोघांच्याही हिताचाच होता ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. खरे तर, कृष्णासाठी त्याचे धर्मकार्य व त्याच्या प्रेमीजनांचे हित या दोन गोष्टी वेगवेगळ्या नव्हत्याच. कारण त्या तशा असूच शकत नाहीत. प्रेमीजनांचे कल्याण करणे व त्यांचे हित साधणे हाच कृष्णाचा धर्म होता आणि तेच त्याचे कार्य होते. हे लक्ष्मी, एवढे निरूपण झाल्यानंतर आता मुख्य कथेकडे वळणे आवश्यक आहे. कारण त्या कथेतील मूळ व मुख्य सूत्र तुला आता कळलेले आहे. ते नीट धरून मात्र ठेव.


हे लक्ष्मी, कृष्णाचे द्रौपदीशी तिच्या विवाहानिमित्त सविस्तर बोलणे झाल्यावर कृष्णाने मुद्दामहूनच काही काळ जाऊ दिला आणि द्रौपदीला सर्व गोष्टींचा शांतपणे विचार करण्यासाठी वेळ दिला. त्या संधीचा द्रौपदीनेही लाभ उठवला. अर्थात् द्रौपदीची भूमिका व विचारसरणी होकारात्मकच असल्यामुळे तिच्या मनाचा निश्चय होण्यासाठी मुळीच वेळ लागला नाही. किंबहुना तिच्याठायी तर कृष्णाच्या सांगण्याविषयीचा निश्चय लागलीच झालेला होता. कृष्णावरील श्रद्धेचे व प्रेमाचेच ते लक्षण होते. त्यामुळेच द्रौपदी कृष्णाच्या पुढील भेटीची व त्याच्या बोलण्याची आतुरतेने वाट पहात राहिली होती. तिच्याठिकाणी कोणत्याही प्रकारचा मानसिक ताण व तणाव नव्हता.

थोडा काळ जाऊ दिल्यानंतर कृष्ण स्वतःहून द्रौपदीच्या भेटीसाठी आला. कृष्णाला पहाताच द्रौपदी धावतच कृष्णाजवळ आली असता कृष्णाने तिला प्रेमाने आपल्याजवळ घेतले. कृष्णाच्या प्रेमळ स्पर्शाने द्रौपदी अत्यंत सुखावली आणि तिनेही कृष्णाच्या प्रेमाला प्रेमाने प्रतिसाद दिला. द्रौपदीने कृष्णाला एका मंचकावर बसवले आणि स्वतः जाऊन कृष्णासाठी जल व फळफळावळ घेऊन आली. द्रौपदीने स्वतःच्या हाताने काही फळांचे तुकडे करून कृष्णाच्या मुखात घातले. परंतु कृष्णाने मात्र फळे सेवन करण्याची जास्त उत्सुकता दाखवली नाही. फक्त थोडेसे जल प्राशन करून कृष्ण काही न बोलता तसाच स्वस्थ बसून राहिला. कृष्णाच्या न बोलण्यामागचा हेतू द्रौपदीच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. कृष्णाला बरेच काही बोलायचे आहे हे द्रौपदीने ओळखले आणि कृष्णाला बोलते करण्याच्या हेतूने तिनेच कृष्णाशी बोलावयास सुरुवात केली.

“कृष्णा, मी पूर्णपणे जाणून आहे की तुझ्याठिकाणी माझेच व्यवधान आहे. माझ्या स्वास्थ्याची व माझ्या हिताची सदैव काळजी वाहणारा असा माझ्यासाठी तरी तूच एकीएक आहेस. तुझ्यावरील श्रद्धेने व प्रेमाने माझ्या जीवनाचा सर्व भार मी तुझ्यावरतीच सोपवला आहे आणि तूही तो माझ्यावरील अत्यंत प्रेमाने स्विकारला आहेस ही तुझी माझ्यावरील अत्यंत कृपाच आहे. आता तू माझ्या पुढील जीवनासंबंधी जो काही निर्णय घेतलेला आहेस तो मला सांग. तुझे वचन हेच मला पूर्णपणे प्रमाण आहे याची खात्री तर तुला आहेच.”

द्रौपदीच्या बोलण्याने कृष्ण संतुष्ट झाला आणि त्याने तिच्याशी बोलावयास सुरुवात केली.

“द्रौपदी, तुझी माझ्यावरील श्रद्धा व प्रेम हे जसे तुझे बळ आहे तसेच ते माझेही बळ आहे. त्या बळाच्या जोरावरतीच मी तुझ्या हिताच्या गोष्टी तुला मोकळेपणाने व हक्काने सांगू शकतो आणि त्यांच्याविषयी आग्रहही धरू शकतो ही गोष्ट अगदी खरी आहे. तू माझ्यावरती ठेवलेल्या



पूर्ण भरवशामुळेच माझ्याठायी तुझ्या जीवनाचे सतत व्यवधान असते आणि त्याचेच फळ तुला मिळत असते. परंतु एक गोष्ट नीट लक्षात ठेव की माझ्यावर अवलंबून रहाताना तुझे मन दुर्बल होता कामा नये. परावलंबित्व मनाला कायमचे दुर्बल करून ठेवते तर स्वावलंबन हेच मनाला सबळ करीत असते. कारण बाह्यांगाने माझा सहवास, मार्गदर्शन व प्रत्यक्ष सहभाग जरी तुला कितीही लाभला तरी त्याला मर्यादा या येणारच आहेत आणि प्रत्यक्ष प्रसंगात अनुभव घेणार आहे ते तुझे मनच! त्या मनाठायी मोकळेपणा असेल तरच मन कोणत्याही व्यक्ती, प्रसंगात गुंतून राहणार नाही. मनावर झालेल्या सुखदुःखाचे परिणाम हे तात्कालिक व वरवरचेच असतील आणि त्या परिणामांची मनावरती मात होणार नाही. त्यामुळेच मन नेहमीच ताजेतवाने व उत्साही राहील आणि शांती, समाधान व आनंद यांचा अनुभव घेत राहील.


द्रौपदी, एखादे वेळेस तुझ्या मनात असेही येत असेल, की मी तोच तोच विषय तुला पुन्हा पुन्हा का सांगत आहे? माझ्याठायी तुझ्याविषयी भरवसा नाही की काय? तर तसे काहीही नाही. माझ्याठायी तुझ्याविषयी पूर्ण विश्वास व खात्री आहे. परंतु मी तुला सावध करीत आहे एवढेच! कारण कितीही नाही म्हटले तरी मनाच्या ठिकाणी अपेक्षा या असतातच आणि ते अगदी साहजिकच आहे. पण जर अपेक्षापूर्ती झाली नाही किंवा होऊ शकली नाही तर मात्र त्याचा मनावर परिणाम हा होतोच. रजोगुणी मनोवृत्तीचे लोक दुःखी व निराश होतात तर तमोगुणी वृत्तीचे लोक रागावतात व चिडतात. पण सत्त्वगुणी वृत्तीचे लोक मात्र ईश्वराची इच्छा मानून घडलेल्या गोष्टीचा स्वीकार करतात आणि ईश्वरावरती श्रद्धा ठेवून पुन्हा उत्साहाने प्रयत्नाला लागतात. परंतु कोणत्याही परिस्थितीत मनाची शांती व समाधान कायम ठेवतात आणि हीच गोष्ट जीवनात सर्वात महत्त्वाची आहे एवढे मात्र तू कायमचे लक्षात ठेव. असो.

द्रौपदी, तुझ्या जीवनातील जोडीदाराविषयी विचार करीत असताना खरे तर मला जास्त विचार करावा लागलाच नाही. तुझ्याएवढेच

व्यक्तिगत प्रेम व श्रद्धा ज्याची माझ्यावर आहे असा माझा परममित्र अर्जुन हाच एकीएक माझ्या दृष्टीसमोर येतो. सद्‌गुणांनी युक्त असलेला व अत्यंत पराक्रमी असलेला अर्जुन हा पाच पांडवातील मध्यम पांडव आहे. माझा व त्याचा एकमेकांविषयी अत्यंत स्नेह व लोभ आहे. आमच्या दोघांमध्ये अशी कोणतीही गोष्ट नाही की जी एकमेकांना ठाऊक नाही. एवढी आमची मने एकमेकांशी जुळलेली आहेत. परस्परांचा सहवास हा आम्हाला अत्यंत प्रिय व हवाहवासा वाटतो आणि म्हणूनच एकमेकांना भेटण्याची ओढ नित्य आमच्याठायी असते. परिस्थितीमुळे वा काही कारणांमुळे जर आमची भेट होऊ शकली नाही तर आम्ही उभयतां सारखेच बेचैन होतो आणि हर प्रयत्नाने एकमेकांची भेट घेतोच घेतो. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे अगदी तुझ्याप्रमाणेच अर्जुनालाही त्याच्या जीवनात माझे मार्गदर्शन व प्रत्यक्ष सहभाग हवा असतो. तुमच्या दोघांमध्ये हा एक सामाईक व महत्त्वाचा दुवा आहे आणि त्याचदृष्टीने तुमची दोघांची जोड मला अत्यंत योग्य वाटते. कारण तुम्ही दोघेही स्वतंत्रपणे माझ्याशी जोडलेले आहातच आणि त्यामागील तुमची भावना व भूमिकाही एकच आहे. तेव्हा तुम्ही जर एकमेकांना जीवनात साथ दिलीत तर तुमच्या उभयतांच्या जीवनातील माझे स्थान कायम राहील, जे तुम्हा दोघांना व मलाही अपेक्षित आहे आणि ते अत्यंत आनंदाचेही होईल.”

कृष्णाचे बोलणे द्रौपदी अत्यंत लक्षपूर्वक व शांतपणे ऐकत होती. ऐकत असताना जरी तिच्या मनाला अर्थात बरेच वाटत होते, तरीही तिला थोडेसे नवलही वाटत होते. द्रौपदीने कृष्णाकडे पाहिले असता तिच्या लक्षात आले की कृष्ण तिच्याकडून तिच्या प्रतिक्रियेची वाट पहात आहे. एक क्षणभरच थांबून द्रौपदीने कृष्णाशी बोलावयास सुरुवात केली.

“कृष्णा, तू हा निर्णय अत्यंत विचारपूर्वक घेतलेला असणार याची मला पूर्ण खात्री आहे. त्यामुळे मला वेगळा असा विचार करण्याची गरजच नाही आणि मी वेगळा विचार केला तरी तो विचार होकारात्मकच



असणार. त्यामुळेच माझ्या विचारांचा निष्कर्षही होकारात्मकच असणार, हे तर तूही जाणूनच आहेस. मी व अर्जुन हे दोघेही तुला प्रिय आहोत आणि आम्हा दोघांनाही तू आपलेपणाने तुझ्या अत्यंत जवळचे म्हणून पहातोस. तसेच आमच्या दोघांच्याठायीही तुझ्याविषयी काय भाव आहे हेही तूच ओळखून आहेस. त्यामुळे तुझा निर्णय हा आमच्या दोघांच्याही हिताचाच असणार हे तर नक्कीच आहे. तेव्हा या तुझ्या निर्णयाविषयी दुमत असण्याचे काहीच कारण नाही असे मला तरी अगदी निश्चितपणे वाटते. माझ्या दृष्टीने तुझ्या अत्यंत जवळच्या संबंधातील असणारी व्यक्ती, ही माझ्या जीवनात माझ्यासाठी अत्यंत योग्यच आहे. कारण त्यामुळेच तुझ्या व माझ्यातील जवळीकतेचे संबंध कायम राहण्यासाठी अनुकूलताच निर्माण होणार आहे आणि माझ्यासाठी तरी तीच गोष्ट सर्वात महत्त्वाची आहे.


कृष्णा, परंतु मला एका गोष्टीचे मात्र अत्यंत नवल वाटत आहे की हा निर्णय घेण्यासाठी तुला एवढा वेळ का लागावा बरे? त्याच्यासाठी तुला बराच विचार करावा लागला का? तुझ्या मनात काही शंका होती का, की ज्याच्यामुळे तुला एवढा विचार करावा लागला आणि तशी असल्यास ती शंका माझ्या संबंधीची होती, की अर्जुनाच्या संबंधीची होती? मला अर्जुन अनुरूप आहे, पण मी अर्जुनाला अनुरूप आहे की नाही, याविषयी तर तुझ्याठिकाणी काही शंका नाही ना? का अर्जुनाची या विवाहाला संमती मिळेल याची तुला खात्री नाही? परंतु एक गोष्ट मात्र मी तुला स्पष्टपणे सांगते, की माझ्यादृष्टीने तरी माझ्यासाठी काही अडचणच नाही. अर्जुन व पांडव यांच्याविषयी मला तशी काही सविस्तर माहिती नाही. मी त्यांच्याविषयी केवळ ऐकूनच आहे. परंतु तुझ्याठायी अर्जुन व मी दोघांची पूर्ण माहिती आहे. आमची बाह्य परिस्थिती, आमचे व्यक्तिमत्त्व, आमचा स्वभाव या सर्वांची माहिती तुलाच आहे आणि म्हणूनच तुझा निर्णय हा सर्वांगाने योग्यच असणार अशी माझी पूर्ण श्रद्धा आहे. तरीही तू तुझ्या मनातील विचार मला अगदी मोकळेपणाने सांगण्याचे कर.”

द्रौपदीच्या बोलण्याने कृष्णाला तोष झाला आहे हे त्याच्या मुखावरील भावावरूनच लक्षात येत होते. आपली मान कौतुकाने किंचितशी हलवून कृष्ण शांत व गंभीर सुरात बोलू लागला.

“अगं द्रौपदी, तुझे बोलणे हे अगदी तुला साजेसेच आहे. तुझ्या बोलण्यातून जी माझ्याविषयीची पूर्ण श्रद्धा व विश्वास आणि तुझ्याठायीची निश्चयात्मकता प्रगट होते त्याचेच मला अत्यंत कौतुक आहे. तुझ्यासारखी रूपवान, गुणवान आणि तेजस्वी स्त्री ज्याला पत्नी म्हणून लाभेल तो पुरूष तर अत्यंत भाग्यवानच म्हणावा लागेल आणि तसे भाग्य त्या अर्जुनाचे निश्चितच आहे. त्याने तुला नापसंत करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. त्याच्यासाठी तर तुझ्यासारखी स्त्री पत्नी म्हणून लाभणे हे भूषणावहच आहे. त्याच्यासाठी तर  त्याचा तो बहुमानच आहे. तो तुझा आनंदानेच स्वीकार करील याविषयी माझ्या मनात कोणतीही शंका नाही आणि तुझ्याविषयी काही शंका माझ्या मनात निर्माण होण्याचा तर प्रश्नच नाही. तुझ्या श्रद्धेची व तुझ्या निश्चयाची जेवढी खात्री तुझ्याठायी आहे, त्याच्यापेक्षा जास्त ती माझ्याठायी आहे हे तू नेहमीच लक्षात ठेव. अर्थात् काही बाह्य अडचणी जरूर आहेत. परंतु त्या परिस्थितीच्या आहेत आणि त्याच्यावरती उपाय योजना करता येणे अगदी शक्य आहे. माझ्याठायी तशी पूर्ण खात्री आहे. फक्त त्या अडचणींतून काही युक्तिप्रयुक्ती करूनच मार्ग काढावा लागणार आहे आणि त्याच विचारात माझा बराच वेळ गेला, हे मात्र खरे आहे.”

कृष्णाचे बोलणे संपता संपताच द्रौपदीने बोलावयास सुरूवात केली.

“अरे कृष्णा, ज्या अर्थी तुला संभाव्य अडचणींची कल्पना आहे त्या अर्थी तुला त्यांच्यावरील उपायही निश्चितच माहित असणार, याची मला तरी पूर्ण खात्रीच आहे. कारण तुझ्याठिकाणी नेहमीच प्रत्येक अडचणीवरती उपाय असतो आणि प्रत्येक शंकेलाही उत्तर असते हे मला आत्तापर्यंतच्या अनुभवावरून पूर्णपणे ठाऊक आहे. पण तरीही ज्या अर्थी



तू विचार करायला एवढा वेळ घेतलास त्या अर्थी ती अडचण केवळ बाह्यांगाची नसून जास्त करून भावनिकच असणार, ही गोष्ट माझ्या लक्षात आलेली आहे. एकतर ती भावनिक अडचण माझी होण्याची शक्यता असणार किंवा माझ्यामुळे दुसऱ्या कोणाची तरी होत असणार. परंतु माझ्या बाजूने एका गोष्टीची मी तुला अगदी पूर्ण खात्री देते, की माझी कोणतीही भावनिक अडचण होणार नाही, मी होऊ देणार नाही आणि तरीही तशी ती झालीच, तर मी त्याच्यावरती निश्चितच मात करीन. तेवढे मनोबळ मला तुझ्यावरील प्रेमामुळे व श्रद्धेमुळे नक्कीच प्राप्त झालेले आहे आणि माझ्या जीवनात तुला कायमचे स्थान देण्यासाठी तेवढी किंमत जर मला मोजावी लागणार असेल, तर त्यासाठी माझ्या मनाची पूर्ण तयारी आहे. परंतु माझ्या जीवनात तू बाह्यांगानेही प्रत्यक्ष हवास म्हणजे हवासच. हा माझा निर्णय व निश्चय कायम आहे. त्यात कधीही बदल होणे शक्यच नाही आणि तूही हे पूर्णपणे ओळखून आहेस. कृष्णा, आता माझ्यामुळे दुसऱ्या कोणाची काही भावनिक अडचण होणार असेल किंवा कोणी काही अडचणीमध्ये येणार असेल, तर मात्र माझा इलाज नाही. ती गोष्ट तूच ठरवायची आहेस. त्यावरील उपायही तूच काढावयाचा आहेस आणि निर्णयही तूच घ्यायचा आहेस.

अरे कृष्णा, या बाबतीतील माझ्या भावना मात्र अगदी स्पष्ट आहेत आणि माझी भूमिकाही अगदी पहिल्यापासूनच निःसंदिग्ध आहे. त्यात तिळमात्रही बदल झालेला नाही. अर्जुनाशी विवाह हे माझे साध्य नसून ते माझे साधन आहे आणि कृष्णा, तुझे माझ्या व्यक्तिगत जीवनातील कायमचे स्थान हे माझे ध्येय आहे. त्यासाठी मी जीवनात कोणतीही तडजोड करायला तयार आहे. मला बाह्य लौकिक, धनदौलत, ऐषआराम वा मानसन्मान यांची अजिबात आवड नाही. तर मला एकीएक तूच हवा आहेस. त्याकरीता कोणताही त्याग करायला मी मागेपुढे पहाणार नाही हे अगदी निश्चित आहे. कृष्णा, मी तुला हेही स्पष्टपणे सांगते की अर्जुनाच्या जीवनात मला प्रथम व मुख्य स्थान नाही मिळाले तरी

चालेल. त्याला माझी मुळीच हरकत नाही. पण माझ्या जीवनात मात्र कायम तुझेच प्रथम व मुख्य स्थान असेल ही गोष्ट निर्विवाद आहे. मला तर एका गोष्टीची पूर्ण खात्री वाटते की 'काय करायचे आहे' याचा निर्णय तुझा झालेलाच आहे. फक्त 'कसे करायचे' याविषयी तुझ्या मनात विचार चालू असणार. तेव्हा आता जराही अनमान न करता मला सर्व काही निःसंदिग्धपणे सांगण्याचे कर बघू.

कृष्णा, योग्य तो निर्णय घेण्याचे बळ तुझ्यापाशी आहे याची मला पूर्ण खात्री आहे. कारण तू भावनेबरोबरच सर्वांच्या हितालाही महत्त्व देतोस आणि त्यांचा योग्य तो मेळही तूच घालू शकतोस. त्यामुळेच मी तुझाच विश्वास धरून आहे आणि तुझाच निर्णय हा माझ्यासाठी अंतिम आहे. तेव्हा तू काहीही अनमान न करता अगदी मोकळेपणाने काय ते ठरव आणि एकदा का तू एखादी गोष्ट करायची ठरवलीस, की मग ती गोष्ट कशी करायची हे तुला कोणीही सांगण्याची गरजच नाही, ही गोष्ट मला निश्चितपणे ठाऊक आहे. तेव्हा कृष्णा, आता काय करायचे व कसे करायचे हे तूच ठरव."

द्रौपदीच्या विचारपूर्ण व निश्चयात्मक बोलण्याचे कृष्णाला अत्यंत कौतुक वाटले हे त्याच्या मुखावरील भावातून अगदी स्पष्टपणे प्रगट होत होते. तेच कौतुक कृष्णाच्या बोलण्यातूनही व्यक्त होऊ लागले.

"अगं द्रौपदी, तुझी विचारसरणी अत्यंत स्पष्ट व स्वच्छ आहे आणि तुझा मनोनिग्रहही अत्यंत कौतुकास्पद आहे. तुझा निर्णय व निश्चय हा कशानेही बदलत काय जराही हलतसुध्दा नाही आणि म्हणूनच तुला सर्वांगाने साहाय्य करण्याचे बळ मला प्राप्त होते. तुझ्या या ठाम भूमिकेमुळेच माझ्याठायीचे तुझ्याविषयीचे व्यवधान नित्य जागृत असते आणि म्हणूनच माझ्याकडूनही तुझ्या जीवनाचा विचार सतत घडत असतो. मुख्य अडचण ही बाहयांगाची आहे आणि ती आहे प्रत्यक्ष अर्जुनाच्या जीवनासंबंधीची. तुझ्याठिकाणी अर्जुनाविषयी काय व किती माहिती आहे हे मला माहित नाही. परंतु अर्जुन व त्याचे इतर सर्व पांडव


बंधू हे सध्या अतिशय कठीण परिस्थितीतून जात आहेत. जन्माने राजपुत्र असूनही पांडवांना त्यांच्या हक्काचा मानसन्मान मिळू शकत नाही. एवढेच नव्हे, तर ते त्यांचा चुलत बंधू असलेला दुर्योधन याच्या द्‌वेषमत्सराचे लक्ष्य ठरलेले आहेत. दुर्योधनाच्या दृष्टीने पांडव हे त्याच्या यशोमार्गातील काटा आहेत आणि म्हणून दुर्योधनाने त्यांना हरेक प्रयत्नाने नेस्तनाबूत करण्याचा चंगच बांधला आहे. अर्थात् पांडव हे पुण्यशील आहेत तसेच पराक्रमीही आहेत. त्यामुळे दुर्योधनाच्या मनातील कुटील हेतू साध्य होण्याची शक्यता सुतरामही नाही. परंतु सध्या तरी पांडवांचा विपत्काळ चालू आहे ही गोष्ट खरीच आहे. माझ्याठिकाणी पूर्ण खात्री आहे की पाचही पांडव हे या दुष्टचक्रातून सुखरूपपणे सुटतील आणि त्यांना त्यांच्या हक्काचे सर्व वैभव व सर्व ऐश्वर्य निश्चितपणे प्राप्त होईल. पण सध्यातरी पांडवांचे जीवन सुखाचेच काय, पण स्वास्थ्याचेही नाही ही वस्तुस्थिती आहे. ते प्राप्त होण्यासाठी आणखी किती काळ जावा लागेल याची काहीच शाश्वती नाही आणि निश्चितीही नाही. अशा परिस्थितीत तुला अर्जुनाशी विवाह करायला सांगणे हे मलाही अवघडच होत आहे. कारण तुझ्या भावी जीवनात तू कमीत कमी सुखाची व स्वास्थ्याची अपेक्षा करणे अगदी साहजिकच आहे. त्यात काही चुकीचे आहे असे म्हणताच येणार नाही. म्हणूनच अशा परिस्थितीत तुझ्यासमोर अर्जुनाशी विवाह करण्याचा प्रस्ताव मांडणे हे मला तरी प्रशस्त वाटत नाही आणि ते मुळात योग्यही नाही. तुझ्या मातापित्याची तर याला कधीच संमती मिळणे शक्य नाही, हे तर अगदी उघड आहे."

कृष्णाच्या बोलण्यावर द्रौपदी थोडावेळ काही बोलली नाही. त्या न बोलण्यातून द्रौपदीच्याठायीची विचारमग्नता लक्षात येत होती आणि ते तिच्या स्वभावाला अगदी धरूनच होते. उतावीळपणा वा उथळपणा हा तिचा स्वभावच नव्हता. प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक करणे व बोलणे हा जणू तिचा मूळ पिंडच होता. म्हणूनच तिच्या वागण्या-बोलण्यात नेहमीच

एक प्रकारची निश्चयात्मकता असे. त्याच निश्चयात्मकतेने द्रौपदीने कृष्णाशी बोलावयास सुरुवात केली.

“कृष्णा, तुझ्याठिकाणी माझ्याविषयी किती सर्वांगीण व्यवधान आहे या जाणीवेने माझे मन तर तुझ्या प्रेमाने व माहात्म्याने अगदी भरून येते. तुझ्याठायी माझ्या जीवनाचा व हिताचा अत्यंत खोलवर विचार आहे आणि म्हणूनच माझ्याविषयी काहीही निर्णय घेताना तू सर्व शक्याशक्यतेचा शंभर वेळा विचार करीत असतोस हे माझ्याही लक्षात येते. माझ्याविषयी एवढा व असा विचार करीत असताना नाही म्हटले तरी तुझ्याही मनाला केवढा तरी ताण येत असणार हे अगदी साहजिकच आहे. परंतु माझ्यावरील आत्यंतिक प्रेमापोटीच तू हे सर्व निभावून नेतोस हेही मी जाणून आहे. खरोखरी मी तुझी शतशः ऋणी आहे एवढेच मी तुला अत्यंत कृतज्ञतापूर्वक सांगू शकते. त्या ऋणातच मी जन्मभर राहू इच्छिते. माझ्याकडे यापेक्षा जास्त दुसरे शब्दच नाहीत.

कृष्णा, मी तुला मागेच सांगितल्याप्रमाणे अर्जुन किंवा पांडव यांच्याविषयी मला जास्त किंवा तपशीलवार माहिती नाही आणि जी काही माहिती आहे तीही केवळ ऐकूनच आहे. मुख्य म्हणजे मी पांडवांकडे आणि विशेषतः अर्जुनाकडे पहाते ते केवळ तुझ्या दृष्टीतून. त्यामुळे तू त्यांच्याकडे ज्या दृष्टीने पहातोस तीच दृष्टी मला प्रमाणभूत आहे. व्यक्तीचे व परिस्थितीचे तू करीत असलेले मूल्यमापन हेच मला आधारभूत आहे. माझ्यासाठी तरी दुसरे कोणतेच परिमाण नाही. एक गोष्ट मी निश्चितपणे जाणून आहे की धनदौलत किंवा सर्व सुखोपभोग या बाह्य गोष्टी केवळ दैवाधीन आहेत. ज्याच्या त्याच्या प्रारब्धानुसार ज्याला त्याला या सर्व गोष्टी जेव्हा व जेवढ्या मिळायच्या आहेत त्या तेव्हा व तेवढ्या मिळणारच आहेत. त्या गोष्टींवर कदाचित बाह्यांगाचे सुखदुःख अवलंबून असेलही, परंतु मनाची शांती व समाधान, या जीवनातील सर्वात महत्त्वाच्या गोष्टी मात्र अत्यंत वेगळ्या आहेत आणि त्या मात्र कोणत्याही बाह्य गोष्टींवरती मुळीच अवलंबून नाहीत.



कृष्णा, सदाचारी व सत्प्रवृत्तीच्या व्यक्ती या तर अतिशय दुर्मिळच आहेत आणि म्हणूनच त्या अत्यंत मूल्यवानही आहेत. त्यांचे मूल्य मला तरी तुझ्याच सांगण्यावरून कळले आहे आणि अगदी पटलेही आहे. माझ्या दृष्टीने त्याहूनही सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, ज्यांनी त्यांच्या जीवनात कृष्णा, तुला प्रमुख स्थान व प्रमुख भूमिका दिली आहे त्यांचे मूल्य तर अमूल्यच आहे. कारण यापेक्षा कोणतीही भाग्याची गोष्ट या जगात असणे शक्य नाही याची मला पूर्ण खात्री आहे. तुझे सख्यत्व एकीकडे आणि बाकी सर्व जग दुसरीकडे, तर तुझ्या सख्यत्वाचेच पारडे भारी व जड आहे हे मी स्वानुभवाने सांगते. माझी ही भूमिका अत्यंत निःसंदिग्ध व निश्चयात्मक आहे. त्यासाठी मग मी कोणाच्याही म्हणजे अगदी माझ्या मातापित्यांच्या विरोधालाही जुमानणार नाही हे निश्चित. परंतु तशी वेळ येणार नाही याचीही मला खात्री आहे. कारण मी तुझाच भरवसा धरलेला आहे आणि तू माझ्यावर तशी वेळ येऊ देणार नाहीस, हेही तेवढेच खरे आहे. तेव्हा आता तू पुन्हा पुन्हा नवीन नवीन प्रश्न निर्माण करून माझी कसोटी घेण्याचा प्रयत्न करू नकोस. माझा जो काही कस लागायचा असेल तो माझ्या पुढील जीवनात लागेलच आणि तेव्हा तुझ्यावरील प्रेमाने व श्रद्धेने मी सर्व प्रसंगातून तुला माझ्या जवळच नित्य ठेवीन असा माझा पूर्ण विश्वास आहे."


द्रौपदीच्या बोलण्याने कृष्णही अगदी निरूत्तरच झाल्यासारखा दिसला आणि कृष्णाला त्याचा अत्यंत आनंदच झाला. कारण कृष्ण द्रौपदीला जेवढ्या जेवढ्या संभाव्य व प्रत्यक्ष अडचणी दाखवत होता, तेवढा तेवढा द्रौपदीचा निश्चय अधिकाधिक दृढच होत होता. त्याला एकच कारण होते की द्रौपदी एकीएक तिच्या ध्येयालाच महत्त्व देत होती आणि तिचे ध्येय होते, तिच्या जीवनात सदासर्वकाळ कृष्णाचे प्रत्यक्ष अस्तित्व असणे. पण त्या ध्येयाच्या साध्यासाठी आवश्यक असणाऱ्या साधनांची सर्व जबाबदारी द्रौपदीने कृष्णावर पूर्णतः सोपवली होती. ही तिची कृष्णावरील अलोट श्रद्धा व कृष्णावरील तिचे अपार प्रेम हीच

द्रौपदीची बलस्थाने होती आणि त्या बळाचीच कसोटी द्रौपदीच्या पुढील जीवनात लागणार होती. त्याची ही तर नुसती सुरूवात होत होती.”

* * *

एवढा वेळ स्वस्थ चित्ताने श्रवण करीत असलेल्या लक्ष्मीला शेवटी राहवलेच नाही. तिने हाताच्या खुणेनेच नारदाला थांबण्याची विनंती केली. अर्थातच भक्तिगायनात तन्मय झालेल्या नारदाला ती खूण कळावयास जरासा वेळ लागलाच. परंतु शेवटी त्याचे लक्ष वेधून घेण्यात लक्ष्मीला यश मिळालेच. नारदाने त्याचा वचनौघ आवरून धरला आणि तो लक्ष्मीकडे प्रश्नार्थक नजरेने पहात राहिला. लक्ष्मीनेही तिचे नेत्र क्षणभर मिटून घेतले. बहुधा लक्ष्मी तिच्या मनातील विचारांची योग्य प्रकारे जुळवाजुळव करीत असावी, असे तिच्या मुखाकडे पहात असताना जाणवत होते. पण लक्ष्मीने लगेचच बोलावयासही सुरूवात केली.

“अरे नारदा, तुझ्या बोलण्याने माझ्या मनातील विचारचक्राला गती तर नक्कीच मिळते. परंतु काहीवेळा त्या विचारांची योग्य दिशा राखणे मला कठीण होऊ लागते. कारण तू सांगत असलेला विषय हा बाह्यांगाने वाटतो तेवढा सरळ व सोपा नाही हे माझ्या लक्षात आलेले आहे. कारण नाही म्हटले तरी हा विषय भावनिक आहे आणि भावना म्हटले की मन हे आलेच. त्या मनाला डावलून तर काही करताच येत नाही आणि मनाची योग्य समज करून देणे हे वाटते तेवढे सोपे नाही. पण त्या मनाची समजूत घालणे हे तर आवश्यकच आहे. म्हणूनच श्रवण करीत असताना थोडा वेळ थांबणे माझ्यासाठी अत्यंत जरूरीचे झाले. तू सांगत असलेला प्रसंग व त्यानिमित्त प्रगटणारा विषय जसा महत्त्वाचा आहे तसाच तो अत्यंत सूक्ष्म आहे. त्यासंबंधी कितीही ऐकले तरी आणखीन ऐकावेसे वाटते आणि कितीही बोलले तरी अधिक बोलावेसे वाटते. परंतु त्यातून मनाठायी अधिक गुंता होणार नाही याचीही काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे व आवश्यक आहे.




नारदा, साध्य व साधन हा विषयही तसाच अत्यंत सूक्ष्म आहे. सिद्धांत म्हणून गोष्टी ऐकायला बऱ्या वाटतात व पटतातही. परंतु प्रत्यक्ष तसा कोणी खरेच अनुभव घ्यायला लागतो तेव्हा मात्र मनाची तारांबळ उडते. कारण येथे साधन म्हणून केवळ जड वस्तू नसतात तर हाडामासाच्या व्यक्ती असतात आणि व्यक्ती म्हटले की मन आले. मन म्हटले की भावना आल्या आणि भावना म्हटल्या की भावनांचा गुंता हाही आलाच. त्यामुळेच मग मनाची चलबिचलही सुरू होतेच. अर्जुनाशी विवाह करायला तयार होण्यामागे द्रौपदीची जी भूमिका आहे त्याचा विचार करताना, माझे मनही थोडेसे साशंक होऊन जरासे हललेही आहेच. कारण येथे तर द्रौपदी उघड उघडपणे मान्य करीत आहे की केवळ कृष्णाला जीवनात प्रथम स्थान देण्यासाठीच, ती अर्जुनाशी विवाह करायला तयार होत आहे. प्रत्यक्ष अर्जुनाला तर तिने पाहिलेलेही नाही. म्हणजे द्रौपदी तर फक्त स्वतःचीच सोय पहात आहे. समजा, अर्जुनाच्या जीवनात कृष्णाला काहीच स्थान नसते तर मला असे निश्चित वाटते की द्रौपदीने अर्जुनाशी विवाह करायला कधीच संमती दिली नसती. त्यामुळेच द्रौपदीचा हा निर्णय अर्जुनावर थोडासा अन्यायच करणारा आहे असे मला तरी जाणवते. व्यक्ती म्हणून अर्जुनाचीही काही गुणवत्ता ही असणारच ना? द्रौपदीच्या दृष्टीने त्याला काही किंमत होती की नाही? कारण शेवटी द्रौपदीला प्रत्यक्ष जीवन अर्जुनाच्या बरोबर जगायचे होते, ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा द्रौपदीला अर्जुन पसंत असणे हेही तेवढेच आवश्यक होते ना? नाहीतर तो अर्जुनावरही अन्यायच ठरला असता. कारण कृष्णप्रेम जरी असले तरी त्या प्रेमामुळे मनपसंत नसलेल्या पतीबरोबर जीवन जगणे हे द्रौपदीला आणि अर्जुनालाही कितपत सुखावह होणार होते, हाही एक महत्त्वाचा मुद्दा आहेच ना? की नाही?”

लक्ष्मीचे बोलणे नारदही अत्यंत लक्षपूर्वक व गंभीरपणे ऐकत होता. लक्ष्मीच्या भावनात्मक बोलण्यामागील असलेली एक प्रकारची तळमळ नारदाला निश्चितच जाणवत होती. लक्ष्मीच्या मनाची अस्वस्थताही

नारदाच्या लक्षात आलेली होती. पण नारद मात्र स्वस्थचित्त होता. त्यामुळेच अतिशय शांतपणे त्याने लक्ष्मीशी बोलावयास सुरुवात केली.

“हे लक्ष्मी, तुझे बोलणे सकृत् दर्शनी जरी बरोबर दिसत असले तरी ते पूर्णपणे मात्र खरे नाही. कोणीही पती वा पत्नी म्हणून जेव्हा आपला जोडीदार निवडतो तेव्हा स्वतःच्या आवडी व अपेक्षा प्रमाण मानूनच तो जोडीदार ठरवत असतो, हे तर खरेच आहे ना? आणि ते तर अगदी योग्यच आहे. परंतु सर्वांच्याच सर्व अपेक्षा पुऱ्या होणे हे तर कधीही शक्यच नसते. मग निवड करताना प्राधान्य ठरवावे लागते आणि मग त्यासाठी काही ना काहीतरी तडजोड करणे हेही आवश्यकच व अटळच ठरते ना? सर्वसाधारणपणे जोडीदार ठरवताना रूप, गुण, धन व सत्ता यांचा निकष लावला जातो. पण त्या निकषाला कोणीही शंभर टक्के उतरू शकत नाही आणि अर्थात तसा कोणी उतरू शकणारही नाही. मग जोडीदाराची निवड करताना या अपेक्षांची जास्तीत जास्त पूर्ती करणाऱ्या जोडीदाराला पसंती दिली जाते आणि त्याचा पती वा पत्नी म्हणून स्वीकार केला जातो. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही तडजोड उभयपक्षी असते. त्यामुळे कोणीही कोणावर उपकार करण्याचा वा अन्याय करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. अर्थात् अशी तडजोड ही मनातल्या मनातच ठेवून आणि त्याची अजिबात वाच्यता न करताच प्रत्येक जण एकमेकांचा स्वीकार करीत असतो, ही गोष्ट महत्त्वाची आहे.

लक्ष्मी, द्रौपदीने पतीची निवड करताना रूप, गुण, धन व सत्ता यांच्याबरोबरच त्याच्या जीवनात कृष्णाचे स्थान काय व किती आहे या गोष्टीला प्रथम प्राधान्य दिले होते. त्यासाठी ती इतर कोणतीही तडजोड करायला तयार होतीच, पण त्याविषयी मात्र कोणतीही तडजोड करायला ती तयारच नव्हती. हा तिचा वैयक्तिक निकष व निर्णय होता. त्यातूनही त्या व्यक्तीच्या जीवनातील कृष्णाचे प्रत्यक्ष स्थान काय आहे हा अनुभव कृष्णाचा हवा, ही गोष्ट द्रौपदीच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाची होती. त्यामुळेच अर्जुनाच्या जीवनात तसे स्थान कृष्णाचे आहे असे खुद्द




कृष्णानेच म्हटल्यावरती ती गोष्ट द्रौपदीसाठी अर्जुनाची सर्वात मोठी गुणवत्ता ठरली होती. बाकी अर्जुनाचे रूप, गुण, धन व सत्ता या गोष्टीही तिच्यासाठी महत्त्वाच्या होत्याच. त्यांना ती डावलत नव्हतीच. परंतु द्रौपदीने त्यासंबंधीचा सर्व भार व निर्णय कृष्णावरील अलोट श्रद्धेने कृष्णावरतीच पूर्णपणे सोपवला होता आणि कृष्णाच्या ठायीही या सर्व गोष्टींविषयी योग्य तो विचार होताच. कृष्णाने कोणतीही भलतीसलती व्यक्ती द्रौपदीसाठी पती म्हणून निवडली तर नसतीच, पण त्याचे नावही सुचवले नसते. तेव्हा, अर्जुनाच्या जीवनातील कृष्णाचे स्थान हा अर्जुनाच्या जीवनाचाही अविभाज्य असाच भाग होता. त्यापासून अर्जुनाला वेगळा मानणे वा करता येणे शक्यच नव्हते आणि त्यालाच द्रौपदीने प्राधान्य दिले हे योग्यच केले. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे द्रौपदीसारखी, कृष्णावरती अत्यंत प्रेम व श्रद्धा असलेली पत्नी अर्जुनाला जोडीदार म्हणून मिळाल्यावरती त्याच्याही कृष्णावरील प्रेमाला व श्रद्धेला जोड व बळकटीच मिळणार होती आणि कृष्णही ते जाणून होता. अर्जुनासाठी ती केवळ भाग्याचीच गोष्ट नव्हती तर त्याला ते एक वरदानच ठरणार होते. होय की नाही?

हे लक्ष्मी, कृष्णाच्या ठायी द्रौपदीविषयी जेवढी काळजी होती तेवढीच काळजी अर्जुनाविषयीही होती ही गोष्ट नीटपणे व कायमची लक्षात ठेव. कारण अर्जुन हा कृष्णाचा परममित्र होता आणि खरे सांगायचे झाले तर कृष्णाच्या दृष्टीने अर्जुन हा त्याचा अत्यंत आवडता असा, पण एक जीवच होता. त्यामुळे कृष्णाठायी अर्जुनाच्या खऱ्या कल्याणाची खरी काळजी होती. अर्जुनाच्या जीवनात त्याला केवळ पत्नीची नव्हे तर त्याचबरोबर एका सहधर्मचारिणीची जरूरी होती आणि त्याचीच पूर्ती द्रौपदीच्या रूपाने निश्चितपणे होत होती याची कृष्णाला पूर्णपणे खात्री होती. म्हणूनच अर्जुन व द्रौपदी यांची सांगड कृष्ण जुळवत होता.”

नारदाच्या बोलण्याचा अपेक्षित व योग्य तो परिणाम लक्ष्मीवरती झाला होता. तिचे मनही एकदम स्थिर झाले होते. लक्ष्मीच्या मनात आत्तापर्यंत जे काही वैचारिक मंथन चालू होते ते आता थांबले होते आणि त्यातून निघालेल्या सम्यक बोधाने लक्ष्मीचे मन शांत होऊन सुखावलेही होते. परंतु त्या सुखातच रमून न राहता लक्ष्मी सावधही होती. कथा व निरूपण यांची असलेली परस्पर सांगड लक्ष्मी जाणत होती. त्यामुळे नारदाचे कथेवरील निरूपण ऐकून जसे लक्ष्मीच्या मनाचे समाधान झाले तसेच पुढील कथाभाग श्रवण करण्याची तिची उत्सुकताही अत्यंत वाढून राहिली होती. मनाच्या अशा समतोल अवस्थेमधूनच लक्ष्मीने नारदाला उद्देशून बोलावयास सुरूवात केली.

“अरे नारदा, सगुण चरित्रकथा व त्यावरील निरूपण यांची अत्यंत अद्भुत अशी सांगड सगुण चरित्रामध्ये असते आणि अशी चरित्रे ही तर तुझ्या अंतःकरणाठायी स्फुरून प्रगट होत असतात. म्हणजे त्याद्वारे खरे तर तुझ्याच अंतःकरणाची अवस्था प्रगट होत असते ही गोष्ट मी पूर्णपणे जाणून आहे. कथाप्रसंग वर्णन करून सांगत असताना तुझ्या अंतरंगातील सगुणप्रेमाचे अनेक नानाविध मनोहारी रंग उत्स्फूर्तपणे प्रगट होऊन जेवढे मनाला सुखवीत व आकर्षित करीत असतात, तेवढेच त्यावरील तुझे निरूपणही तुझ्या अंतःकरणातील अत्यंत तरल व सूक्ष्म अवस्था प्रगट करून तुझ्या अनुभवाच्या सखोल अवस्थेकडे निर्देश करीत असते. माझ्या दृष्टीने तीच सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. कारण त्यामुळेच माझेही मन सगुण प्रेमाने भरून हलके होते आणि माझी मुळातील जडबुद्धी हळूहळू सूक्ष्मबुद्धी होऊ लागते. त्यामुळेच ईश्वरी अनुभवाने परिपूर्ण असलेले तुझे अंतःकरण जाणण्याची माझ्या बुद्धीची क्षमताही वाढत रहाते आणि तसाच अनुभव घेण्याचा ध्यासही माझ्या चित्ताठायी जडून रहातो.

नारदा, तुझ्या मुद्देसूद विषय मांडणीमुळे माझ्याठायीच्या संदेहाचे मूळच नाहीसे झाले आहे आणि तेथे कोणत्याही प्रकारच्या शंकेला मुळी वावच उरलेला नाही. कृष्णाशिवाय अर्जुनाचे जीवनच नव्हते आणि




द्रौपदीला कृष्णाशिवायचे जीवनच नको होते. तेव्हा अर्जुन व द्रौपदी यांनी विवाह करून एकत्रितपणे सहजीवन जगणे हे अगदी योग्यच होते. कारण तसे ते अर्जुन व द्रौपदी या दोघांनाही अत्यंत आवश्यक होते आणि त्यांच्या कृष्णाविषयीच्या भावाला साजेसेही होते. त्यामुळे अर्जुन व द्रौपदी या दोघांनाही कृष्णाचा सहवास व प्रेमसंग करण्याची संधी व अनुकूलता लाभणार होती, हेही खरेच आहे. परंतु आता एक सर्वात महत्त्वाचा प्रश्न शिल्लक रहातो की हे सर्व घडले कसे आणि कृष्णाने हे सर्व साधले कसे? त्यासाठी कृष्णाला अनेक गोष्टी जुळवून आणाव्या लागल्या असणार आणि अनेकांच्या मनाची समजूतही घालावी लागली असणार, हे तर नक्कीच आहे. कारण अर्जुन व द्रौपदी यांच्या विवाहाचा प्रस्ताव सर्वांनाच मानवला असणे तर शक्यच नाही. खुद्द अर्जुनालाही ही विवाहाची सूचना कितपत मान्य झाली असती? केवळ कृष्ण सांगतो म्हणून द्रौपदीशी विवाह करण्यासाठी अर्जुन मनापासून तयार झाला असता का? कारण अर्जुनाठायी जर द्रौपदीविषयी काही स्वतंत्र भावना नसती आणि तरीही निव्वळ कृष्णाच्या शब्दासाठी जर त्याने द्रौपदीशी विवाह केला असता तर त्याला व अगदी द्रौपदीलाही त्यांच्या वैवाहिक जीवनात किती व कसे काय सुख लाभले असते? असे अनेक प्रश्न जर माझ्या मनात येत आहेत तर ते कृष्णाठायीसुद्धा निश्चितच आले असणार. पण कृष्णाने या सर्व प्रश्नांची उत्तरे कशी शोधून काढली आणि या सर्व अडचणींतून कसा मार्ग काढला ही सर्व कथा श्रवण करण्याची माझी उत्कंठा, आता अतिशय वाढून राहिलेली आहे. तरी तू त्याची त्वरित पूर्ती करण्याची कृपा करावीस अशी मी तुला अत्यंत प्रेमपूर्वक विनंतीच करते.”

लक्ष्मीच्या बोलण्यावरती नारद क्षणभर स्तब्ध राहिला. पण पुढच्याच क्षणी त्याच्या भावपूर्ण अंतःकरणाला व्यक्त होण्यासाठी माध्यम होणारा शब्दप्रवाह वेगाने वाहू लागला.

“लक्ष्मी, तुझे म्हणणे अगदी खरे आहे. कृष्णाने जरी ठरवले तरी अर्जुन व द्रौपदी यांचा विवाह होण्यात प्रत्यक्षात अनेक अडचणी होत्याच.

द्रौपदीच्या मातापित्यांची समजूत घालणे जसे कठीण होते, तसेच अर्जुनाची संमती मिळवणेही जरी सोपे नव्हते तरी ते तेवढेसे कठीणही नव्हते. अर्जुन हा कृष्णाचे माहात्म्य जाणत नसल्यामुळे द्रौपदीच्या सहवासामुळे त्याला होणाऱ्या लाभाचे महत्त्वही त्याच्या लक्षात आलेच नसते. तसेच पत्नी व सहधर्मचारिणी यातील फरकही अर्जुनाला यथार्थपणे कळणे कठीण होते. परंतु कृष्णाच्या मैत्रीखातर व कृष्णाच्या प्रेमाग्रहासाठी अर्जुन द्रौपदीशी विवाह करायला नक्कीच तयार झाला असता आणि कृष्णही हे जाणून हेता. पण कृष्णाला तसे करायचे नव्हते. त्याला सर्व गोष्टी अगदी सहजपणे घडून यायला हव्या होत्या. निदान बाह्यांगाने तरी तसे दिसायला हवे होते. कारण अर्जुनाच्या कुटुंबियांचाही प्रश्न कृष्णाच्या नजरेसमोर होताच. अशा तऱ्हेने सर्वांची काळजी कृष्णाच्या ठायी होती. कोणाच्याही भावना न दुखावता सर्वांच्या भावनांचा योग्य आदर ठेवून, कृष्णाला या सर्वातून मार्ग काढायचा होता आणि कृष्णच तो, त्याने तसा मार्ग काढलाच!” असे म्हणून नारदाने लक्ष्मीकडे नजरेचा कटाक्ष टाकला.

* * * * *



# द्रौपदी स्वयंवराची योजना

लक्ष्मीची उत्कंठा अगदी शिगेला पोहोचलेली आहे आणि आता तिची उत्सुकता जास्त ताणणे योग्य नाही हे ओळखून नारदाने त्याचा आवरून धरलेला शब्दप्रवाह पुन्हा मोकळा केला.


“लक्ष्मी, कृष्णाने मनाशी काही विचार करून निश्चित योजना ठरवली आणि त्याने द्रौपदीचा पिता द्रुपद याची भेट घेतली. कृष्ण आलेला पहाताच द्रुपदाने अत्यंत आदरपूर्वक व प्रेमाने त्याचे स्वागत केले आणि त्याला स्वतःच्याजवळ मंचकावर बसवले. कृष्णाने काही बोलणे करायच्या आतच द्रुपदाने कृष्णाशी बोलायला सुरुवात केली.

“अरे कृष्णा, तुझे आगमन श्रावणात वर्षणाऱ्या जलधारांप्रमाणे मनाला सुखद गारवा व आनंदाचा शिडकावा देणारे असते. मनात काही काळजी असेल तर ती तुला पाहिल्याबरोबर एकदम नाहीशीच होते. तुझ्या रूपाने सर्व अडचणींवरचा जणू उपायच हाताशी आला आहे असे वाटते. ज्याच्यापाशी मन मोकळे करावे अशी अत्यंत प्रेमाची व्यक्तीच जणू तुझ्या रूपाने भेटली आहे याची अगदी खात्री पटते. तुझे प्रसन्न व्यक्तिमत्त्व पाहून सर्व मनोवृत्ती अत्यंत उल्हसित होतात आणि मनाच्याठिकाणी एकप्रकारचा उत्साहच निर्माण होतो. आज बरेच दिवसांनी तुझी भेट होत आहे आणि त्यामुळे खरे तर, मला माझ्या मनातील अनेक गोष्टी तुझ्याशी मोकळेपणाने बोलायच्या आहेत. परंतु राज्यकारभार वा राजकारण या सर्व गोष्टी सध्या बाजूला ठेवूया. अर्थात् त्या गोष्टी महत्त्वाच्या आहेतच. परंतु त्यासंबंधी एरव्ही केव्हातरी सावकाशपणे व सविस्तरपणे बोलता येईल. आज मला तुझ्याशी काही व्यक्तिगत व कौटुंबिक गोष्टींविषयी बोलावयाचे आहे. त्या सर्व गोष्टी मी केवळ तुझ्याशीच बोलू शकतो. त्याला कारण आहे तुझे आमच्या कुटुंबात

असलेले प्रेमाचे स्थान. आम्ही सर्वच कुटुंबिय तुला आमच्यापैकीच एक समजतो आणि तसेच तुझ्याशी वागतोही. तुझ्याविषयी कोणत्याही प्रकारची परकेपणाची भावना आमच्या मनात उद्भवणे हे केव्हाही संभवतच नाही. आमच्या कुटुंबाचा तू केवळ अविभाज्य घटकच आहेस असे नाही, तर तू आमच्या कुटुंबाचा मार्गदर्शकच आहेस आणि खऱ्या अर्थाने कुटुंबप्रमुखही तूच आहेस. आमच्या सर्वांच्या प्रेमाची, श्रद्धेची व खात्रीची अशी सामाईक व्यक्ती एकच आहे आणि ती म्हणजे कृष्णा, तूच आहेस हे अगदी सत्य आहे.

कृष्णा, आज मला तुझ्याशी विशेषत्वाने माझ्या कन्येविषयी म्हणजे अर्थातच द्रौपदीविषयी बोलावयाचे आहे. द्रौपदीची तुझ्यावर असलेली पराकोटीची श्रद्धा व तुमचे दोघांचे असलेले अत्यंत प्रेमाचे व जवळीकतेचे संबंध याची मला जाणीव आहे आणि मला त्याचा अतिशय आनंद आहे. द्रौपदीच्या मनात तुझ्याविषयी काय भाव आहे आणि तिच्या अंतःकरणात तुला काय स्थान आहे, हेही मी जाणून आहे. तुझे खरे माहात्म्यही द्रौपदीच जाणून आहे. त्याविषयी आम्ही बरेचसे अनभिज्ञच आहोत. अशा द्रौपदीसंबंधी आता काय निर्णय घ्यावा, हाच माझ्यापुढील सध्याचा मोठा प्रश्न आहे.

कृष्णा, एक गोष्ट तुझ्याही लक्षात आलीच असेल की द्रौपदी ही आता उपवर झालेली असून तिच्या विवाहाच्या दृष्टीने विचार करण्याची वेळ आलेली आहे. द्रौपदीसाठी पती म्हणून योग्य वर शोधण्याची जबाबदारी तशी थोडीशी कठीणच आहे. द्रौपदीचे व्यक्तिमत्त्व व गुणवत्ता या दोहोंना साजेसा पुरूष मिळणे, हेच मुळात वाटते तेवढे सोपे नाही. त्यातूनही द्रौपदीच्या स्वभावात असलेला बाणेदारपणा व तेजस्विता तूही जाणून आहेस. त्यामुळेच तिच्या स्वभावाशी मिळती जुळती असलेली आणि द्रौपदीला सांभाळून घेणारी अशीच व्यक्ती तिच्या जीवनात पती म्हणून येणे अत्यंत आवश्यक आहे. तरच तिचे व तिच्या पतीचेही सर्व जीवन सुखावह व स्वास्थ्याचे होईल. कृष्णा, याच बाबतीत मला तुझ्याशी



बोलून विचारविनिमय करायचा होता आणि तुझे मार्गदर्शनही घ्यायचे होते. द्रौपदीला आमच्यापेक्षा तूच जास्त जवळून ओळखतोस. त्यामुळेच तिचे मनोगतही तुलाच अधिक ठाऊक आहे. द्रौपदी तिच्या मनातील सर्व काही तुलाच मोकळेपणाने सांगत असणार याची मला पूर्ण खात्री आहे. तेव्हा द्रौपदीच्या विवाहासंबंधी आपण आता काय व कसे करावे हे तूच सांग.”

द्रुपदाच्या बोलण्यावरती कृष्णाने मंदस्मित करून प्रतिसाद दिला आणि बोलावयास सुरुवात केली.


“अहो द्रुपद महाराज, द्रौपदीविषयी तुमच्या मनातील विचार अगदी योग्यच आहे आणि तो विचार योग्य वेळीच आलेला आहे. तुमची कन्या म्हणून तुम्हाला द्रौपदीची काळजी वाटणे जरी साहजिक असले, तरी तुम्ही तिची अजिबात काळजी न करता अगदी निश्चिंत रहा. द्रौपदी ही एक अत्यंत वेगळ्या प्रकारची मुलगी आहे हे खरेच आहे. मीही ती गोष्ट अगदी पहिल्यापासूनच जाणून आहे. परंतु तुम्हीही एक गोष्ट लक्षात ठेवा, या तिच्या वेगळेपणामुळेच द्रौपदीचे पुढील सर्व जीवनही केवळ वेगळेच नाही, तर विशेषही होणार आहे. द्रौपदी ही सामान्य स्त्री नाही आणि त्यामुळे तिचे जीवनही सामान्य असणारच नाही. द्रौपदीच्या पुढील आयुष्यात एखादे वेळेस तिला अनेक कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागेल आणि क्वचित प्रसंगी संघर्षही करावा लागेल. परंतु त्या सर्वांतून द्रौपदीचे जीवन तावून सुलाखून निघेल आणि सुवर्णाप्रमाणे अधिकच उजळून झळाळेल याची तुम्ही पूर्ण खात्री बाळगा.

अहो महाराज, खरे तर आता मी तुमच्याशी द्रौपदीच्या विवाहासंबंधीच बोलण्यासाठी आलो होतो. यासंबंधी द्रौपदीशी झालेल्या बोलण्यामधून तिचे मनोगत मला कळलेले आहे. तिच्या ठायी माझ्याविषयी पूर्ण श्रद्धा आहे हे तुम्हीही जाणून आहातच. द्रौपदीने तिच्या विवाहासंबंधीचा निर्णय पूर्णतः माझ्यावरच सोपवलेला आहे. त्याविषयी विचार करीत असताना माझ्या लक्षात आले, की द्रौपदीचा भावी पती हा

जसा रूपगुणाने युक्त व ऐश्वर्यसंपन्न असावा तसाच तो अत्यंत पराक्रमीही असावा. कारण पराक्रम हाच पुरूषांचा खरा दागिना आहे. एवढेच नव्हे, तर त्यातच त्यांचे खरे पुरूषत्व आहे. पराक्रमानेच पुरूष हा पुरूष म्हणून शोभतो आणि पराक्रम हाच खरा पुरूषार्थ आहे. बाकी रूप, गुण वा धन या सर्व दैवाधीन असलेल्या गोष्टी आहेत. पण पराक्रम हा ईश्वरदत्त आहे. ती ईश्वराची देणगी आहे जी सर्वांनाच मिळते असे नाही. काही भाग्यवंतांनाच ईश्वरी कृपेमुळे त्याचा लाभ होत असतो. एखाद्यापाशी जगातील सर्व सुखे आहेत पण पराक्रम नाही, तर ती सुखे म्हणजे जणू एखाद्या कलेवराला सजवण्यासारखेच आहे. पण पराक्रम असेल तर मात्र जगातील सर्व सुखे प्राप्त करून घेणे सहज शक्य आहे हे अगदी सत्य आहे. तेव्हा असाच पराक्रमी शूरवीर आपल्या द्रौपदीला पती म्हणून लाभावा असे मला अत्यंत मनापासून वाटत आहे. यावर तुमचा काय विचार आहे तो तुम्ही मला अगदी मोकळ्या मनाने सांगण्याचे करावे.”

कृष्णाच्या बोलण्यावरती द्रुपद अत्यंत मोकळेपणाने हसला व म्हणाला,

“अरे कृष्णा, द्रौपदीच्या विवाहासंबंधी तू तर केवढातरी विचार केलेला आहेस, हे तर अगदी स्पष्टपणे दिसत आहे. त्यामुळे खरे तर, मला दुसरा काही वेगळा विचार करण्याचे कारणही नाही आणि तशी जरूरीही नाही. तुझा विचार हा सर्वांगीण असतो आणि त्यामध्येच सर्वांचे हित असते याची मला पूर्ण खात्री आहे. मला वाटते तुझे यासंबंधी द्रौपदीशीही नक्कीच बोलणे झालेले असणार आणि तिने तुला तिची संमतीही निश्चितच दिलेली असणार. धोरण म्हणून तुम्ही घेतलेला हा निर्णय मलाही योग्यच वाटतो आणि माझी त्याला पूर्णपणे अनुमती आहे. परंतु प्रश्न असा आहे की असा पराक्रमी पुरूष कसा व कुठे शोधून काढायचा? असे काही पराक्रमी पुरूष नजरेसमोर येतात खरे, परंतु ते द्रौपदीसाठी अनुरूप आहेत की नाहीत याविषयीही प्रश्नच आहे. कारण



एखादा पुरूष केवळ पराक्रमी असेल पण नीतिमान, सदाचरणी व कुलशीलवान नसेल, तर तो द्रौपदीसाठी पती म्हणून योग्य ठरणारच नाही. अर्थात हे तूही जाणून आहेसच आणि याचाही विचार तुझ्या ठिकाणी असणारच. पण कृष्णा, तुझ्या नजरेसमोर असा कोणी पराक्रमी व द्रौपदीच्या योग्यतेचा पुरूष असेल, तर तू तसे मला अत्यंत मोकळेपणाने सांग. तसे जर असेल आणि त्याच्याविषयी तुझी जर खात्री असेल, तर मग काही प्रश्नच उरत नाही. तुझी निवड ही सुयोग्यच असणार आणि आम्हा सर्वांनाही ती निवड मान्य असणारच.”

द्रुपदाच्या बोलण्यावरती कृष्ण थोडावेळ स्वस्थ राहिला. बहुधा त्याच्या मनातील सर्व विचार कृष्ण योग्य प्रकारे जुळवीत असावा असे त्याच्या मुखाकडे पाहिले असता जाणवत होते. कारण थोड्या वेळातच कृष्णाने पुन्हा बोलावयास सुरुवात केली.

“अहो महाराज, असा कोणताही विवक्षित पुरूष सध्या तरी माझ्या दृष्टीसमोर नाही. मला असे वाटते की असा पराक्रमी पुरूष शोधण्यासाठी आपण द्रौपदीचे स्वयंवर ठरवूया आणि त्यामध्ये असा एक ‘पण’ लावूया, की जो ‘पण’ केवळ एखादा अद्वितीय पराक्रमी पुरूषच जिंकू शकेल. तसे पाहायला गेले तर पराक्रमाची अनेक क्षेत्रे उपलब्ध आहेत. जसे की तलवारयुद्ध, गदायुद्ध, बाणयुद्ध वगैरे. परंतु या सर्वांमध्ये बाणयुद्धातील पराक्रम हा कठीण व म्हणूनच श्रेष्ठ समजला जातो. कारण यामध्ये अत्यंत दूरच्या अंतरावरून लक्ष्याचा वेध घ्यावा लागतो. त्यासाठी केवळ हस्तकौशल्य असून उपयोग होत नाही. त्या जोडीला लक्ष्यावर नजर एकाग्र करता येणे अत्यंत आवश्यक असते. नजर एकाग्र होण्यासाठी मनाची एकाग्रता हवी आणि त्यासाठी चित्ताची स्थिरता असणे अत्यंत महत्त्वाचे असते. म्हणूनच सर्व वीरांमध्ये धनुर्वीर हा सरस व उत्कृष्ट गणला जातो. तेव्हा द्रौपदीच्या स्वयंवरासाठी ‘पण’ लावताना आपण असाच ‘पण’ लावूया की ज्यामुळे या पृथ्वीतलावरील सर्वश्रेष्ठ धनुर्वीर

कोण याचीच जणू ती कसोटी लागेल. मला तरी असेच वाटते. याउपर आपण आपला विचार काय आहे तो सांगावा.”

कृष्णाचे बोलणे संपत असतानाच द्रुपद राजाने कौतुकाने मान डोलवावयास सुरुवात केली होतीच. कृष्णाचे बोलणे थांबल्यावरती मात्र द्रुपदाला राहवलेच नाही आणि त्याने लागलीच बोलावयास सुरुवात केली.

“अरे कृष्णा, तू एकदा बोलायला लागलास ना की तुझे बोलणे ऐकतच रहावे असेच वाटते. तू जेव्हा एखाद्या विषयाची अत्यंत मुद्देसूद मांडणी करतोस तेव्हा त्यामागील तुझी सखोल विचारपूर्वकता जाणवते आणि तुझा मुद्दा लागलीच मनाला पटतोही. मी स्वतः एक राजा असल्यामुळे योद्धाही आहे आणि त्यामुळेच सर्व प्रकारच्या युद्धांची माहिती व युद्धवीरांची महती मी जाणून आहे. सर्व वीरांमध्ये धनुर्वीर हाच सरस आहे हे तुझे म्हणणे अगदी योग्यच आहे. आपल्या बाणाने दूरवरून एखाद्या लक्ष्याचा वेध घेणे ही साधी व सोपी गोष्ट नाही. त्यासाठी केवढा तरी बाह्यांगाचा सराव हा जसा करावा लागतो, तशीच मनाची एकाग्रता होण्यासाठी केवढा तरी अभ्यासही करावा लागतो. धनुर्विद्या प्राप्त करून घेणे ही एक मोठी तपश्चर्याच आहे. त्यामध्ये तन व मन या दोन्हींचाही कस लागतो. म्हणून असा धनुर्वीर हाच खरा पराक्रमी असतो. पण त्याचबरोबर तो अत्यंत विरळाही असतो हेही खरे आहे. तेव्हा अशा वीराला शोधून काढण्याची जबाबदारी ही आता तुझीच आहे. त्यासाठी काय व कोणता ‘पण’ लावायचा याची योजना तूच ठरव आणि मला कळव. मग त्याप्रमाणे पुढील सर्व व्यवस्था मला करता येईल.”

द्रुपदाच्या बोलण्याने कृष्णाचे समाधान झाले आणि त्याचा आदरपूर्वक निरोप घेऊन कृष्ण त्वरीत तेथून निघाला. पुन्हा द्रौपदीची भेट घेऊन कृष्णाने त्याचे द्रुपदाशी झालेले बोलणे तिला सांगितले. द्रौपदीच्या प्रश्नार्थक मुद्रेकडे पाहून कृष्णाने तिला समजावून सांगावयास सुरुवात केली.

“अगं द्रौपदी, तुझ्या स्वयंवरासाठीचा ‘पण’ हा धनुर्वीरांसाठीच ठरवण्यामागील माझा हेतू अगदी स्पष्ट आहे. सध्या भूतलावरती अर्जुन हाच एकमेव असा श्रेष्ठ धनुर्धर आहे ही गोष्ट सत्य आहे. अर्जुनाच्या तोडीचा कोणीही धनुर्धर नाही. परंतु तुला सावध करण्यासाठी म्हणून एक गोष्ट सांगून ठेवतो, की अर्जुनाच्या जवळपास येणारा असा एक दुसरा निष्णात धनुर्वीर आहे आणि तो म्हणजे कर्ण होय. मूळचा सूतपुत्र असलेला कर्ण हा दुर्योधनाच्या आश्रयाला गेला आहे आणि दुर्योधनाच्या मर्जीने राजाही झालेला आहे. पण तो अर्जुनाचा अत्यंत द्वेष्टा आहे. कर्ण हा स्वतः पराक्रमी आहेच. परंतु अर्जुनाशी निरंतर स्पर्धा व चुरस करण्याच्या मिषाने त्याच्याठायी अर्जुनाविषयी एक प्रकारचा द्वेष-मत्सरच निर्माण झालेला आहे. तो नेहमीच अर्जुनाला पाण्यात पहात असतो आणि दुर्योधनावरील निष्ठेने कर्णाने अर्जुनाशी कायमचे वैरही धरलेले आहे.

हे सर्व तुला सांगायचे कारण म्हणजे तुझ्या स्वयंवराच्यावेळी हा कर्ण निश्चित उपस्थित राहील याची मला अगदी खात्री आहे. जेथे त्याच्या धनुर्विद्येला आव्हान आहे आणि जेथे त्याचा पराक्रम व कौशल्य प्रगट होण्याची संधी आहे, अशा तुझ्या स्वयंवराच्यावेळी कर्ण हजर राहिल्याशिवाय रहाणे शक्यच नाही. कठीणातील कठीण ‘पण’ ही जिंकण्याची क्षमता कर्णाच्याठायी आहे. त्यामुळे त्यानेच जर तो ‘पण’ जिंकला तर मात्र पंचाईत होईल. त्यावेळेस त्याच्या कुलशीलाचा एकीएक मुद्दाच आपल्या कामाला येऊ शकेल. हे सर्व मी तुला आधीच सांगून ठेवत आहे. कारण प्रत्यक्ष स्वयंवराच्यावेळी तुलाच हे सर्व निर्णय घ्यायचे आहेत, हे तू पूर्णपणे लक्षात ठेव.”

कृष्णाचे बोलणे एवढा वेळ लक्षपूर्वक व शांतपणे ऐकत असलेल्या द्रौपदीने मंदहास्य केले आणि ती म्हणाली,


“अरे कृष्णा, माझे प्रत्यक्ष स्वयंवर पार पडेपर्यंत तू काहीना काही सूचना मला सतत देतच रहाणार आहेस हे आता माझ्या लक्षात आलेले आहे. सर्व निर्णय मीच घ्यायचे आहेत असे तू म्हणत रहाणार; फक्त ते

निर्णय काय घ्यायचे हे मात्र तूच मला सांगणार आहेस, होय ना?” असे म्हणून द्रौपदी अगदी मोकळेपणाने हसली. त्यामध्ये कृष्णही हसून सामील झाला. कृष्णाने द्रौपदीच्या मस्तकावर अत्यंत प्रेमाने हळुवार थोपटले आणि तो तेथून नेहमीप्रमाणे त्वरेने निघाला.

हे लक्ष्मी, त्यानंतर कृष्णाने पांचाळ देशातील उत्तमोत्तम कारागीरांना बोलावून घेतले आणि त्यांच्याकडून त्याला हवी होती तशी एक आगळी वेगळी यंत्ररचना बनवून घेतली. त्यानंतर कृष्णाने द्रुपद राजाला व त्याच्या दरबारातील निवडक प्रधान मंडळींना बोलावून घेतले आणि त्यांना ती बनवलेली यंत्ररचना दाखवून त्यामागील हेतूही विशद करून सांगितला.

“अहो द्रुपद महाराज, द्रौपदीच्या स्वयंवरातील लावल्या जाणाऱ्या ‘पणा’चा एक भाग म्हणून मी ही विशिष्ट यंत्ररचना तयार करवून घेतली आहे. यामध्ये एक फिरते लोखंडी चाक एका खांबाला वरच्या भागात बसवले असून, त्या चाकावरती एक लाकडी मासा बसवला आहे. स्वयंवराच्या वेळी एका मोठ्या घंगाळात स्वच्छ जल भरून ते घंगाळे त्या चाकाखाली बरोबर मध्यावरती ठेवण्यात येईल. ते चाक सतत फिरते ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. स्वयंवराचा ‘पण’ जिंकण्यासाठी कोणत्याही धनुर्वीराला एकच गोष्ट करावी लागेल आणि ती म्हणजे घंगाळातील जलात वरती फिरणाऱ्या माशाचे केवळ प्रतिबिंब पाहून प्रत्यक्ष माशाच्या डाव्या डोळ्याचा वेध बाणाने घ्यावा लागेल. त्यात जो वीर यशस्वी होईल तोच द्रौपदीसाठी योग्य पती आहे असे निश्चित होईल आणि त्यालाच द्रौपदी पती म्हणून स्वीकारेल.”

कृष्णाची योजना ऐकून सर्वांची पहिली प्रतिक्रिया हीच होती की ‘ही गोष्ट तर केवळ अशक्यच आहे. फिरत्या चाकावर बसवलेल्या माशाच्या एका डोळ्याचा आणि तोही त्या माशाचे फक्त पाण्यातील प्रतिबिंब पाहून बाणाने वेध घ्यायचा? छे, छे! हे कोणालाही कदापिही शक्यच होणार नाही.’ द्रुपद राजा मात्र काही न बोलता थोडावेळ स्वस्थ राहिला. त्याची



मुद्रा मात्र जराशी सचिंतच दिसत होती. शेवटी न राहवून तो कृष्णाला म्हणालाच.

“अरे कृष्णा, ही गोष्ट तर मला जवळ जवळ अशक्यच दिसत आहे. मुळात एवढा कठीण ‘पण’ द्रौपदीच्या स्वयंवरासाठी लावण्याची खरेच आवश्यकता आहे का? मला नाही वाटत की एवढ्या कुवतीचा व क्षमतेचा कोणी धनुर्वीर सध्या तरी या भूतलावर असेल. असे असताना जर प्रत्यक्ष स्वयंवराच्या वेळी कोणालाच हा ‘पण’ जिंकता आला नाही तर स्वयंवराचा केलेला हा सर्व खटाटोप व्यर्थच जाईल ना? मग द्रौपदीही अर्थात नाराज व थोडीशी निराशही होईल आणि आपणा सर्वांचाच विरस होऊन आपण निरूत्साही होऊन राहू, असे मला तरी अगदी खात्रीपूर्वक वाटते.”


द्रुपदाच्या बोलण्यावरती कृष्णाने थोडा वेळ विचार केला आणि त्याने द्रुपदाशी बोलण्यास सुरुवात केली.

“अहो द्रुपद महाराज, तुम्हाला काळजी वाटणे अगदी साहजिकच आहे. परंतु माझ्याठिकाणीही द्रौपदीविषयी तेवढीच काळजी आहे, हे तुम्हीही जाणून आहातच. परंतु एक गोष्ट लक्षात ठेवा की आपली द्रौपदी ही सामान्य नाही, तर एक असामान्य स्त्री आहे. तेव्हा तिच्या स्वयंवराची अटही सामान्य असणे शक्यच नाही. तो ‘पण’ ही असामान्यच असणे अगदी साहजिक नाही का? कारण आपली द्रौपदी ही कोणाही सामान्य व्यक्तीच्या गळ्यात वरमाला घालणे शक्यच नाही. ती कोणाही सामान्याला सहजासहजी मिळू शकणारच नाही आणि तशी ती कोणाला मिळणे हे योग्यच होणार नाही. द्रौपदीचा तर तो एक मोठा अवमानच ठरेल. पण तरीही तुम्ही एका गोष्टीची पूर्ण खात्री बाळगा की द्रौपदीसाठी तिच्या योग्यतेचा असा वीरपुरूष या भूतलावरती निश्चितच आहे आणि तो स्वतःच्या पराक्रमाने हा अत्यंत कठीण वाटणारा, पण अशक्य नसणारा ‘पण’ जिंकेलच जिंकेल. तुम्ही सर्व भार माझ्यावरती सोपवलेलाच आहे. तेव्हा तुम्ही अगदी पूर्णपणे निश्चिंत राहा.”

कृष्णाच्या बोलण्यावरती द्रुपद राजाचे मन शांत व निःशंक झाले. पण तरीही त्याच्या मनात थोडीशी काळजी मात्र शिल्लक राहिलीच आणि तेही अगदी साहजिकच होते म्हणा. परंतु कृष्णावरील श्रद्धेने व भरवशाने द्रुपद राजाने द्रौपदीच्या स्वयंवरासाठीची तयारी सुरू केली. त्याआधी त्याने द्रौपदीशी बोलून तिलाही त्या लावलेल्या 'पणा'ची कल्पना दिली. ही योजना कृष्णाची आहे असे म्हटल्यावरती द्रौपदीला त्यावर आणखीन काही विचार करण्याची जरूरीच वाटली नाही. तिने केवळ किंचित हसून मान डोलवली आणि शांतपणे पुन्हा तिच्या महालात निघून गेली. कृष्णावरील श्रद्धेने व प्रेमाने द्रौपदी अंतर्बाह्य अत्यंत शांत होती. अर्थात पुढे काय काय व कसे कसे कृष्ण घडवील याची आतुरता मात्र द्रौपदीच्याठायी साहजिकपणे होतीच.

हे लक्ष्मी, कृष्णाच्या सांगण्यानुसार द्रुपद राजाने द्रौपदीच्या स्वयंवराची मोठी जय्यत तयारी सुरू केली. प्रथम राजपुरोहितांच्या सल्ल्यानुसार शुभदिन व शुभमुहूर्ताची वेळ निश्चित केली. त्यानंतर देशोदेशीच्या राजांना व राजपुत्रांना खास आमंत्रणपत्रिका व व्यक्तिगत आमंत्रणे पाठविण्यात आली. फक्त स्वयंवराचा 'पण' काय आहे हे मात्र त्यांना कळविण्यात आले नव्हते. त्याविषयी मुद्दामच गुप्तता राखण्यात आली होती. त्याचप्रमाणे स्वयंवरासाठी एक खास, अत्यंत सुशोभित असा मंडप उभारण्यात आला आणि सर्व आमंत्रित पाहुण्यांसाठी सर्व सुखसोयींनी युक्त, असे शामियानेही उभारण्यात आले.

हे लक्ष्मी, अशा तऱ्हेने द्रौपदीच्या स्वयंवराचे वातावरण एकीकडे निर्माण होत असताना, कृष्णाच्या ठिकाणी मात्र एक वेगळेच व्यवधान होते. स्वयंवराचे रीतसर आमंत्रण हस्तिनापुरला पाठवलेले होतेच. परंतु ते पांडवांना मिळण्याची सुतरामही शक्यता नव्हती. कारण कर्मधर्मसंयोगाने पांडव त्यावेळेस हस्तिनापुरला नव्हतेच. खरे सांगायचे तर, पांडव एका मोठ्या प्राणसंकटातूनच वाचले होते आणि ते अज्ञातवासातच राहिलेले होते."



* * *


बोलत असताना नारदाने लक्ष्मीकडे जाणूनबुजूनच पाहिले आणि त्याच्या अपेक्षेप्रमाणेच त्याला लक्ष्मीच्या मुखावर कमालीची उत्सुकता दिसून आली. नारदाने लक्ष्मीकडे सहेतूक नजरेने पाहून स्मितहास्य केले आणि त्यावरती लक्ष्मीनेही हलकेच हसून प्रतिसाद दिला. लक्ष्मीच्या मनात काय आहे हे नारदाने लागलीच ओळखले आणि नारदाने तिच्या मनातील ओळखले आहे, हे लक्ष्मीच्याही लगेचच लक्षात आले. लक्ष्मी नारदाकडे अपेक्षेने पहातच राहिली. तेव्हा लक्ष्मीची अपेक्षापूर्ती करण्याच्या हेतूने नारदाने पुन्हा बोलावयास सुरुवात केली.

“हे लक्ष्मी, तुझ्या मनात आलेले विचार माझ्या लक्षात आलेले आहेत. पांडवांवरील गुदरलेल्या प्राणसंकटाचा मी उल्लेख जरी थोडक्यातच केला, तरी तो तुझी उत्सुकता वाढविण्यासाठी पुरेसा होता. पांडवांवर संकट आणि तेही प्राणसंकट कोणी व कसे आणले आणि त्यातून पांडवांना कोणी व कसे वाचवले, हे प्रश्न तुझ्याठायी निर्माण होणे अगदी साहजिकच आहे. त्याचा सविस्तर तपशील सांगणे जरी शक्य व आवश्यक नसले तरी थोडक्यात तुला तो प्रसंग सांगून, मी तुझी उत्सुकता काही प्रमाणात तरी पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. कारण त्याशिवाय तुझे लक्ष पूर्णपणे श्रवणात लागणार नाही हे मी पूर्वानुभवाने जाणून आहे.

हे लक्ष्मी, मागे मी तुला सांगितलेली एक गोष्ट तुझ्या लक्षात असेलच आणि ती म्हणजे कौरवांतील ज्येष्ठ कौरव दुर्योधन हा पांडवांचा अतिशय द्वेष व मत्सरच करीत असे. पुढेमागे राज्यासन प्राप्त होण्यामध्ये हे पांडवच मोठा अडसर आहेत असा दुर्योधनाने अगदी पक्का समज करून घेतला होता. अर्थात त्याची भीतीही तशी साधारच होती. कारण सर्वच पांडव, आणि विशेषतः त्यांच्यातील ज्येष्ठ बंधू धर्मराज हे त्यांच्या सद्‌गुणांमुळे, सज्जन स्वभावामुळे व सत्प्रवृत्तीमुळे सर्वसामान्य जनमानसात अत्यंत आदराचे व कौतुकाचे स्थान प्राप्त करून राहिले

होते. एवढेच नव्हे, तर राज्यातील व राजदरबारातील सर्वच जाणकार व आदरणीय व्यक्तीही धर्मराजाकडे राज्याचा भावी वारसदार या दृष्टीनेच पहात असत. या सर्वांचाच परिणाम असा झाला की पांडवांचे अस्तित्वच दुर्योधनाच्या मनात कायमचे सलत राहिले. आपल्या मार्गातील हे काटे कायमचे नष्ट करावेत असा एकीएक विचार दुर्योधनाच्याठायी प्रबळ होऊन राहिला होता. त्याच विचाराने पछाडलेल्या अवस्थेतील दुर्योधन पांडवांच्या अगदी जीवावरच उठला होता आणि त्यासाठीची कटकारस्थाने रचण्यातच तो नेहमी गढलेला असे. परंतु ईश्वरी कृपेने दुर्योधनाला त्यात कधीच यश मिळत नसे. कारण पांडवांच्या हिताची काळजी सतत वहाणारा कृष्ण हा सदैव दक्ष व जागरूक असे.

लक्ष्मी, आपल्या मार्गातून पांडवांना कायमचे हटवण्यामध्ये येणाऱ्या अपयशामुळे दुर्योधनाच्या ठिकाणची चीड अधिकच वाढत राहिली आणि शेवटी दुर्योधन अगदी हट्टालाच पेटला. त्याने पांडवांना कायमचे नष्ट करण्याच्या एकीएक हेतूने आणखीन एक गुप्त कारस्थान रचले. हस्तिनापुरापासून अत्यंत दूर अशा एका ठिकाणी त्याने एक मोठा राजवाडा बांधून घेतला आणि त्याच्या भिंतींमध्ये लाख व कापूर यासारखे ज्वालाग्राही पदार्थ भरून ठेवण्याची व्यवस्था केली. त्यानंतर दुर्योधनाने बाह्यांगाने प्रेमाचा मोठा आव आणून पांडवांनी कुंतीसह त्या नवीन राजवाड्यामध्ये विश्रांतीसाठी जाऊन रहावे, असा आग्रह सुरू केला. नंतर त्या राजवाड्याला आग लावून पांडवांना जाळून मारण्याचा दुर्योधनाचा डाव होता. धर्मराजा हा त्याच्या साध्या-सरळ स्वभावानुसार दुर्योधनाच्या काव्याला बळी पडला आणि त्याने त्या राजवाड्यामध्ये जाऊन रहाण्याचा निर्णयही घेतला. परंतु दुर्योधनाची ही योजना कृष्णप्रेमी विदुराकडून कृष्णाच्या कानापर्यंत पोहोचली. पांडवांच्या रक्षणासाठी सदैव सावध व दक्ष असलेल्या कृष्णाने ताबडतोब त्याठिकाणी त्याच्या विश्वासातील माणसे पाठवली आणि त्या राजवाड्यातून बाहेर पडण्याचा एक गुप्त भुयारी मार्ग तातडीने तयार करवून घेतला.



पांडव प्रत्यक्ष त्या राजवाड्यात जाण्यास निघण्याआधी अर्जुनाने अर्थातच, ही गोष्ट कृष्णाला कळीत केली. कारण अर्जुन प्रत्येक महत्त्वाची गोष्ट कृष्णाला कळविल्याशिवाय कधीच करीत नसे. कृष्णाने अर्जुनाला ताबडतोब सावध केले आणि दुर्योधनाने रचलेले कपट अर्जुनाच्या कानावर घातले. परंतु कृष्णाच्याच सांगण्यानुसार अर्जुनाने त्याच्या बंधूंना ही गोष्ट न कळवता त्या राजवाड्यात जाण्याचा बेत कायम ठेवला आणि त्याप्रमाणे सर्व पांडवांनी त्या राजवाड्याकडे प्रस्थान केले. पांडव थोडे दिवस राजवाड्यात रहातात न रहातात तोच एका रात्री सर्व पांडव पूर्णपणे निद्राधीन झाले असता, दुर्योधनाच्या गुप्तचरांनी त्या राजवाड्यालाच आग लावून दिली आणि इतर मंडळींसह ते तिथून पळून गेले. आगीची जाणीव होताच पांडवांना जाग आली. राजवाड्यामध्ये ज्वालाग्राही पदार्थ आधीच ठासून भरलेले असल्यामुळे, क्षणार्धात ती आग सगळीकडे पसरली आणि त्या आगीने सर्व राजवाड्याला आतून व बाहेरून घेरून टाकले. परंतु कृष्णाच्या सांगण्यावरून अर्जुनाला राजवाड्यातील गुप्त भुयारी मार्गाची माहिती होती. त्या गुप्त मार्गाने सर्व पांडव त्यांच्या कुंतीमातेसह त्या राजवाड्यातून बाहेर पडले आणि त्या नगरीपासून बरेच दूर गेले. त्यानंतर कृष्णाच्या सूचनेनुसार पांडवांनी अज्ञातवासातच रहाण्याचे ठरवले आणि ब्राम्हण वेष धारण करून ते कुंतीसह कोणत्याही एका जागी जास्त वेळ न थांबता फिरत राहिले. ही घटना व प्रसंग कृष्णाने फक्त द्रौपदीलाच सांगितली. त्यामुळे द्रौपदी पूर्णपणे निःशंक होती.


हे लक्ष्मी, पांडव आगीमध्ये जळून मेले ही बातमी हस्तिनापूरला पोहोचली आणि सर्वत्र शोकाचे वातावरण निर्माण झाले. प्रथम तर त्यावर कोणाचाही विश्वासच बसेना. परंतु त्या बातमीची खातरजमा झाल्यावरती सर्व नागरीकजन व नातलग अत्यंत दुःखी झाले आणि वारंवार पांडवांची आठवण काढून शोक करू लागले. दुर्योधन तर मनातून अत्यंत खूशच झाला होता. परंतु बाहयांगाने दुःखी असल्याचा आव आणण्यात मात्र तो

चांगलाच यशस्वी झाला होता. आधी युवराजपद व नंतर प्रत्यक्ष राज्यासन मिळवण्याच्या दुर्योधनाच्या मार्गातील अडथळा आता कायमचा दूर झाला होता आणि दुर्योधन त्याच खुशीत मग्न होऊन राहिला होता. पांडवांच्या मृत्युच्या बातमीने धृतराष्ट्रानेही बाह्यांगाने दुःख व्यक्त केले खरे, पण ते नक्राश्रूच होते. त्यानेही काही दिवस रीतसर दुखवटा पाळला. परंतु ती सर्व औपचारिकताच होती. काही काळानंतर पुन्हा सर्वांची जीवने सुरळीतपणे व व्यवस्थितपणे सुरू झाली. पांडवांविषयी खऱ्या प्रेमाचे असलेले जन मात्र पांडवांना विसरू शकत नव्हते आणि म्हणून त्यांच्या आठवणी पुन्हा पुन्हा काढून दुःखी होत होते. काहीतरी चमत्कार घडेल आणि पांडव पुन्हा परत येतील अशी वेडी आशा मनात ठेवून पांडव परत येण्याची ते वाट पहात होते.”

नारदाच्या बोलण्याचा वेग थोडासा मंदावल्यासारखा झाला आहे हे लक्ष्मीच्या लक्षात आले आणि तीच संधी साधून लक्ष्मीने मध्येच बोलावयास सुरूवात केली.

“अरे नारदा, दुर्योधनाचा द्वेष व त्यामुळे पांडवांवर वारंवार येणारी संकटे याचे वर्णन ऐकून माझे मन तर अगदी सुन्नच होऊन राहिले आहे. मला तर काही सुचेनासेच झाले आहे. एखाद्याच्या ठिकाणी एवढा पराकोटीचा द्वेष व मत्सर असू शकतो यावर माझा विश्वासच बसत नाही. परंतु दुर्योधन तर पांडवांच्या द्वेषाने अगदी पूर्णपणे पछाडलेला होता. पांडवांना मरण आल्याशिवाय दुर्योधनाच्या मनाला चैन पडणे शक्यच नव्हते. परंतु पांडवांचा खरा रक्षणकर्ता व पाठीराखा असलेल्या कृष्णामुळेच पांडव एवढ्या घोर संकटातून सुखरूपपणे बचावले. प्रेमाला व मैत्रीला जागण्याच्या कृष्णाच्या या ब्रीदाला व स्वभावाला तोडच नाही हेच खरे!

अरे नारदा, परंतु पांडव जरी वाचले तरी त्यांच्यावरील संकट तर अजूनही कायमच होते. कारण जोपर्यंत दुर्योधन आहे तोपर्यंत पांडवांच्या जीवाला शांती व स्वस्थता लाभणे शक्यच नव्हते, हे तर अगदी उघडपणे




दिसत होते. असे असतानाही द्रौपदीचे अर्जुनाशी लग्न होणे म्हणजे तिच्यासाठी तर जीवनभर अनेक संकटांच्या मालिकेला आपणहून आणि तेही जाणूनबुजून आमंत्रण दिल्यासारखेच होत होते. नाही का? हा मूलभूत प्रश्न माझ्या मनाला आत कुठेतरी सतावत आहेच. त्यातून पुन्हा द्रौपदीच्या प्रत्यक्ष स्वयंवराच्या वेळी पांडव तर अज्ञातवासातच होते. मग त्यांच्यापर्यंत त्या स्वयंवराची बातमी व निमंत्रण पोहोचणार तरी कसे आणि ते स्वयंवराला प्रत्यक्षपणे हजर रहाणार तरी कसे? आणि मग द्रौपदीचे स्वयंवर पार पडून तिची मनोइच्छा पुरी होणार तरी कशी? खरोखरी माझ्या मनात अचानक या प्रश्नांचे काहूरच माजल्यासारखे झाले आहे. त्याचे कारण म्हणजे माझ्या मनातच कुठेतरी शंका लपलेली आहे आणि तीच शंका अशी वेगळ्या वेगळ्या प्रश्नांच्या रूपाने अचानक वर येत आहे. माझे मन शंकित झाल्यामुळे थोडेसे दूषितही होते. माझ्या मनाच्या दुर्बलतेचेच हे लक्षण आहे हे मी जाणून आहे. त्यामुळेच तू जो द्रौपदीच्या कृष्णावरील श्रद्धेचा व प्रेमाचा विषय सांगत आहेस त्यावर मी श्रद्धा ठेवून तो श्रवण करते खरी, पण काही वेळा माझे मन मात्र त्या विषयाचा पूर्णपणे स्वीकार करीत नाही, हेही माझ्या लक्षात येतेच. परंतु मला एका गोष्टीचे अजूनही राहून राहून नवल वाटते की द्रौपदीला सर्वकाही माहित असूनही काहीच मानसिक अडचण कशी आली नाही? तिचे मन एवढे सबळ कसे काय झाले होते? द्रौपदीची ही कृष्णावरील अंधश्रद्धा तर नव्हती ना? का कृष्णावरील प्रेमासाठी तिचे मन एकप्रकारे दुर्बलच झालेले होते? सर्व परिस्थितीची पूर्ण कल्पना द्रौपदीला खरोखरीच होती ना?”

बोलता बोलता लक्ष्मीच्या लक्षात आले, की तिचे मन फारच नकारात्मक दिशेने विचार करू लागलेले आहे. त्यामुळे ती सावध झाली. तिने तिचे बोलणे प्रयत्नपूर्वक थांबवले आणि ती नारदाकडे अगतिक नजरेने पहात राहिली. लक्ष्मीची ही दयनीय अवस्था पाहून नारदाला तिची

कणवच आली आणि तिचे मन स्वच्छ व निर्मळ करण्यासाठी नारदाच्या मुखातून प्रेमळ पण सत्यवचने पुन्हा प्रगट होऊ लागली.

“हे लक्ष्मी, तुझ्या मनाची पुन्हा चलबिचल होते आहे हे दिसतच आहे आणि तूही तुझ्या मनाची अवस्था लपवून न ठेवता मोकळेपणाने प्रगट करीत आहेस, ही गोष्ट मात्र चांगली व योग्यच आहे. प्रेम व श्रद्धा यासंबंधी जोपर्यंत तुझ्या ठायी व्यावहारिकच दृष्टी व मर्यादितच व्याख्या आहे, तोपर्यंत तुझ्या मनाचा कोतेपणा तसाच कायम रहाणार आणि मनाची चलबिचल पुन्हा पुन्हा तशीच होत रहाणार. द्रौपदीची श्रद्धा व प्रेम हे कोणा सामान्य प्रापंचिक पुरूषाच्या ठायी नव्हते, तर तिचे मन व बुद्धी हे दोन्ही कृष्णाठायी जडलेले होते ही महत्त्वाची व मूलभूत गोष्ट तू आधी लक्षात घे आणि अत्यंत दृढपणे मनात धरून ठेव. त्यामुळेच तुझ्या मनाचा विचार करण्याचा दृष्टीकोनच कायमचा बदलेल आणि कृष्णाकडे व त्याच्यामुळे द्रौपदीकडे पहाण्याची योग्य दृष्टी तुला लाभेल. त्या दृष्टीने पहाता पहाताच तुला आधी कृष्णाचे अंतःकरण आणि मग द्रौपदीचे मन जाणता येणे शक्य होईल.

हे लक्ष्मी, कृष्णाच्या ईश्वर स्वरूपाविषयी जरी द्रौपदीला पूर्ण जाण नसली, तरी कृष्णाचे असामान्यत्व मात्र तिला नक्कीच आकलन झालेले होते आणि त्याविषयीचा तिचा निश्चय अगदी ठाम होता. मुख्य म्हणजे द्रौपदीचा हा निश्चय तिच्या स्वानुभवातून झालेला होता. त्यामुळेच तिच्या कृष्णावरील श्रद्धेत अजिबात अंधत्व नव्हते. कृष्णाचे सतत मार्गदर्शन घेऊन त्याप्रमाणे जीवन जगताना त्या निमित्ताने द्रौपदीला कृष्णाचे प्रेमही अनुभवावयास मिळाले आणि तिचे कृष्णाशी एक प्रेमाचे भावनिक नाते निर्माण झाले. प्रेमाच्या भावनेमध्ये सुरुवातीला दुर्बलता व थोडेसे अंधत्वही असू शकते, ही गोष्टही खरीच आहे. परंतु याठिकाणी एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे, की ज्या कृष्णावरती द्रौपदीचे प्रेमाने मन जडले होते तो कृष्ण हा अत्यंत सबळ होता आणि दुर्बलांनाही सबळ करण्याचे सामर्थ्य त्याच्याठायी होते. त्याचप्रमाणे कृष्ण हा आत्मज्ञानी



असल्यामुळे त्याचे सर्व मार्गदर्शन व निर्णय हे योग्य त्या विवेकाने व डोळसपणे घडत असत.

लक्ष्मी, द्रौपदीला कृष्णाच्या प्रेमळ सहवासाची व त्याच्या प्रत्यक्ष सहभागाची एवढी सवय झालेली होती की ती तिची नितांत गरजच होऊन राहिली होती. त्याशिवाय जीवन जगण्याची वेळ जर द्रौपदीवर आली असती, तर तिची अत्यंत मानसिक कुचंबणाच झाली असती. एकवेळ शारीरिक कष्ट परवडले पण मानसिक क्लेश सहन करणे हे त्याहूनही कठीण असते. नेमकी हीच गोष्ट कृष्ण जाणून होता. म्हणूनच त्याने द्रौपदीच्या मानसिक गरजेला अधिक प्राधान्य व महत्त्व दिले आणि तिचा विवाह कृष्णाने त्याचा परममित्र व अत्यंत प्रेमाचा असलेल्या, अशा अर्जुनाशी करण्याची योजना आखली. त्याआधी कृष्णाने कोणतीही गोष्ट द्रौपदीपासून लपवून न ठेवता सर्व परिस्थिती स्पष्टपणे द्रौपदीला समजावून सांगितलेली होती आणि अंतिम निर्णय खुद्द द्रौपदीवरतीच सोपवला होता. कृष्णाने द्रौपदीला फक्त एकच गोष्ट सांगितली होती की 'द्रौपदी, तुझा तूच विचार करून निर्णय घे. तू काहीही निर्णय घेतलास तरी मी नेहमीच तुला साथ देईन याची खात्री बाळग. फक्त एकच गोष्ट कर, विचार होकारात्मक दिशेने कर.'


लक्ष्मी, कृष्णाच्या बोलण्यातील मतितार्थ व भावार्थ हे दोन्ही द्रौपदीने लगेचच ओळखले आणि हेच तर तिचे वैशिष्ट्य होते. कृष्णप्रेमाने द्रौपदीचे मन व कृष्णावरील श्रद्धेने द्रौपदीची बुद्धी हे दोन्ही अत्यंत स्वच्छ असल्यामुळे तिची भूमिकाही अत्यंत स्पष्ट होती. त्यामुळे 'कृष्ण ज्या बाजूला आहे तीच दिशा होकारात्मक आहे' हे कळायला द्रौपदीला मुळीच वेळ लागला नाही. त्या होकारात्मक दिशेने विचार केल्यावरती क्षणार्धातच द्रौपदीचा निर्णय 'हो' असाच झाला आणि तिने तो निर्णय कृष्णाला ताबडतोब तिथल्या तिथेच सांगूनही टाकला. द्रौपदीचा हा निर्णय ना भावनेच्या भरातील होता, ना कृष्णावरील अंधश्रद्धेमुळे होता. सर्व परिस्थितीची पूर्ण कल्पना असूनही कृष्णाच्या प्रेमाच्या

भरवशाने व कृष्णावरील श्रद्धेच्या बळाने द्रौपदीने घेतलेला निर्णय हा जेवढा वस्तुनिष्ठ होता, तेवढाच तो भावपूर्णही होता.”

नारद जसे जसे स्पष्टपणे व सविस्तरपणे त्याचे म्हणणे मांडीत होता तसा तसा लक्ष्मीच्या मनावरील ताण हळूहळू कमी होत होता, हे तिच्या मुखाकडे पाहिले असता अगदी सहजपणे लक्षात येत होते. त्यामुळे नारदाचे बोलणे थांबल्यावरती लक्ष्मीला तिचे मन मोकळे करण्यासाठी जराही वेळ लागला नाही.

“अरे नारदा, माझ्या मनाचे पूर्ण समाधान करण्यासाठी तुला बरेच व तेच तेच बोलणे वारंवार करावे लागत आहे हे माझ्याही लक्षात येते खरे, पण माझाही नाईलाजच होत आहे. तुझे तर्कशुद्ध बोलणे बुद्धीला पटायला जराही वेळ लागत नाही. परंतु थोडेसे मागे मागे रहाते ते माझे मनच. पण आता मात्र ते निश्चितपणे सावरले आहे. द्रौपदीच्याठायी कृष्णाविषयी असलेली श्रद्धा आणि त्यांचे अत्यंत आगळे वेगळे असलेले प्रेमाचे नातेसंबंध आता माझ्या निश्चितपणे लक्षात आलेले आहेत. द्रौपदीने कृष्णावरती अगदी पूर्णपणे भरवसा ठेवलेला आहे आणि तो भरवसा कृष्णावरती असल्यामुळे त्याचे पूर्ण फळ द्रौपदीला मिळणारच होते. बरे, द्रौपदीला तरी दुसरे काय हवे होते? तर प्रत्यक्ष कृष्णाशिवाय तिला आणखीन काहीच नको होते. तिला फक्त कृष्णच हवा होता. द्रौपदीचे ध्येय तिच्यासाठी अगदी स्पष्ट होते. त्या ध्येयाप्रत द्रौपदीला नेण्याची जबाबदारी तिने कृष्णावरतीच पूर्णपणे सोपवली होती आणि मुख्य म्हणजे ती जबाबदारी कृष्णाने स्वीकारली होती. ही एकच गोष्ट सत्य आहे आणि अंतिम आहे. तेव्हा आपण इतर आजूबाजूला बघायचे किंवा दुसरा काही विचार करायचे काही कारणच नाही, हेच खरे. होय ना?

नारदा, मला अगदी मनापासून असे वाटते की आपण द्रौपदीच्या या निर्णयाविषयी कितीही बोललो किंवा केवळ तात्त्विक चर्चा केली तरी माझ्या मनाचे समाधान पूर्णपणे होणे शक्य नाही. कारण प्रश्न व त्यांची



उत्तरे आणि त्या उत्तरातून आणखीन नवीन प्रश्न, असे हे चक्र चालूच राहील आणि तेही जागच्या जागीच फिरत राहील. त्यापेक्षा द्रौपदीने हा बाह्यांगाचा कठीण व गूढही वाटणारा निर्णय प्रत्यक्षात कसा निभावून नेला हे पहाणे व जाणून घेणे हेच अधिक योग्य होईल. प्रत्यक्ष प्रसंगात द्रौपदीची कृष्णप्रेमनिष्ठा कशी कायम राहिली आणि कृष्णावरील श्रद्धेने तिने काय व कसा अनुभव घेतला हेच महत्त्वाचे आहे आणि तेच ऐकण्यासाठी मी आता अत्यंत आतुर झालेली आहे. तेव्हा तू द्रौपदीच्या स्वयंवराची व तिच्या पुढील जीवनासंबंधीची कथा व मुख्य म्हणजे त्यावरील निरूपण सांगावयास सुरू करणे हेच अत्यंत योग्य होईल.”


लक्ष्मीचे बोलणे ऐकून नारदाने मंदस्मित केले आणि संमतीदर्शक मान डोलवली. नारदाने क्षणभर त्याचे नेत्र मिटून घेतले मात्र, त्याच्या अंतःकरणातील दाटलेला भक्तिभाव त्याच्या मुखकमलावरती पूर्णपणे पसरला आणि त्याच्या मुखातून शब्दरूपाने वाहू लागला.

“हे लक्ष्मी, द्रौपदीच्या स्वयंवराची जय्यत तयारी द्रुपदाकडून अत्यंत हौसेने व उत्साहाने चालूच होती. परंतु त्याच्या मनात मात्र थोडीशी धाकधुक होतीच. द्रौपदीच्या स्वयंवरासाठी लावलेला एवढा कठीण ‘पण’ खरेच कोणी जिंकेल की नाही याची काळजी, नाही म्हटले तरी द्रुपदाच्या मनात कोठेतरी सुप्तपणे होतीच. फक्त तो कोणाशी तसे बोलून दाखवत नव्हता एवढेच! कारण द्रुपदाने जर त्याच्या मनातली शंका प्रगट केली असती, तर मग सगळीकडेच साशंकतेचे वातावरण निर्माण झाले असते आणि द्रुपदाला तसे होऊ द्यायचे नव्हते. म्हणून तो अत्यंत प्रयत्नपूर्वकच मनातून शांत व बाहेरून स्वस्थ राहिला. कृष्णावरती द्रुपदाचा पूर्ण भरवसा होता आणि त्याचीच खात्री द्रुपद धरून राहिला होता. द्रौपदी मात्र मनातून पूर्णपणे निःशंक होती आणि अत्यंत मोकळेपणाने वावरत होती. तिच्याकडे पाहूनच द्रुपदाची व त्याच्या पत्नीचीही उमेद वाढत होती, हे मात्र खरे.

लक्ष्मी, पांडवांची नित्य काळजी वहाणाऱ्या कृष्णाच्या मनातही ‘आता पांडवांनी पुन्हा जनात प्रगट होण्याची वेळ आलेली आहे’ असे विचार येऊ लागले होतेच. त्यासाठी द्रौपदी स्वयंवराची वेळ हीच अत्यंत योग्य आहे हेही कृष्णाने आधीपासूनच ठरवले होते. कृष्ण पांडवांशी संपर्क ठेवून होताच. त्यामुळे कृष्णाने पांडवांना संदेश पाठविला की द्रौपदीच्या स्वयंवराला त्यांनी उपस्थित रहायचे आहे आणि स्वयंवराकरीता लावलेला ‘पण’ जिंकण्याचा पराक्रम हा अर्जुनाला करायचा आहे. कृष्णावरती नितांत श्रद्धा व विश्वास असलेल्या पांडवांसाठी कृष्णाचा शब्द हा अंतिम होता. त्यामुळे ब्राह्मणवेष धारण करून गुप्तपणे रहात असलेले पांडव हे ताबडतोब पांचाल देशी येऊन दाखल झाले आणि स्वयंवर मंडपात गुप्तपणे बसून राहिले.

हे लक्ष्मी, प्रत्यक्ष स्वयंवराच्यावेळी द्रुपदराजाने सभामंडपात जमलेल्या मान्यवर राजामहाराजांचे प्रथम स्वागत केले आणि त्यानंतर स्वयंवरासाठी लावलेला तो ‘पण’ सर्वांना नीट समजावून सांगितला. त्याचबरोबर ‘तो ‘पण’ जिंकण्याच्या स्पर्धेत उतरणारा पुरूष हा कुलवान असणे अत्यंत आवश्यक आहे’ अशी पुस्तीही द्रुपदाने जोडली. तो ‘पण’ ऐकल्याबरोबरच सर्वत्र एकच हलकल्लोळ माजला आणि सर्वांच्या मुखातून निराशेचा एकच सूर प्रगट होऊ लागला. प्रत्यक्ष पुढे येऊन तो ‘पण’ जिंकण्याचा प्रयत्न करायलाही कोणी धजावतच नव्हते. ज्यांना स्वतःच्या पराक्रमाविषयी फाजील गर्व होता असे काही राजे पुढे सरसावले आणि त्यांनी त्या फिरत्या चक्रावरील मत्स्याचे पाण्यातील प्रतिबिंब पाहून त्याच्या एका डोळ्याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला खरा, परंतु त्यांचा तो खटाटोप अत्यंत हास्यास्पदच ठरला. द्रौपदीच्या सौंदर्याला भुलूनही काही जणांनी खोटा आवेश आणून प्रयत्न केला. पण मुळात आडातच नाही तर पोहोऱ्यात कुठून येणार? त्यामुळे त्या राजांचा खोटेपणा ऐनवेळी उघडा पडला आणि ते सर्वांच्या चेष्टेचाच एक विषय झाले.

* * * * *



## कर्णाचा प्रयत्न - द्रौपदीची स्पष्टोक्ती

हे लक्ष्मी, सुरूवातीला असलेला सर्वांचा उत्साह हळूहळू जसा जसा ओसरू लागला, तसे तसे स्वयंवरमंडपात एक प्रकारचे नैराश्याचे वातावरण पसरू लागले आणि द्रुपदाच्या मुखावर तर चिंतेचेच भाव दिसू लागले. त्याने हळूच एक दृष्टीक्षेप कृष्णाकडे टाकला. पण कृष्णाची मुद्रा मात्र शांत व गंभीरच होती. बराच वेळ गेला तरी कोणीही प्रयत्न करण्यासाठी पुढे येण्याचेही धाडस करेना. तेवढ्यातच, अचानक महारथी व धनुर्वीर म्हणून भूतलावरती विख्यात असलेला कर्ण पुढे आला. दुर्योधनाच्या सांगण्यावरून व दुर्योधनाचा प्रतिनिधी म्हणून तो स्वयंवरासाठी उपस्थित राहिलेला होता. कर्णाने प्रथम द्रुपद राजाला नम्रतापूर्वक वंदन केले आणि द्रौपदीकडे एक दृष्टीक्षेप टाकला. द्रौपदीचे ऐकून असलेले सौंदर्य प्रत्यक्ष पाहून कर्णाचेही देहभान थोडावेळ हरवलेच आणि तो तिच्याकडे अनिमिष नेत्रांनी पहातच राहिला. पण लगेचच कर्णाने स्वतःला सावरले आणि द्रुपदाची अनुज्ञा घेऊन कर्ण एकेक पाऊल सावकाश पण ठामपणे टाकीत धनुष्य बाण हाती घेण्यासाठी पुढे जाऊ लागला.

हे लक्ष्मी, कर्णाची धनुर्विद्येतील पारंगतता सर्वश्रुतच होती. त्यामुळे ‘पण’ जिंकण्यासाठी पुढे आलेल्या कर्णाला पाहून स्वयंवर मंडपातील सर्व उपस्थितांची उत्सुकता अतिशय वाढली आणि कर्णाचा पराक्रम पहाण्यासाठी सर्वजण अत्यंत आतुर होऊन राहिले. ‘पण’ जिंकण्याचा पूर्ण आत्मविश्वास जसा व जेवढा कर्णाच्या ठायी होता तसा व तेवढाच विश्वास व खात्री तेथील सर्वांच्याच ठिकाणी होती आणि ती सर्वांच्याच चेहऱ्यावर अगदी स्पष्टपणाने दिसत होती. परंतु द्रौपदी मात्र आधीपासूनच सावध होती, कारण कृष्णाने तिला कर्णासंबंधी आधीच सांगितले होते. कर्णाने ‘पण’ जिंकण्याची शक्यता नव्हे तर खात्रीच होती आणि मग काहीही निर्णय घेणे वा बदलणे शक्यच झाले नसते हे द्रौपदी ओळखून होती. तिने एकच दृष्टीक्षेप कृष्णाकडे टाकला असता कृष्णाने


केवळ सूचकतेने व हलकेच मान डोलवली. कृष्णाचा इशारा द्रौपदीच्या लगेचच लक्षात आला. क्षणार्धात द्रौपदी पुढे सरसावून उभी राहिली आणि तिने कर्णाला हाक मारून थांबवले.

“अहो कर्णराज, तुम्ही जरा थांबण्याचे करावे. तुम्ही हा ‘पण’ जिंकण्याचा प्रयत्न करण्याआधी मला तुमच्याशी काही बोलावयाचे आहे.”

द्रौपदीच्या या बोलण्याने कर्णासह सर्व उपस्थित जन चकित व स्तब्ध झाले. कर्णही जागच्या जागीच थबकून उभा राहिला आणि त्याने आधी द्रुपदाकडे व नंतर द्रौपदीकडे वळून पाहिले. कर्णाला काहीच उलगडा होईना. द्रुपदालाही काहीच कळेना. तोही द्रौपदीकडे आश्चर्याने व अपेक्षेने पहात राहिला. कृष्ण मात्र अत्यंत शांतपणे द्रौपदीकडे पहात होता. त्याच्या नेत्रात एक विशेष चमक दिसत होती. द्रौपदीने पुन्हा एकदा कृष्णाकडे पाहिले आणि त्याच्या नेत्रातील संमतीदर्शक भाव पाहून तिला बळ आले. सर्व धैर्य एकवटून द्रौपदीने बोलावयास सुरूवात केली. तिचा सूर अत्यंत शांत पण निश्चयी होता आणि तिचे बोलणेही अत्यंत निःसंदिग्ध व स्पष्ट होते.

“अहो कर्णराज, प्रथम मी तुमची मनःपूर्वक क्षमा मागते. तुमचा कोणत्याही प्रकारे अवमान करण्याचा माझा मुळीच हेतू नाही. परंतु काही गोष्टी वेळीच स्पष्ट करणे हे माझ्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. कारण हा माझ्या पुढील सर्व जीवनाचा प्रश्न आहे. माझ्या स्वयंवरासाठी धनुर्विद्येची कसोटी घेणारा असा ‘पण’ लावलेला आहे ही गोष्ट खरीच आहे. पण त्याआधी माझीही एक अट आहे. हा ‘पण’ जिंकण्यासाठी प्रयत्न करणारा पुरूष हा कुलवान असणे अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय कोणताही पुरूष प्रयत्न करण्यासाठीही पात्र ठरणार नाही आणि ही गोष्ट माझ्या पित्याने आधीच स्पष्ट केलेली आहे.

कर्णराज, तुम्ही एक वीरपुरूष म्हणून प्रख्यात आहात, हे मीही जाणून आहे. पण त्याचबरोबर तुमच्या खऱ्या कुळाचा ठावठिकाणा नाही




असेही मी ऐकून आहे. एका सारथ्याला तुम्ही अर्भकावस्थेत गंगेच्या प्रवाहात सापडलात व त्यानेच तुमचे सर्व संगोपन केले अशीही वदंता आहे. तुम्हाला कोणत्याही प्रकारे हिणवण्याचा माझा अजिबात हेतू नाही आणि तसे करण्याचा मला कोणता अधिकारही नाही. परंतु माझ्या निर्णयाशी मात्र मी ठाम आहे. हा निर्णय माझा अत्यंत व्यक्तिगत आहे आणि त्याचा मला पूर्ण हक्कही आहे. तरी तुम्ही प्रथम तुमच्या कुळासंबंधी सांगणे करावे आणि नंतरच ‘पण’ जिंकण्यासाठी पुढे व्हावे अशी मी तुम्हाला विनंती करते.”

द्रौपदीचे बोलणे ऐकून स्वयंवर मंडपात सर्वत्र निःशब्द शांतता पसरली. काही जणांचा तर त्यांच्या कानावरती विश्वासच बसेना. द्रौपदीकडून अशा वक्तव्याची कोणीच अपेक्षा केली नव्हती. स्वयंवर प्रसंगी कोणी राजकन्या एवढे स्पष्टपणे बोलू शकेल अशी कोणी कल्पना करणेही शक्य नव्हते. अगदी द्रुपदालाही अशी कल्पना नव्हती. त्यामुळे तोही द्रौपदीकडे एकटक पहातच राहिला. परंतु द्रौपदीच्या बोलण्यातील मुद्दा त्यालाही पटला होता आणि मान्य होता. त्यामुळे द्रुपद जरी काही बोलला नाही तरी त्याने द्रौपदीकडे पाहून संमतीदर्शक मान हलवली आणि द्रौपदीच्या बोलण्याला दुजोराच दिला. परंतु सर्वात हतबुद्ध झाला तो अर्थातच कर्ण! द्रौपदीच्या त्या अनपेक्षित बोलण्याने कर्ण जेवढा अचंबित झाला, त्याहीपेक्षा जास्त तो अवमानितच झाला. द्रौपदीचे बोलणे त्याच्या अंतःकरणाला अत्यंत वेदनादायी झाले. तरीही कर्णाने मनाचा संयम कायम राखला आणि स्वतःला सावरून धरले. पुढे गेलेला कर्ण, जो जागच्या जागीच थबकून उभा राहिला होता, तो द्रौपदीचे बोलणे ऐकून त्याच पावली मागे फिरला आणि मान खाली घालून स्वतःच्या आसनाच्या दिशेने सावकाश पावले टाकीत चालू लागला. परंतु कर्ण जेव्हा द्रौपदीच्या समोर आला तेव्हा मात्र तो पुन्हा थांबला आणि द्रौपदीकडे रागाने जळजळीत कटाक्ष टाकीत बोलू लागला. खरे म्हणजे कर्णाच्या मुखातून शब्दांचा स्फोटच होऊ लागला.

“अगं द्रौपदी, अशा तऱ्हेने माझा सर्वांसमक्ष अवमान करून तू तुझ्या कोत्या व क्षुद्र मनोवृत्तीचेच प्रदर्शन केले आहेस, ज्याच्यासाठीच तुम्ही स्त्रिया प्रसिद्ध आहात. खरे तर, कोणत्याही माणसाचे श्रेष्ठत्व हे त्याच्या जन्मकुळावरून ठरत नसते तर ते त्याच्यावर झालेल्या संस्कारावरून निश्चित होत असते. त्याचप्रमाणे कोणत्याही पुरूषाचे पुरूषत्व हे त्याच्या पराक्रमानेच सिद्ध होत असते. कारण कोणाचा जन्म कोणत्या कुळात व्हावा हे कोणाच्याच हातात नाही. परंतु प्रयत्नाने मोठेपण प्राप्त करून घेणे मात्र प्रत्येकाला शक्य आहे आणि तेच महत्त्वाचे आहे. तरीही तुझ्यासारखी स्वतःला बुद्धीमान समजणारी स्त्री जेव्हा जाणूनबुजून असा कुळाचा खोटा मुद्दा उपस्थित करते तेव्हा तिचे अती शहाणपण व तिच्याठायीचा अहंकारच प्रगट होतो. तुझ्याठायी स्वतःच्या रूपगुणाविषयी केवढा गर्व आहे हेच सिद्ध होते.

हे द्रुपद महाराज, अशा तऱ्हेने स्वयंवराला सर्वांना आधी आमंत्रित करायचे आणि मग माझ्यासारख्या एखाद्याचा जाहीरपणे अपमान करायचा, हे तुमच्यासारख्या वयोवृद्ध, अनुभवी व ज्ञानी व्यक्तीला खचितच शोभा देणारे नाही. हे तर सभ्यपणाचे किंवा सुसंस्कृतपणाचेही लक्षण नाही. खरे तर, हे सर्व मी तुम्हाला समजावून सांगण्याची काहीही आवश्यकताच नाही. पण द्रौपदीचे बोलणे ऐकून तुम्ही त्यावर एक चकार शब्दही न बोलता ज्याअर्थी स्वस्थ बसून राहिला आहात, त्याअर्थी द्रौपदीच्या बोलण्याला तुमची पूर्ण संमती आहे असाच अर्थ त्यातून निघत आहे. मला तरी यामागे कोणाचे तरी काहीतरी राजकारण असावे याची खात्रीच वाटते. मला येथे बोलावून मुद्दाम अपमानित करण्यामागे निश्चितच कोणाचा तरी डाव आहे. पण त्याची फळे तुम्हाला भोगावी लागतील आणि त्यासाठी फार मोठी किंमत तुम्हाला मोजावीच लागेल याची पूर्ण खात्री बाळगा. माझा परममित्र असलेला कुरूकुळाचा युवराज दुर्योधन माझा झालेला हा अवमान सहन करणे कधीच शक्य नाही.



द्रौपदी, तूही एक गोष्ट पूर्णपणे लक्षात ठेव. तू माझा हा जाणूनबुजून केलेला अवमान तुला अत्यंत महागात पडणार आहे. जन्मभर तुला त्यासाठी रडावे लागेल आणि अनन्वित कष्ट व क्लेशही भोगावे लागतील. माझ्या कुळाची व माझ्या मातापित्यांची माहिती जरी मला नसली, तरी ज्या मातापित्यांनी माझा सांभाळ केला आणि माझे पालन-पोषण करून मला वाढविले त्यांच्याविषयी मला सार्थ अभिमानच आहे. विशेषतः माझी माता राधा ही तर माझ्यासाठी सर्वस्व आहे आणि ती तर माझे अत्यंत पूजनीय असे दैवतच आहे. तुझ्याकडून कळत नकळत त्या माझ्या मातेचीच अवहेलना घडलेली आहे. एवढेच नव्हे, तर ज्या मातेने माझ्यावरती सुसंस्कार केले त्या माझ्या मातेच्या मातृत्वाचाच जणू तू अवमान केलेला आहेस आणि त्या पापाची फळे तुला याच जन्मात भोगावी लागतील, हे तू निश्चितपणे समजून रहा.”

कर्णाने त्याचे बोलणे महत् प्रयासाने आवरून घेतले खरे, पण त्याचा झालेला प्रक्षोभ काही कमी झालेला नव्हता, हे त्याच्या क्रुद्ध चेहऱ्यावरून स्पष्टपणे दिसत होते. रागाच्या त्या भरातच, झालेला अवमान कसाबसा गिळून कर्ण स्वतःच्या आसनावर जाऊन बसला. स्वयंवरमंडपात पसरून राहिलेल्या शांततेतही एक प्रकारचा सुप्त तणाव सर्वांनाच जाणवत होता आणि सर्वचजण श्वास रोखून पुढे काय घडणार याची वाट पहात स्वस्थ बसून राहिले.”

नारदाचे बोलणे लक्षपूर्वक ऐकणाऱ्या लक्ष्मीला शेवटी स्वस्थ बसवलेच नाही. तिचाही अत्यंत नाईलाजच झाला. थोडीशी संधी मिळण्याचा अवकाश, तिने ती संधी साधलीच आणि बोलावयास सुरुवातच केली.

“अरे नारदा विवाह म्हटला की अगदी सुरुवातीपासूनच काहीना काही अडचणी येणारच असा जणू नियमच आहे की काय अशी मला तरी शंका वाटते. कारण आतापर्यंत कृष्णचरित्रामधील ‘कृष्ण व रुक्मिणी यांचा विवाह’ आणि ‘अर्जुन व सुभद्रा यांचा विवाह’ असे दोन प्रसंग तू

सांगितलेस आणि त्या प्रत्येक प्रसंगात अगदी पहिल्यापासूनच अनेक अडचणी व संघर्षाची परिस्थिती निर्माण होत राहिली. आता द्रौपदीच्या स्वयंवराची सुरुवातही अशा संघर्षात्मक प्रसंगातून होत असताना दिसत आहे. हा निव्वळ योगायोग म्हणावा, की हीच कृष्णचरित्राची खासियत आहे असे समजावे, हे आता तूच मला सांग. मुळामध्ये द्रौपदीच्या स्वयंवरासाठी लावलेला ‘पण’ हाच मुळी एवढा कठीण आहे, की तेथपासूनच अडचणींना सुरुवात होते. अर्थात तो ‘पण’ केवळ अर्जुनालाच जिंकणे शक्य व्हावे हा त्यामागील कृष्णाचा गुप्त हेतू जरी बरोबर असला, तरी त्यामुळे स्वयंवरमंडपामध्ये एक प्रकारच्या नैराश्याचे वातावरण निर्माण झालेच आणि थोडीशी तणावपूर्णताही पसरून राहिली हे मान्य करावयासच हवे. मला वाटते स्वयंवराचा हा ‘पण’ जर लोकांना आधीच कळविला असता तर फारच थोडे राजे किंवा राजपुत्र त्या स्वयंवराला उपस्थित राहिले असते. अर्थात बरेच जण कुतूहलाने किंवा औपचारिकता म्हणून हजर झाले असते ती गोष्ट वेगळी.

नारदा, मला सर्वात नवल वाटते म्हणण्यापेक्षा वाईटच जास्त वाटते ते कर्णाच्या प्रसंगाचे. तो प्रसंग निश्चितच टाळता आला असता. कर्ण हा अर्जुनाचा प्रतिस्पर्धी आहे हे कृष्णाला माहित होते आणि त्याने द्रौपदीलाही तसे आधीच सांगितले होते. बरे, कर्णाच्या जन्माविषयी व कुळाविषयीही सर्वांना आधीच माहिती होती. तेव्हा कर्णाला जर स्वयंवराचे आमंत्रणच पाठवले नसते तर ते जास्त बरे झाले नसते का? म्हणजे असा अनावस्था प्रसंग गुदरलाच नसता. पण एखाद्याला आमंत्रण देऊन बोलवायचे आणि मग सर्वांसमक्ष जाहीरपणे त्याच्या कुळाविषयी प्रश्न व शंका उपस्थित करून त्याला नामोहरम व अवमानित करायचे हे माझ्या तरी बुद्धीला पटत नाही. ‘पण’ जिंकण्यासाठी केवळ अर्जुनाचा मार्ग खुला करण्यासाठीचाच तो एक चुकीच्या पद्धतीने केलेला प्रयत्न होता, असे सकृत् दर्शनी तरी दिसते. मला तरी तसेच वाटते. विवाहासारख्या मंगल प्रसंगी एखाद्याचा जाणूनबुजून किंवा कळत नकळतही अवमान

झाल्यामुळे तेथील एकंदरीत वातावरणही गढूळ झालेच असणार, नाही का? त्यातूनही कर्णाच्या मनामध्ये द्रौपदीविषयी द्वेष, मत्सराचे किंवा सूडभावनेचे बीज पेरले गेले ते वेगळेच. त्याचा पुढे प्रत्यक्ष त्रास हाही द्रौपदीलाच झाला असणार ना? यामध्ये कोणाचे तरी, कोठे तरी, काही तरी निश्चितच चुकले असावे असे मला तरी वाटते. पण कोणाचे काय चुकले हे मात्र मला निश्चितपणे कळत नाहीये. तरी नारदा, तूच हा माझ्या मनाचा गुंता लवकरात लवकर सोडवून माझ्या मनाला मोकळे कर बघू.”

***


लक्ष्मीच्या बोलण्याने नारदही गंभीरच झाला. लक्ष्मीच्या मनाची झालेली अगतिक अवस्था पाहून नारदाला तिची दयाच आली आणि त्याने गंभीरपणे लक्ष्मीशी बोलावयास सुरुवात केली.

“अगं लक्ष्मी, तुला कर्णाबद्दल सहानुभूती वाटणे साहजिकच आहे. त्यात तुझा काहीच दोष नाही. पण त्यासाठी तुला एवढे व्यथित होण्याचे कारण नाही. केवळ भावनेच्या भरात वस्तुस्थितीपासून दूर जाण्याचे करू नकोस. कारण मग तू सत्याच्या जवळच काय सत्याच्या दिशेलाही येऊ शकणार नाहीस. तेव्हा तुला आधी प्रयत्नपूर्वक आणि वेळीच सत्याच्या दिशेकडे निदान वळावयास तरी हवे. मुळामध्ये जेव्हा द्रुपद राजाने स्वयंवराचा ‘पण’ घोषित केला तेव्हाच त्याने एक गोष्ट स्पष्ट केली होती, की ‘कुलशीलवान पुरूषच या स्वयंवरात भाग घेण्यासाठी पात्र आहेत.’ कारण केवळ धनुर्विद्येत निष्णात आहे एवढ्याच गुणवत्तेवर द्रौपदी कोणाही सोम्यागोम्याला वरणे शक्यच नव्हते, ते योग्यच ठरले नसते. तो द्रौपदीच्या संपूर्ण जीवनाचाच प्रश्न होता. तिला त्या पुरूषाशी संसार करून सर्व जीवन त्याच्याबरोबर व्यतीत करावयाचे होते. या दृष्टीने पाहिले असता द्रुपदाने घातलेली अट अगदी बरोबरच होती. हे माहित असूनही कर्ण हा जाणूनबुजून ‘पण’ जिंकण्यासाठी पुढे सरसावला. तेव्हा मग त्याच्या जन्मासंबंधीचा उल्लेख हा अटळच ठरला. नव्हे,

कर्णानेच तो उल्लेख करणे जणू भागच पाडले आणि कर्णानेच जे स्वतःहून मागून घेतले तेच त्याला मिळाले. कर्ण जर स्वतःच समजून उमजून आपणहून दूर राहिला असता, तर पुढे घडलेला अनावस्था प्रसंग कर्णावर ओढवलाच नसता. हे तर खरे आहे ना?

लक्ष्मी, आता तू विचारशील की मग कर्णाला बोलावलेच का? तर वस्तुस्थिती अशी होती की औपचारिक आमंत्रण सर्वच राजामहाराजांना रीतसर पाठवलेले होते. कर्ण हा दुर्योधनाच्या सांगण्यावरून, त्याचा प्रतिनिधी म्हणून त्या स्वयंवराला हजर होता. त्याच मर्यादेत तो राहिला असता तर ते ठीकच होते. त्याला कोणाचीच काही हरकत असण्याचा प्रशनच नव्हता. परंतु स्वयंवरासाठी लावलेला ‘पण’ ऐकल्यानंतर कर्णाठायीची क्षत्रियवृत्ती जागृत झाली आणि त्याच्या पराक्रमाला आव्हान देणारा तो ‘पण’ जिंकण्यासाठी त्याच्याठायी एकप्रकारची ईर्षाच निर्माण झाली. आधीच कर्णाठायी स्वतःच्या पराक्रमाविषयी जरी रास्त असला, तरी अभिमान होताच आणि त्यातच त्याचे मन द्रौपदीच्या सौंदर्यानेही अत्यंत आकर्षित झाले. या दोन्ही गोष्टींची परिणती कर्णाचे मन थोडेसे चळण्यामध्ये झाली आणि त्याच्याठायीचा विवेकच तेवढावेळ तरी नष्टच झाला. द्रौपदी आपल्या पराक्रमावर व व्यक्तिमत्त्वावर नक्कीच आकृष्ट होईल अशी त्याला पक्की खात्री होती. परंतु कृष्णाठायी स्थिर असलेले द्रौपदीचे मन अजिबात ढळले नाही आणि कृष्णाला दिलेल्या शब्दाशी द्रौपदी ठाम राहिली. तिचा दृढ निश्चय कायमच राहिला.

हे लक्ष्मी, असा प्रसंग निर्माण होऊ शकेल याची कृष्णाला कल्पना होतीच आणि म्हणूनच त्याने द्रौपदीला आधीच तशी पूर्वसूचनाही देऊन ठेवली होतीच. द्रौपदीही अत्यंत जागरूक व दक्ष होती. त्यामुळेच ज्या वेळेस ‘पण’ जिंकण्यासाठी अकल्पितपणे कर्ण पुढे आला, त्यावेळेस द्रौपदी लगेचच सावध झाली. खरे तर, कर्ण हा सूतपुत्र आहे ही गोष्ट द्रुपदालाही माहित होतीच. त्यामुळे कर्णाला आवरण्याची जबाबदारी द्रुपदावरतीच होती. परंतु कर्णाला थांबवण्यासाठी द्रुपदाला एकदम धैर्य



झाले नाही. त्याचे धैर्यबळ प्रयत्नपूर्वक एकवटण्यासाठी द्रुपदाला थोडासा वेळ लागत होता. परंतु तो थोडा वेळ देखील द्रौपदीला बराच जाणवला आणि तोही तिला असह्यच झाला. द्रौपदीचाही मग नाइलाजच झाला आणि तिने स्वतः पुढे होऊन कर्णाला रोखले. द्रौपदीने कर्णाला तिचे म्हणणे जसे ठामपणे सांगितले होते, तसेच ते अत्यंत नम्रतेनेही सांगितले होते, ही गोष्टही लक्षात घ्यायला हवी. द्रौपदीने कर्णाला उद्देशून कोणतेही अवमानकारक शब्द वापरलेले नव्हतेच. परंतु कर्णाला मात्र द्रौपदीचे बोलणे अगदी जिव्हारी झोंबले. कारण द्रौपदीकडून नेमके कर्णाच्या वर्मावरतीच बोट ठेवले गेले होते आणि कर्ण सर्वांसमक्षच उघडा पडला होता. त्यामुळे साहजिकच कर्णाचा अहंकार दुखावला गेला आणि त्याचीच परिणती कर्णाच्या चिडण्यात झाली. मग कर्णाच्या मनाचाही तोल गेला आणि द्रौपदीने विचारलेल्या मूळ प्रश्नाचे उत्तर न देताच, त्याने उलट द्रौपदीलाच दुरूत्तरे करण्यास सुरुवात केली. एवढेच नव्हे, तर कर्णाने द्रौपदीशी आव्हानात्मक भाषेतही बोलण्यास सुरुवात केली. सुसंस्कृतपणाचा आव आणून मिरवणाऱ्या कर्णाच्या सभ्यतेचा मुखवटाही शेवटी गळून पडला.

हे लक्ष्मी, हा प्रसंग टाळता आला असता आणि तसा तो टाळावयासही हवा होता हे तुझे म्हणणे बरोबरच आहे. परंतु प्रश्न असा आहे की तो प्रसंग टाळण्याचा प्रयत्न कोणी करावयास हवा होता आणि तसे करण्याची जबाबदारी निश्चितपणे कोणाची होती? यासंबंधी प्रसंग घडून गेल्यावरती पुष्कळ बोलता येणे अगदी सहज शक्य आहे. परंतु त्याचा फारसा काही उपयोग त्या प्रसंगातील संबंधितांना तर होणे शक्यच नाही. तरीसुद्धा प्रसंगाचा निरपेक्षपणे अभ्यास करावयाचा झाला, तर ईश्वराची नियती असे म्हणता येईल खरे, पण ते तर सर्वच प्रश्नांचे उत्तर आहे आणि नियतीचा अभ्यास करणे तर शक्यच नाही. ‘ईश्वरी नियती ही अशी अशी आहे’ एवढेच फक्त तिच्याविषयी म्हणता येईल. दुसरे कारण म्हणजे त्या प्रसंगात प्रत्येक जण त्याच्या त्याच्या

स्वभावानुसार वागला आणि स्वभावाच्या बंधनापुढे तर कोणाचाच कसलाही इलाज नाही. कारण स्वभावाला औषध नाही असे जे म्हणतात, ते संसारात तरी अगदी खरेच आहे. परंतु स्वभावाला खरे तर उपाय आहे आणि तो म्हणजे विवेक! या विवेकाने स्वभावावरती निश्चितच मात होऊ शकते आणि स्वतःचे व इतरांचेही जीवन सुसह्य व स्वास्थ्याचे नक्कीच करता येते.

हे लक्ष्मी, हा विवेक भक्तिमार्गानेच प्राप्त होऊ शकतो. विवेक हे तर भक्तिभावाचे प्रमुख लक्षण आहे. तो केवळ शाब्दिक ज्ञानाने मात्र निर्माण होऊ शकत नाही. कारण शाब्दिक ज्ञानाने केवळ अहंकारच निर्माण होतो आणि अहंकाराच्या ठिकाणी विवेक हा संभवतच नाही. कर्ण हा जसा पराक्रमी होता तसाच तो अत्यंत बुद्धिमान व ज्ञानीही होता. परंतु हे ज्ञान त्याला गुरूकृपेमुळे किंवा गुरूसेवेतून प्राप्त झालेले नव्हते. त्यामुळे कर्णाच्या चित्ताची शुद्धी झालेलीच नव्हती आणि विवेक हा तर शुद्ध मन व शुद्ध बुद्धी यांच्या संयोगाने शुद्ध चित्ताच्या ठायीच निर्माण होतो. त्यामुळे कर्णाने आधी अहंकाराच्या भरात स्वतःची सीमारेषा जाणून बुजून ओलांडली आणि जेव्हा द्रौपदीने त्याला रोखले तेव्हा कर्णाला ते सहन झाले नाही. कर्णाच्या अशुद्ध मनाचा तोल गेलाच आणि त्याने स्वतःच स्वतःचा अवमान करून घेतला. डोळ्यासमोर दिसत असतानाही अग्नीवरती जाणूनबुजून पाय ठेवायचा आणि नंतर पाय पोळला म्हणून आरडाओरडा करावयाचा. एवढेच नव्हे, तर त्या ठिकाणी अग्नी कोणी ठेवला असे म्हणून त्याच्या नावाने शंख करून, उगाचच आकांड तांडव करण्यातलाच हा प्रकार झाला असेच म्हणावे लागेल.


हे लक्ष्मी, गंगेच्या प्रवाहात मिळालेल्या अर्भकावस्थेतील कर्णाचे पालनपोषण व संगोपन एका सारथ्याने व त्याच्या पत्नीने त्याला स्वतःचा मुलगा समजून, अत्यंत प्रेमाने केले होते ही गोष्ट खरीच होती. त्यामुळे कर्ण त्याच्या मातापित्यांसंबंधी, विशेषतः मातेविषयी अत्यंत भावनाशील होता आणि तेही अगदी साहजिकच होते. पण कर्णाला त्या

गोष्टीचे भांडवल करण्याची काहीच जरूरी नव्हती. परंतु भावनेच्या भरात कर्ण त्याच्या झालेल्या अवमानाला त्याच्या मातेचाच अवमान मानू लागला आणि त्याने तसा आरोपही द्रौपदीवरती केला. खरे तर, कर्णाच्या मातेच्या उल्लेखाचा मुद्दाच अप्रस्तुत व गैरलागूच होता. कर्णाच्या मातेच्या वात्सल्यभावाविषयी शंका घेण्याचे कोणालाच काहीही कारणच नव्हते. त्याविषयी तर काहीही प्रश्नच निर्माण होत नव्हता. पण तरीही कर्ण भावनाविवश होऊन विनाकारणच त्याच्या मातेला त्या वादात ओढू पहात होता. त्या निमित्ताने जणू लोकांची सहानुभूती मिळवण्याचा कर्णाचा तो प्रयत्न त्याच्या मनाची दुर्बलताच व्यक्त करीत होता. त्या दुर्बलतेपोटीच काहीतरी भावनिक आधार शोधण्याचा कर्णाचा तो केविलवाणा प्रयत्न होता. अर्थातच त्याला त्या प्रयत्नामध्ये यश नक्कीच मिळाले. स्वयंवरमंडपामध्ये एकदम कर्णाच्या विषयी सहानुभूतीचे वातावरण निर्माण झाले खरे, परंतु कर्णाला त्याचा प्रत्यक्ष असा काहीच लाभ होऊ शकला नाही. कारण द्रौपदी ही तिच्या निश्चयाशी व निर्णयाशी अढळ राहिली आणि लावलेल्या ‘पणा’च्या आधीच ठरवलेल्या नियमानुसार कर्णाला चरफडत का होईना पण तेथून बाजूला व्हावे लागले.

हे लक्ष्मी, कर्णाविषयी सहानुभूती तुलाच काय, अगदी कोणालाही वाटणे अगदी साहजिकच आहे. त्याच्या जन्माचे रहस्य व त्याच्या पुढील जीवनाचा इतिहास जर तुला कळला तर तुला निश्चितच व अधिकच वाईट वाटेल. पण जर मी तुला हे आताच सर्व सांगत बसलो तर विषयांतर होईल आणि मग मूळ कथाप्रसंग बाजूलाच राहील. कारण कर्णाच्या कथेतून पुन्हा आणखीन नवीन प्रश्न निर्माण होतील. कर्ण हा दुर्दैवी होता, एवढेच फार तर म्हणता येईल. अत्यंत पराक्रमाबरोबरच परोपकार व दानशूरता या दैवी गुणांचा लाभही त्याला झालेला होता. सूर्यासारखी अत्यंत तेजस्वी अशी कवचकुंडले त्याला जन्मजातच लाभलेली होती. एवढे असूनही कर्णाच्या ठायी अगदी लहानपणापासूनच

एक प्रकारचा न्यूनगंडच निर्माण झालेला होता. बालवयामध्ये सूतपुत्र म्हणून सतत हिणवले गेल्यामुळे कर्णाला कधीच योग्य संधी मिळाली नाही आणि त्याच्या गुणांची योग्य कदरही झाली नाही. कर्णाच्या गुणवत्तेलाही थोरामोठ्यांकडून कधीच मान्यताही मिळालीच नाही. अशा न्यूनगंडाने पछाडलेल्या कर्णाचा दुर्योधनाने त्याच्या स्वार्थासाठी उपयोग करून घेतला. दुर्योधनाने धूर्तपणा दाखवून कर्णाला राजमान्यता मिळवून दिली आणि त्याला पूर्णपणे वश करून घेतले. दुर्योधनाच्या उपकारांच्या ओझ्याखाली दबलेल्या कर्णाने त्याची निष्ठा पूर्णपणे दुर्योधनाच्या ठायी वाहिली आणि स्वतःचे सर्व जीवनच जणू त्याने दुर्योधनाला समर्पण केले. येथेच कर्णाच्या मानसिक अधोगतीला सुरूवात झाली.

हे लक्ष्मी, समर्पण हे तर खरे भक्तिभावाचे लक्षण आहे आणि असा भक्तिभाव फक्त ईश्वरासाठीच संभवतो. असे असतानाही कर्णाने दुर्योधनालाच त्याचे दैवत मानले आणि दुर्योधनासाठीच सर्व जीवन जगण्याचा निश्चय केला. कर्णाने तसे वचनच दुर्योधनाला दिले आणि त्याने ते शेवटपर्यंत पाळलेही. यासाठी काहीजण कर्णाचे कौतुकही करतील. परंतु यामध्ये कर्णाच्या मनाची दुर्बलताच उघडी पडली. दुर्योधनाची दुष्प्रवृत्ती व त्याची कुटिल नीती याची पूर्ण माहिती असूनही कर्ण दुर्योधनाचीच साथ करीत राहिला, ही गोष्ट कर्णाच्या मनाचा कमकुवतपणाच सिद्ध करते. पुढे दुर्योधनाने पांडवांविरूद्ध केलेल्या सर्व कपट कारस्थानांमध्ये कर्ण कळत नकळत व प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे सहभागी झालाच किंवा वेळप्रसंगी जाणूनबुजूनही स्वस्थच राहिला. दुर्योधनाला विरोध करण्याची वा त्याला योग्य गोष्टी समजावून सांगण्याची हिंमतच कधी कर्णाला झाली नाही. कारण तो दुर्योधनाचा मिंधाच होऊन राहिला होता. त्यामुळेच दुधात टाकलेल्या एका मिठाच्या खड्याप्रमाणे कर्णाचे सर्व जीवनच नासून गेले आणि त्याच्या सर्व गुणांवरती पाणीच फिरवल्यासारखे झाले. कर्णाच्या या अधोगतीला व त्यातूनच अटळ ठरलेल्या त्याच्या नाशाला केवळ एकमेव कर्णच



जबाबदार आहे. त्यासाठी दुसऱ्या कोणालाही जबाबदार धरता येणारच नाही, हे अगदी पक्केपणाने लक्षात ठेव.


हे लक्ष्मी, जीवनामध्ये सर्वच गोष्टी काही सर्वांच्याच मनासारख्या नेहमी होतातच असे नाही. पण त्यावेळेसच तुमच्या सद्‌गुणांचा कस लागतो. जेव्हा गोष्टी मनाविरूद्ध घडतात, तेव्हाच सद्भाव टिकवून ठेवणे आवश्यक असते आणि त्यासाठीच विवेकाची जरूरी असते. असा विवेक सत्संगतीनेच प्राप्त होऊ शकतो. मानसिक अडचणींच्या वेळी सत्पुरूषांचे मार्गदर्शन घेतले तर तेच हा विवेक जागृत करतात आणि सद्भावाला सबळ करतात. सत्पुरूष जन्म व कुळाचा विचार न करता सर्वांनाच आश्रय देत असतात. नेमके हेच कर्णाने केले नाही. त्याने सज्जनांचा आधार तर घेतला नाहीच, उलट दुर्योधनासारख्या दुर्जनांचा आश्रय घेऊन कर्णाने त्याची बुद्धी, त्याचा पराक्रम, एवढेच काय, त्याची सर्व जीवनमूल्येच दुर्योधनाकडे जणू गहाणच टाकली, जी त्याला कधीच परत मिळाली नाहीत. कारण कर्ण पुढील सर्व जीवनभर दुर्योधनाच्या उपकारांच्या ऋणातच जखडून राहिला.

लक्ष्मी, माझ्या बोलण्यातून नाही म्हटले तरी थोडेसे विषयांतर होत आहे असे तुला एखादे वेळेस वाटेल. पण हे केवळ विषयांतर नसून मी सांगत असलेल्या विषयांतील अंतर, म्हणजे त्या विषयाचा गाभा अधिकाधिक स्पष्ट करून सांगत आहे आणि हे मी जाणूनबुजूनच करीत आहे. कारण सामान्यांच्या अंतरात फक्त सांसारिक विषयच भरलेले असतात. त्यामुळेच त्यांचे अंतःकरण हे नेहमीच अशुद्ध व मलीन असते. परंतु ईश्वरी अनुभवामुळे विशुद्ध व निर्मळ असलेल्या अंतरात जेव्हा भक्तिभाव स्फुरून येतो, तेव्हा त्यातूनही अनेक व विविध विषय प्रगट होत रहातात. मात्र त्या विषयांच्या द्‌वारा ईश्वरी प्रेमभक्तीचेच माहात्म्य सिद्ध होत असते, ही महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेव. अगं, या कर्णाने धनुर्विद्‌या प्राप्त करून घेतली होती, ती सुद्धा त्याचे गुरू परशुराम यांच्याशी असत्य बोलून! ब्राह्मण कुलोत्पन्न असूनही वृत्तीने क्षत्रिय

असलेले परशुराम यांचा नियम होता, की ते केवळ ब्राह्मण कुळातील व्यक्तींनाच धनुर्विद्या शिकवतील. पण कर्णाने त्याच्या जन्माची गोष्ट परशुरामांपासून जाणूनबुजून लपवून ठेवली. एक दिवस ती गोष्ट काही कारणामुळे परशुरामांना कळलीच. कर्णाचा हा खोटेपणा परशुरामांना सहन झाला नाहीच आणि त्यांचे आशीर्वाद व त्यांची कृपा कर्णाला लाभू शकली नाही. त्याचाच परिणाम म्हणून कर्णाला प्राप्त झालेली धनुर्विद्या त्याला पूर्णपणे फळू शकली नाहीच.

हे लक्ष्मी, हे सर्व तुला एवढ्या सविस्तरपणे सांगण्यामागील माझा उद्देश केवळ एवढाच आहे की एखाद्याला जीवनात अनन्वित दुःखे व क्लेश भोगावयास लागले म्हणून त्याच्याविषयी सहानुभूती व दया जरूर असावी, पण म्हणून त्याच्या दुर्गुणांकडे दुर्लक्ष करू नये किंवा त्याच्या दुर्वर्तनाचे समर्थन करू नये. कारण अशा व्यक्तींना शेवटी त्यांच्या कर्माचे व त्यांच्या भावाचे फळ हे भोगावेच लागणार आहे. त्यावेळेस मात्र कोणीही तक्रार करू नये किंवा दुसऱ्या कोणालाही दोष देऊ नये आणि स्वतःवर अन्याय झाला अशी ओरड करू नये.

लक्ष्मी, परंतु जीवनामध्ये विनाकारण अवमान व अवहेलना अनुभवायला मिळाली असता, ज्यांनी एकमेव ईश्वरालाच आर्ततेने आळवले आणि महापुरूषांचा आश्रय घेऊन त्यांचे मार्गदर्शन घेतले, त्यांनी मात्र प्रयत्नपूर्वक त्यांचा सद्भाव व सत्यनिष्ठा कायम राखली. त्यांच्या सदाचरणाचे फळ त्यांना निश्चितपणे मिळाले आणि त्यांची जीवने सुख, शांती व आनंद यांनी भरून राहिली. लक्ष्मी, याचे तुला एकच उदाहरण देतो, म्हणजे माझे सांगणे तुझ्या लक्षात येईल. या दुर्योधनाचा चुलता विदुर, हा तर दासीपुत्रच होता. खरे तर महर्षी व्यास हेच त्याचे पिता होते. परंतु त्याचा जन्म मात्र एका दासीच्या पोटी झालेला होता. त्याचा तपशील मी तुला येथे सांगत बसत नाही. कारण तो येथे अनावश्यक आहे. पण त्यातील मुद्दा एवढाच आहे की या विदुरालाही जन्मापासूनच नेहमी अवमान व अवहेलना सहन करावी लागली. एवढेच काय, खुद्द




दुर्योधनही विदुराला वारंवार व सर्वांसमक्ष अपमानित करून त्याचा पाणउताराही करीत असे. परंतु मुळातच सत्प्रवृत्तीचा व सज्जन असलेला विदुर, त्याच्या सद्भावाला प्रयत्नपूर्वक धरून राहिला आणि दुर्योधनाचा विरोध पत्करूनही पांडवांच्या न्याय्य भूमिकेला तो उघडपणे पाठिंबा देत राहिला. त्याचीच परिणती म्हणून दुर्योधनाने तर विदुराला राज्याबाहेरही काढले. परंतु तरीही विदुराने त्याची सत्यनिष्ठा, सात्त्विकता व सद्भाव सोडला नाही. तर पर्यत्नपूर्वक तो सद्‌गुणांना धरून राहिला.

आता एवढे धैर्यबळ त्या विदुराकडे कुठून आले म्हणशील तर त्याचे एकमेव कारण म्हणजे त्याच्याठायी असलेले कृष्णाविषयीचे नितांत प्रेम व अलोट श्रद्धा. कृष्णाचे माहात्म्य पूर्णपणे जाणून असलेला विदुर, अंतरात मनोभावे व प्रेमभावे नित्य कृष्णालाच भजत असे. कृष्णप्रेमामुळे निर्मळ व प्रेमळ झालेल्या अंतःकरणामुळेच विदुराला कठीण प्रसंगातही उभे राहून उठून दिसण्याचे भावबळ प्राप्त झाले होते. त्याहीपेक्षा सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे विदुराला त्याच्या कृष्णभक्तीचे आनंददायी फळही मिळाले. कृष्णाने एक दिवस प्रत्यक्ष स्वतः विदुराच्या घरी जाऊन त्याची भेट घेतली आणि विदुराच्या भक्तिभावाची पूर्ती केली. अशा तऱ्हेने विदुराने अंतरात कृष्णाची कृपा व प्रसन्नता कायमची प्राप्त करून घेतली.”

नारदाच्या बोलण्याचा वेग एवढा प्रचंड होता की ऐकत असताना लक्ष्मी खरे तर नुसती अवाकच होऊन राहिली होती. परंतु त्याचबरोबर लक्ष्मीला नारदाच्या सांगण्यातील गंभीरताही निश्चितच जाणवत होती. विषयाचे प्रतिपादन करताना नारद केवळ विषयाच्याच अंतरात शिरला नव्हता, तर तो त्याच्याही अंतरात अत्यंत सखोल गेला होता. त्यामुळेच त्याच्या स्वानुभवात त्याची भावपूर्णताही हळूहळू विलय पावत राहिली आणि नारद अचानक निःशब्दच झाला. नारदाचा शब्दप्रवाह थांबला आहे हे कळायलाही लक्ष्मीला जरासा वेळच लागला. कारण त्या शब्दातील नाद लक्ष्मीच्या कानात कितीतरी वेळ घुमतच होता आणि त्या नादातील भाव

तर लक्ष्मीच्या मनात पुरेपूर भरूनच राहिला होता. परंतु थोड्या वेळाने लक्ष्मी भानावर आली आणि तिने नारदाकडे पाहिले तर नेत्र मिटून स्वस्थ बसलेली नारदाची शांत व प्रसन्न मूर्ती लक्ष्मीच्या दृष्टोत्पत्तीस आली. मनाच्या त्या भावपूर्ण अवस्थेतच लक्ष्मी स्वतःच्या जागेवरून उठली आणि तिने नारदाच्या चरणांना स्पर्श करून त्याला प्रेमादरपूर्वक वंदन केले. त्या थोड्याशा स्पर्शातील हळुवार प्रेमभावाने आनंदाच्या पूर्ण अवस्थेत असलेल्या नारदाचे अंतःकरण अत्यंत सुखावले. तेवढ्याशा निमित्तानेही नारद देहभानावर आला आणि त्याने नेत्र उघडून समोर बसलेल्या लक्ष्मीकडे पाहिले. परंतु नारदाच्या मुखावर स्मित नव्हते आणि त्याच्या नजरेतही गंभीरताच होती. लक्ष्मीला हे ताबडतोब जाणवले आणि तिचे मन व्याकूळच झाले. आपले दोन्ही कर जोडून तिने नारदाला पुन्हा नमस्कार केला आणि तिने गंभीर सुरात बोलावयास सुरूवात केली.

“अरे नारदा, हे मन मोठे विचित्र आहे, ही गोष्ट अगदी खरी आहे. बाह्य अंगाला व रंगाला भुलून ते केव्हा व कुठे वहात जाईल याचा खरंच भरवसा नाही. काही वेळा बाह्यांगाच्या आकर्षणाने मन मोहितच होते आणि मग गोष्टींच्या अंतरंगाकडे त्या मनाचे दुर्लक्षच होते. बाह्य गुणांमुळे जरी अंतरातील दुर्गुण व दूषितता थोडावेळ झाकोळली जात असली, तरी अंतरातील दोष व घाण ही केव्हाना केव्हा तरी वरती उफाळून येणारच आणि त्यावेळेस मग सर्वच चांगल्या गोष्टी व्यर्थ जाणार, हे तुझे सांगणे अगदी योग्यच आहे. मनाला वेळीच सावध करून त्याचा विवेक जागृत करण्याचा तुझा हा प्रयत्न म्हणजे माझ्यावरील केवढे तरी उपकारच आहेत. अशा बाह्य देखाव्याला भुलून खऱ्याला विसरणे ही मनाची दुर्बलताच आहे, हे आता स्वानुभवाने माझ्याही लक्षात आलेले आहे. आता मी अगदी सावध रहाण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करीन, असे मी तुला वचन देते. कारण माझे मन जेव्हा जेव्हा असे मोहाला बळी पडून सत्यापासून दूर जाते तेव्हा मला जेवढा त्रास होतो,



त्यापेक्षा जास्त त्रास तुला होतो हे मला जाणवते आणि मग त्याचा मला अधिकच त्रास होतो.


नारदा, ‘ईश्वराच्या सेवेला लागतात तेच सद्‌गुण आणि ईश्वराविषयी भक्तिभाव निर्माण करतो तोच सद्भाव होय’ हे तुझे सांगणे एवढे सरळ व स्पष्ट आहे की खरे तर मनाला दुसरा तिसरा विचार करण्याचे कारणच नाही आणि मनाला आजूबाजूला जायलाही वावच नाही. त्यातूनही विशेषतः जेव्हा कृष्णावतारासारखी विशेष चरित्रे प्रगट होतात तेव्हा तर योग्य-अयोग्य व धर्म-अधर्म यांचा निवाडा अगदी स्पष्ट असतो. तेच तर अवतारचरित्रांचे माहात्म्य व विशेषत्व आहे. त्यांचे निर्णय हेच ते योग्य आणि त्यांचे आचरण हाच तो धर्म होय अशी दृष्टी हवी आणि तसाच निश्चयही हवा, नाही का? तेव्हा द्रौपदीचा निर्णय व तिचे वागणे हे कृष्णाला संमत असताना, त्याविषयी शंका घेण्याला मनात जागाच नसावी. पण कर्णाविषयीच्या सहानुभूतीने माझे मन एक प्रकारे भरकटलेच आणि कर्णावरती अन्याय झाला आहे या कल्पनेने, माझे मन अधिकच व्यथित झाले. त्या भरात न्याय व अन्याय याचा निवाडा करणारा प्रत्यक्ष कृष्णच तेथे हजर आहे या गोष्टीचाही मला विसरच पडला. परंतु तू मात्र तुझ्या ब्रीदाला जागलास आणि स्पष्ट व निःसंदिग्ध शब्दात सत्य प्रगट केलेस. त्या सत्यातील प्रखरतेमुळे माझ्या डोळ्यांवर आलेली झापड आता पूर्णपणे बाजूला झालेली आहे आणि सर्व काही मला पुन्हा स्वच्छ व स्पष्ट दिसू लागले आहे. आता माझ्या ठिकाणचा नकारात्मक भाव पूर्णपणे लयाला गेलेला आहे आणि होकारात्मक भाव पुन्हा उदयाला आलेला आहे. तेव्हा हे नारदा, तू वेळीच कृष्णचरित्रातील प्रेमरसाने भरलेल्या भक्तिभावाच्या कथा सांगण्यास पुन्हा सुरूवात कर. त्यामुळे माझे मन पुन्हा प्रेमभावाने युक्त होईल.

कृष्णाला प्रमाण मानून सर्व निर्णय कृष्णावरील प्रेमाने व श्रद्धेने घेणाऱ्या द्रौपदीने तिच्या मार्गात कर्णाच्या रूपाने आलेली अडचण, वेळीच व मोठ्या धैर्याने दूर केली. मुख्य म्हणजे, तिने त्यावेळेस दुसऱ्या

कोणाच्याही प्रतिक्रियेला महत्त्व न देता त्याकडे दुर्लक्षच केले आणि केवळ कृष्णाकडे लक्ष ठेवून कृष्णाला संमत असलेला निर्णय घेतला. पण अजूनही पुढील अत्यंत महत्त्वाचा कथाभाग प्रगट व्हायचाच आहे. अर्जुनाने तो 'पण' जिंकला असणार हे तर निश्चितच आहे. त्याची मला अगदी पूर्ण खात्री आहे. परंतु ते सर्व नीट व्यवस्थितपणे व सुरळीतपणे घडले, की पुन्हा काही बाह्य अडचणी आल्या? माझे मन जरा जास्तच संवेदनाक्षम झालेले आहे आणि त्यामुळे माझ्या मनावरती थोडासा ताणही येत आहे. कारण अर्जुन व इतर पांडव जनात प्रगट झाल्यावरती पुन्हा काही अडचणी व कठीण प्रसंग अगदी सहजपणे संभवतातच. तेव्हा सर्व काही अगदी सावकाशपणे व सखोलपणे मला समजावून सांगण्याचे कर पाहू."

लक्ष्मीचे बोलणे ऐकून नारदाला संतोष झाला खरा, पण त्याची गंभीरता मात्र अजूनही कायम असलेली स्पष्टपणे दिसत होती. त्याच गंभीरतेने नारदाने बोलावयास सुरूवात केली.

"अगं लक्ष्मी, कर्णाची दया येऊन त्याच्याविषयीच्या निरर्थक व वृथा सहानुभूतीमुळे थोडेसे का होईना, पण गढूळ झालेले तुझे मन निवळले आणि पुन्हा मूळ पदावर आले याचे मला निश्चितच समाधान झाले. परंतु काही मूलभूत गोष्टी तू नीट समजून व जाणून घे आणि त्याचा तुझ्याठायी कायमचा निश्चय कर. म्हणजे तुझ्या मनाठायी पुन्हा अशा तऱ्हेची दुर्बलता निर्माण होणार नाही आणि तुझे मन मोहजालात पुन्हा फसणार नाही. कारण कृष्णचरित्रामध्ये पुढेही असे अनेक प्रसंग वारंवार येत रहाणार, ज्यामध्ये योग्य-अयोग्य व धर्म-अधर्म यांचा निवाडा करण्याची वेळ पुन्हा पुन्हा येणार. अशा वेळी कोणाहीविषयीच्या व्यक्तिगत भावनेला किंवा स्वतःच्या बौद्धिक ज्ञानाला महत्त्व न देता कृष्णाच्या अंतःकरणालाच प्रमाण मानायचे आहे, ही गोष्ट न विसरता कायमची लक्षात ठेव. कारण केवळ न्याय व अन्याय ही गोष्ट महत्त्वाची नसून मुख्य प्रश्न सत्य व असत्य याचा आहे. न्याय हा




सत्यालाच मिळाला पाहिजे आणि ईश्वर हाच सत्य आहे हा तर मूलभूत सिद्धांत आहे. त्याच सत्याला कृष्ण अनुभवीत होता आणि त्याच सत्याला प्रगट करणे हा कृष्णाचा धर्म होता. त्या धर्माला रक्षण देणे हाच न्याय कृष्ण करीत होता. तेव्हा सत्य ईश्वराला प्रगट करणे हाच सद्धर्म आणि त्या धर्माला रक्षण देऊन न्याय मिळवून देणे हेच सत्कर्म होय. या मूलभूत सिद्धांताचाच आधी तू कायमचा निश्चय करून ठेव. तरच तुला सर्व कृष्णचरित्र समजेल, उमजेल व आवडेलही. मग तुला कृष्ण अधिकच प्रिय होऊन राहील आणि तुझ्या हृदयात कायमचे स्थान घेऊन राहील.

लक्ष्मी, आणखीन एक गोष्टही समजून घे. द्रौपदीचे कृष्णावर अत्यंत प्रेम व श्रद्धा होती म्हणजे त्याचा असा काही अर्थ होत नाही, की द्रौपदीचे मन अगदी पूर्णपणे शुद्ध होते किंवा तिचे वागणे बोलणेही नेहमीच अत्यंत योग्य असे. कारण द्रौपदी अजूनही खऱ्या अर्थाने कृष्णाची पूर्ण भक्त झालेली नव्हती. त्यामुळे साहजिकच तिचे मन व बुद्धी यांच्याठायीचे काही दोष अजूनही तसेच कायम होते. अर्थात द्रौपदीलाही याची जाणीव होतीच आणि कृष्णही तिला वेळप्रसंगी त्याची जाणीव करून देत असेच. त्यामुळे काही वेळेला या दोषांमुळे द्रौपदीकडूनही अयोग्य वागणे वा बोलणे पुढेही घडलेले आहे आणि मग त्याची फळेही तिला भोगावी लागलेली आहेतच. पण प्रत्येक वेळेस कृष्णाने त्याच्या ब्रीदाला जागून द्रौपदीच्या मदतीसाठी प्रत्यक्षपणे धावून येणे केले आणि द्रौपदीला आधार व प्रेम दिलेच. भक्तिभावाने अंतःकरणाची पूर्ण शुद्धी होण्यास वेळ हा लागतोच आणि तो वेळ किती कमीजास्त लागेल याचा निश्चित असा नियमही नाही किंवा गणितही नाही. परंतु एक गोष्ट निश्चितपणे खरी आहे की तेवढा वेळ ईश्वर त्याच्या चरणी एकनिष्ठेने राहिलेल्या त्याच्या भक्ताला सांभाळत असतो व सांभाळूनही घेतो. परंतु जेव्हा भक्ताचे अंतःकरण ईश्वरी प्रेमाने पूर्णपणे भरून निर्मळ व प्रेमळ होते तेव्हाच त्या भक्तांकडून भक्तीचे आचरण

अत्यंत सहजपणे घडते आणि भक्तिभावाचे खरे बळ व फळ त्या भक्ताला पूर्णपणे प्राप्त होते.

हे लक्ष्मी, यावेळेस कथेवरील निरूपणाचा भाग जरा जास्तच झाला असे एखादे वेळेस तुला वाटेल, पण त्या निमित्ताने आपला केवढा तरी संवाद झाला, ही गोष्ट महत्त्वाची आहे. खरे तर, संवाद व्हावा या हेतूनेच कथाप्रसंग सांगितलेले असतात. पण काही वेळेला होते काय की श्रोत्याच्या मनाला प्रतिपाद्य विषयातील आशयाचा गाभा दिसेनासा होतो, कारण त्याचे मन विषयाच्या बाह्य अंगातच अडकते किंवा बाह्य रंगालाच भुलते. अशावेळी श्रोत्याच्या मनाची संवादी अवस्था नसल्यामुळे वक्ता व श्रोता यामध्ये संवाद होईनासा होतो आणि मग साहजिकच कथेवरील निरूपण वाढत रहाते. विषयातील सूक्ष्म व तरल धागे वक्ता त्याच्या अनुभवसिद्ध वाणीने अत्यंत हळुवारपणे व कुशलतेने उलगडत रहातो आणि श्रोत्याच्या मनातील स्वतःच्याच विचारांचा झालेला गुंताही हळूहळू सुटत जातो. श्रोत्याचे मनही पुन्हा वक्त्याच्या सांगण्याशी जुळू लागून संवादी होते आणि वक्ता ज्याच्याकडे निर्देश करून दाखवित आहे, ते श्रोत्याला पुन्हा दिसू लागते. सगुण प्रेमभक्तीच्या कथांद्वारे ईश्वराचे अंतःकरणच दाखवायचे असते आणि त्या अंतःकरणाला प्रमाण मानून व त्यालाच ध्येय ठेवून भक्तिआचरण करणाऱ्या भक्ताकडे निर्देश करावयाचा असतो. कारण त्या दोन्हीमधूनच ईश्वराशी ऐक्य पावणारा तो भक्तिभाव साकार होत असतो जो आनंदाच्या अनुभवाचे मूळ आहे. असो. आता आपण पुन्हा कथेकडे वळूया आणि त्यातून भरून वहाणाऱ्या प्रेमरसाचे सेवन करून सगुणभक्तीचा आनंद अनुभवू या.

* * * * *



# अर्जुनाने केला मत्स्यभेद

लक्ष्मी, घडलेल्या प्रसंगाने सर्वच जण अवाक् होऊन स्वस्थ बसून राहिले होते आणि त्याठिकाणी थोडेसे निराशेचेच वातावरण पसरले होते. ‘पण’ जिंकण्यासाठी पुढे येण्याचे कोणालाच धैर्य होत नव्हते. आता हे स्वयंवर तरी रहित करावयास हवे किंवा त्यासाठी लावलेला ‘पण’ तरी बदलून थोडासा सुलभ करावयास हवा असेच सर्वांना वाटत होते. द्रुपदाच्या मनातही तसाच काहीतरी विचार आला असावा, असे त्याच्या चेहऱ्यावरील अस्वस्थ भावावरून जाणवत होते. द्रौपदी मात्र अत्यंत विश्वासाने एकटक नजरेने कृष्णाकडे पहात शांतपणे बसली होती. तिने सर्व सूत्रे आधीच कृष्णाच्या हाती सुपूर्द केलेली होती आणि कृष्णाच्या कृतीची ती आतुरतेने वाट पहात होती. कृष्णाच्या कृपेने व प्रत्यक्ष साहाय्याने सर्व काही व्यवस्थितच होणार आहे याची असलेली खात्री, द्रौपदीच्या मुखावर पूर्णपणे दिसत होती.

लक्ष्मी, प्रसंगाचे भान व अवधान असलेल्या कृष्णाने ओळखले, की आता त्याने सूत्रे हलविण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे आणि हातात प्रत्यक्ष वेळ तर कमीच आहे. कृष्णाने पाठवलेल्या निरोपानुसार अर्जुनासह सर्वच पांडव ब्राह्मणवेष धारण करून व कोणाच्याही नकळत स्वयंवरमंडपात आधीच येऊन बसलेले होते आणि एवढावेळ घडत असलेला प्रसंग पहात होते. ‘पण’ जिंकण्याच्या ईर्षेने पुढे सरसावलेला कर्ण आणि त्याला वेळीच रोखणारी द्रौपदी हे सर्व पाहून, पांडव दिग्मूढ तर झाले होतेच पण त्याचबरोबर द्रौपदीकडून प्रगटलेली संयमित तेजस्विता पाहून पांडव अधिक प्रभावितही झाले होते. तिचे विशेष व्यक्तिमत्त्व सर्वच पांडवांच्या मनात विशेषत्वाने भरलेले होते आणि तिच्याकडे ते सर्वजणही अगदी एकटक नजरेने न्याहाळून पहात होते. द्रौपदीच्या आकर्षक व सुरेख व्यक्तिमत्वाने अर्जुनही भारून गेला होताच.

परंतु तरीही मनातून मात्र तो भानावर होताच. द्रौपदीच्या स्पष्ट बोलण्याने स्वतःचा अवमानच झाला आहे म्हणून नाराज व रागावलेला कर्ण जेव्हा चरफडतच त्याच्या आसनावर जाऊन बसला, तेव्हा अर्जुन अधिक सावध झाला. कर्ण पुढे आलेला पाहून अर्जुनाच्या मनावरही ताण आलेला होताच. कर्णाला माघारी परतावे लागलेले पाहून अर्जुनाच्या मनावरील ताण एकदम सैल झाला. पण त्याचबरोबर तो अधिकच सतर्कही झाला आणि अपेक्षेने कृष्णाकडे पहात राहिला. अर्जुनाने आता पुढे येण्याची वेळ आलेली आहे हे कृष्णानेही ओळखले. त्याने नेत्रपल्लवीने अर्जुनाला खूण केली आणि क्षणाचाही विलंब न लावता ब्राह्मणवेषातील अर्जुन ताबडतोब पुढे आला.

हे लक्ष्मी, ब्राह्मणवेषधारी अर्जुन एकेक पाऊल सावकाश पण दमदारपणे टाकीत जसा जसा पुढे येऊ लागला, तशी तशी सर्वच सभा अधिकाधिक विस्मयचकित होऊ लागली. ब्राह्मण असूनही तो धनुर्विद्या कशी जाणत आहे या विचाराने सर्वांनाच नवल वाटले. ‘या ब्राह्मणाला थोडीफार धनुर्विद्या एखादे वेळेस येत असेलही. पण जी गोष्ट कोणाही क्षत्रियाला जमू शकली नाही, ती या तरूण ब्राह्मणकुमाराला कशी काय जमेल बरे? कदापिही शक्यच नाही’ याच नजरेने व त्याच खात्रीने सर्वजण अर्जुनाकडे पहात होते. काहींच्या पहाण्यात उपहास होता, तर काहींच्या पहाण्यात कुतूहल होते, तर काहींच्या पहाण्यात थोडीशी मिश्किलताही होती. जनमनावर झालेला परिणाम अर्जुनाच्याही लक्षात आल्यावाचून राहिला नाही. पण कोणाकडेही अजिबात लक्ष न देता अर्जुनाने पुढे होऊन द्रुपदाला वंदन केले. अर्जुनाकडे पाहून द्रुपदालाही नवलच वाटले. ब्राह्मण कुळातील असल्यामुळे कुलशीलाचा प्रश्न निर्माणच होत नव्हता. परंतु ‘जी कृती व जो पराक्रम केवळ क्षत्रियांकडूनच अपेक्षित आहे, तो या ब्राह्मण युवकाला कसा काय जमणार?’ हा प्रश्न अर्थातच द्रुपदाच्या मनालाही पडलाच. त्याने मान वळवून द्रौपदीकडे पाहिले, तर द्रौपदी आधीच कृष्णाकडे पहात होती.

कृष्णाने त्याची मान सूचकतेने हलकेच डोलवून द्रौपदीला खूण केली. हा ब्राह्मणवेषधारी म्हणजे अर्जुनच आहे याची खात्री द्रौपदीला पटली आणि तिनेही तिच्या नजरेनेच तिची संमती द्रुपदाला कळवली. त्यावर द्रुपदही निश्चिंत झाला आणि त्यानेही हाताच्या इशाऱ्याने अर्जुनाला ‘पण’ जिंकण्याचा प्रयत्न करण्यासाठी अनुमती दिली.

सर्व सभा कुतूहलाने पहात असताना अर्जुन आत्मविश्वासपूर्वक त्या खास बनवलेल्या यंत्रणेच्या जवळ आला. तेथे ठेवलेले धनुष्य अर्जुनाने त्याच्या हातात उचलून घेतले आणि आदरपूर्वक मस्तकाला लावून त्याला वंदन केले. धनुष्यावर बाण लावण्यापूर्वी एक क्षणभरच अर्जुनाने त्याची नजर ज्याठिकाणी कृष्ण बसला होता त्या दिशेला वळवली. कृष्णाच्या दृष्टीला अर्जुनाची दृष्टी भिडली मात्र, कृष्णाच्या नजरेतील अर्जुनाविषयीचा आत्यंतिक आपलेपणा व विश्वास अर्जुनाच्या नजरेतून त्याच्या हृदयापर्यंत जाऊन पोहोचला. त्याचाच परिणाम म्हणून अर्जुनाचे हृदय भरून आले आणि त्याची सर्व गात्रे फुरफरू लागली. अर्जुनाने पुढच्याच क्षणी धनुष्याला बाण लावला आणि तो जलाने भरलेल्या घंगाळाजवळ येऊन उभा राहिला. त्या स्वच्छ जलात वरती फिरणाऱ्या चक्राचे व त्यावरती बसविलेल्या लाकडी माशाचे प्रतिबिंब अगदी स्पष्टपणे दिसत होते. त्या प्रतिबिंबाकडे पहात अर्जुनाने धनुष्यबाणाची दिशा प्रत्यक्ष लाकडी माशाच्या दिशेने वरती केली आणि त्या फिरत्या चक्राच्या वेगाचा अंदाज तो घेऊ लागला. अर्जुनाने मन स्थिर करून त्याचे सर्व लक्ष एकवटले. सर्व सभा श्वास रोखून स्तब्ध राहिली होती. कधी नव्हे ती द्रौपदीच्या हृदयाची धडधडही थोडीशी का होईना, वाढली होतीच आणि तेही अगदी साहजिकच होते. कृष्ण मात्र शांत चित्ताने व अत्यंत खात्रीने अर्जुनाकडे प्रेमळ दृष्टीने पहात होता. काही क्षणाचाच तो काळ सर्वांनाच अत्यंत प्रदीर्घ जाणवत होता. अनेकजणांनी तर उत्सुकतेचा ताण सहन न झाल्यामुळे आपले डोळे मिटूनच घेतले होते. तेवढ्यातच अर्जुनाने त्या फिरणाऱ्या लाकडी माशाच्या प्रतिबिंबाकडे पहात, त्याच्या प्रत्यक्ष डाव्या

डोळ्याचा वेध घेऊन, धनुष्याला लावलेला बाण अत्यंत वेगाने सोडला. क्षणार्धात त्या अमोघ बाणाने त्याचे लक्ष्य गाठून माशाच्या डाव्या डोळ्याचा छेद घेतला आणि तो बाण त्या लाकडी माशासह भूमीवर अर्जुनाच्या पायाजवळ येऊन पडला. क्षणभर काय झाले हे कोणालाच कळले नाही आणि कळले तेव्हा कोणाचाही त्यावर विश्वासच बसेना. पण अर्जुनाने द्रौपदीच्या स्वयंवरासाठी लावलेला ‘पण’ लीलया जिंकला होता, ही मात्र वस्तुस्थिती होती.

हे लक्ष्मी, पण जेव्हा थोड्या वेळाने वस्तुस्थिती सर्वांच्या लक्षात आली, तेव्हा मात्र सर्वजण जागेवरून उठून उभे राहिले आणि त्यांनी करतालीचा प्रचंड कडकडाट केला. उत्साहित झालेला द्रुपद आपल्या आसनावरून उठून पुढे धावतच अर्जुनाच्या जवळ जाण्यास निघाला. नेत्रांतून भरून वहाणाऱ्या अश्रूंना आवर घालीत द्रौपदीने कृष्णाकडे वळून पाहिले, तर अत्यंत आनंदित झालेला कृष्ण, प्रसन्न मुद्रेने अर्जुनाकडे जवळ जवळ धावतच आधीच निघाला होता. अर्जुनाच्या जवळ आल्यावर कृष्णाने आधी अर्जुनाला प्रेमाने आलिंगन दिले आणि मग कितीतरी वेळ तो अर्जुनाची पाठ कौतुकाने थोपटीत राहिला. तेवढ्यात द्रुपदही तेथे येऊन पोहोचला असता, अर्जुनाने त्याला आदराने वाकून व त्याच्या पायांना स्पर्श करून वंदन केले. द्रुपदानेही अर्जुनाचे दोन्ही हात आपल्या हातात घेऊन त्याचे अभिनंदन केले आणि प्रश्नार्थक नजरेने अर्जुनाकडे पहात राहिला. द्रुपद अर्जुनाची माहिती व ओळख करून घेण्यास साहजिकच अत्यंत आतुर झालेला होता आणि हे अर्जुनाच्याही लक्षात आलेच. अर्जुनाने फक्त कृष्णाकडे पाहिले. अर्जुनाच्या पहाण्याचा अर्थ कृष्णाच्याही लक्षात आलाच आणि त्याने पुढे होऊन द्रुपदाशी बोलण्यास सुरुवात केली.

“अहो द्रुपद महाराज, द्रौपदीच्या स्वयंवराच्या ‘पणा’ची यशस्वी पूर्ती झाली ही खरेच अत्यंत आनंदाचीच गोष्ट आहे. जिंकण्यास अत्यंत कठीण असलेला हा ‘पण’ जिंकून या शूरवीराने, खरेच मोठाच पराक्रम केलेला आहे हे निश्चित. द्रौपदीसाठी हा वीर अनुरूप आहे याची खात्री


त्याने त्याच्या दुष्कर पराक्रमाने दिलीच आहे. पण तरीही या पुरूषाची माहिती आणि विशेषतः त्याचे कुळ व शील जाणून घेण्यासाठी तुम्ही सारेच जण साहजिकच अत्यंत आतुर असणार, ही गोष्ट उचितच आहे. या वीर पुरूषाला मी चांगलेच ओळखतो असे जर मी म्हटले तर तुम्हाला निश्चितच आश्चर्य वाटेल. पण ती गोष्ट अगदी खरी आहे. हा वीर पुरूष म्हणजे दुसरा तिसरा कोणीही नसून, हा कुरूकुळातील राजकुमार व मध्यम पांडव असलेला साक्षात अर्जुनच आहे, ही गोष्ट ऐकल्यावर तुम्हाला सुखद का होईना पण धक्का नक्कीच बसेल खरा. पण ही खरेच वस्तुस्थिती आहे. त्याने धारण केलेल्या त्याच्या बाह्य पोशाखामुळे तुमचा एखादेवेळेस विश्वास बसणार नाही, परंतु त्या वेषामुळे जरी तो ब्राह्मण दिसत असला तरी तो क्षत्रियकुलोत्पन्न असा अर्जुनच आहे, ही गोष्ट सत्यच आहे. त्याचे इतर चारही बंधू, हेसुद्धा तशाच वेषात या स्वयंवरमंडपात हजर आहेत.

अहो द्रुपद महाराज, अचानकपणे ओढवलेल्या व अगदी प्राणांवरच बेतलेल्या संकटामुळेच या पांडवांवर अशा तऱ्हेने, वेष पालटून अज्ञातपणे जीवन जगण्याची वेळ आलेली होती. पांडवांवरील व्देष, मत्सरामुळे व स्वार्थाने अंध झालेल्या काही स्वकीयांकडूनच पांडवांना आगीत जाळून जीवे मारण्याचे कारस्थान रचले गेले होते. परंतु ईश्वरी कृपेने सर्व पांडव त्यांच्या कुंतीमातेसह त्या संकटातून जिवानिशी सुखरूपपणे बचावले. माझ्या सांगण्यानुसारच सर्व प्रतिकूल वातावरण निवळेपर्यंत गुप्तपणे वावरण्याचा त्यांनी निर्णय घेतला होता आणि आज अगदी योग्य वेळी व शुभ समयी पांडव या इथे प्रगट होत आहेत याचा मलाही अतिशय आनंदच होत आहे, ही गोष्ट अत्यंत खरीच आहे. कारण पांडवांचे व माझे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे व घरगुती स्वरूपाचे आहेत. मी त्यांच्या कुटुंबाचा जणू एक घटकच आहे. एवढे व असे प्रेमाचे स्थान पांडवांनी मला त्यांच्या जीवनात दिलेले आहे. अशा पराक्रमी व सुसंस्कृत कुळामध्ये द्रौपदी जाणार आहे आणि तीही अर्जुनाची पत्नी म्हणून, हे

तिचे केवढे तरी मोठे भाग्यच आहे. तेव्हा आपण अगदी निःशंक मनाने द्रौपदीचा विवाह अर्जुनाशी करून द्यावा अशी मी विनंती करतो.”

कृष्णाचे बोलणे चालू असतानाच सभामंडपामध्ये थोडीशी खळबळ माजायला सुरूवात झालीच होती. ‘पण’ जिंकलेला ब्राम्हण वेषातील धनुर्वीर हा साक्षात अर्जुनच आहे आणि त्याचे इतर सर्व पांडव बंधूही स्वयंवरमंडपात हजर आहेत हे कळल्यावर अनेकांच्या संमिश्र प्रतिक्रिया हळू आवाजात, पण उघडपणे व्यक्त होण्यास सुरूवातच झाली. ‘पांडव अजूनही जिवंत आहेत’ हे कळताच सर्वांनाच त्या त्या परीने धक्काच बसला होता. कोणाला सुखाचा, कोणाला नवलाईचा तर कोणाला थोडासा भीतीचाही! पण सर्वात जास्त धक्का बसला तो कर्णालाच. पांडवांविषयी व विशेषतः अर्जुनाविषयी नेहमीच मत्सरभावाने असलेला कर्ण जागच्या जागीच उभा राहून बोलू लागला.

“अरे कृष्णा, हा सर्व तुझा आधीपासूनच ठरवलेला डाव आहे, ही गोष्ट आता स्पष्ट होत आहे. तू पांडवांचा पक्षपाती आहेस हे तर सर्वांनाच ठाऊक आहे. द्रौपदीचा विवाह अर्जुनाशी व्हावा हे तर तू आधीच नक्की केलेले असणार. म्हणूनच तर या स्वयंवरामध्ये केवळ धनुर्धारी पुरूषांसाठीच असलेला, एवढा कठीण ‘पण’ लावला गेला. त्यामागील योजनाही तुझीच असणार याचीही मला पूर्ण खात्री आहे. अर्जुनाचा केवळ मीच एकमेव प्रतिस्पर्धी आहे, हेही फक्त तूच जाणून आहेस. त्यामुळे या स्पर्धेतून मला ज्या पद्धतीने डावलले गेले, त्यामागेही तुझाच हात असणार, हेही अगदी उघड आहे. कृष्णा, खरे तर तुझे ज्ञान, तुझे चातुर्य व तुझा मुत्सद्दीपणा याविषयी मला अत्यंत आदर आहे. परंतु तुझा हेतू तडीस नेण्यासाठी तूही कुटिल राजकारणच करावेस, याचे मला वाईट वाटते. त्यामागील कारणही माझ्या लक्षात येत नाही. माझा झालेला अवमान व माझी झालेली अवहेलना याला तुझाही छुपा पाठिंबा असावा ना? तुझ्यासारख्या न्यायबुद्धीच्या पुरूषाला असे वागणे मुळीच शोभा देत नाही.



कृष्णा, त्या आगीच्या अपघातातून पांडव सुखरूपपणे वाचले, याचा मलाही निश्चितच आनंद आहे. मला खात्री आहे की धृतराष्ट्र, भीष्म व दुर्योधन यांच्यासह सर्व कुरूकूळ पांडवांचा स्वीकार व स्वागतच करील. अर्जुनाने स्वयंवराचा ‘पण’ जिंकला याचेही मला कौतुकच आहे आणि मीही सर्वांप्रमाणेच त्याचे अभिनंदनच करतो. परंतु हे सर्व ज्या पद्धतीने घडत आहे, त्याचे मात्र मला वाईट वाटते आणि काळजीही वाटते. कारण यामुळे परस्परांमधील गैरसमज व द्वेष-मत्सर वाढण्यासच अधिक मदत होणार आहे. अर्थात हे सर्व तू जाणत नाहीस असे नाही. परंतु तरीही तू जाणूनबुजूनच हे सर्व करीत आहेस. यामागे तुझा काय हेतू आहे आणि त्याने काय साध्य होणार आहे हे माझ्या तरी लक्षात येत नाही.”

कर्णाच्या बोलण्यावर कृष्णाने मंदस्मित केले आणि तो म्हणाला, “अरे कर्णा, माझ्या न्यायबुद्धीवर तुझा विश्वास आहे ही गोष्ट चांगली आहे. परंतु मी सज्जनांना व सत्प्रवृत्तीच्या जनांनाच न्याय देत असतो, ही गोष्ट बहुधा तुला माहीत नसावी. कारण अन्याय त्यांच्यावरतीच होत असतो आणि तोही दुष्प्रवृत्तीच्या पण सबळ व दांडगट असलेल्या दुर्जनांकडून. केवळ त्यांच्या हाती बळ व सत्ता असते म्हणून ते सत्तांध होतात आणि दुर्बल सज्जनांचा दुःस्वास करून त्यांना नामोहरम करू पहातात. त्यांना बळजबरीने अंकित करतात किंवा धन व सत्ता यांची आमिषे दाखवून स्वतःचे मिंधे करून ठेवतात. अशा वेळी निःपक्षपातीपणाचा आव आणून स्वस्थ बसणे, हा माझा स्वभावही नाही आणि तो माझा धर्मही नाही. मी सज्जनांच्या पाठीशी माझ्या सर्व शक्तीनिशी उभा रहातो आणि त्यांना आधार व रक्षण तर देतोच, पण त्यांना मनाने सबळही करतो. सज्जनत्वामुळेच सद्धर्म टिकून रहाण्याची काहीतरी आशा आहे हे विसरू नकोस.

अरे कर्णा, आणखीन एक गोष्ट लक्षात ठेव. मी माझ्या प्रेमाच्या व्यक्तींना कधीच अंतर देत नाही. ज्यांनी माझ्यावरती श्रद्धा ठेवून माझा भरवसा धरला त्यांच्या भरवशाला मी नेहमीच जागतो. त्यांच्या सुखासाठी

व हितासाठी मी हरतऱ्हेने प्रयत्न करतो आणि त्यांची बाजू उघडपणे घेऊन त्यांना यश हे मिळवून देतोच देतो. मग त्यासाठी माझ्यावरती कोणी पक्षपातीपणाची टीका केली तरी मला त्याची पर्वा नाही. अशा लोकांची मी जराही तमा बाळगत नाही. त्यासंबंधी जर कोणी मला दूषणेही दिली तर मी तरी ती भूषणेच समजतो.

कर्णा, तुझ्या जन्माविषयी व कुळाविषयी कोणाचीच तक्रार असण्याचे काहीच कारण नाही. कारण कसा व कुठे जन्म घ्यावा हे कोणाच्याच अधीन नाही. ती गोष्ट केवळ ईश्वराधीनच आहे ही गोष्ट सत्यच आहे. परंतु द्रौपदीसाठी तो मुद्दा हा तिच्या स्वयंवरासाठी लावलेल्या ‘पणा’चा एक आवश्यक भाग होता आणि तो सर्वांनाच बंधनकारक होता. तेव्हा त्यासंबंधी चर्चा करण्याची किंवा वाद घालण्याची जरूरीच नाही. जन्माने श्रेष्ठत्व किंवा कनिष्ठत्व ठरत नाही ही गोष्ट अगदी बरोबर आहे. पण मग असा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो की श्रेष्ठत्व व कनिष्ठत्व हे कोणत्या आधारावर ठरवायचे? त्यासाठी काय प्रमाणभूत मानायचे? केवळ एखादी व्यक्ती पराक्रमी, परोपकारी किंवा दानशूर आहे म्हणून तिला श्रेष्ठत्व प्राप्त होऊ शकेल का? जर त्या व्यक्तीचे मन शुद्ध नसेल आणि तिच्या मनात वासना व द्‌वेषमत्सरादी विकार भरलेले असतील तर त्या व्यक्तीची बाह्यांगाची सत्कर्मे व बाह्य सदाचरण हे शुद्ध देखावाच ठरेल. कारण एकदा जर त्याच्या मनातील मळ व अशुद्धत्व उफाळून वर आले की त्याचे सर्व गुण अयोग्य दिशेने व अयोग्य कार्याला लागतील आणि मग त्याच्याकडून घडणारी सर्व कर्मे ही अधर्मच ठरतील. म्हणूनच एखादी व्यक्ती बाह्यांगाने गुणवान असूनही तिच्याठिकाणी सद्भाव नसेल आणि तिच्याठायी सत्याची चाड व असत्याची चीड नसेल तर ती व्यक्ती असत्याला व अधर्मालाही साथ देऊ शकेल. अशावेळी तिची सर्व गुणवत्ता ही कुचकामीच ठरेल.

तेव्हा मनुष्य हा जसा केवळ त्याच्या जन्माने नव्हे तर त्याच्या संस्काराने घडतो तसाच तो कुसंगतीने बिघडतो हेही खरेच आहे.

त्यासाठीच कोणीही मनुष्य हा त्याच्या जन्मापेक्षा त्याच्या संगतीनेच अधिक व खरा ओळखला जातो. कारण मूळ संस्कारांना सत्संगतीची जोड मिळाली तरच ते सबळ होतात आणि सफळही होतात. तर कुसंगतीने चांगले संस्कारही दुर्बल होतात आणि फुकट जातात. सत्संगतीमुळे मनुष्य सद्भावाला व धर्माला साथ देतो आणि सदाचरणाला प्रवृत्त होतो. पण कुसंगतीने चांगल्या संस्कारातील मनुष्यही असद्भावाने युक्त होतो आणि अधर्माला साथ देऊन वेळप्रसंगी पापाचरण करण्यासाठीही तो उद्युक्त होतो.


अरे कर्णा, आजच्या तुझ्या दयनीय अवस्थेला तुझा तूच कारणीभूत आहेस हे लक्षात ठेव. त्यासाठी दुसऱ्या कोणालाही दोष देऊ नकोस. उपकाराच्या ओझ्याखाली दबून, तू जाणूनबुजून दुर्योधनाची साथ देत आहेस. त्यामुळे त्याची काय परिणती होणार आहे याची तुलाही पूर्ण कल्पना आहेच. पण तुझ्याबद्दलच्या आपलेपणापोटी मला तुला एवढेच सांगावेसे वाटते, की एकीएक ईश्वराचेच उपकार मानून त्याचेच स्मरण करीत रहा. म्हणजे तोच तुला सन्मार्ग दाखवील. सन्मार्गाने गेल्यावरतीच सत्कर्मांना अर्थ प्राप्त होतो आणि ती सफळ होतात. कारण ती सर्व कर्मे ईश्वराला अर्पण होतात. त्यानेच ईश्वर प्रसन्न होतो आणि मनाला खरे सुख व शांतीसमाधान प्राप्त होते. तुझ्या बुद्धीला सर्व ज्ञान आहे आणि तू सर्वकाही जाणूनही आहेस. परंतु परिस्थितीमुळे दुखावलेल्या तुझ्या मनाला सन्मार्गाने जाण्याचे बळच राहिलेले नाही. परंतु अजूनही वेळ गेलेली नाही. वेळीच सावध हो आणि सन्मार्गाने जाण्याचे धैर्यबळ प्राप्त करून घे. नाहीतर कुसंगतीने एवढा वहात जाशील, की मग प्रयत्न करूनही तुला सन्मार्ग सापडणार नाही आणि तो दाखवणाराही कोणी भेटणार नाही. शेवटी जीवनात निराश होऊन तुला पश्चात्तापच होईल. पण तेव्हा परत फिरण्याची वेळ मात्र टळून गेलेली असेल. तेव्हा स्वतःच्याच पावलांनी स्वतःच अधोगतीच्या मार्गाकडे जाऊ नकोस आणि स्वतःचा

सर्वनाश स्वतःच ओढवून घेऊ नकोस, असे माझे तुला अत्यंत कळकळीचे सांगणे आहे.”

कर्णाविषयीच्या कळवळ्याने एवढा वेळ बोलणारा कृष्ण बोलायचा जरी थांबला, तरी कृष्णाच्याठायीची आर्तता त्याच्या मुखावरील भावातून स्पष्टपणे जाणवत होती. तशी ती स्वयंवरमंडपातील सर्वांनाच जाणवल्याशिवाय राहिली नाही. मग कर्णही प्रभावित होणे अगदी स्वाभाविकच होते. कृष्णाच्या बोलण्यातील आपलेपणा कर्णाच्या मनालाही स्पर्श करता झाला आणि तोही थोडावेळ भारावूनच गेला. त्या भरातच कर्ण सावकाशपणे कृष्णाच्या जवळ आला. त्याने कृष्णाचे हात स्वतःच्या दोन्ही हातात प्रेमाने धरले आणि तो कृष्णाशी बोलू लागला.

“अरे कृष्णा, तुझ्याठिकाणी माझ्याविषयी आत्यंतिक आपलेपणा आहे हे मला निश्चितच जाणवते. त्याचे कारण मला माहीत नाही. तरीही मी तुझ्या माझ्याविषयीच्या भावनेचा आदर करतो. माझ्यासाठी तू नेहमीच आदरणीय आहेस खरा, परंतु तुझ्या व्यक्तिमत्त्वाचा मला केव्हाच थांगपत्ता लागलेला नाही. तुझे जीवनचरित्र अत्यंत विस्मयकारक व एक गूढच आहे. काहीजणांना तुझ्याठायी ईश्वरत्वाचे सर्व गुण दिसतात हेही मला ठाऊक आहे. पण मी मात्र तुझ्याकडे एक पराक्रमी, कुशल,मुत्सद्दी व अत्यंत बुद्धीमान असा, पण एक राजकारणी पुरूष म्हणूनच पहातो. ईश्वर व ईश्वरत्व म्हणजे काय याविषयी एखादेवेळेस मी अनभिज्ञ असेनही. परंतु ईश्वरी सत्तेवरती माझाही विश्वास आहे. आपले प्राप्त कर्तव्यकर्म ईश्वराला स्मरून करावे आणि त्याचे फळ ईश्वराला अर्पण करावे एवढेच मला समजते आणि मी तेवढेच अत्यंत प्रामाणिकपणे करीत असतो.

कृष्णा, आता ईश्वरी गुण म्हणशील तर माझ्या माहितीप्रमाणे ईश्वराचा सर्वात महत्त्वाचा व मुख्य गुण म्हणजे, त्याची सर्व जीवांवरती असलेली समदृष्टी. ईश्वर म्हटला म्हणजे त्याच्याठायी सर्व प्राणीमात्रांविषयी समभावच असणार आणि तो त्यांच्याकडे कधीच



तरतमभावाने पहाणार नाही हे तर नक्कीच ना? त्याचीच लेकुरे असलेल्या जीवांच्यामध्ये ईश्वर कधीही व कोणताही पक्षपात करील, हे तर माझ्या दृष्टीने मुळी संभवतच नाही. म्हणूनच उघड उघड पक्षपातीपणाने वागणाऱ्या तुझ्याठायी ईश्वरत्व पहाणे मला तरी शक्य होत नाही. भावनात्मकतेपेक्षा मी माझ्या बुद्धीलाच प्रमाण मानतो आणि माझी बुद्धी जो मार्ग मला दाखवील त्याच मार्गाने मी जात असतो आणि माझा तरी तोच धर्म आहे.


कृष्णा, मी कुसंगतीने सन्मार्गापासून च्युत होत आहे हे तुझे सांगणेही मला पटत नाही. कारण ‘पांडव म्हणजेच सज्जन व कौरव म्हणजे दुर्जनच’ अशी तू किंवा तुझ्यासारखे इतर काही लोक करीत असलेली वर्गवारी, ही मुळातच चुकीची आहे. त्यामुळे मला ती मान्यच नाही. सामान्यांच्या ठायी असलेले सर्व संभाव्य गुणदोष हे उभयतांच्याठायी आहेत. तेव्हा गुणांचे कौतुक व दोषांची निंदा ही दोन्ही करावयासच हवी आणि ती तशी मी नेहमीच करीत असतो. एक गोष्ट मी तुला निक्षून सांगतो की कोणाच्याही उपकाराचे कोणतेही ओझे माझ्या शिरावर नाही आणि मी कोणाचा मिंधाही नाही. पण ज्यांनी माझ्यावरती उपकार केले त्यांच्याविषयी माझ्याठायी कृतज्ञता मात्र नक्कीच आहे आणि माझी निष्ठाही त्यांच्याठायीच आहे. हा माझा गुण आहे की दोष आहे हे मला माहित नाही, पण मी एकनिष्ठ आहे आणि माझी निष्ठा परिस्थितीनुसार किंवा सोय व स्वार्थ यांच्यानुसार कधीही बदलत नाही. हा माझा मूळचाच स्वभावधर्म आहे आणि तो मात्र बदलणे कधीही शक्यच नाही. तेव्हा मला माझ्या स्वभावाप्रमाणे राहू दे आणि मला माझ्या मार्गाने जाऊ दे. त्यातच माझ्या मनाला समाधान लाभणार आहे. मी माझ्या बुद्धीला प्रमाण मानून शक्यतो सत्कर्माने वागण्याचा नेहमीच प्रयत्न करीत रहाणार आणि त्याची जी काही बरी वाईट फळे माझ्या प्रारब्धानुसार मिळतील ती विनातक्रार सेवन करणार. असो. तू माझ्याविषयी दाखवलेल्या आपलेपणाबद्दल पुन्हा एकदा तुझे मनःपूर्वक

आभार मानतो. आता माझे येथे थांबणे अनावश्यक आहे आणि अयोग्यही आहे” असे म्हणून कर्ण कोणाशीही न बोलता वेगाने व आवेगाने निघून गेला. त्याच्याबरोबर आलेल्या त्याच्या सहकाऱ्यांनीही तोच मार्ग अवलंबिला आणि ते सर्वजण कर्णाच्या पाठोपाठ मंडपाच्या बाहेर पडले.”

* * *

नारदाचे बोलणे ज्या आवेगाने व आवेशाने घडत होते त्यावरून लक्ष्मीच्या लगेचच लक्षात आले, की नारदाचे बोलणे थांबले असले, तरी त्याचे सांगणे संपलेले नाही. खरे तर, नारद द्रौपदी व अर्जुन यांच्या विवाहाची कथा सांगत होता. पण मध्येच अचानक हे कर्णाचे उपकथानक केव्हा व कसे सुरु झाले, हे नारद व लक्ष्मी या उभयतांनाही कळलेच नाही. परंतु नारदाच्या बोलण्यामध्ये कर्णाविषयीचा एवढा कळवळा होता की लक्ष्मीच्या ठिकाणीही कर्णाविषयी आपलेपणा निर्माण झाला आणि तिला कर्णाची कणवच आली. त्यामुळे नारद आता बोलणे थांबवून पुन्हा मूळ कथेकडे प्रयत्नपूर्वक वळत आहे असे जेव्हा लक्ष्मीच्या लक्षात आले, तेव्हा मात्र तिला राहवलेच नाही आणि नारद काही बोलायच्या आधीच लक्ष्मीनेच बोलावयास सुरुवात केली.

“अरे नारदा, जरा थांब. द्रौपदीच्या कथेच्या ओघात अत्यंत सहजपणे कर्णाचा विषय आला खरा. परंतु तो भाग तू ज्या कळकळीने सांगत होतास त्यावरून तुझ्याठिकाणी त्या कर्णाविषयीचा विशेष आपलेपणा, अगदी स्पष्टपणे दिसत होता. एवढेच काय कर्णाशी बोलताना कृष्णाच्याठायी असलेला कर्णाविषयीचा कळवळाही उघडपणे प्रगट होत होता. मला तरी कृष्णाच्या बोलण्यात एक विशेष प्रकारची आर्तताच जाणवत होती आणि मला त्याचेच गूढ वाटत आहे. त्यामुळे यामागील कारण काय असावे हे जाणून घेण्याची माझी आतुरता कमालीची वाढली आहे. त्याचबरोबर आणखीन एक गोष्ट माझ्या लक्षात आली की कृष्ण सुरुवातीला जरी कर्णाशी आपलेपणाने बोलला तरी त्यानंतर कर्णाने केलेल्या बोलण्यावरती मात्र, कृष्णाने कोणताच प्रतिवाद केला नाही.



कर्णाचे बोलणे जे सकृतदर्शनी तरी तर्काला धरून योग्य वाटत होते ते कृष्णाला पटले की काय? का कृष्णाने जाणूनबुजूनच ते बोलणे पुढे वाढवले नाही? ही उत्सुकताही माझ्याठायी आहेच. तेव्हा नारदा, आधी या कर्णाच्या उपकथानकाची पूर्ती कर आणि मगच मूळ कथेकडे वळ. मला काही निश्चित असे कारण सांगता येणार नाही, पण ही कर्णाची व्यक्तिरेखा माझ्याही मनाला थोडीशी लुभवीत आहे ही गोष्ट मात्र खरी आहे.”


लक्ष्मीच्या बोलण्यावरती नारदाने त्याचे नेत्र मिटून थोडावेळ विचार केला. तेवढा वेळ लक्ष्मीही नारदाकडे आतुरतेने पहात राहिली होती. काही वेळाने त्याने नेत्र उघडले आणि तो एकटक नजरेने लक्ष्मीकडे पहात राहिला. लक्ष्मीचीही उत्सुकता थोडीशी ताणली गेली. शेवटी नारदाने बोलावयास सुरुवात केली.

“अगं लक्ष्मी, मनाच्या उत्सुकतेला ना अंत ना पार. एखादा विषय कितीही सांगितला तरी मनाचे पूर्ण समाधान कधी होतच नाही. पण विषयाची व्याप्ती जशी जशी वाढत जाते, तशी तशी त्या विषयाचा मूळ हेतू झाकोळला जाण्याची शक्यताही वाढत जाते आणि नेमके तेच आपण टाळावयास हवे. कारण एका विषयातून दुसरा व दुसऱ्यातून तिसरा असे विषय निघत रहातात आणि मग शेवटी मनात त्या सर्वांचा एक गुंताच होऊन रहातो. तो गुंता सोडवण्यासाठी मग पुन्हा आणखीन एक विषय सांगावा लागतो. म्हणूनच कर्णाविषयी व्यक्तिगत बोलण्याचा मोह आपण टाळायलाच हवा. कारण मुळात आपण कृष्णाच्या सगुण प्रेमभक्तीचे निरूपण व त्यासाठी कथा सांगत आहोत ही गोष्ट विसरता कामा नये. त्यासाठी कृष्णाचे प्रेमीजन व कृष्णाचे माहात्म्य जाणणाऱ्या व्यक्ती यांच्यावरतीच आपण आपले लक्ष प्रयत्नपूर्वक केंद्रीत करावयास हवे. आपली दृष्टी कोठेही आजूबाजूला जाणार नाही याची काळजीही आपणच घ्यावयास हवी. कृष्णाच्या ठिकाणी जो कर्णाविषयी आपलेपणा होता त्याचे कारण सांगितले तर लक्ष्मी, तू पुन्हा भावनाविवश होशील याची

मला अगदी पक्की खात्री आहे आणि मग तुझे मन पुन्हा मूळ पदावर आणणे महा कर्मकठीण होऊन बसेल. त्यात केवढातरी वेळ वाया जाईल. त्यापेक्षा कृष्णाच्या प्रेमाच्या रसपूर्ण कथा गाण्यात व श्रवण करण्यात अधिक वेळ गेला तर आपल्याला आनंदाचा अनुभव अधिक काळ घेता येईल हे निश्चित. होय की नाही? तेव्हा आपण आता कर्णाच्या प्रसंगाला वळसा घेऊन पुढे जाण्याचे करावे हेच उत्तम!

लक्ष्मी, पण बोलता बोलता शेवटी तू एक असा मुद्दा उपस्थित केलास, की कर्णाच्या बोलण्यावरती कृष्ण काहीच प्रतिक्रिया व्यक्त न करता स्वस्थच राहिला आणि याचे कारण तुला कळले नाही. तुला असे वाटले असेल की कृष्णाठायीचा कर्णाविषयीचा आपलेपणा एकदम नाहीसा झाला की काय? पण कृष्णाच्या बाबतीत तसे घडणे शक्यच नव्हते. कारण कर्णाविषयीचा आपलेपणा हा कृष्णाचा व्यक्तिगत होता आणि तो त्याच्या स्वभावानुसार त्याच्याठायी कायम होता. पण कर्णाचा समावेश कृष्णाच्या प्रेमीजनांमध्ये मात्र निश्चितच होत नव्हता हे खरेच आहे. प्रेमीजनांमध्ये प्रेम हे उभयपक्षी असते. तशी परिस्थिती कर्णाच्या बाबतीत नव्हती ही वस्तुस्थितीच होती. ती आपण मान्य करूनच लक्षात ठेवावयास हवी. कर्णाच्याठायी कृष्णाविषयी केवळ बाह्यांगाने आदर होता आणि ते कर्णाच्या सभ्यतेचे लक्षण होते. परंतु कर्णाच्याठायी कृष्णाविषयी प्रेम किंवा श्रद्धाही नव्हतीच. त्यामुळे कर्णाशी बोलणे वाढवल्याने काहीच साध्य होणार नव्हते, तर तो वेळेचा अपव्यय ठरला असता, हे कृष्ण पूर्णपणे जाणून होता.

लक्ष्मी, एक गोष्ट तुझ्या लक्षात आली का? कृष्ण स्वतःहून कर्णाशी काही बोललाच नव्हता. परंतु कर्णाने जेव्हा कृष्णावरती पक्षपातीपणाचा हेत्वारोप केला, तेव्हाच कृष्णाने कर्णाला प्रत्युत्तर दिले. पण कर्ण त्याच्या चुकीच्या भूमिकेशी ठाम आहे आणि त्याचे समर्थनच करीत आहे ही गोष्ट जेव्हा कर्णाच्या बोलण्यातून स्पष्टपणे दिसू लागली, तेव्हा मात्र कृष्णाने काहीही प्रतिवाद न करता स्वस्थ बसण्याचीच भूमिका घेतली.



कारण बुद्धीने व शब्दज्ञानाने स्वतःच्या वागण्याबोलण्याचे नेहमीच समर्थन करता येते. त्यामुळे सामान्यजन एखादे वेळेस फसू शकतात. परंतु अनुभवी जनांना त्या शाब्दिक ज्ञानातील पोकळपणा व फोलपणा हा लगेचच लक्षात येतो. परंतु ती गोष्ट जरी बुद्धीवाद्यांच्या लक्षात आणून दिली, तरी ते स्वतःच्या ज्ञानाच्या अहंकारामुळे ती मान्य करून त्याचा स्वीकार कधीच करणार नाहीत, ही गोष्टही ते अनुभवी जन जाणून असतात. म्हणूनच वाद न वाढवता तो टाळून ते स्वस्थच रहाणे पसंत करतात.

लक्ष्मी, आता विषय आलाच आहे म्हणून केवळ तुझ्या माहितीसाठी कर्णाच्या बोलण्यातील विसंगती तुझ्या लक्षात आणून देतो. ‘ईश्वर सर्व जीवांकडे समभावाने पहातो. त्यांच्यात कधीच भेदभाव करीत नाही’ हे कर्णाचे विधानही त्याचे अर्धवट ज्ञानच प्रगट करणारे आहे आणि अर्धवट ज्ञान हे नेहमीच धोकादायक असते. कारण हे विधान ईश्वराचा तत्वतः विचार केला असता जरी बरोबर असले, तरी तोच ईश्वर जेव्हा मानवरूप होतो, तेव्हा धर्मरक्षणाच्या कार्यासाठी त्याच्याकडून धर्म व अधर्म हा फरक केला जातोच. सज्जन-दुर्जन, योग्य-अयोग्य, नीती-अनीती, धर्म-अधर्म असा फरक दिसल्यानेच आणि तसा फरक प्रत्यक्ष कृतीद्वारे केल्यानेच धर्मरक्षणाचे कार्य घडू शकते, हे खरेच आहे. असा फरक करण्याला जर कोणी पक्षपात करणे म्हणू लागला, तर तो म्हणणारा एक तर अज्ञानी तरी असावा किंवा त्याला ज्ञान असूनही त्याच्या डोळ्यांवरती मोहाचे किंवा द्वेषमत्सराचे झापड आलेले असावे. आता हे झापड कोणी काढायचे व कसे काढायचे? कर्णाच्या डोळ्यांवरती असेच झापड आलेले होते म्हणूनच त्याच्या दृष्टीला कृष्ण हा पक्षपाती दिसत होता आणि कृष्णाचे ईश्वरत्व कर्णाच्या दृष्टीला जाणवतही नव्हते. ज्याला आपल्या अज्ञानाची जाणीव झाली आणि खरे ज्ञान जाणून घेण्यासाठी जो आर्त झाला, त्यालाच ज्ञान करून देणे शक्य असते. परंतु ज्याला आपल्या अज्ञानाची जाणीवच नाही आणि आपल्या अज्ञानालाच जो ज्ञान समजतो,

त्याला ज्ञान देणे हे कोणालाही शक्यच नाही. अगदी कृष्णालाही ते शक्य नव्हतेच आणि हे ज्ञान कृष्णाला पूर्णपणे असल्यामुळेच, कर्णाला काहीही समजावून सांगण्याच्या फंदात न पडता, कृष्ण स्वस्थ राहिला. कृष्णाला त्यावेळी करता येण्यासारखी जी एकच गोष्ट होती, तीच त्याने केली आणि ती म्हणजे कृष्णाने कर्णाकडे पूर्णपणे दुर्लक्षच केले.

लक्ष्मी, कर्णाने बोलताना अगदी सहजपणे असेही विधान केले की ‘ गुण-दोष’ हे सर्वांच्याच ठायी असतात आणि आपण सर्वांच्याच गुणांचे कौतुक व दोषांचा निषेध करावा; ज्याचे त्याचे गुण-दोष ज्याचे त्याला. त्यामध्ये उगाचच आपण डावे उजवे करत बसू नये. वरकरणी हे बोलणे चांगुलपणाचे वाटते खरे, पण ते बोलणे केवळ मानभावीपणाचेच आहे. कारण त्यामध्ये केवळ चांगुलपणाचा आवच आणलेला आहे. गुणांचे कौतुक जरूर असावे व प्रसंगी करावेही, हे खरेच आहे. पण सर्वच दोषांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कारण दोषांचे मूळ कारण जरी अज्ञान हेच असले, तरी दोषां-दोषांमध्ये सुद्धा फरक हा आहेच. काही दोष हे व्यक्तिगत पातळीवरचे असतात. जसा एखाद्याच्या ठायी अज्ञानामुळे मोह आहे किंवा लोभ आहे, तर त्याचे परिणाम व त्रासही त्याचे त्यालाच भोगावे लागतात. अर्थात त्याच्या नातेसंबंधातील लोकांना त्या दोषांची थोडीशी झळ लागतेच. कारण तो त्यांच्या नशिबाचा भाग असतो आणि तो त्यांनाच सहनही करावा लागतो. परंतु काही जणांच्याठायी दुसऱ्याविषयी व्देष, असूया व मत्सर असे दोष असतात. या दोघांचा उगम केवळ अज्ञानामध्येच नसतो तर वासनेमुळे दूषित झालेल्या अंतःकरणामध्ये असतो आणि म्हणूनच अत्यंत खोलवरही असतो. या दोषांनी पछाडलेले लोक सर्वांचा नेहमीच दुःस्वास करतात आणि इतरांना त्रास देण्यासाठी नित्य सज्ज असतात. काही ना काही कारण काढून लोकांचा मानसिक व प्रत्यक्षही छळ करण्याचा त्यांचा स्वभावच असतो. दुसऱ्यांच्या सुखाने त्यांना दुःख होते आणि दुसऱ्यांना दुःखी पाहून वा करूनही यांना एक प्रकारचा हर्ष होतो. अशा दुर्जनांच्या दोषास्पद

स्वभावामुळे सामान्य लोकांवर नेहमीच एक प्रकारचे दडपणच येत असते आणि ते सदैव तणावाखालीच वावरत असतात.


लक्ष्मी, यापैकी ज्यांच्याठायी व्यक्तिगत पातळीवरचे दोष आहेत त्यांची ईश्वरालाही दयाच येते. त्यांना जर भाग्याने सत्पुरूषांचा आश्रय मिळाला तर त्यांना त्या सत्पुरूषांच्याद्वारे ईश्वराच्या विशुद्ध प्रेमाचा लाभही मिळतो. त्यामुळे त्यांना त्यांच्या दोषांची जाणीव होते आणि त्या दोषांतून मुक्त होण्यासाठी त्यांच्याठायी आर्तता निर्माण होते. असे भाग्यवान जीव त्या सत्पुरूषांचे माहात्म्य जाणून जर त्यांनाच शरण गेले, तर त्यांच्या प्रेमाने व बोधाने ते जीव सबळ होतात आणि स्वतःच्या दोषांतून पराक्रमाने मुक्त होतात. मनाने निर्मळ व प्रेमळ झालेले हे जीव खऱ्या शांती व समाधानाचा अनुभव स्वतः घेतात आणि दुसऱ्यांनाही देतात.

लक्ष्मी, पण सज्जनांचा छळ करणाऱ्या दुष्ट दुर्जनांविषयी ईश्वराठायी मुळीच दयामाया असत नाही. त्यामुळेच जेव्हा ईश्वराचे मानव रूपाने अवतरणे होते तेव्हा त्याच्या अवतार चरित्रामध्ये सज्जनांना आधार व रक्षण देणे जसे असते तसेच दुर्जनांचा निःपात करणे, हाही त्या अवतारकार्याचा महत्त्वाचा भाग असतो. अशावेळी दुर्जनांचा केवळ निषेधच न करता त्यांचे निर्मूलनच करण्याचे कार्य अवतारी पुरूषांकडून घडत असते. त्याचबरोबर अशा दुर्जनांची साथ करणाऱ्यांचीही मग गय केली जात नाही. बाह्यांगाने सज्जनत्वाचा टेंभा मिरवणाऱ्यांनी कितीही आव आणला तरी दुःसंगतीची व त्यामुळे घडलेल्या दुष्कर्माची फळे त्यांना भोगावीच लागतात. अशा दुर्जनांविषयी सहानुभूती बाळगण्याचे आपल्याला काहीच कारण नाही. आपल्याला सज्जनांचाच मागोवा घेऊन त्यांनाच अनुसरायचे आहे आणि अशा सज्जनांच्या पाठीशी सर्वांगाने व समर्थपणे उभ्या राहिलेल्या कृष्णाचेच माहात्म्य आपल्याला जाणून घ्यायचे आहे. कृष्णाचेच प्रेमीजन होऊन त्याचेच भक्त होऊन रहायचे आहे आणि

आनंदाचा अनुभव घ्यायचा आहे. त्यासाठी कृष्णाचे प्रेमीजन हेच आपल्याला आदर्श व जवळचे आहेत हे पूर्णपणे व कायमचे लक्षात ठेव.”

नारदाचे बोलणे थांबले तरी लक्ष्मी बराच वेळ काही बोललीच नाही असे म्हणण्यापेक्षा, ती काही बोलूच शकत नव्हती हेच खरे होते. पण बोलल्याशिवाय राहूही शकत नव्हती. बोलण्यापेक्षा न बोलणेच लक्ष्मीला अधिक कठीण जात होते. लक्ष्मीच्याठायी थोडीशी अपराधभावनाही निर्माण झालेली होतीच आणि त्यातून बाहेर येणे तर अत्यंत आवश्यकच होते. त्यासाठी एकच मार्ग तिला उपलब्ध होता तो म्हणजे तिच्या मनाची अवस्था बोलूनच मोकळी करणे. शेवटी लक्ष्मीने तिच्या मनातील सर्व धैर्यबळ एकवटले आणि बोलावयास सुरुवात केली. तिच्या आवाजातील कंप हा तिच्या मनातील आर्ततेचाच निर्देशक होता.

“अरे नारदा, सर्वात प्रथम मी तुझी अत्यंत व्यथित अंतःकरणाने क्षमाच मागते. माझ्यामुळे तुझ्या मनाला अत्यंत कष्ट झाले आहेत, या गोष्टीचा मला स्वतःलाच अत्यंत त्रास होत आहे. तुझ्या अंतःकरणाला झालेली व्यथा तुझ्या बोलण्यातून अगदी स्पष्टपणे प्रगट होत असलेली मला जाणवत होती. माझ्या मनात कुठेतरी कर्णाविषयी उगाचच सहानुभूती निर्माण झालेली होती आणि ती वारंवार वरती येत होती. नेमका याचाच तुझ्या मनाला त्रास होत होता आणि तीच तुझी व्यथाही होती. माझी कर्णाविषयीची सहानुभूती ही मला कृष्णाच्या माहात्म्याचा विसर पाडत होती आणि कृष्णाच्या अंतःकरणापासून दूर नेत होती, ही गोष्ट माझ्या लक्षातच येत नव्हती. पण तुला ती स्पष्टपणे दिसत होती आणि माझ्यावरील प्रेमापोटी सहनही होत नव्हती. माझ्यावरील त्या प्रेमानेच तुझे अंतःकरण कळवळले आणि तू विषयांतर करून कर्णाच्या निमित्ताने पुष्कळच बोललास. या जगात केवळ सुष्ट व दुष्ट असे दोनच वर्ग नसून, यामध्ये मिश्रवृत्तीचेही अनेकजण आहेत हे तू माझ्या लक्षात आणून दिलेस. त्याहीपेक्षा बाह्यांगाने सुष्ट दिसणारे पण मनातून दुष्ट असणारे किंवा दुष्टांची साथ-संगत करणारेही अनेकजण असतात आणि




त्यांच्यापासूनही अधिक सावध राहिले पाहिजे, हेच तू अगदी स्पष्ट करून सांगितलेस. त्यामुळे अशा सुष्ट म्हणून केवळ दिसणाऱ्या लोकांविषयी आपल्याठायी अजिबात सहानुभूती नसावी. नाहीतर तेच मग मोहाचे मूळ ठरेल आणि आपल्याला ईश्वराच्या प्रेमभक्तीपासून वंचित करेल. मग कुठली आलीय ईश्वराची प्राप्ती आणि कुठला आलाय ईश्वराच्या भेटीचा आनंद?

नारदा, अशा मोहाचे मूळ माझ्या मनात धरण्याच्या आधीच तू मला सावध केलेस आणि तुझ्या प्रभावी व धारदार बोलण्याने माझ्याठायीचे त्या मोहाचे बीजच पूर्णपणे काढून टाकलेस. याबद्दल मी तुझी सहस्त्रशः ऋणी आहे. चांगुलपणाविषयी असलेल्या माझ्या काल्पनिक समजुतीतून माझे मन आता पूर्णपणे बाहेर आलेले आहे. त्या मनाठायी आलेले शंकेचे मळभही पूर्णतः दूर हटले आहे आणि माझे मन सगुणप्रेमाचा अनुभव घेण्यासाठी केवळ आतुरच नव्हे तर आर्तच झालेले आहे. मध्ये बराच वेळ सगुणकथा श्रवण करण्याविनाच गेला. अर्थात तो वाया मात्र गेला नाही. पण घडलेल्या या उपासामुळे माझ्या मनाची भूक मात्र अधिक तीव्र झालेली आहे. तेव्हा तू आता कृष्णाच्या व त्याच्या प्रेमीजनांच्या कथा सांगण्यास त्वरित सुरुवात कर बघू. त्या कथांमधील सगुण प्रेमरस हाच माझ्या मनाला रोचक, पाचक व पोषक आहे. त्यामुळेच माझे मन धष्ट व पुष्ट होईल आणि सगुणभक्तिचा आनंद अनुभवण्यासाठी सज्ज होईल. माझ्यासाठी तेच श्रेय आहे आणि तेच प्रेयही आहे. होय ना?"

लक्ष्मीच्या बोलण्याचा नारदाला संतोष झाला आणि त्याने समाधानाने मान डोलवली. नारदाचे मुखही पुन्हा नेहमीप्रमाणे प्रसन्न दिसू लागले आणि त्याने लक्ष्मीकडे पाहून स्मितहास्य केले. नारदाची कळी खुललेली पाहून लक्ष्मीलाही आनंद झाला आणि श्रवणातुर झालेली लक्ष्मी नारदाकडे अपेक्षेने पहात राहिली. नारदानेही लक्ष्मीची अपेक्षापूर्ती करण्यास विलंब लावला नाही आणि नारदाचा वचनौघ पुन्हा प्रगट होऊन वाहू लागला.

"लक्ष्मी, स्वयंवरमंडपातून कर्णाच्या तशा तडकाफडकी जाण्यामुळे मंडपात जरी थोडीशी चलबिचल झाली तरी ती लगेचच निमालीही आणि अर्जुनाने 'पण' जिंकल्याचा हर्षच त्या वातावरणात भरून राहिला. थोडासा दिग्मूढ होऊन एवढा वेळ स्वस्थ राहिलेला द्रुपदही सावरला आणि त्वरित पुढे येऊन त्याने अर्जुनाचे अभिनंदन केले. एवढेच नव्हे, तर द्रुपद स्वतः धर्म, भीम व इतर पांडव यांच्या जवळ गेला आणि त्याने त्यांना सन्मानपूर्वक मंचकावर आणले. कृष्णाने द्रौपदीला नेत्रपल्लवीने खूण केली असता द्रौपदीही पुढे आली आणि कृष्णाच्या जवळ येऊन उभी राहिली. कृष्णानेही द्रौपदीचे प्रेमपूर्वक अभिनंदन केले आणि तिचा हात स्वतःच्या हातात घेऊन तो अर्जुनाच्या हातात दिला. अर्जुनाच्या चेहऱ्यावरून त्याला झालेला आनंद अगदी ओसंडून जात होता, तर अर्जुनाच्या पराक्रमाने व व्यक्तिमत्त्वाने भारित झालेल्या द्रौपदीलाही अगदी कृतकृत्य झाल्यासारखे वाटत होते. तिने कृष्णाकडे डोळे भरून पाहिले आणि तिचा कृतज्ञता भाव केवळ नजरेनेच व्यक्त केला. द्रुपदाचे नेत्रही प्रेमाश्रूंनी भरून आले. त्याने दोन्ही हात जोडून धर्मराजाला वंदन केले आणि तो त्याच्याशी आदरपूर्वक बोलू लागला.

"अहो धर्मराज, माझी कन्या ही खरेच भाग्यवान आहे. म्हणूनच तिचा संबंध तुमच्यासारख्या कुळाशी व अर्जुनासारख्या पराक्रमी वीराशी जुळून येत आहे. तिच्या संमतीनेच तिच्या स्वयंवरासाठी लावलेला अत्यंत कठीण असा 'पण' जिंकून या अर्जुनाने माझ्यावर तर मोठेच उपकार केलेले आहेत. आमची द्रौपदीही सर्व सुलक्षणांनी युक्त अशी एक आदर्श कन्या आहे आणि तुमच्या कुटुंबासाठी व कुळासाठी ती अत्यंत अनुरूप आहे अशी माझी पूर्ण खात्री आहे. स्वतःच्या सुशील स्वभावाने व सेवाभावाने ती अर्जुनाला तर प्रसन्न करीलच पण सर्व कुटुंबालाही आनंदित ठेवील, असा मला पूर्ण विश्वास आहे. तरी आपण अर्जुनाचा ज्येष्ठ बंधू या नात्याने द्रौपदीचा अर्जुनाची पत्नी म्हणून स्वीकार करावा, अशी मी आपल्याला नम्रतापूर्वक विनंती करतो."




द्रुपदाच्या बोलण्यावर धर्मराजाने द्रुपदाला दोन्ही कर जोडून नमस्कार केला आणि तो शांत स्वरात बोलू लागला.

“अहो द्रुपद महाराज, तुमच्यासारख्या सत्वशील कुळाशी आमची सोयरीक जुळून येत आहे ही गोष्ट आमच्यासाठीही गौरवास्पदच आहे. आमच्या संबंधीची सर्व माहिती कृष्णाकडून तुम्हाला कळली असेलच. कृष्ण हा मध्यस्थ आहे असे म्हटल्यावर आपल्याला कोणतीही काळजी करण्याचे कारणच नाही. आमच्यासाठी तर कृष्ण हा आमच्या कुटुंबाचा एक घटकच आहे. आमची माता कुंती हिचा तर कृष्णावरती विशेषच लोभ आहे आणि माझा कनिष्ठ बंधू अर्जुन व कृष्ण हे तर एकमेकांचे अत्यंत जीवलग असे मित्रच आहेत. आमच्या जीवनातील सर्वच प्रसंगात कृष्ण हा आम्हाला साथ करीत असतो. त्याच्याच सावधानतेमुळे आम्ही सर्वजण अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडण्यापासून वाचलो आणि त्याच्याच सूचनेनुसार आम्ही आज येथे स्वयंवरासाठी उपस्थित राहिलो होतो. अर्जुनाने केलेल्या पराक्रमाचे मलाही अत्यंत कौतुक व आनंदच आहे आणि त्याचे त्याला मिळालेले फळही अत्यंत सुंदरच आहे. खरेच तुमची कन्या ही रूपवती व सौंदर्यवती तर आहेच, पण तुम्ही केलेल्या सुसंस्काराचे तेजही तिच्या मुखावर शोभून दिसत आहे. द्रौपदीचे आमच्या कुटुंबात होणारे आगमन ही निश्चितच आम्हा सर्वांसाठीच सुखकारक व आनंददायी घटना आहे.

अहो महाराज, परंतु मला एक गोष्ट आपल्याला नम्रतापूर्वक सांगावयाची आहे. आम्ही पाचही बंधू नेहमीच एकत्र व एकोप्याने रहात असतो याचे मूळ कारण म्हणजे आमची माता कुंती हे आहे. तिने आम्हा पाचही भावंडांना अगदी लहानपणापासून स्वतः अत्यंत कष्ट सोसून वाढविले. आम्हा सर्वांशीच नेहमी प्रेमभावाने व मुख्यतः समभावाने वागून आमच्या कुंती मातेने आमच्यावर जे सदाचरणाचे संस्कार केले, त्याचेच फळ म्हणजे आजचे आम्ही आहोत ही गोष्ट सत्य आहे. त्यामुळे आम्ही सर्वच बंधू आमच्या मातेचेच सदैव ऋण मानतो आणि नेहमी तिच्याच

वचनात असतो. तिची इच्छा हीच आमच्यासाठी अंतिम व प्रमाण असते. आमच्या मातेचा साधा शब्दही आम्ही आज्ञा म्हणूनच स्वीकारतो आणि तिचे आज्ञापालन हे आमचे कर्तव्यकर्मच नव्हे, तर तो आमचा धर्मच आहे. तेव्हा आमच्या मातेने आधी या द्रौपदीचा स्नुषा म्हणून स्वीकार करणे हे आमच्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. तिच्या अनुज्ञेशिवाय आम्ही कोणतेही पाऊल पुढे टाकू शकणार नाही. आम्ही या नगरीतच आमच्या मातेसह एका लहान घरात तात्पुरते वास्तव्य करून आहोत आणि दररोज भिक्षा मागून आम्ही आमचा उदरनिर्वाह करीत होतो. तेव्हा प्रथम या द्रौपदीला एकटीलाच आमच्या मातेच्या भेटीला घेऊन जाण्याची आपण आम्हाला परवानगी द्यावी, अशी मी आपणाला विनंती करतो. कुंतीमातेच्या इच्छेनुसार व तिच्या निर्णयानुसारच पुढील सर्व गोष्ट घडतील आणि व्यवस्थित घडतील याची मी आपणाला खात्री देतो.”

धर्मराजाचे बोलणे थांबल्यावरती थोडावेळ त्याठिकाणी शांतता व स्तब्धताच पसरली. पण सर्वांच्याचठायी धर्मराजाविषयी अत्यंत कौतुकाचाच भाव होता. एवढ्या तरूण वयातही धर्मराजाच्या ठिकाणी असलेला सूज्ञपणा, त्याची नम्रतेने बोलण्याची वृत्ती आणि त्याहूनही त्याच्याठिकाणी दिसत असलेली मातृभक्ती या सर्वांचाच प्रभाव तेथील सर्वांवरच झाला. विशेषतः द्रुपद तर जास्तच प्रभावित झाला आणि तो धर्मराजाकडे अत्यंत कौतुकाने पहात राहिला. द्रौपदीने हळूच एक कटाक्ष अर्जुनाकडे टाकला तर अर्जुन वरकरणी तरी शांतच दिसला. तो काहीच बोलला नाही. त्याच्यासाठी त्याच्या ज्येष्ठ बंधूचे म्हणणे हे तर प्रमाण होतेच. पण अर्जुनाच्याही त्याच्या मातेविषयी त्याच भावना होत्या, ज्या धर्मराजाच्या होत्या. अर्जुनाच्या इतर बंधूंचेही वेगळे मत असण्याचे काही कारणच नव्हते आणि तसे त्यांचे वेगळे मत असणे शक्यही नव्हते. कारण त्यांनाही काही वेगळा विचार करण्याचे कारण नव्हते आणि तशी त्यांना बहुधा सवयही नव्हती. अर्जुनाची अशी थंड प्रतिक्रिया बघून द्रौपदीला मात्र थोडेसे वेगळे वाटले आणि नवलही वाटले. तिने अपेक्षेने



कृष्णाकडे पाहिले. कृष्णाची मुद्रा अगदी शांत होती. पण द्रौपदीच्या ठिकाणी निर्माण झालेली काळजी कृष्णाने ओळखली. त्याने केवळ नजरेच्या खुणेनेच द्रौपदीला आश्वासित केले आणि कृष्णावर पूर्ण भरवसा ठेवून असलेली द्रौपदी लगेचच अगदी निश्चिंत झाली आणि मनात मोकळीही झाली.

धर्मराजाची इच्छा जाणून द्रुपदाने स्वतःही त्यांच्याबरोबर जाण्याचा मानस व्यक्त केला. परंतु धर्मराजाने त्या गोष्टीस नम्रतेने नकार दिला. एवढेच नव्हे, तर द्रुपदाने देऊ केलेल्या इतरही सुविधा व मदत धर्मराजाने स्वीकारली नाही. कुंतीची प्रथम भेट द्रौपदीने एकटीनेच घ्यावी अशीच बहुधा धर्मराजाची इच्छा असावी. द्रुपदानेही मग जास्त आग्रह केला नाही. मग त्याची संमती घेऊन धर्मराज, अर्जुन, द्रौपदी व बाकीचे सर्व पांडव त्या स्वयंवरमंडपाच्या बाहेर पडले. निघताना द्रौपदीने हळूच मागे वळून कृष्णाकडे एक दृष्टीक्षेप टाकला. कृष्णाशिवाय असे एकट्याने जाणे द्रौपदीलाही जरा कठीणच वाटत होते. पण कृष्णावर श्रद्धा ठेवून तीही एकेक पाऊल सावकाशपणे टाकीत संथ गतीने चालू लागली. पुढे धर्मराज, त्याच्यामागे भीम, त्याच्यामागे अर्जुन, अर्जुनाच्या मागे द्रौपदी आणि सर्वात मागे नकुल व सहदेव या क्रमाने जात असलेली, ती जणू द्रौपदीच्या विवाहाची वरातच आहे असे वाटत होते. पण एक गोष्ट आज विशेषत्वाने घडत होती की पांडवांच्यामध्ये प्रथमच एक तिसरी व्यक्ती आलेली होती आणि ती व्यक्तीही एक स्त्री होती. ती स्त्रीही सर्वसाधारण किंवा साधी नव्हतीच तर तिच्या रूपगुणाने व प्रभावी व्यक्तिमत्त्वाने प्रख्यात असलेली एक अत्यंत सुंदर व तेजस्वी अशी स्त्री होती. भावी घटनांचे जणू ते सूचकच होते.

* * * * *


# अर्जुन-द्रौपदी विवाहातील पेचप्रसंग

हे लक्ष्मी, धर्मराजासह इतर पांडव व द्रौपदी जेव्हा त्यांच्या तात्पुरत्या वसतीस्थानाजवळ आले, तेव्हा घरात प्रवेश करण्याच्या आधी बंद दाराबाहेर उभे राहूनच धर्मराजाने कुंतीमातेला हाक मारली आणि तो थोड्याशा गमतीच्या सुरात म्हणाला,

“हे माते, आम्ही नेहमीप्रमाणे भिक्षा मागून परत आलो आहोत. परंतु आजची मिळालेली भिक्षा नेहमीसारखी नाही, तर अत्यंत आगळी वेगळी अशी आहे. या अर्जुनाने दाखवलेल्या अतुलनीय पराक्रमामुळे लाभलेली ही भिक्षा खरेच अतिशय सुंदरही आहे. तेव्हा तू लवकर दार उघड आणि आम्हाला घरात घे.”

धर्मराजाचे बोलणे ऐकून दार उघडण्यासाठी लगबगीने येता येता कुंतीच्या मुखातून सहजोद्गार निघाले, “अरे, ही तर चांगलीच गोष्ट आहे की! खरेच आज एखादेवेळेस भाग्याने चांगली भिक्षा मिळाली असेलही, तरी भिक्षा चांगली किंवा वाईट याचा विचार न करता, नेहमीप्रमाणेच ती भिक्षा तुम्ही सर्वांनी आपापसात सारखे भाग करून वाटून घ्या म्हणजे झाले.”

असे बोलत बोलतच कुंतीने घराचा दरवाजा उघडला तर समोर तिच्या पाचही पुत्रांसह एक तरूण व सुंदर स्त्री तेथे मान लववून उभी होती. द्रौपदीच्या प्रथम दर्शनानेच कुंती अत्यंत प्रभावित तर झालीच, पण तिच्याठायी द्रौपदीविषयी एक प्रकारचा आपलेपणाही निर्माण झाला. त्याचे निश्चित कारण खरे तर कुंतीलाही कळले नाही. पण ती अनाहूतपणे पुढे झाली आणि तिने द्रौपदीचे दोन्ही हात स्वतःच्या हातांमध्ये धरून तिचे अत्यंत प्रेमाने स्वागत केले. द्रौपदीनेही लगेचच नम्रपणे वाकून कुंतीच्या पायांना स्वतःच्या हाताने स्पर्श केला आणि तिला आदरपूर्वक नमस्कार



केला. कुंतीने द्रौपदीच्या मस्तकावर प्रेमाने हात ठेवला आणि पुन्हा तिचा हात धरून तिला घरात आणले. पाठोपाठ सर्व पांडवांनीही घरात प्रवेश केला. कुंती धर्मराजाकडे प्रश्नार्थक मुद्रेने पहात राहिली. तेव्हा धर्मराजाने तिला घडलेला सर्व वृत्तांत सांगितला. तो ऐकून कुंतीला अतिशय आनंद झाला आणि हर्षभराने तिचे मुख फुलून आले. ती अर्जुनाच्या जवळ गेली आणि तिने अत्यंत प्रेमाने अर्जुनाला जवळ घेतले. अर्जुनाचे कौतुक करीत असताना कुंतीचे नेत्रही पाणावले आणि तिच्या नकळत वाहूही लागले. खरे तर, तिच्या मुखातून शब्दही फुटणे कठीण होत होते. परंतु तरीही कसेबसे स्वतःला सावरीत कुंती एवढेच जेमतेम बोलू शकली.

“खरेच, हा आपल्या सर्वांच्याच जीवनातील एक अत्यंत आनंदाचा आणि अत्यंत दुर्मिळ असा क्षण आहे. एवढे दिवस मी एकटीच तुम्हाला सांभाळीत होते. आता माझ्या जोडीला व मदतीला ही द्रौपदी आलेली आहे. माझ्यासाठी तरी यापेक्षा दुसरी कोणतीही आनंदाची गोष्ट असणे शक्यच नाही. धर्मराजा, आता तू जराही वेळ न दवडता त्वरित द्रुपद महाराजांची भेट घे आणि अर्जुन व द्रौपदी यांच्या विवाहाची योजना व व्यवस्था ताबडतोब करावयास सांग. लागलीच तू निघण्याचे कर बघू.”

कुंतीचे बोलणे ऐकून धर्मराजा काहीच बोलला नाही आणि तेथून निघण्यासाठी हललाही नाही. धर्मराजाची ती स्तब्धता पाहून कुंतीलाही नवलच वाटले आणि ती धर्मराजाकडे त्याच्या काहीतरी प्रतिक्रियेच्या अपेक्षेने पहात राहिली. शेवटी धर्मराजानेच या शांततेचा भंग केला आणि त्याने बोलावयास सुरुवात केली.


“हे कुंतीमाते, तू केवळ आमची जन्मदातीच नसून तू आमचे पालन-पोषण करून आम्हाला लहानाचे मोठेही केले आहेस ही गोष्ट सत्य आहे. तू केलेल्या संस्कारांमुळेच आमची खऱ्या अर्थाने वाढ झालेली आहे. त्यामुळे तू आमची केवळ माताच नसून आमच्यासाठी देवताच आहेस. ‘मातृ देवो भव’ असे जे म्हटले जाते त्या वचनावर आमची पूर्ण श्रद्धा आहे. म्हणूनच आमचे सर्व जीवन हे तुझ्या सेवेसाठीच आहे असाच

आमचा भाव आहे. या भावापोटीच तुझे सहजवचनही आम्हासाठी शिरसावंद्य अशी आज्ञाच आहे आणि त्या आज्ञेचा भंग करण्याचे पाप आमच्याकडून कधीही घडणे शक्यच नाही.

हे माते, आम्ही घरात प्रवेश करीत असताना मी सहजपणे ‘आम्ही एक आगळीवेगळी भिक्षा आणली आहे’ असे म्हणालो आणि त्यावरती तूही ‘ती भिक्षा सर्वांनी सारखी वाटून घ्या’ असे उत्स्फूर्त वचन बोललीस. परंतु आमच्यासाठी, निदान माझ्यासाठी तरी ती आज्ञाच आहे आणि तिचे पालन करणे हे केवळ माझे कर्तव्यकर्मच नाही, तर माझ्यासाठी तरी तो माझा धर्मच आहे. तुझ्या आज्ञेचे उल्लंघन चुकून व नकळत जरी माझ्याकडून घडले तरी माझ्याठायी एक प्रकारची अपराधभावना निर्माण होईल आणि त्या पापाचा मी कायमचा धनी होऊन राहीन. अशा परिस्थितीत मी काय व कसा निर्णय घ्यावा हेच मला समजेनासे झाले आहे. माझी विचारशक्ती थांबली आहे व बुध्दीही कुंठीतच झालेली आहे. तेव्हा मी काय करावे याचे तूच मला मार्गदर्शन करावेस अशी मी तुला विनंती करतो. कारण तुझ्या आज्ञेनुसार द्रौपदीने आम्हा सर्व बंधूंची पत्नी होणेच आवश्यकच आहे.”

धर्मराजाचे बोलणे ऐकून कुंती एकदम चकितच झाली. धर्मराजाची धर्मपालनाविषयीची निष्ठा कुंती जाणून होती. धर्मराजाची धर्माचरणाची निष्ठा बदलणे काय, जरासुद्धा हलणेही शक्य नाही, याचीही खात्री कुंतीला होती. त्यामुळे कुंतीच्या समोर मोठी विचित्र परिस्थिती निर्माण झाली. कुंतीचे सहज बोलणेही धर्मराजा गंभीरपणेच घेणार याचीही कल्पना कुंतीला पूर्णपणे होती. परंतु भिक्षा म्हणजे एखादी स्त्री असेल अशी कल्पनाही कुंतीच्याठायी असणे शक्यच नव्हते. त्यामुळे कुंतीच्या मनाची स्थितीही गोंधळल्यासारखीच झाली होती. तिच्या मनातील तोच गोंधळ तिच्या बोलण्यातूनही प्रगट होऊ लागला.

“अरे धर्मराजा, हा तर एक मोठा कठीणच प्रश्न निर्माण झालेला आहे. तुम्ही आणलेली भिक्षा म्हणजे एक स्त्री असल्यामुळे तिला तुम्ही



आपापसात वाटून घ्या असे मी म्हणू शकत नाही. पण त्याचबरोबर मातृआज्ञाभंगाचे पाप करण्यासाठी मी तुम्हाला प्रवृत्तही करू शकत नाही. तेव्हा या प्रश्नातून तुम्ही बंधूंनीच आपापसात चर्चा करून एकमताने तोडगा काढा. परंतु एक गोष्ट पक्केपणाने लक्षात ठेवा की काही झाले तरी तुम्हा बंधूंमधील ऐक्य मात्र कायम टिकून राहिले पाहिजे. त्यात कोणत्याही कारणाने वा कसल्याही निमित्ताने बाधा येऊ देऊ नका म्हणजे झाले. तुमच्यातील एकी हेच तुमचे बलस्थान आहे ही महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवा.”


एवढा वेळ स्वस्थपणे बसून सर्व ऐकत असलेली द्रौपदी कुंतीचे बोलणे ऐकून अत्यंत विस्मय पावली. तिचा तिच्या कानावरती विश्वासच बसेना आणि तिला एक वस्तू समजून होत असलेले तिच्याविषयीचे बोलणे तर द्रौपदीला मुळी ऐकवेच ना. द्रौपदीने मोठ्या विश्वासाने अर्जुनाकडे पाहिले, तर तो मान खाली घालून स्वस्थच बसला होता. अशा परिस्थितीत काय करावे हे द्रौपदीलाही कळेच ना. द्रौपदी अत्यंत हवालदिल झाली आणि त्या परस्थितीत तिला कृष्णाची अत्यंत तीव्रतेने आठवण येऊ लागली. कृष्णाच्या स्मरणाने द्रौपदीच्या नेत्रात अश्रू तरळून आले. द्रौपदीची ही अगतिक अवस्था पाहून कुंतीचेही मन कळवळले. तिलाही द्रौपदीची दयाच आली. कुंती द्रौपदीच्या जवळ गेली आणि तिने द्रौपदीच्या मस्तकावरती हलकेच थोपटले. त्याचक्षणी द्रौपदीला कुंतीचा केवढा तरी आधार वाटू लागला आणि ती कुंतीकडे अपेक्षेने पहात राहिली. कुंतीनेही थोडावेळ परस्थितीचा विचार केला आणि ती बोलू लागली.

“हे माझ्या पुत्रांनो, मी काय सांगते ते नीट ऐकून घ्या. धर्म-अधर्माची भाषा मला अवगत नाही. मी भावनेला जास्त प्राधान्य देते. सर्वांच्या भावना जास्तीत जास्त सांभाळून त्यांचा मेळ घालण्याचा माझा नेहमीच प्रयत्न असतो. आताचा हा प्रसंग तसा अत्यंत नाजूकच आहे. त्यातून मार्ग काढताना अत्यंत काळजी घेतली पाहिजे आणि मुख्य म्हणजे त्यासाठी मनाचा समतोल राखणेही तेवढेच अत्यंत आवश्यक

आहे. त्यासाठी मी तुमच्याशी एकेकट्याने व्यक्तिगत व खाजगी बोलू इच्छिते. त्यानंतर मी अर्जुनाशी बोलेन आणि द्रौपदीशी बोलेन आणि त्यांची मनिषा जाणून घेईन. कारण या प्रसंगात ते दोघेच मुख्य आहेत ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे.” असे बोलून कुंती घराच्या आतील भागात निघून गेली.

कुंतीच्या बोलण्यावरती कोणीच काही बोलले नाही. तसे काही बोलण्याची आवश्यकताही नव्हतीच. कारण कुंतीचे सांगणे हे सर्वांना प्रमाणच होते. कुंतीच्या सांगण्यानुसार प्रथम धर्मराजाने कुंतीची एकांतात भेट घेतली. त्या भेटीत धर्मराजाने त्याची भूमिका पुन्हा स्पष्टपणे कुंतीसमोर मांडली. ‘मातेचे वचन मोडण्याचे पाप मला मुळीच करायचे नाही, त्यापेक्षा मी मरण पत्करेन माते! त्यासाठी, तुझी इच्छा असल्यास आम्ही सर्व बंधूंनीच द्रौपदीशी लग्न करावे असे मला तरी वाटते. निदान माझी तरी त्यासाठी पूर्ण तयारी आहे’ असे धर्मराजाने कुंतीला अत्यंत निःसंदिग्धपणे सांगितले.

त्यानंतर भीम, नकुल व सहदेव यांनीही क्रमाक्रमाने कुंतीची एकांतात भेट घेऊन तिच्यासमोर त्यांच्या मनातील विचार मांडले. ‘माते, तुझी इच्छा असल्यास तीच आज्ञा मानून आम्ही द्रौपदीशी विवाह करावयास तयार आहोत’ असे त्या सर्वांनीच कुंतीला अगदी मोकळेपणाने सांगितले. त्यानंतर अर्जुन हा कुंतीस भेटावयास आला. पण बराच वेळ तो काही बोललाच नाही. फक्त मान खाली घालून तो तेथे उभा राहिला. अर्जुनाची मनःस्थिती कुंतीने ओळखली. तिने अर्जुनाच्या जवळ जाऊन त्याच्या खांद्यावरती हलकेच थोपटले आणि स्वतःच्या हाताने अर्जुनाची हनुवटी धरून त्याची मान वर केली. अर्जुनाच्या नजरेत असहाय्यता होती. कुंतीने नेत्रखुणेनेच अर्जुनाला आश्वासित केले आणि मन मोकळे करण्याची सूचना केली. अर्जुनही प्रयत्नपूर्वक आणि थोड्याशा अस्पष्ट सुरात बोलू लागला.




“हे माते, मी ओळखून आहे की तुझ्यावरती हा एक कठीण प्रसंगच आलेला आहे. मला माहित आहे की तुझ्या दृष्टीने आम्हा बंधूंची एकी ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. ती योग्यच आहे आणि मलाही ती प्रमाणच आहे. मी माझ्या बाजूने तुला एवढेच आश्वासन देतो की जरी मी ‘पण’ जिंकून द्रौपदीला प्राप्त करून घेतले असले तरीही केवळ माझाच हक्क तिच्यावरती आहे असा दावा मी कधीही करणार नाही. पण मला एक गोष्ट कबूल करावयासच हवी की माझे मन द्रौपदीवर पूर्णपणे जडले आहे. तरीही आपल्या सर्व कुटुंबाच्या स्वास्थ्यासाठी व हितासाठी द्रौपदीचा विवाह आम्हा सर्व बंधूंशी व्हावा असाच निर्णय घेण्याची वेळ जर तुझ्यावर आली, तर तू जराही अनमान न करता तसा निर्णय अगदी निःसंकोचपणे घे. त्या निर्णयाला माझी पूर्णपणे अनुमती व बांधिलकी असेल असे मी तुला वचन देतो. मला अशी निश्चितपणे खात्री आहे की काहीही निर्णय घेण्याआधी तू द्रौपदीशीही नक्कीच बोलणे करशील आणि तिच्याही भावना जाणून घेशील.” असे म्हणून अर्जुनाने कुंतीला वाकून नमस्कार केला आणि अश्रूंनी पाणावलेल्या नेत्रांनी तो तेथून निघून गेला. अर्जुनाच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात असताना कुंतीचे नेत्रही भरून आलेले होते.

अर्जुनाच्या पाठोपाठ स्वतः द्रौपदी कुंतीच्या भेटीसाठी आली. येताक्षणीच द्रौपदीने प्रथम कुंतीला वाकून अत्यंत नम्रतापूर्वक नमस्कार केला आणि ती तेथेच उभी राहिली. कुंतीने द्रौपदीला प्रेमाने आपल्याजवळ बसवून घेतले आणि तिचा हात आपल्या हातात घेतला. द्रौपदीला एकदम भरूनच आले आणि तिने हलकेच स्फुंदायला सुरुवात केली. कुंतीने द्रौपदीच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवून तिचे सांत्वन करून तिला शांत केले. स्वतःला कशाबशा सावरलेल्या द्रौपदीशी मग कुंतीने बोलावयास सुरुवात केली.

“हे द्रौपदी, तुझी व्यथा मी जाणून आहे. कारण मीही एक स्त्रीच आहे. पण मी एक माताही आहे. म्हणून माझी व्यथा तूही समजून

घ्यावीस, एवढीच माझी इच्छा आहे व तुझ्याकडून अपेक्षाही आहे. मला माझी पाचही मुले सारखीच आहेत. त्यांचे स्वभाव एकमेकांहून अत्यंत भिन्न असेच आहेत. पण मी मात्र त्यांच्याकडे केवळ मातेच्या प्रेमाने व समभावानेच पहात असते. माझ्या पाचही पुत्रांचा भाव व निष्ठा केवळ माझ्याठायीच आहे. त्यांच्यासाठी मीच सर्वस्व आहे आणि माझ्यासाठीही तेच माझे सर्वस्व आहेत. तुला एक महत्त्वाची गोष्ट सांगते की केवळ माझ्यावरील प्रेमामुळेच त्यांची आपापसातील एकी टिकून आहे आणि त्यांचे हे ऐक्य हेच त्यांचे सर्व बळ आहे. त्या ऐक्यामध्ये जर कोणत्याही कारणामुळे किंवा कोणाही व्यक्तीमुळे बाधा आली तर त्यांचे ऐक्य भंग पावेल आणि मग विखुरलेले माझे पुत्र हे बलोहीन व तेजोहीन होऊन रहातील ही गोष्ट अगदी सत्य आहे. म्हणून माझा सर्व प्रयत्नही नेहमीच त्यांचे ऐक्य राखण्याकडे व सांभाळण्याकडेच असतो हेही खरेच आहे.

द्रौपदी, मी आता तुला एक अत्यंत महत्त्वाची व खाजगी गोष्ट सांगते. माझ्या सर्व पुत्रांशी वैयक्तिक बोलणे केल्यावर माझ्या एक गोष्ट लगेचच लक्षात आली की त्या सर्वांचेच मन तुझ्यावरती आधीच गेलेले आहे. माझ्या पुत्रांचे मन खऱ्या अर्थाने केवळ मीच जाणू शकते आणि त्यासाठी मला जराही वेळ लागत नाही. तेव्हा ही गोष्ट खरीच आहे, की त्या सर्वांच्या मनात तू पूर्णपणे भरलेली आहेस आणि तुझ्या प्राप्तीची आकांक्षा त्यांच्याठायी निर्माण झालेलीच आहे. अर्जुनाचे मन तर तुझ्यावरती पूर्णपणे जडलेले आहे. त्या बिचाऱ्याची अत्यंत भावनिक कुचंबणाच होत आहे. ही गोष्ट प्रयत्न करूनही तो माझ्यापासून लपवून ठेवू शकला नाही आणि ती गोष्ट माझ्याही लक्षात आल्याशिवाय रहाणे शक्यच नव्हते. परंतु नावाप्रमाणेच अर्जुनाच्या स्वभावात ऋजुता व सरळता आहे. त्यामुळेच अर्जुन स्वतःच्या भावना व्यक्त न करता सर्व कुटुंबाच्या हितासाठी माझी आज्ञा प्रमाण मानणार आणि ज्येष्ठ बंधूच्या शब्दाचाही मान राखणार. त्याचा हा स्वभाव मला पूर्णपणे ठाऊक आहे आणि म्हणूनच मला त्याची काळजीही वाटते. अशा परिस्थितीत माझ्या



मनाची द्‌विधा स्थिती झाल्यामुळे कोणताही निर्णय घेणे मला कठीणच होत आहे. माझे मन मी तुझ्याकडे पूर्णपणे मोकळे केलेले आहे. तेव्हा आता तूही तुझ्या मनातील भावना मोकळेपणाने माझ्याकडे प्रगट कर. कोणतीही भीती अथवा संकोच अजिबात बाळगू नकोस.”


कुंतीचे बोलणे शांतपणे ऐकत असताना द्रौपदीची मनःस्थिती मात्र मुळीच शांत नव्हती. तिच्या मनात केवढीतरी खळबळ माजलेली होती आणि साहजिकच मनाची अत्यंत चलबिचलही झालेली होती. त्यामुळे द्रौपदी बराच वेळ काहीही न बोलता स्वस्थच बसून राहिली होती. पण तिच्या मनातील सर्व अस्वस्थता तिच्या मुखावर पूर्णपणे पसरली होती आणि ती कुंतीच्या लक्षात आल्याशिवाय राहिली नाही. कुंतीने द्रौपदीचा हात आपल्या एका हातात घेतला आणि दुसऱ्या हाताने तिने द्रौपदीचे मस्तक हळुवार थोपटले. कुंतीच्या मायेच्या स्पर्शाने द्रौपदीचेही मन व नेत्र भरून आले. थोडावेळ तसाच जाऊ दिल्यानंतर एकेक शब्द सावकाशपणे उच्चारीत द्रौपदी बोलू लागली.

“अहो कुंतीदेवी, आपण मला माझ्या मातेसमानच आहात. त्यामुळेच आपल्या स्पर्शातील वात्सल्यभावाने माझे मन भरून आले. माझ्यावरील प्रेमाच्या हक्काने तुमच्या मनातील सर्व काही मला सांगून तुम्ही तुमचे मन मोकळे केलेत. त्याने मला बरे वाटले. आता त्याच हक्काने मी माझे मन तुमच्याकडे मोकळे करण्याचा प्रयत्न करीत आहे. माझ्या भावना योग्य शब्दात व्यक्त करणे कदाचित मला जमणार नाही. तरी तुम्ही त्या समजून घ्याल याची मला खात्री आहे. तेवढा विश्वास तुमच्या माझ्यावरील आपलेपणामुळे माझ्याठायी नक्कीच निर्माण झाला आहे. म्हणूनच माझे मन तुमच्यापुढे मोकळे करण्याचे साहस करण्यास मी धजावत आहे ही गोष्ट अगदी खरी आहे.

अहो कुंतीदेवी, प्रथमच मी एक गोष्ट तुम्हाला अगदी मोकळेपणाने सांगते की माझा व अर्जुनाचा विवाह जुळवून आणण्यामागील प्रेरणा ही केवळ कृष्णाचीच आहे. त्याच्याच योजनेनुसार असा ‘पण’ माझ्या

विवाहासाठी लावला गेला जो फक्त अर्जुनच जिंकू शकेल. माझ्या विवाहाबाबत कृष्णाने पुढाकार घेण्याचे एकमेव कारण म्हणजे माझ्या मनात असलेले कृष्णाचे श्रद्धास्थान व प्रेमस्थान आणि म्हणून मी त्याला दिलेले माझ्या जीवनातील अग्रस्थान. कृष्ण हा माझ्या जीवनातील एकमेव असा मार्गदर्शकही आहे. माझी कृष्णावरती नितांत श्रद्धा आहे आणि माझ्या हिताची सर्व काळजी कृष्णच वहात असतो. माझ्या जीवनातील निर्णय घेण्याचे सर्व हक्क मी फक्त कृष्णालाच दिले आहेत. तो हक्क माझ्या मातापित्यांनाच काय, पण मलाही नाही. कृष्णाचा या पांडवांवरती अत्यंत लोभ व प्रेमच आहे आणि तुमच्याविषयी तर त्याला अतिशय प्रेम व आदर आहे. त्यातूनही अर्जुन हा कृष्णाच्या अत्यंत प्रेमाचा व त्याचा जिवलग मित्र आहे. त्यांची मैत्री तुम्हीही जाणून असणारच. तुमच्या सर्वांचाही कृष्ण हा अत्यंत आवडता आहे हे मला ठाऊक आहे. कृष्णानेच तसे मला सांगितले. तेव्हा तुमच्या कुटुंबात व अर्जुनाच्या जीवनात माझा 'अर्जुनाची पत्नी म्हणून प्रवेश व्हावा' ही मूळ इच्छा कृष्णाचीच आहे. ती इच्छा मला तर प्रमाण आहेच, पण तुम्हालाही ती मान्य असेल याचीही मला पूर्ण खात्री आहे.

अहो कुंतीदेवी, कृष्णाने माझ्या मनात अर्जुनाची प्रतिमा आधीच भरलेली होती आणि प्रत्यक्ष स्वयंवराच्यावेळी पाहिलेला अर्जुनाचा पराक्रम व त्याचे व्यक्तिमत्त्व यामुळे तर माझे अर्जुनावरती पती म्हणून जे मन पूर्णपणे जडले गेले आहे, ते आता कायमचेच! त्यामध्ये जसा बदल होणे कधीही शक्य नाही त्याचप्रमाणे माझ्याठायी तशी भावना दुसऱ्या कोणा पुरूषाविषयी निर्माण होणेही शक्यच नाही. तसा मी विचारही करूच शकत नाही. आपण स्त्रिया तनमनाने केवळ एकाच पुरूषाला पती म्हणून वरतो, हे तुम्हीही जाणून आहातच. असे असताना मी अनेक पुरूषांशी विवाह करण्याचा प्रश्न येऊच कसा शकतो आणि तुम्हीही तसे सुचवू कसे शकता हे मला तरी कळतच नाही.




मला सर्वात नवल वाटते ते एकाच गोष्टीचे की एरवी पापपुण्याची व धर्म-अधर्माची भाषा करणारे तुमचे पुत्र व विशेषतः तुमचे ज्येष्ठ पुत्र यांना मी एकापेक्षा जास्त पुरूषांना पती म्हणून स्वीकारण्यात काहीच चुकीचे किंवा काही गैरही वाटत नाही. मला वाटते की धर्माचरणाकडे ते केवळ पुरूषांच्याच दृष्टीने पहातात. एवढेच नव्हे, तर आपण स्त्रियाही आपल्या कर्तव्यकर्मांकडे पुरूषांच्याच दृष्टीने पहातो आणि त्या पुरूषांना सदा संतुष्ट राखणे, यातच आपली इतिकर्तव्यताही समजत असतो. परंतु मी नक्कीच त्या स्त्रियांपैकी एक नाही. मला माझे स्वतंत्र अस्तित्व आहे आणि माझे स्वत्वही माझ्याठायी नित्य जागृत असते. तेव्हा तुम्ही मला क्षमा करा. तुमची अगतिकता मी समजू शकते आणि मला त्याविषयी पूर्ण सहानुभूतीही आहे. परंतु या बाबतीत तुम्हाला माझ्याकडून काही मदत मिळणे शक्यच होणार नाही. तुमच्या पुत्रांमध्ये ऐक्य राखण्याची एवढी मोठी किंमत मला झेपणारी नाही. खरे तर, त्यांचे ऐक्य त्यांनीच विवेकाने वागून राखले पाहिजे, ती जबाबदारी मुळात त्यांचीच आहे. त्याची आवश्यकता त्यांनाच जाणवायला हवी आणि त्यासाठी प्रयत्नही त्यांनीच करावयास हवेत. याबाबत त्यांनी कृष्णाचे मार्गदर्शन घेतले आणि त्याच्याशी विचारविनिमय केला तर ते अधिक योग्य ठरेल असे मला तरी अगदी मनापासून वाटते.”

द्रौपदीचे बोलणे ऐकून कुंती स्तब्धच राहिली. ती काहीच बोलली नाही असे म्हणण्यापेक्षा ती काही बोलूच शकली नाही असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. कारण द्रौपदीचे बोलणे कुंतीला अगदी मनापासून पटले होते. कुंतीला स्वतःलाही अशाच तऱ्हेच्या कठीण भावनिक प्रसंगातून जावे लागले होते. पंडूराजाशी विवाहबद्ध झालेली असतानाही त्याच्याच इच्छेनुसार, कुंतीला संतती प्राप्त करून घेण्यासाठी दैवी, पण परपुरूषांची मदत घ्यावी लागली होती. तिला प्राप्त झालेल्या वरानुसार तिने दैवी पुरूषांना आवाहन करून बोलावले होते आणि त्यांच्याशी घडलेल्या संबंधातूनच कुंतीला धर्म, भीम व अर्जुन या पुत्रांची प्राप्ती

झाली होती. कुंतीला तिच्या जीवनातील इतर दुसऱ्या कोणालाही माहित नसलेल्या या प्रसंगाची आठवण झाली. परंतु तिच्या अंतरात एवढी वर्षे तिने जपून ठेवलेले आणि तिला सलत असलेले गुह्य द्रौपदीला सांगण्याची हिंमत मात्र कुंतीला झाली नाही. द्रौपदीला ती एवढेच म्हणाली,

"द्रौपदी, तुझी ही स्वतंत्र विचारसरणी पाहून मला तुझे कौतुक नक्कीच वाटते. परंतु स्त्रीजीवनाच्या असलेल्या मर्यादा व त्यांच्यावर ईश्वरानेच निसर्गतःच सोपवलेली जबाबदारी याची जाणीव तुला तुझ्याच अनुभवाने पुढील आयुष्यात जशी जशी होत राहील, तसे तसे तुझे मन व विचार करण्याची दृष्टी अधिकाधिक व्यापक होत राहील हे मी तुला माझ्या स्वानुभवाने सांगते त्यावर तू विश्वास ठेव. परंतु तुझ्या जीवनात तू कृष्णाला अग्रस्थान देतेस आणि त्याच्यावरतीच तुझी श्रद्धा आहे हे ऐकून मात्र मला अतिशय समाधान झाले. आमच्याही कुटुंबात कृष्णाला विशेष स्थान आहे ही गोष्ट खरीच आहे. किंबहुना, ते स्थान कृष्णाने आमच्यावरील प्रेमाने व लोभाने स्वतःहूनच प्राप्त करून घेतले आहे असे म्हणणे हेच जास्त योग्य ठरेल. माझ्यासाठी तर कृष्ण हा माझा मोठा आधारस्तंभच आहे. त्याची महानता मी जाणून आहे आणि माझे सर्वच अंतर्बाह्य जीवनही कृष्णाला पूर्णपणे ठाऊक आहे. त्याच्यापासून कोणतीही गोष्ट मी कधीच लपवून ठेवत नाही. माझी व्यथा फक्त कृष्णच समजू शकतो आणि मला साहाय्यही केवळ तोच करू शकतो. याही प्रसंगातून कृष्णच निश्चित व योग्य मार्ग काढेल याची मला पूर्ण खात्री आहे. तूही कृष्णाशीच बोलून त्याला सर्व परिस्थिती समजावून सांगशील आणि त्याच्या सांगण्यानुसार काय तो निर्णय घेशील असाही विश्वास माझ्याठायी आहे. त्यामुळेच मला मुळीच काळजी नाही. धर्म-अधर्म व व्यक्तिगत भावना यांची योग्य ती सांगड घालण्याचे सामर्थ्य कृष्णाठायी आहे. तेव्हा मला असे वाटते की तू आता तुझ्या मातापित्यांची भेट घेऊन



त्यांनाही सर्व परिस्थिती समजावून सांग आणि मुख्य म्हणजे कृष्णाचे मार्गदर्शन घेऊन योग्य तो निर्णय घे.”

असे म्हणून कुंती आपल्या जागेवरून उठली आणि तिने प्रेमाने द्रौपदीच्या मस्तकावर थोपटले. द्रौपदीचा हात आपल्या हातात घेऊन तिच्यासह कुंती बाहेर आली. तिच्याकडे पहात असलेल्या तिच्या पुत्रांकडे पाहून कुंती मंदपणे हसली आणि म्हणाली,

“मी तुमच्या सर्वांशी बोलून तुमचे मन व मत जाणून घेतले आहे. तुम्हीही अत्यंत मोकळेपणाने बोलून तुमच्या मनातील भावना व्यक्त केल्या आहेत. मुळात एक गोष्ट खरी आहे, की द्रौपदीच्या स्वयंवराचा ‘पण’ हा अर्जुनाने व्यक्तिगतरित्या जिंकलेला आहे आणि म्हणून द्रौपदीनेही अर्जुनालाच मनापासून वरलेले आहे आणि त्याचा पती म्हणून स्वीकार केला आहे. आता उद्भवलेली समस्या ही नंतरची आहे. त्यावरती काय उपाययोजना करावयाची ते सर्व संमतीने ठरविणे आवश्यक आहे आणि तसेच ते झाले पाहिजे. परंतु एक गोष्ट मी निश्चितपणे सांगते की त्यासंबंधीचा अंतिम निर्णय हा अर्जुन व द्रौपदी यांचाच असेल. परस्परांशी विचारविनिमय करूनच त्यांनी तो निर्णय घ्यायचा आहे. कारण मुळात तो त्यांच्याच भावनेचा प्रश्न आहे. परंतु त्यासाठी योग्य तो वेळ जाऊ देणे आवश्यक आहे. घाईगडबडीने कोणताही निर्णय न घेता उभयतांनी शांत मनाने व स्थिरबुद्धीनेच काय तो निर्णय घेणे अधिक उचित आहे. त्यांना आवश्यक वाटल्यास त्यांनी त्यासंबंधी इतर कोणाशीही बोलणे करावे आणि ज्यांच्यावर त्यांची श्रद्धा असेल त्यांचे मार्गदर्शनही घ्यावे. यामध्ये द्रौपदीचे मातापिता यांच्याही भावना गुंतलेल्या आहेत, ही गोष्टही आपण लक्षात ठेवावयास हवी. तेव्हा अर्जुना, आता तू द्रौपदीला घेऊन तिच्या मातापित्यांकडे जाण्याचे कर आणि त्यांना सर्व परिस्थिती समजावून सांग. त्यांच्याशी बोलल्यानंतर मग द्रौपदी तिचा काय तो निर्णय घेण्यास मोकळी आहे. परंतु एक गोष्ट निश्चित आहे, की

कोणत्याही परिस्थितीत द्रौपदीच्या मनाविरूद्ध तिच्यावरती कोणताही निर्णय लादला जाणार नाही.”

कुंतीचे बोलणे संपले तरी त्याच्यावरती कोणीही बोलून काहीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. धर्मराजा मात्र अत्यंत गंभीर झालेला आहे हे त्याच्या चेहऱ्यावरून लगेचच लक्षात येत होते. इतर पांडवही माना खाली घालूनच बसून राहिले होते. अर्जुनाने द्रौपदीकडे हळूच एक नेत्रकटाक्ष टाकला तर द्रौपदी अर्जुनाकडेच पहात होती. तिच्या नजरेतील अपेक्षेचा भाव अर्जुनाच्या लगेचच लक्षात आला. परंतु काहीही न बोलता अर्जुन स्वस्थच राहिला. कुंतीने अर्जुनाकडे व द्रौपदीकडे बघून त्यांना नेत्राने खूण केली असता अर्जुन द्रौपदीसह तेथून बाहेर पडला. ते दोघेही तेथून गेल्यानंतर कुंतीने तिच्या पुत्रांकडे पुन्हा एकदा पाहिले आणि ती त्यांच्याशी बोलू लागली.

“बाळांनो, तुम्ही जरी काही बोलला नाहीत तरी तुमच्या मनातील नाराजी मला जाणवते आहे. विशेषतः धर्मराजा, तुझे गांभीर्य हेच अधिक बोलके आहे. तुझ्या मनातील एका विशिष्ट भूमिकेला एकदा का तू धरून बसलास, की मग त्या भूमिकेत तू सहजासहजी बदल करू शकत नाहीस. त्यातूनही स्वधर्माचरणाला प्राधान्य देण्याची तुझी भूमिका तू सोडणे कधीच शक्य नाही हे मी पूर्णपणे जाणून आहे. पण या बाबतीत द्रौपदीच्या स्वधर्माचरणालाही तेवढेच महत्त्व आहे, हेही आपण विसरता कामा नये. एक स्त्री म्हणून ती पाच पुरूषांशी कसा काय विवाह करणार हाही प्रश्न आहेच ना? तिच्यासाठी ते अधर्माचरण ठरणार नाही का? शिवाय द्रौपदीच्या भावनेचाही प्रश्न आहेच. तिच्या भावना डावलून तिच्या मनाविरूद्ध तिच्यावरती कोणत्याही निर्णयाची बळजबरी करणे सुद्धा अयोग्यच आहे आणि तोही एक प्रकारचा अधर्मच ठरेल. तेव्हा मला वाटते की आपणही कोणातरी सुयोग्य व्यक्तीचे मार्गदर्शन घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्या दृष्टीने माझ्या नजरेसमोर पहिले नाव कोणाचे येत असेल तर ते कृष्णाचेच होय. आपल्या कुटुंबाचा खरा हितचिंतक,

मार्गदर्शक व खऱ्या प्रेमाचा असा कृष्णच आहे, असा आपल्या सर्वांचाच आतापर्यंतचा नेहमीचाच अनुभव आहे. तेव्हा आपण कृष्णालाच आपली अडचण सांगावी, असे मला अगदी मनापासून वाटते. कृष्णच या नाजूक व कठीण अशा भावनिक प्रसंगातून आपल्याला मार्गदर्शन करून निश्चितपणे सुखरूप बाहेर काढील, याची मला पूर्ण खात्री आहे. धर्मराजा, यासंबंधी तुझा काय विचार आहे तो तूही अगदी मोकळेपणाने सांग बरे.”


कुंतीच्या बोलण्यावरती धर्मराजा बराच वेळ काही न बोलता जरी स्वस्थच राहिला तरी त्याच्या मनात विचारांचे चक्र चालूच असल्याचे त्याच्या चेहऱ्यावरून लगेचच लक्षात येत होते. परंतु कुंती मात्र त्याच्याकडे बोलण्याच्या अपेक्षेने एकटक पहात होती. शेवटी धर्मराजाचाही नाइलाजच झाला आणि त्याने त्याच्या धीरगंभीर आवाजात बोलावयास सुरूवात केली.

“हे माते, तुझे म्हणणे खरे आहे. मी माझ्या भूमिकेशी निष्ठ आहे, कारण निष्ठा हाच माझ्या जीवनाचा पाया आहे आणि त्या बळावरतीच मी माझे स्वधर्माचरण करीत असतो. तो पायाच जर ढासळला तर माझे जीवन कोसळायला जराही वेळ लागणार नाही. आम्ही सर्वांनी आणलेली भिक्षा आमच्यात वाटून घ्यावी असे उद्‌गार तू जरी सहजपणे म्हणाली असलीस, तरी मी त्यावरती ‘तुझ्या म्हणण्याप्रमाणेच होईल’ असे जे बोललो ते मात्र अत्यंत गंभीरपणेच म्हणालेलो होतो. कारण गंभीरता हा माझा स्वभाव आहे हे तूही जाणून आहेस. माझ्यासाठी मी तुला दिलेले ते वचनच आहे आणि वचननिष्ठता हा माझा धर्म आहे. तेव्हा तुला दिलेले वचन मी कोणत्याही परिस्थितीत पाळणारच, ही अगदी काळ्या दगडावरची रेघ आहे. त्यात कोणताही बदल होणार नाही. मग त्यासाठी मला प्राणार्पण करावे लागले तरी चालेल. मला त्याची पर्वा नाही.

माते, परंतु ही गोष्ट प्रत्यक्ष कशा पद्धतीने अमलात आणावी हा प्रश्न आहेच. कारण यामध्ये भावनिक अडचणीही आहेतच. भावनाच सामान्याला दुर्बल करतात आणि त्याला त्याच्या स्वधर्माचरणापासून

परावृत्त करतात. म्हणूनच भावनेच्या आहारी जाऊन आपण जर आपल्या स्वधर्मापासून दूर वहात गेलो, तर ते अयोग्यच ठरणार आहे. यासाठी एखाद्या जाणकार व्यक्तीचे मार्गदर्शन घेण्याची आवश्यकता आहे हे तुझे म्हणणे मलाही पटते. परंतु त्यासाठी कृष्ण ही ती योग्य व्यक्ती आहे असे मात्र मला खरेच वाटत नाही. कृष्णाचे आपल्या कुटुंबाशी अत्यंत घनिष्ठ संबंध आहेत ही गोष्ट खरी आहे. कृष्णाठायी आपल्या सर्वांविषयीच अत्यंत आपलेपणा आहे हेही मी जाणून आहे. कृष्णाठायी बुद्धीकौशल्य, वाक्चातुर्य व व्यवहारज्ञानही आहे. परंतु आताची परिस्थिती ही वेगळी व अधिक गुंतागुंतीची आहे. कारण या प्रसंगात धर्म-अधर्माचा मूलभूत प्रश्न निर्माण झालेला आहे. मुख्य म्हणजे, तू म्हणतेस त्याप्रमाणे द्रौपदीच्या स्वधर्माचरणाचाही महत्त्वाचा प्रश्न आता आलेला आहे. त्या दृष्टीने धर्मशास्त्राचा अभ्यासक असलेल्या आणि धर्म-अधर्माचा योग्य निवाडा करून सांगणाऱ्या अशा एखाद्या अधिकारी व्यक्तीचेच मार्गदर्शन आपण घ्यावयास हवे. त्यादृष्टीने विचार केला असता माझ्यासमोर एकच व्यक्ती येते आणि ती म्हणजे सर्वज्ञानी असलेले असे व्यास महर्षी. त्यांचा धर्मशास्त्रातील अधिकार महान तर आहेच आणि तो सर्वमान्यही आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्यास महर्षी हे नात्याने आमचे पितामह आहेत. त्यामुळे त्यांचे आपल्या कुटुंबातील स्थान हे साहजिकच अग्रगण्य आहे. त्यांच्याविषयी सर्वांनाच अतिशय आदरही आहे. म्हणूनच व्यास महर्षींचेच मार्गदर्शन घ्यावे असेच मी ठरवले आहे. तेच योग्य तो निवाडा व योग्य ते मार्गदर्शन करतील याची मला पूर्ण खात्री आहे.”

* * * * *



# महात्मा व्यास-धर्मराज संवाद


धर्माच्या बोलण्यात महर्षी व्यासांचा उल्लेख आल्यावरती कुंतीनेही संमतीदर्शक मान डोलावली. कारण व्यासांचा अधिकार कुंतीही जाणून होतीच आणि नाही म्हटले तरी त्यातच नातेसंबंधाचीही भर पडत होतीच. कुंतीची अनुमती घेऊन धर्म व्यासांच्या भेटीसाठी ताबडतोब निघालाही. व्यासांच्या आश्रमात पोहोचल्यावर धर्माने सर्वप्रथम व्यासांना अत्यंत आदरपूर्वक प्रणिपात केला. व्यासांनीही धर्माला आशीर्वाद देऊन त्याचे क्षेमकुशल चिंतिले आणि येण्याचे कारण विचारले. धर्मराजाने व्यासांना सर्व हकीकत थोडक्यात विशद करून सांगितली आणि तो नम्रतापूर्वक त्यांच्याशी बोलू लागला.

“अहो व्यास महर्षे, आपल्यासारख्या सर्वज्ञानी महात्म्यांना आमच्या प्रापंचिक अडचणी सांगणे म्हणजे आपल्याला वृथा कष्टविण्यासारखेच आहे हे मी जाणून आहे. कारण आपण स्वतः या संसारापासून पूर्णपणे विरक्त आहात. पण म्हणूनच आपण भावनेला बाजूला करून धर्म-अधर्माचा निवाडा योग्य प्रकारे करू शकता ही गोष्ट सत्य आहे. त्यासाठीच मी आपल्या चरणांशी आलेलो आहे. कुंतीमातेचे सहज वचनही आज्ञा मानून त्याचे पालन करावे अशी आम्हा सर्वच पांडवांची मनोधारणा आहे. कारण पुत्र या नात्याने तोच आमचा धर्म आहे. त्यादृष्टीने आम्ही सर्व बंधू द्रौपदीचा पत्नी म्हणून स्वीकार करायला तयार आहोत. अर्थातच द्रौपदीच्या संमतीनेच. परंतु आमच्या सर्वांच्या ठायी एक प्रश्न निर्माण होत आहे, की द्रौपदीला एक स्त्री म्हणून पाच पती असणे हे धर्मशास्त्राला धरून आहे की नाही? पुरूषांना बहुपत्नीत्वाचा अधिकार धर्मशास्त्राने दिलेला आहे. पण या बाबतीत स्त्रियांसाठी धर्मशास्त्राची काय आज्ञा आहे यासंबंधी आम्ही पूर्णतः अनभिज्ञ आहोत. तरीही आपण धर्मशास्त्रानुसार आम्हाला योग्य ते मार्गदर्शन करण्याची कृपा करावी.”

धर्मराजाचे बोलणे ऐकून व्यासांची मुद्रा अत्यंत गंभीर झाली आणि त्यांनी आपले नेत्र मिटून घेतले. बराच वेळ विचारमग्न अवस्थेत गेल्यावर व्यासांनी नेत्र उघडून धर्मराजाकडे एक दृष्टीक्षेप टाकला. त्यांच्या प्रेमळ नजरेत धर्मराजाविषयीचा आपलेपणा पूर्णपणे भरलेला होता. थोडावेळ व्यास धर्मराजाकडे तसेच पहात राहिले आणि मग त्यांच्या मुखातून एकेक शब्द हळूहळू बाहेर येऊ लागला.

"अरे धर्मराजा, तुझे कल्याण असो. धर्मशास्त्राला प्रमाणभूत मानून नेहमीच तसे आचरण करण्याचा तुझा निश्चय, हा निश्चितच स्तुत्य आहे. मला तुझ्याविषयी कौतुकच वाटते. परंतु एक गोष्ट लक्षात ठेव की धर्मशास्त्र हे मानवाच्या बाह्य आचरणाला मार्गदर्शन करण्यासाठी निर्माण झालेले आहे. मानवाची अधोगती टाळून त्याची उन्नती व्हावी हाच एकमेव हेतू धर्मशास्त्राच्या मागे आहे. या धर्माचरणामुळे आवश्यक असणारी देहशुद्धी निश्चितच होते. परंतु त्यामुळे मनाची शुद्धी मात्र होऊ शकत नाही, ही महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेव. मानवाची अधोगती म्हणजे त्याच्या मनाचीच अधोगती आणि मानवाची उन्नती म्हणजे त्याच्या मनाचीच उन्नती होय. मनाची शुद्धी नसताना केलेले धर्माचरण हा केवळ बाह्यांगाचा देखावाच ठरेल. धर्माचरणाला भावनेची जोड असेल आणि तीही केवळ स्वतःच्या मनातील भावनांची नव्हे तर दुसऱ्याविषयीच्या भावनांची, तरच त्या धर्माचरणाचे अपेक्षित फळ मिळेल; मन वासनारहित होऊन स्वच्छ व निर्मळ होईल आणि ईश्वरप्राप्तीच्या मार्गाने स्वतःची प्रगती साधत राहील. धर्माचरणाची परिणती आत्मधर्माची जागृती होण्यात व्हावयास हवी तरच त्या धर्माचरणाला अर्थ प्राप्त होईल. नाहीतर, केवळ बाह्यांगाचे धर्माचरण हे निरर्थकच ठरेल.

धर्मराजा, आणखीन एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेव, की धर्मशास्त्र हे मानवाच्या बाह्याचरणाचे नियम म्हणून केवळ मार्गदर्शक तत्वेच म्हणूनच आहेत. त्यात काठिण्य नसावे तर योग्य कारणासाठी, आवश्यकतेनुसार त्यामध्ये बदल करण्याची लवचिकता असावी. अर्थात




लवचिकता या नावाखाली कोणीही त्याचा गैरफायदा घेऊ नये, हे याठिकाणी अपेक्षित आहे. आता धर्मशास्त्राने पुरूषांसाठी बहुपत्नीत्वाची दिलेली परवानगी याच गोष्टीकडे पहा ना! काही अपवादात्मक परिस्थितीतच व योग्य कारणासाठीच धर्मशास्त्राने दिलेली ही परवानगी आहे. पण तसा नियम मात्र अजिबात नाही आणि परवानगी म्हणजे काही शास्त्राची आज्ञा नाही. पण कालमानानुसार अनेक पुरूष या सवलतीचा गैरफायदा घेऊ लागले आणि स्वतःच्या वासनापूर्तीसाठी व पुरूषी अहंकार जोपासण्यासाठीच धर्मशास्त्रातील या नियमाचा गैरवापर करू लागले. त्यांनी स्वतःच्या अधर्माचरणालाच धर्माचरणाचे नाव दिले खरे, परंतु नाव बदलल्याने भाव काही बदलत नाही. त्यांना त्यांच्या अधर्माच्या भावाचेच फळ मिळाले आणि त्यांची नैतिक अधोगती होऊन शेवटी त्यांचा ऱ्हासच झाला. तेव्हा बाह्य आचरणाने धर्मशास्त्राचे पालन करीत असताना त्यासाठी विवेक असणे अत्यंत आवश्यक आहे आणि विवेक हा शुद्ध मन व शुद्ध बुद्धी यांच्या संयोगातूनच जन्माला येत असतो ही गोष्ट पूर्णपणे लक्षात ठेवावयास हवी.

धर्मराजा, द्रौपदीच्या निमित्ताने ‘स्त्रियांना बहुपतीत्वाची परवानगी धर्मशास्त्राने दिली आहे की नाही’ ही गोष्ट तुला जाणून घ्यायची आहे. खरे म्हणशील तर धर्मशास्त्रामध्ये या गोष्टीचा उल्लेखच नाही. कारण असा प्रसंग आतापर्यंत निर्माणच झालेला नाही. आताही हा जो प्रसंग निर्माण झालेला आहे तो प्रथमच व अपवादात्मकही आहे आणि कोणतेही शास्त्र हे नियम सांगते, अपवाद सांगत नाही. अपवाद हे परस्थितीनुसार व आवश्यकतेनुसार होत असतात. असे अपवाद जर मुद्दामहून ठरवून व जाणूनबुजून केले तर हळूहळू तोच एक नियम होऊन राहील आणि मग त्या अपवादालाच शास्त्राधार प्राप्त झाल्यासारखे होईल. असे घडणे मात्र अत्यंत अयोग्यच होईल. कारण त्या अयोग्य अपवादांच्या निमित्ताने अधर्माला आधार व वाव मिळेल. एवढेच नव्हे, तर अधर्माला खतपाणी मिळून तो पोसला जाईल आणि फोफावेलही. तेव्हा धर्मशास्त्रामुळे

अधर्माला प्रोत्साहन मिळणार नाही याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

धर्मराजा, तत्त्वतः म्हणायचे झाले तर स्त्रियांच्या बहुपतीत्वाला धर्मशास्त्राची जशी परवानगी नाही तसा त्याला विरोधही नाही. त्यामुळे ते कृत्य अधर्मांचेच ठरू शकेल असेही नाही. ती गोष्ट कोणत्या कारणासाठी, कोणत्या परिस्थितीत व कोण करीत आहे यावरच सर्व काही अवलंबून राहील. केवळ वासनासुखापोटी किंवा स्वार्थासाठी किंवा भावनेच्या भरात असे कृत्य कोणी करीत असेल, तर ते गैरच नव्हे तर तो अधर्मच होईल. परंतु कोणी जर निःस्वार्थीपणे, सर्वांच्या हितासाठी आवश्यकच आहे म्हणूनच केवळ करीत असेल, तर मात्र त्या निर्णयाकडे व्यापक दृष्टीने पहाणे करावे लागेल. मग जरी तो निर्णय धर्मशास्त्राच्या चौकटीत बसत नसला तरी त्याला अधर्म असे मात्र म्हणता येणार नाही. कारण त्यामागील हेतू शुद्ध आहे आणि कृती ही केवळ अपवाद म्हणूनच केली जात आहे. परंतु या सर्वांची आधी खात्री करून घेणे हे अत्यंत आवश्यक आहे.

धर्मराजा, तुमच्या कुटुंबातील या प्रसंगातही निर्णय घेत असताना तुम्ही स्वधर्माचरणाला महत्त्व द्याच. परंतु तसे करीत असताना स्वधर्माचरण हा व्यक्तिगत प्रतिष्ठेचा प्रश्न करू नका. नाहीतर, स्वधर्माचरणाचाच अहंकार निर्माण होईल आणि बाह्यांगाचे स्वधर्माचरण हा केवळ ढोंगीपणा ठरेल. मुळात हा प्रसंग द्रौपदीच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा व भावनिक आहे ही गोष्ट लक्षात ठेवा. एखाद्या स्त्रीने एकापेक्षा जास्त पुरूषांचा पती म्हणून स्वीकार करणे ही गोष्ट जरी धर्मशास्त्राच्या विरूद्ध नसली तरी धर्मशास्त्राची ती आज्ञाही नाही. त्यामुळे तशी सक्तीही करता येणार नाही. हा द्रौपदीच्या भावनेचा व इच्छेचा प्रश्न आहे. तेव्हा त्याचा निर्णयही तिलाच घेऊ द्या आणि तिच्या निर्णयाचाच सर्वांनी मोकळेपणाने स्वीकार करा. मुख्य म्हणजे प्रसंगात व प्रसंगानंतरही कुटुंबातील एकोपा कायम ठेवा आणि कुंतीचा आदर व मान



राखून तिला तोष देत रहा. तिने तुमच्यासाठी घेतलेल्या कष्टांची जाणीव ठेवा आणि तिच्या मनाला कोणत्याही प्रकारे क्लेश होणार नाहीत याची काळजी घ्या.”

अशा तऱ्हेने व्यासांनी धर्मराजाशी सविस्तर व सर्व अंगांनी बोलणे केले आणि त्या निमित्ताने त्यांच्याकडून धर्मशास्त्राचे पालन करण्यामागील हेतू व कारण याचे रहस्यही प्रगट झाले. मुळात धर्मशास्त्र हे मानवाची अधोगती टाळून त्याला त्याच्या उन्नतीचा मार्ग दाखवण्याच्या हेतूनेच प्रगट झाले. परंतु अज्ञानाने किंवा काही वेळा अहंकारानेही सामान्य जन त्या शास्त्राच्या नियमाच्या चौकटीत स्वतः अडकून बसले आणि त्यांनी इतरांनाही त्यात बळेबळे अडकवले. धर्मशास्त्राचा अज्ञानाने किंवा जाणूनबुजून चुकीचा अर्थ लावून किंवा वेळप्रसंगी स्वतःच्या सोयीनुसार धर्मशास्त्राचे नियम वाकवूनही त्यांनी केवळ स्वतःचाच हेतू साध्य केला ही गोष्ट खरीच आहे. स्वतःचा स्वार्थ व वासनापूर्ती साध्य करण्यासाठी धर्मशास्त्र हे अशा लोकांच्या हातातील एक शस्त्रच ठरले. असो. लक्ष्मी, हा विषय पुढेही कारणाकारणाने येत रहाणारच आहे आणि तेव्हा त्याविषयी अधिक बोलणे घडणारच आहे. कारण धर्मशास्त्र हे धर्माचा आधार न रहाता जेव्हा ते अधर्मीयांची सोय ठरू लागते, तेव्हा सत्यधर्मरक्षणासाठी त्या धर्मशास्त्राचे शुद्धीकरण करण्याची आवश्यकता निर्माण होत असते. ते धर्मकार्य, ज्यांचे अंतःकरण विशुद्ध आहे अशा महात्म्यांच्याकडूनच घडू शकते. कारण त्यांच्या अंतरात संवेदना, भावना व आत्मबळ यांचा सुंदर व सुयोग्य संगम असतो.”

* * *

नारद बोलता बोलता थोडासा अंतर्मुख झाल्यासारखा दिसत होता. कारण त्याचे बोलणे एकदम निरपेक्षतेने होऊ लागले होते. नारदाच्या बोलण्याचा सूरही बदलला आहे आणि थोडासा अधिक तीव्र झाला आहे हे लक्ष्मीच्याही लक्षात आलेच. खरे तर, आधीचा कथाप्रसंग ऐकत असतानाही लक्ष्मीला अस्वस्थता जाणवतच होती. तिच्या मनात तिला

थोडेसे घुसमटल्यासारखेच वाटत होते. द्रौपदीच्या निमित्ताने प्रगट होत असलेला विषय लक्ष्मीच्या मनाला मानवतच नव्हता आणि रूचत तर नव्हताच नव्हता. तरीही ती श्रद्धापूर्वक सर्व ऐकत होती खरी, पण त्यामुळे तिच्या मनावरील ताणही वाढलेला होता. त्यातच जेव्हा नारद धर्मशास्त्राची चौकट, त्याच्या मर्यादा, त्याचा होत असणारा दुरूपयोग याविषयी थोड्याशा पोटतिडिकीनेच बोलू लागला, तेव्हा मात्र लक्ष्मीला स्वस्थ बसणे शक्यच झाले नाही. अगदी न राहवून तिने बोलावयास सुरुवात केलीच.

“अरे नारदा, एकंदरीत जे काही घडत आहे आणि जे काही तू सांगत आहेस, ते माझ्या तरी सहनशक्तीच्या पलिकडचेच आहे. एखाद्या गोष्टीचा एवढा घोळ का होत आहे हे मला तरी समजत नाही. मला तर असाच संशय येत आहे की हा घोळ जाणूनबुजूनच घातला असावा. येथे केवळ द्रौपदीच्या भावनेचाच प्रश्न मुख्य असताना धर्म-अधर्म, स्वधर्माचरण व योग्यायोग्य यांच्याविषयी नाहकच कोरडी चर्चा केली जात होती. द्रौपदीच्या स्त्रीत्वाविषयी कोणालाच आदरही दिसत नव्हता. तिच्या स्वत्वाविषयी तर कोणालाच पर्वाही नव्हती. द्रौपदीकडे माणूस म्हणून तरी कोणी पहात होते की नाही, याची मला तर शंकाच येते. द्रौपदीविषयीची साधी सहानुभूतीही कोणाच्या ठिकाणी नव्हती असेच मला तरी वाटते.

नारदा, परंतु मला राहून राहून एकाच गोष्टीचे नवल वाटते की व्यासांनीही धर्मराजाशी धर्मशास्त्रासंबंधी नुसते तात्त्विकच बोलणे केले. तत्त्व म्हणून जरी त्यांचे सर्व सांगणे योग्य असले तरी त्यांनी धर्मराजाला निश्चित असे काहीच मार्गदर्शन केले नाही. अर्थात ‘द्रौपदीच्याही भावनेचा विचार करावा’ असे त्यांनी सांगितले ही गोष्ट खरी आहे. पण त्याहीपेक्षा व्यासांनी जर वडिलकीच्या नात्याने धर्मराजाला अगदी निःसंदिग्धपणे सांगितले असते की ‘द्रौपदीने सर्व पांडवांशी विवाह करण्याचा प्रस्ताव मुळातच चुकीचा आहे आणि तो द्रौपदीवरही अन्याय करणाराच आहे’ तर ते अधिक योग्य ठरले असते. म्हणजे सर्व प्रश्न

तेथल्या तेथेच संपला असता. पण व्यासांनीही स्वतःचा असा निर्णय न सांगता, धर्मराजाला केवळ धर्मशास्त्राची माहितीच पुरवली आणि तो निर्णय पांडवांवरतीच सोपवला. म्हणजे पुन्हा संदिग्धतेला वाव राहिलाच आणि त्यामुळे स्वतःच्या मनातील सुप्त इच्छा पूर्ण करण्यासाठी कोणाला तरी संधीही शिल्लक राहिलीच. एवढेच नव्हे, तर धर्म-अधर्म व भावना यांचा मुळातील मुद्दा व गुंताही तसाच कायम राहिला तो राहिलाच. हे सर्व माझ्या तरी आकलनशक्तीच्या पलिकडचेच आहे आणि त्याचाच ताणही माझ्या मनावरती निर्माण झालेला आहे. तेव्हा नारदा, मला केवळ तत्त्व म्हणून धर्म न सांगता, प्रत्यक्ष जो आचरणाचा धर्म आहे तोच नीट समजावून सांग. तरच माझे मन मोकळे होईल आणि पुढील श्रवणासाठी पुन्हा सादर होईल.”

लक्ष्मीच्या बोलण्यातील आर्तता नारदाच्या अंतःकरणालाही स्पर्श करती झाली आणि त्याचेही अंतःकरण द्रवले असे म्हणावे, तर ते आधीपासूनच सतत स्त्रवतच होते. तरीही नारदाचे अंतःकरण कळवळलेच. परंतु नारदाठायीचा तो कळवळा केवळ लक्ष्मीसाठी नव्हता किंवा द्रौपदीसाठीही नव्हता. तर धर्मशास्त्रावर बोट ठेवून वागवल्या जाणाऱ्या असंख्य दुर्बल व असहाय जीवांच्या दबल्या गेलेल्या भावनांसाठीही तो कळवळा होता. धर्मशास्त्राच्या चौकटीत जन्मभर अडकून पडल्यामुळे घुसमट अनुभवत असलेल्या सर्वसामान्य जीवांसाठीच नारदाचे अंतःकरण कळवळत होते. त्याच कळवळ्यापोटी नारदाने लक्ष्मीशी बोलण्यास सुरूवात केली.

“हे लक्ष्मी, तुझ्या मनाची होणारी तळमळ मी स्वानुभवाने निश्चितच समजू शकतो. परंतु, काहीवेळा परिस्थितीपुढे कोणाचा इलाजच चालू शकत नाही. सर्वसामान्य जीव तर परिस्थितीला शरणच जातात आणि परिस्थितीची मात स्वतःवर ओढवून घेतात. परिस्थितीतून मार्ग काढण्याचे धैर्य व कौशल्यच आधी कोणाकडे नसते आणि एखादे वेळेस जरी असा मार्ग कोणी दाखवला तरी त्या मार्गाने जाण्याची हिंमत होणे

आवश्यक असतेच. त्यातही सामान्य जीव हे कमीच पडत असतात. हे तर स्वतःच्या बाबतीत झाले. मग दुसऱ्या जीवांना मदत करून त्यांना कठीण परिस्थितीतून बाहेर काढण्याचा तर प्रश्नच निर्माण होत नाही. एकतर दुसऱ्याची असहाय्य परिस्थिती आधी कोणाला दिसतही नाही किंवा क्वचित जाणवली तरी सामान्यजन त्याकडे दुर्लक्षच करतात. कारण प्रत्येक जण हा स्वतःमध्येच अडकलेला असतो आणि स्वतःच्या दुःखामध्येच चूर असतो. बरेचदा बाह्य परिस्थितीला मनःस्थितीच कारणीभूत असते आणि म्हणून परिस्थितीत सुधारणा होण्यासाठी मनःस्थितीवरच इलाज करण्याची आवश्यकता असते. अर्थात तीच गोष्ट अत्यंत कठीण आहे. कारण त्या मनाला सांगणार कोण आणि ते मन ऐकणार कोणाचे, हाच मुख्य व मूलभूत प्रश्न आहे. प्रत्येकजण स्वतःच्या मनासारखेच करण्याचा प्रयत्न करीत असतो आणि दुसऱ्यांनीही आपल्या मनासारखे वागावे म्हणून त्यांच्यावर दडपण आणण्याचाही प्रयत्न करीत असतोच. त्यासाठी मग नात्याच्या मोठेपणाचा किंवा प्रचलित धर्माच्या चौकटीचा स्वतःच्या सोयीसाठी व स्वार्थासाठी वापर करून घेतला जातो. हे दडपण बाजूला करण्यासाठी किंवा वेळप्रसंगी झुगारूनही देण्यासाठी केवढे तरी धैर्यबळच दाखवावे लागते आणि त्यासाठी आधी त्याच्या मुळाशी आत्मबळच असावे लागते. ते आत्मबळ कसे प्राप्त करून घ्यावे हाच तर कळीचा मुद्दा आहे.

हे लक्ष्मी, परिस्थितीत सापडल्यामुळे द्रौपदीची परवड होत होती, ही गोष्ट खरी आहे. पण त्या परिस्थितीला कुंती, धर्मराजा व अर्जुन यांचीच मनःस्थिती कारणीभूत होत होती हे तर उघडच आहे. पण त्या तिघांच्या मनःस्थितीमागील कारणे मात्र वेगवेगळी होती हे तुझ्या लक्षात आले का? कुंतीच्या ठिकाणी तिच्या पाचही पुत्रांचे ऐक्य ही सर्वात मुख्य गोष्ट होती. केवळ अर्जुनाची पत्नी म्हणून जर द्रौपदी पांडवांच्या कुटुंबात आली असती तर त्यांच्या ऐक्याला निश्चितच तडा गेला असता हे कुंतीच्या तेव्हा लगेचच लक्षात आले, जेव्हा तिने तिच्या सर्व पुत्रांची मने जाणून


घेतली. त्यासाठी मग कुंती, द्रौपदीचे साहाय्य घेऊ पहात होती. साहजिकच द्रौपदीच्या भावनांना कुंती नकळत का होईना, पण दुय्यमच महत्त्व देत होती. किंबहुना कुंती तर द्रौपदीकडून तिच्या भावना बाजूलाच ठेवण्याची अपेक्षा करीत होती आणि कुंतीच्या दृष्टीने एक स्त्री म्हटली की स्वत्व वगैरे प्रश्नच निर्माण होत नव्हता. पुरूषांच्या इच्छेप्रमाणे वागून 'सर्व कुटुंबाचे ऐक्य राखण्याची जबाबदारी केवळ कुटुंबातल्या स्त्रीवरतीच आहे' अशी कुंतीची ठाम धारणा होती. तेच ती द्रौपदीला विनंतीपूर्वक सांगत होती आणि तिची द्रौपदीकडूनही तीच अपेक्षा होती.

हे लक्ष्मी, खरी डळमळीत मनःस्थिती धर्मराजाची झाली होती ही गोष्ट मात्र खरीच आहे. द्रौपदीचे आकर्षक व्यक्तिमत्त्व व आगळेवेगळे सौंदर्य पाहून धर्माचे मन लागलीच द्रौपदीवरती जडले होते आणि त्याचीच परिणती म्हणजे तिच्या प्राप्तीची तीव्र इच्छा, म्हणजे खरे तर सुप्त वासनाच धर्मराजाच्या मनातही लगेचच निर्माण झाली होती. धर्मराजाने अर्थात बाह्यांगाने तसे दाखवले नाही. कारण संयम व सभ्यता हे सज्जनत्वाचे गुण त्याच्याठायी होते. परंतु द्रौपदीविषयीची ही आंतरिक सुप्त इच्छाच जणू धर्मराजाच्या मुखातून प्रगट झाली. तो निर्हेतुकपणे म्हणाला की हेतूपुरस्सर म्हणाला हे कळावयास खरे तर काहीच मार्ग नाही. परंतु, 'हे माते, आम्ही आज एक आगळी वेगळी भिक्षा आणली आहे' असे उद्‌गार धर्मराजाकडून बाहेर पडले. धर्मराजाने गंमत केली किंवा सहज विनोद केला असे म्हणावे तर धर्मराजाचा तसा स्वभाव मुळातच नव्हता. त्याचा स्वभाव गंभीरच होता. त्यामुळे ती गंमत नव्हती ही गोष्ट लपून राहू शकली नाही. कारण 'आणलेली भिक्षा तुम्ही सर्वांनी आपापसात वाटून घ्या' हे कुंतीनेही केलेले सहज विधान धर्मराजाने सोयीस्करपणे अत्यंत गंभीरतेने घेतले आणि तो मुद्दामहून त्यालाच धरून बसला. ती जर निव्वळ गंमत असती तर खरी वस्तुस्थिती कळल्यानंतर ती गंमत तेथेच संपावयास हवी होती. परंतु धर्मराजा कुंतीच्या सहज

विधानालाही ‘मातेची आज्ञा’ असे म्हणून व मानून मातृआज्ञेचे पालन करण्याचा हट्टच धरून बसला.

हे लक्ष्मी, एखादे वेळेस तुला धर्मराजाचा रागही येण्याची शक्यता आहे. परंतु मला त्याची दयाच जास्त येते. कारण त्या प्रसंगाच्या निमित्ताने धर्मराजाच्या मनाची कमजोरीच प्रगट झाली होती. केवळ बाह्य धर्माचरणाने मनाची शुद्धता होत नाही आणि मनातील वासनेचे मूळही नाहीसे होत नाही ही गोष्ट खरीच आहे. नेमका हाच दोष सज्जनांच्या सज्जनत्वामध्ये आहे. त्यांचे बाह्य आचरण एवढे योग्य व व्यवस्थित असते की त्यामध्ये नाव ठेवायला काहीच जागा दाखवता येत नाही. परंतु त्यांचे मन निर्मळ व निर्दोष नसल्यामुळे त्यांच्याठायीच्या सुप्त वासना, काहीतरी बाह्य कारणाच्या निमित्ताने जाग्या होऊन चाळवल्या जातात आणि मग त्यांच्या मनाचे चाळे सुरू होतात. अशावेळी त्या मनाचा तोल राखणे कठीण होऊन बसते आणि त्यांच्याच मनाला क्लेशही होऊ लागतात. परंतु मन दुर्बल असल्यामुळे त्या क्लेशांवर काहीच इलाज चालू शकत नाही. मनाचे क्लेश सहन करीत रहाणे हाच एकमेव उपाय शिल्लक रहातो. परंतु अशा सज्जनांचा जर विवेक शाबूत असेल तर तो मात्र त्यांना अयोग्य कृती करण्यापासून परावृत्त करीत रहातो. त्यामुळे त्या सज्जनांकडून प्रत्यक्ष दुष्कृत्य असे काही घडत नाही. तरीही धर्मशास्त्राचा आधार घेऊन स्वतःच्या वासनांची पूर्ती करण्याचा त्यांचा प्रयत्न चालू असतो. त्यांची ही मानसिक अधोगती इतरांच्या लक्षात येऊ शकत नाही. परंतु ते स्वतः मात्र जाणून असतात आणि तरीही स्वतःचा नाइलाज झाल्यामुळे ते स्वस्थच बसतात.

हे लक्ष्मी, परंतु जेव्हा मनाच्या दोषाला स्वभावाच्या अहंकाराची जोड मिळते, तेव्हा मात्र गोष्टी फारच कठीण होऊन बसतात. कारण त्या दोषांचा त्रास इतरांनाही होऊ लागतो. पण सज्जनत्वाचाही अहंकार असल्यामुळे इतरांचा त्रास एकतर त्यांच्या लक्षातच येत नाही किंवा लक्षात आला, तरी त्यांना त्याची पर्वा असत नाही. स्वतःच्या दुष्कृत्यांना



धर्मशास्त्राच्या चौकटीत बसवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो आणि शास्त्राच्या शाब्दिक ज्ञानामुळे त्यांना ते बऱ्याच वेळा शक्यही होते. परंतु दुसऱ्याच्या भावना जाणूनबुजून दुखवून त्यांच्या मनाला क्लेश देणे हेही पापाचरणच आहे या गोष्टीचा मात्र स्वतःला सज्जन समजणाऱ्यांना व तसे म्हणवून घेणाऱ्यांना पूर्ण विसर पडतो. ही मनाची अधोगती टाळणे त्यांना स्वतःला शक्य होत नाही आणि त्यासाठी कोणा अधिकारी सत्पुरूषांना शरण जाऊन त्यांचे मार्गदर्शन घेणेही त्यांना जमत नाही. कारण स्वतःच्या सज्जनत्वाचा अहंकारच त्यांच्या आड येत असतो. अशा धर्मराजासारख्या सज्जनांची पुढे जीवनात एक प्रकारची शोकांतिकाच होते आणि त्यांची अवस्था दयनीयच होऊऩ रहाते. पण त्यात दुसऱ्या कुणाचाच दोष नसतो, तर त्याला त्यांचे तेच जबाबदार असतात. म्हणूनच आपणाला तरी त्यांचा राग न येता फक्त त्यांची दयाच यावी.


हे लक्ष्मी, अर्जुनाची मनःस्थिती अर्थातच या सर्वाहून वेगळीच होती. त्याचा परममित्र असलेल्या कृष्णाच्या प्रेरणेनुसार त्याने स्वतः द्रौपदीच्या स्वयंवराचा ‘पण’ जिंकलेला होता. त्यामुळे त्याचा व द्रौपदीचा विवाह व्हावा ही इच्छा मुळात कृष्णाचीच आहे, ही गोष्ट अर्जुनाच्या निश्चितच लक्षात आलेली होती. पण धर्मराजाने घेतलेल्या भूमिकेमुळे अर्जुनही आधी चकित व नंतर नाराजच झालेला होता. फक्त त्याच्या स्वभावानुसार त्याची नाराजी व्यक्त न करता तो स्वस्थच राहिला. त्याचेही मन द्रौपदीवरती लगेचच जडले होते आणि तिला होणाऱ्या मानसिक त्रासाची कल्पनाही अर्जुनाला निश्चितच होती. पण त्याची अडचण एकच होती की तो उघडपणे द्रौपदीच्या बाजूने बोलू शकत नव्हता. अर्जुनाच्याठायी द्रौपदीच्या भावनेपेक्षा त्याच्या कर्तव्यकर्माला प्राधान्य होते. मातेचे वचन, ज्येष्ठ बंधूची इच्छा आणि भावाभावांमधील ऐक्य या गोष्टींना अर्जुनाच्या दृष्टीने अधिक महत्त्व होते. थोडक्यात काय, तर कुंतीसाठी तिच्या पुत्रांमधील ऐक्य महत्त्वाचे होते, तर धर्मराजासाठी त्याच्या मातेचे वचन महत्त्वाचे होते आणि अर्जुनासाठी

त्याच्या ज्येष्ठ बंधूची इच्छा महत्त्वाची होती. इतर पांडवांसाठीही मातेची इच्छा प्रमाण होती आणि त्यांना त्यांच्या ज्येष्ठ बंधूला अनुसरणे आवश्यकच होते. त्याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे, जर विनासायास द्रौपदीची प्राप्ती झाली असती, तर ती मनातून त्यांनाही हवी होतीच.”

नारद थोडावेळ बोलायचा थांबला आणि लक्ष्मीकडे पहात राहिला. त्याने सांगितलेला विषय लक्ष्मीच्या लक्षात आला की नाही हे त्याला जाणून घ्यायचे होते. नारदाच्या पहाण्यातील हा हेतू लक्ष्मीच्याही लक्षात आलाच. त्यामुळे तिनेही लागलीच बोलावयास सुरुवात केली.

“नारदा, तुझ्या सांगण्यातील मुख्य मुद्दा मला निश्चितच समजला आहे. कुंती, धर्मराज, अर्जुन वगैरे अगदी प्रत्येकजण बाह्यांगाने त्यांच्या त्यांच्या कर्तव्यकर्माच्या समजुतीच्या चौकटीत अडकलेले होते आणि मनातूनही स्वतःच्याच भावनेमध्ये गुंतून राहिलेले होते. त्यातून बाहेर येण्याचे धैर्यही त्यांच्यापाशी नव्हते आणि मुळात त्यांना त्याची आवश्यकताच जाणवत नव्हती, हेच खरे आहे. कारण प्रत्येकजण केवळ स्वतःच्याच भावनेला प्राधान्य देत होता आणि दुसऱ्याच्या म्हणजे मुख्य द्रौपदीच्या भावनेला त्यांच्या दृष्टीने किंमतच नव्हती किंवा अस्तित्वच नव्हते. त्यातूनही कुंतीची भूमिका मी थोडी तरी समजू शकते. तिच्या पुत्रांचे ऐक्य हे कुंतीच्यासाठी सर्वात महत्त्वाचे असणे तर बरोबर व साहजिकच आहे. द्रौपदीची भावना मात्र कुंती नक्कीच समजून आहे. पण तरीही ती द्रौपदीने तिच्या पाचही पुत्रांचा पती म्हणून स्वीकार करावा, अशीच विनंती करीत आहे. त्यामागील कुंतीची असहाय्यता व अगतिकता जाणवून मलाही अत्यंत वाईटच वाटते.

नारदा, तुझ्या म्हणण्याप्रमाणे सर्वांचीच अगतिकता जाणवून आपल्याला कोणाचाही राग न येता दयाच यावयास हवी. परंतु धर्मराजाची दया येणे मात्र मला जरा कठीणच होत आहे. त्याचा राग न यावा म्हणूनही मला जरा प्रयत्नच करावे लागतील. कारण धर्मराजाकडून जास्त जबाबदारीने वागण्याची अपेक्षा करणे चुकीचे आहे, असे मला तरी




वाटत नाही. ज्येष्ठ बंधूचे नाते केवळ सांगण्यासाठी किंवा दाखवण्यासाठी नसून त्या नात्याप्रमाणे वागणे आवश्यक आहे ना? त्यासाठी वेळप्रसंगी इतरांच्या सुखासाठी स्वतःच्या सुखाचाही त्याग घडला पाहिजे. तरच ते ज्येष्ठत्व शोभून दिसेल. नाही तर, ते नात्याचे ज्येष्ठत्व नुसते मिरवण्यात काय अर्थ आहे बरे? ते तर केवळ स्वतः ओझे बाळगून दुसऱ्यालाही भारभूत होण्यासारखे आहे. धर्मराजाच्या बाबतीत तर मला उलटाच प्रकार पहावयास मिळाला. द्रौपदीच्या प्राप्तीची त्याची इच्छा येनकेन प्रकारे पूर्ण करण्याचाच त्याचा प्रयत्न आहे. त्यासाठी मग मातृवचन, वचनभंगाचे पाप, धर्मशास्त्राचा आधार इत्यादी गोष्टींचे साहाय्य तो स्वतःच्या सोयीनुसार घेत आहे, ही गोष्ट तर लपून रहातच नाही. अर्थात हे सर्व तो बाह्यांगाने सभ्यतेने करीत आहे एवढेच! आता याचेच कौतुक करायचे असेल तर माझे काहीच म्हणणे नाही. पण मला ती गोष्ट मानवत नाही हेही खरे आहे.

नारदा, तो धर्मराजाही व्यासांच्या भेटीला गेला तो एकटाच गेला. खरे तर, त्यांनी सर्वांनी मिळून, अगदी द्रौपदीलाही बरोबर घेऊन व्यासांची भेट घेतली असती तर ते योग्य ठरले नसते का? व्यासांनी सर्वांशी बोलून लगेचच निवाडाही केला असता. पण धर्मराजाला तशी आवश्यकताच जाणवली नाही. यातच खरे काय ते स्पष्ट दिसते. बरे व्यासांनाही प्रश्न विचारताना धर्मराजाचा भर केवळ ‘ द्रौपदीने आम्हा पाचजणांशी विवाह करणे धर्मशास्त्राला धरून नसले तरी विरूद्ध नाही ना?’ या मुद्द्यावरच होता. ‘तसा विवाह द्रौपदीने करणे योग्य नाहीच आणि माझ्याकडून मातृवचन पालन करणे घडले नाही तर मला काय दोष लागेल आणि त्याच्या परिमार्जनासाठी काय करावे लागेल’ हे जाणून घेण्यासाठी, तशी साधी विचारणाही धर्मराजाकडून घडलीच नाही. त्यातूनही व्यासांशी झालेल्या बोलण्यातून धर्मराजाला नक्की काय समजले आणि त्यातील नेमके काय तो कुंतीला जाऊन सांगणार आहे हाही एक प्रश्नच आहे.

स्वतःच्या सोयीचे व सोयीपुरतेच तो सांगणार हे तर उघडच आहे. मला तरी त्याची पूर्ण खात्री आहे.

नारदा, अर्जुनाविषयी मलाही अनुकंपा जरूर वाटते. परंतु त्याच्याकडून काहीतरी निश्चित भूमिका घेण्याची अपेक्षा करणे चुकीचे आहे, असे मला तरी वाटत नाही. शेवटी बोलून चालून अर्जुन हा एक पुरूष आहे. द्रौपदीने त्यालाच वरलेले आहे, ही गोष्ट अगदी स्पष्ट असताना अर्जुनाने द्रौपदीच्या केवळ पाठीशीच नव्हे तर तिच्या साथीनेच उभे रहायला हवे होते. कारण द्रौपदीने अर्जुनाचा भरवसा धरायचा नाही तर दुसऱ्या कोणाचा धरायचा? बरे, अर्जुनाला ही गोष्ट कळत नव्हती असे नाही. परंतु तो केवळ स्वस्थच राहिला असे नाही, तर त्याचा कल कुटुंबाला प्राधान्य देण्याकडेच होता. द्रौपदी अजूनही अर्जुनाची पत्नी झाली नव्हती ही गोष्ट जरी खरी असली, तरी त्याने द्रौपदीकडे एवढ्या परकेपणाने बघणे योग्यच नव्हते. मला एका गोष्टीचे मात्र राहून राहून जेवढे नवल वाटते त्यापेक्षा जास्त वाईट वाटते की अर्जुनाचा परममित्र असलेल्या कृष्णाशी बोलून त्याचे मार्गदर्शन घ्यावे, असा विचारही अर्जुनाच्या मनात कसा आला नाही? अर्जुन एवढा दिग्मूढ व असहाय्यच झाला होता की काय? पण त्याची परिणती द्रौपदीला अत्यंत मानसिक त्रास होण्यात होत होती एवढे तरी अर्जुनाच्या लक्षात यायला नको होते का? का अर्जुनाठायी एवढीही संवेदनक्षमता राहिली नव्हती? मला तरी या सर्वांचा काहीच अर्थ लागू शकत नाही. मुख्य म्हणजे कृष्ण का स्वस्थ राहिला होता? त्याची काही भूमिका होती की नाही? तसे म्हटले तर कृष्णाचीही जबाबदारी होतीच ना?

हे नारदा, व्यासांच्या भूमिकेविषयी कोणतीही शंका घेणे हे तर अयोग्यच आहे. माझा काय कोणाचाच तो अधिकार नाही. परंतु त्यांनीच जर थोडीशी अधिक निश्चयात्मक व निर्णायक भूमिका घेतली असती तर तो परिस्थितीचा व भावनेचाही गुंता लागलीच सुटला असता. व्यासांनी जर वडिलकीच्या नात्याच्या हक्काने धर्मराजाशी स्पष्टच बोलणे केले




असते आणि द्रौपदीसह सर्व पांडवांनाच बोलावून घेऊन त्यांना धर्मशास्त्रापेक्षा द्रौपदीच्या भावनेला आणि मुख्य म्हणजे नैतिक आचरणालाच प्राधान्य द्यावयास सांगितले असते, तर मग कोणाच्याही मनात काहीच प्रश्न उरला नसता. अर्जुन व द्रौपदी यांचा विवाहही मग अत्यंत सुरळीतपणे पार पडला असता आणि सर्वांनाच सौख्याचा लाभ निश्चितच झाला असता असे मला तरी अगदी मनापासून वाटते. अर्थात याविषयी तूच अधिक समर्थपणे बोलू शकशील. कारण केवळ तुझाच तो अधिकार आहे हे मी पूर्णपणे जाणून आहे.”

***

लक्ष्मीचे बोलणे नारद अत्यंत लक्षपूर्वक ऐकत होता. तिच्या मनाची होणारी बेचैनी नारदाच्या लक्षात येत होती खरी, परंतु त्याचाही नाइलाजच होत होता. तोच तोच विषय पुन्हा पुन्हा बोलूनही लक्ष्मीच्या मनाचे समाधान होत नव्हते ते नव्हतेच आणि ते तसे होणे कधीही शक्यच नव्हते. कारण कोणी कसे वागावयास हवे होते आणि कोणाची भूमिका काय असावयास हवी होती या विषयी नंतर कितीही बोलले तरी ते कमीच असते. ते बोलणे कधीही न संपणारे आणि त्यामुळे नेहमी अपूर्णच रहात असते. शेवटी असे असे घडले खरे आणि ही वस्तुस्थिती आहे, एवढेच सांगणे शिल्लक रहाते. केवळ बोलण्याने बोलणे वाढत रहाते आणि वस्तुस्थिती मात्र न बदलता तशीच रहाते हेच खरे. पण त्यामुळे कथेचा प्रवाह अडून रहात होता ही वस्तुस्थिती मात्र खरी होती आणि नारदाच्यासाठी तीच मुख्य अडचण होत होती. परंतु नारदाला लक्ष्मीच्या मनःस्थितीकडे दुर्लक्ष करणेही शक्य होत नव्हते. कारण लक्ष्मीला पुढील श्रवणासाठी तयार करणे हेही नारदाच्या दृष्टीने तेवढेच आवश्यक होते. लक्ष्मी श्रवण करण्याच्या मनःस्थितीत नसतानाही नारदाकडून त्याच्या आंतरिक अवस्थेनुसार सगुण चरित्रकथा प्रगट होत राहिली असती, पण ती कथा रंगली नसती हे नारद जाणून होता. वक्ता व श्रोता यांच्या मनोमीलनातून व जुळलेल्या प्रेमसुरातूनच सगुण प्रेमभक्तिचे माहात्म्य

भक्तिगायनाद्वारे साकार होऊ शकते हे रहस्य नारदाला स्वानुभवाने माहित होते. म्हणूनच नारदाने लक्ष्मीशी पुन्हा बोलून तिच्या मनाशी संवाद साधण्याच्या प्रयत्नाला सुरुवात केली.

"हे लक्ष्मी, या विषयावरती आपण जरी कितीही बोलणे केले तरी तुझ्या मनाची अस्वस्थता वाढतच जाणार ही गोष्ट खरीच आहे. कारण तो विषयही तसाच आहे. तत्त्वतः सत्य असलेली गोष्ट प्रत्यक्ष आचरणात आणणे कठीणच आहे. कारण तत्त्व हे निरपेक्ष असते आणि प्रत्यक्ष आचरण हे स्थळ, काळ, व्यक्ती व प्रसंग यांच्या सापेक्षतेने करावे लागते. त्याचा निर्णय होतानाही प्रत्येकाचे मन, बुद्धी व स्वभाव यांचा सहभाग मुख्यत्वेकरून असतो. त्यामुळे ज्याच्या त्याच्या मनाची अवस्था, बुद्धीची समज व स्वभावाची सहजता यांच्या संयोगातूनच आचरण घडते आणि हे तीनही घटक अनाकलनीय व कोणताही अंदाज करण्याच्या पलीकडचे आहेत. त्यांचे निश्चित असे काही शास्त्र नाही आणि नियमही नाहीत. मुख्य म्हणजे सामान्यांसाठी त्या गोष्टी अपरिवर्तनीयच आहेत. त्यातही स्वतःहून स्वतःमध्ये बदल करणे कोणालाच शक्य होत नाही. तसा बदल होण्यासाठी कोणत्यातरी बाह्य बळाची जरूरी असते. त्यासाठी दुसऱ्या कोणा सबळ व्यक्तिवरती अपार प्रेम व अढळ श्रद्धा असणे आवश्यक असते. त्या दृष्टीने विचार केला असता धर्मराजामध्ये बदल होणे शक्यच नव्हते. कारण तो धर्मशास्त्राच्या चौकटीमध्ये व धर्माचरणाविषयीच्या स्वतःच्या समजुतीमध्ये पूर्णपणे अडकलेला होता आणि त्याच्या जीवनात अशी कोणतीही व्यक्ती बाह्यांगाने नव्हती की जिच्यावरील श्रद्धेने व प्रेमाने धर्मराजा स्वतःच्या मूलभूत दृष्टीमध्येच काही बदल करू शकेल. कारण स्वतःच्या तथाकथित धर्माचरणाविषयीच धर्मराजाला जास्त प्रेम होते. स्वतःच्याच स्वभावाच्या प्रेमात अडकलेला व रमलेला धर्मराजा म्हणूनच मनाने अत्यंत दुर्बलच झालेला होता. त्याच्या वृत्तीत व कृतीत बदल होण्याचे तसे कारणही नव्हते आणि तशी सुतराम शक्यताही नव्हती.




हे लक्ष्मी, कुंतीची अवस्थाही धर्मराजासारखीच झालेली होती. पतीच्या अकाली निधनानंतर स्वतःच्या पाचही पुत्रांची जबाबदारी समर्थपणे सांभाळणारी कुंती कुटुंबाच्या चौकटीलाच सांभाळून रहात होती, यात काहीच नवल नाही. कारण तिच्यासाठी तोच तर मूलभूत आधार होता. त्यामुळे कुंतीच्या दृष्टीने कौटुंबिक ऐक्यालाच एकमेव प्राधान्य असणेही अत्यंत साहजिकच होते. द्रौपदीची होणारी भावनात्मक कुचंबणा लक्षात येऊनही कुंतीची द्रौपदीकडून हीच अपेक्षा होती की पांडवांमधील ऐक्य राखण्यासाठी द्रौपदीने त्याग करावा. पण त्यामुळे द्रौपदीला किती शारीरिक व मानसिक त्रास होईल हे कुंतीला स्पष्ट दिसत असूनही, ती त्याकडे डोळेझाकच करीत होती. पुत्रप्रेमाचे रूपांतर पुत्रमोहात झाल्याचेच ते लक्षण होते. परंतु त्यावरही कोणाचा काहीच इलाज नव्हता. त्याचा खरा इलाज कुंतीकडेच होता, पण ती स्वतःच असहाय्य झालेली होती. थोडक्यात काय, कुंती व धर्मराज हे दोघेही त्यांच्या भावनेत, समजुतीत व स्वभावात पूर्णपणे अडकलेले होते हीच गोष्ट खरी आहे. ती आपण मान्य करूया आणि त्याबद्दल त्यांचा राग न करता त्यांच्याविषयी मनात फक्त दया व सहानुभूती ठेवून हा विषय येथेच संपवू या! तेच अत्यंत योग्य ठरेल.

लक्ष्मी, कुंती व धर्मराज यांच्यापेक्षा अर्जुन हा वेगळा होता हे तर निश्चितच, पण तो किती वेगळा होता हे पुढे कळून येणारच आहे. अर्जुन हा कृष्णाच्या प्रेमाचा व अत्यंत जवळचा मित्र असल्यामुळेच त्याच्याकडून जास्त अपेक्षा असणे अगदी साहजिकच आहे. या नाजूक परिस्थितीत कृष्णाशी विचारविनिमय करणे आवश्यक आहे हे अर्जुनाच्याही लक्षात आलेले होतेच. त्यालाही कृष्णाच्या मार्गदर्शनाची अत्यंत जरूरी वाटत होतीच. परंतु तसे तो उघडपणे बोलत नव्हता इतकेच. पण त्याचे मन मोकळे करण्यासाठी त्याला एकमेव कृष्णाचाच आधार होता. त्याशिवाय अर्जुनाच्या मनावरील ताण हलका होणे शक्यच नव्हते आणि अर्जुनही हे जाणून होताच. पण धर्मराजाचा स्वभाव ओळखून असल्यामुळे अर्जुन

जाणूनबुजून स्वस्थच राहिला होता आणि कृष्णाची भेट होण्याची वाट पहात होता. अर्जुनाने कृष्णाशी कधी, कसे व काय बोलणे केले आणि त्याचा अर्जुनावरती काय परिणाम झाला किंवा त्याला त्याचा काय उपयोग झाला, हे कथेच्या ओघात पुढे येणारच आहे. मुख्य म्हणजे, अर्जुनाचा उपयोग द्रौपदीला काय व किती झाला हाच प्रश्न आहे.

हे लक्ष्मी, पण त्याआधी व्यासांच्या अंतःकरणाची अवस्था जाणून घेऊन त्यांची भूमिका समजून घेण्याचा प्रयत्न करूया. ‘प्रयत्न करूया’ असे मी मुद्दामच म्हणत आहे. कारण व्यासांसारख्या पूर्ण आत्मज्ञानी अवस्थेतील महात्म्यांचे अंतःकरण पूर्णपणे जाणणे, हे केवळ अशक्यच आहे. कारण ती अवस्था मनाच्या कल्पनेच्या व बुद्धीच्या तर्कज्ञानाच्याही पलिकडचीच आहे. जेथे ‘मी’पणा पूर्णपणे लयाला गेला आहे अशा महात्म्यांच्या अंतःकरणातील निरहंकारी अवस्थेला मनाच्या ‘मी’पणामुळे व बुद्धीच्या अहंपणामुळे कधीच जाणता येणार नाही. या महात्म्यांच्या प्रसंगात प्रगट होणाऱ्या भूमिकेवरून त्यांचा स्वभाव व वृत्ती याची अंधुकशी कल्पना येऊ शकते खरी, पण शेवटी ती कल्पनाच असल्यामुळे तोही एक अंदाजच रहातो. बरे, भूमिका ही सापेक्षतेने प्रगट होत असते आणि त्याला अनेक बाह्य कारणेही असतात. त्यामुळे महात्म्यांची ठराविक प्रसंगातील ठराविक भूमिका थोडीफार कळली, तरी त्यामुळे त्यांच्या अंतःकरणाची अवस्था कळली असे मात्र होत नाही. त्यासाठी आपले अंतःकरणच तसे होणे हाच एकमेव मार्ग आहे आणि आपले अंतःकरण तसे कसे होईल, हाच तर मुख्य प्रश्न आहे.

हे लक्ष्मी, आत्मज्ञानी व्यक्तींकडून त्यांच्या वृत्तीनुसारच कार्य घडत असते, ही गोष्ट खरीच आहे. व्यासांसारखे महापुरूष हे ‘स्व’प्रेमात म्हणजेच आत्मप्रेमातच सहजतेने रमत असतात. म्हणूनच या त्यांच्या वृत्तीला ‘आत्मरती’ असेच संबोधलेले आहे. व्यास जास्त करून स्वतःच्या अंतःसृष्टीतच स्वानंदाचा अनुभव घेत असत. या त्यांच्या स्वानुभवाच्या सृष्टीतच महाभारत, भगवद्गीता व श्रीमद् भागवत यासारखे ग्रंथ आधी




प्रसवले आणि व्यासांच्या अंतरातील त्या अद्भूत क्रिडेचा आनंद शब्दरूपाने नंतर साकार झाला. व्यासांच्या अशा अंतरातील अवस्थेमुळे त्यांचा बाह्य जगाशी व जगातील व्यवहाराशी अगदी क्वचितच संबंध येत असे. आत्मज्ञानाच्या अनुभवामुळे व्यासांना सर्वच शास्त्रांचे मूलभूत ज्ञान यथार्थतेने होते. परंतु त्यासंबंधी ते आपणहून कोणालाच काही सांगत नसत. व्यास कोणाची अपेक्षेने वाट पहात असतील तर ते संसाराचे मिथ्यत्व व ईश्वराचे सत्यत्व जाणून ज्यांना खरे वैराग्य आलेले आहे आणि ज्यांना ईश्वराच्या प्राप्तीसाठी आत्मज्ञानाने आत्मधर्म जाणून घ्यायचा आहे, अशा शरण्य भावाने आलेल्या मुमुक्षू जनांची! परंतु कालमानानुसार नेमकी तीच गोष्ट दुर्मिळ झालेली होती आणि सामान्य जन बाह्यआचरणाच्या धर्म-अधर्मामध्ये गुंतून प्रपंचातच अडकून राहिलेले होते. धर्मराजाही खरेतर असाच सामान्य जीव होता. परंतु व्यासांवरील आदराने व श्रद्धेने आणि थोड्याशा नातेसंबंधामुळेही धर्मराजा व्यासांकडे केवळ प्रापंचिक मार्गदर्शनासाठीच आलेला होता. धर्मराजाला व्यासांचा धर्मशास्त्रातील अधिकारच फक्त ठाऊक होता. परंतु त्यांच्या आत्मज्ञानी अवस्थेची धर्मराजाला काहीच माहिती नव्हती आणि मुख्य म्हणजे त्याला तशी जरूरीही वाटत नव्हती.

हे लक्ष्मी, धर्मराजाची ही अवस्था व भूमिका व्यासांच्या तर लगेचच लक्षात आली. त्यामुळे धर्म-अधर्मापलीकडील आत्मधर्माचे ज्ञान धर्मराजाला सांगण्याचे, व्यासांना काहीच प्रयोजन नव्हते आणि धर्मराजाची तशी अनन्य शरणागतीची अवस्थाच नसल्यामुळे तसे ज्ञान प्रगट करूनही, धर्मराजाला त्याचा काहीही उपयोग झाला नसताच. अनधिकारी व्यक्तीसाठी सत्यज्ञान केव्हाही प्रगट होत नाहीच आणि तसे प्रगट करूही नये, असा मुळी संकेतच आहे. त्यानुसार व्यासांनीही धर्मराजाबरोबरचे बोलणे जास्त वाढवले नाही. परंतु तरीही व्यासांच्या अंतःकरणातील ईश्वरी अनुभवाची सहज प्रेमस्वरूप अवस्था प्रगट झाल्याशिवाय राहिली नाहीच. ‘द्रौपदीच्या भावनेला अग्रक्रम द्या आणि

तिची इच्छाच प्रमाण माना’ असे उद्गार व्यासांच्या मुखातून म्हणूनच सहजतेने बाहेर आले. ‘कुंतीची काळजी घ्या आणि कुठल्याही परिस्थितीत सर्व बंधूंनी एकोप्याने राहून कुंतीच्या मनाला तोष द्या’ या शब्दांतूनही व्यासांच्या अंतरीचे प्रेम व कळवळाच व्यक्त झाला. लक्ष्मी, तुझे म्हणणे अगदी खरेच आहे की व्यासांसारख्या महात्म्यांच्या अंतःकरणाचा अभ्यास आपल्याला कधीच करता येणार नाही. परंतु त्यांच्याकडून बाह्यांगाने थोड्याफार प्रमाणात प्रगट होणाऱ्या त्यांच्या अंतःकरणाच्या अवस्थेमुळे ती सर्वश्रेष्ठ अनुभवाची अवस्था आपणही अनुभवावी असा ध्यास मात्र आपल्याला निश्चितच लागू शकतो. आपल्यासाठी हीच गोष्ट अत्यंत आवश्यक व म्हणून महत्त्वाचीही आहे.”

नारदाचे बोलणे ऐकत असताना लक्ष्मीच्या मनाची बेचैन अवस्था कमी कमी होऊन ते शांत व स्थिर होत आहे हे तिच्या मुखावरील बदललेल्या भावामुळे अगदी स्पष्टपणे तर दिसत होतेच पण तिच्या शब्दातूनही तोच भाव व्यक्त होऊ लागला.

“अरे नारदा, तुझे म्हणणे अगदी खरे आहे. जी अवस्था आपल्याला प्राप्त करून घ्यायची आहे त्याचाच आपण ध्यास धरावा. त्यासाठी त्याच अवस्थेविषयी बोलणे व विचार आपल्याकडून घडावयास हवा. म्हणजे आपण तो प्रयत्नपूर्वकच करावयास हवा. कारण तरच आधी त्यासंबंधी आपला निश्चय होईल आणि मगच त्याचा ध्यास आपल्याला लागण्याची शक्यताही निर्माण होईल. पण त्यासाठी आधी इतर आजुबाजूच्या गोष्टींविषयीचा किंवा इतर व्यक्तींच्या भावाचा विचार करणे, आपण थांबवले पाहिजे. त्यामुळेच आपले विचार एकदेशीय होऊन आपल्याला निश्चयाचे मनोबळ प्राप्त होईल, ही गोष्ट आता माझ्या पूर्णपणे लक्षात आलेली आहे आणि तीच गोष्ट मी प्रयत्नपूर्वक मनात धरून ठेवीन. म्हणूनच आता धर्मराज व कुंती यांच्यापाठी न लागता, आपण अर्जुन व द्रौपदी यांच्या पाठोपाठ जाऊया. कारण त्यांच्या पाठीशी कृष्ण हा निश्चितपणे उभा आहे. मला वाटते द्रौपदीला जरी कृष्णाचा आधार



असला तरी तिला प्रत्यक्ष मदत फक्त अर्जुनाचीच होऊ शकणार आहे, ही गोष्ट तर अगदी स्पष्टच आहे. द्रौपदीही अर्जुनाचाच भरवसा धरून असणार आणि ही गोष्ट अर्जुनही जाणत असणारच. पण त्या भरवशाला अर्जुन खरेच जागला का? त्याचे कृष्णाशी बोलणे झाले का? कृष्णाने अर्जुनाला व विशेषतः द्रौपदीला काय मार्गदर्शन केले? आणि मुख्य म्हणजे निर्माण झालेला सर्व भावनिक गुंता सुटून त्यातून काही मार्ग निघाला की नाही? नारदा, हे सर्व जाणून घेण्यासाठी आपण कथेच्या मुख्य प्रवाहात येणे आवश्यक आहे हे मला तरी जाणवते. कारण तरच आपण कृष्णापर्यंत पोहचू शकू याची मला खात्री आहे आणि कृष्णाच्या अंतःकरणापर्यंत पोहोचल्याशिवाय काहीच खरे नाही. त्याशिवाय माझ्या मनाचे समाधान होणेही शक्यच नाही, मग आनंदाचा अनुभव येणे तर दूरच राहिले. होय की नाही?”

लक्ष्मीच्या बोलण्याने नारदाचे समाधान झाले आणि त्याने त्याची मान संमतीदर्शक डोलवली. नारदाकडे अपेक्षेने पहात असलेल्या लक्ष्मीच्या भावाची पूर्ती करण्यासाठी नारदाला मुद्दामहून अशी वेगळी तयारी करण्याची काही आवश्यकताच नव्हती. मधुर रसाने भरून तयार झालेल्या एखाद्या फळाप्रमाणे नारदाचे अंतःकरण प्रेमरसाने पूर्णपणे भरून वहाण्याच्या तयारीतच होते. त्या अंतःकरणाला लक्ष्मीच्या भावाचा स्पर्श हा निमित्तमात्रच ठरला आणि नारदाच्या अंतःकरणातील प्रेमरस त्याच्या मुखातून प्रगट होणाऱ्या शब्दप्रवाहामधून भरभरून वाहूच लागला.

“हे लक्ष्मी, तुझे म्हणणे अगदी खरे आहे. आपल्याला शेवटी कृष्णाच्या अंतःकरणापर्यंतच पोहोचायचे आहे, हे खरेच आहे. कारण त्याशिवाय आपल्याला आनंदाचा अनुभव येणे शक्य नाही. त्यासाठी कृष्णाविषयीचा भक्तिभाव निर्माण होणे आवश्यक आहे. तो तर कृष्णाविषयीच्या आत्यंतिक प्रेमातूनच निर्माण होणार आणि कृष्णप्रेम उत्कट होण्यासाठी त्याच्याच सगुण चरित्रलीलांचे गायन घडावयास हवे. कृष्णाकडून अशा लीला त्याच्या प्रेमीजनांसाठीच आणि त्यांच्याविषयीच्या

आपलेपणातूनच प्रगट झाल्या ही गोष्ट तर खरीच आहे. या आपलेपणापोटीच कृष्णाने त्याच्या प्रेमीजनांची सुखदुःखे ही स्वतःची म्हणून केवळ मानली असेच नाही, तर त्यांच्या भावनेशी समरस होऊन कृष्णाने ती सुखदुःखे त्यांच्या समवेत अनुभवलीही. एवढेच नव्हे, तर कृष्ण त्याच्या सर्व सामर्थ्यानिशी सर्व प्रसंगात त्या प्रेमीजनांच्या बरोबरीने उभाही राहिला. कृष्णावर श्रद्धा ठेवून त्याच्या मार्गदर्शनानुसार जे वागले ते जीवनातील सर्व प्रसंगात अगदी सहजतेने तरून तर गेलेच, पण त्यापैकी काही जणांच्या मनात कृष्णाविषयी प्रेमही निर्माण होऊन राहिले आणि त्यांना कृष्णप्रेमाची गोडीच लागली. त्यातूनही ज्या भाग्यवंतांना कृष्णप्रेमाचे विशेषत्व व यथार्थ मूल्य कळले, त्यांना त्या कृष्णाचे माहात्म्यही जाणवले आणि त्यांना कृष्णभक्तीचाच छंद जडला. या कृष्णभक्तीनेच त्यांची सर्व विभक्तता दूर होऊन त्यांनी कृष्णाशी ऐक्य साधले आणि ते स्वतःच्या अंतःकरणातच कृष्णाशी एकरूप होऊन राहिले. कृष्णाचा आनंद हा त्याच्या भक्तांचा झाला आणि त्याच्या भक्तांचा आनंद हा कृष्णाचा झाला. आनंद आनंदाशी मिळाला आणि एकीएक परमानंदच उरला. तोच वर्णन करण्यासाठी शिल्लक राहिला आणि तोच परमानंद सर्वांना व सर्वाला पुरूनही उरलाच. लक्ष्मी, अशीच संधी भाग्याने अर्जुन व द्रौपदी यासारख्या कृष्णाच्या प्रेमीजनांना मिळाली होती. त्या संधीचा त्यांनी कसा व किती उपयोग करून घेतला हेच आता बघूया. खरे तर, आता या खेळाला सुरुवातच झालेली होती. पण खरा खेळ अजूनही पुढे रंगायचाच होता. तोच खेळ आता आपण पाहूया, गाऊया आणि ऐकूया.

हे लक्ष्मी, कुंतीच्या सांगण्यानुसार अर्जुन द्रौपदीला घेऊन द्रुपद राजाकडे जाण्यासाठी निघाला. वाटेत आधी बराच वेळ त्या दोघांपैकी कोणीच काही बोलत नव्हते. अर्जुनाने काहीतरी बोलावे किंवा विचारावे असे द्रौपदीला मनातून वाटत होते आणि द्रौपदीशी काहीतरी बोलावयास हवे असे अर्जुनाच्याही मनात येत होते. परंतु प्रत्यक्ष बोलणे मात्र

कोणाकडूनच होत नव्हते. मधून मधून अर्जुन व द्रौपदी दोघेही एकमेकांकडे पहात असत. परंतु बोलण्याचा धीर मात्र त्यांच्यापैकी कोणालाच होत नव्हता. शेवटी जेव्हा द्रुपद राजाचा राजवाडा जवळ येऊ लागला, तेव्हा मात्र द्रौपदीला राहवलेच नाही. तिने मनातल्या मनात कृष्णाचे स्मरण करून धीर एकवटला आणि अर्जुनाशी बोलण्याचा हळूहळू प्रयत्न करू लागली.

“अहो नाथ, मी तुमच्याशी काही बोलण्याचे धाडस करीत आहे याबद्दल प्रथम मी तुमची क्षमाच मागते. आपल्या विवाहासंबंधी जो काही प्रश्न निर्माण झाला आहे, त्यासंबंधी प्रत्येक जण त्याचे त्याचे मत सांगत आहेच. परंतु तुमच्या मनात काय आहे किंवा त्यासंबंधी तुमची भूमिका निश्चितपणे काय आहे हे मला कळलेलेच नाही. ते जाणून घेण्याची मला केवळ उत्सुकताच नाही, तर ती माझी अत्यंत आवश्यकताच आहे. कारण शेवटी हा आपल्या दोघांच्याही जीवनाचा प्रश्न आहे आणि त्यासाठी आपण एकमेकांची मने जाणून घेणे अत्यंत जरूरीचे आहे, असे मला तरी वाटते. कारण आपली मने एकमेकांना कळली व जुळली तरच या नातेसंबंधाला अर्थ प्राप्त होणार आहे.

हे नाथ, मी एक गोष्ट तुम्हाला अगदी स्पष्टपणे सांगते की आपल्या उभयतांचा हा विवाह केवळ कृष्णाच्या इच्छेनुसार व त्याच्याच प्रयत्नाने जुळून आलेला आहे. तुमचे व कृष्णाचे मैत्रीचे व प्रेमाचे संबंध असल्यामुळे माझ्यासाठी तुम्हीच पती म्हणून योग्य आहात, असा निर्णय कृष्णानेच घेतला आणि त्यानंतर सर्व योजना नीट आखून ती योजना यशस्वीही केली. हे सर्व कृष्णाने माझ्यावरील प्रेमापोटीच केले हे तर निश्चित आहे. परंतु आता अचानक ही जी विचित्र परिस्थिती निर्माण झालेली आहे ती मात्र कृष्णाला माहिती असणे शक्यच नाही. त्याच्यासाठीही हे सर्व अनपेक्षितच असणार. परंतु यातून कृष्ण हाच निश्चित मार्ग काढू शकेल याची मला पूर्ण खात्री आहे. त्यासाठी त्याचेच मार्गदर्शन घेणे अत्यंत आवश्यक आहे.

हे नाथ, माझ्याठायी कृष्णाविषयी विशेष भावना आहेत आणि माझ्या अंतरात कृष्णाला विशेष स्थान आहे ही गोष्ट मला तुमच्यापासून मुळीच लपवून ठेवायची नाही. कारण त्यात लपवण्यासारखे काहीच नाही. कृष्णाला तसेच स्थान माझ्या जीवनातही असावे, एवढीच माझी इच्छा आहे. तुमच्या व कृष्णाच्या प्रेमसंबंधाविषयी मी जे काही कृष्णाकडून ऐकले आहे त्यावरून माझी तर पूर्णपणे खात्रीच झालेली आहे की तुमच्याही मनात कृष्णाला तसेच व तेवढेच स्थान आहे, जे माझ्या मनात आहे. कृष्णाचे स्थान आपल्या जीवनात असावे असे तुम्हालाही निश्चितपणेच वाटत असणार. म्हणूनच मला असे मनापासून वाटते की आपण उभयतांनी कृष्णाची भेट घेऊन त्याच्याशी मोकळेपणे बोलावे आणि त्याचे मार्गदर्शन घ्यावे. कृष्णाला सर्व धर्मशास्त्राचे ज्ञान तर आहेच, परंतु कृष्ण मानवी मनाच्या भावनाही समजू शकतो हे त्याचे विशेषत्व आहे. एवढेच नव्हे, तर योग्य भावना असतील तर त्यांना शास्त्रापेक्षाही अधिक महत्त्व आहे, हेही कृष्ण जाणून आहे आणि योग्य भावना राखण्यासाठी धर्मशास्त्राचाही उपयोग कसा करून घ्यावा, हेही फक्त त्या कृष्णालाच माहित आहे. म्हणूनच मी तुम्हाला पुन्हा विनंतीपूर्वक सांगते की आपण कृष्णाशी बोलणे करूया. आपल्या उभयतांच्या हिताचा कळवळा एकीएक कृष्णाठायीच आहे आणि केवळ कृष्णच आपल्याला या अडचणीतून सुखरूपपणे बाहेर काढू शकेल याचा मला पूर्ण विश्वास आहे. तुम्हीही कृष्णावरतीच विश्वास धरा म्हणजे सर्व काही व्यवस्थित व सुरळीत होईल हे निश्चित.”

द्रौपदीचे मोकळेपणाचे व स्पष्ट बोलणे ऐकून अर्जुनाला नवलही वाटले आणि द्रौपदीचे कौतुकही वाटले. अर्जुन बराच वेळ अनिमिष नजरेने द्रौपदीकडे पहातच राहिला होता. अर्जुनाच्या एकटक नजरेतील भाव पाहून द्रौपदी थोडीशी लाजलीच आणि तिने तिची मान खाली लववली. तरीही नेत्र थोडेसे वर करून द्रौपदी अर्जुनाकडे अपेक्षेने हळूच पहातही होती.

द्रौपदीच्या नजरेतील भाव अर्जुनानेही ओळखला आणि त्यानेही तिला प्रतिसाद देण्यासाठी तिच्याशी बोलण्यास सुरुवात केली.

"हे द्रौपदी, तुझ्या मोकळेपणाने मला खरेच बरे वाटले. असे मोकळेपणाचे बोलणे तू माझ्याशी करू शकलीस याचे मला अधिकच अप्रूप वाटत आहे. तुझ्याठायी कृष्णाविषयी असलेली श्रद्धा व भावना ही तर मला अधिकच भावली. कृष्ण माझा अत्यंत जवळचा असा एकमेव मित्र आहे ही गोष्ट अगदी खरीच आहे. एवढेच नव्हे, तर कृष्णाचे व माझे प्रेमाचे व अत्यंत जवळीकतेचे संबंधही आहेत. अर्थात याचे सर्व श्रेय कृष्णाकडेच आहे ही गोष्टही तुला तुझ्या अनुभवाने ठाऊक असेलच. परिस्थितीत अचानक जो भावनिक गुंता निर्माण झालेला आहे, त्यासंबंधी कृष्णाशी बोलण्याचा विचार हा माझ्याही मनात होताच. एकतर आपल्या विवाहाचा हा योग कृष्णानेच जुळवून आणलेला आहे आणि दुसरे म्हणजे माझ्या मनातील व जीवनातील प्रत्येक गोष्ट कृष्णाला सांगायचीच हा माझा भाव नेहमीच असतो. कारण त्याशिवाय माझ्या मनाला चैन पडणे तर कधीही शक्यच होत नाही. त्यामुळे हा विषय मी कृष्णाशी बोलणारच आहे. कृष्ण आपल्याला नेहमीप्रमाणेच योग्य ते मार्गदर्शन करील याची मला पूर्ण खात्री आहे. मला वाटते आधी आपण तुझ्या पित्याची भेट घेऊन त्यांना घडलेली सर्व हकीकत सांगू आणि त्यानंतर लगेचच कृष्णाची भेट घेऊ. तो आपली अत्यंत आतुरतेने वाट पहात असणार हे नक्कीच!"

अर्जुनाचे होकारात्मक बोलणे ऐकून द्रौपदीच्या मनाला बराचसा धीर आला. अर्जुनाशी ती मोकळेपणाने बोलू शकते आणि तिच्या कृष्णाविषयी असलेल्या भावना अर्जुनाला केवळ मान्यच आहेत असे नव्हे, तर अर्जुनाच्याही कृष्णाविषयी तशाच भावना आहेत हे लक्षात आल्यावर तर द्रौपदीचे मन एकदम मोकळे झाले. तिच्या मनावरील ताणही बराचसा कमी झाला आणि अर्जुन सर्व प्रसंगात तिला नक्कीच साथ देईल याची खात्रीही द्रौपदीला वाटू लागली. द्रौपदीची अर्जुनाकडे बघण्याची दृष्टीही

अधिक होकारात्मक झाली आणि तिच्याठायी अर्जुनाविषयी आपलेपणा निर्माण झाला. अर्जुनही बराचसा मोकळा झाला आहे असे त्याच्याकडे बघितल्यावर जाणवत होते. नंतर मात्र एकमेकांशी काहीही न बोलता अर्जुन व द्रौपदी द्रुपद राजाच्या राजवाड्यात येऊन दाखल झाले.

द्रुपद राजा तर द्रौपदीच्या येण्याच्या वाटेकडे कधीपासूनच डोळे लावून बसला होता. जसा जसा वेळ जात होता तशी तशी द्रुपदाच्या मनाची अधिकाधिक घालमेल होत होती. परंतु त्याच्या सोबतीला कृष्ण असल्यामुळे कृष्ण द्रुपद राजाच्या मनाला वारंवार धीर देऊन शांत करीत होता. अर्थात कृष्णही द्रौपदीच्या येण्याची वाट पहात होताच, परंतु अत्यंत शांत मनाने. तेवढ्यात अर्जुनासह द्रौपदीचे तेथे आगमन झाले. द्रुपदाने जवळ जवळ धावतच पुढे जाऊन त्या दोघांचे स्वागत केले आणि त्यांना प्रेमाने आपल्याजवळ बसवून घेतले. परंतु अर्जुन व द्रौपदी या दोघांच्याही चेहऱ्यावरील गंभीरता पाहून द्रुपदाच्या मनाला थोडीशी काळजीच वाटू लागली. तो सचिंत मुद्रेने कृष्णाकडे पाहू लागला असता कृष्णाने हाताच्या खुणेनेच त्याला ‘सर्व काही ठीक होईल’ असे आश्वासित केले. परंतु जेव्हा अर्जुनाने घडलेला सर्व वृत्तांत द्रुपदाला सांगितला तेव्हा मात्र द्रुपदाला वाटणारी काळजी खरीच ठरली. एवढेच नव्हे, तर कृष्णही थोडासा चकितच झाला. खरे सांगायचे तर, द्रुपदाचा धीरच सुटला आणि त्याच्या मुखातून एकामागून एक शब्द बाहेरच पडू लागले.

“असे कसे शक्य आहे? असे कसे घडू शकेल? एका स्त्रीने अनेक पुरूषांशी विवाह करणे हा विचारच, मुळात केवळ चुकीचाच नाही तर अनीतीचाच आहे. कोणतीही कुलशीलवान व सुसंस्कृत स्त्री असा विचारसुद्धा करू शकणार नाही. ही गोष्ट धर्मशास्त्राला धरून असणे तर शक्यच नाही आणि समजा एखादेवेळेस तशी असली तरी द्रौपदीसारखी आमची सुसंस्कारीत कन्या तशा गोष्टीचा विचारही करणार नाही. विवाह हे अत्यंत पवित्र असे बंधन आहे अशी आपल्या धर्मशास्त्राचीच शिकवण आहे आणि त्याचे पावित्र्य राखणे हे आपल्या सर्वांचेच कर्तव्यकर्म आहे.

कोणत्याही परिस्थितीत ते आपण बजावलेच पाहिजे. मी फक्त एकच गोष्ट जाणतो की द्रौपदीच्या स्वयंवराचा ‘पण’ हा केवळ अर्जुनानेच जिंकलेला आहे आणि म्हणूनच द्रौपदी केवळ अर्जुनालाच पती म्हणून वरू शकते. त्याव्यतिरिक्त तिने दुसऱ्या कोणाला वरण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही आणि याविषयी काहीही चर्चा करण्याचे सुद्धा कारणच नाही. माझ्या दृष्टीने हा विषय येथेच संपलेला आहे” असे म्हणून द्रुपद राजा तेथून त्वरेने निघूनच गेला.

* * * * *

# कृष्ण-अर्जुन संवाद

द्रुपदाच्या बोलण्याने व तेथून निघून जाण्याने तेथील वातावरणातील ताण अधिकच वाढला आणि तो अर्जुन, द्रौपदी व अगदी कृष्णाच्याही मुखावरती स्पष्टपणे दिसत होता. कोणीच काही बोलत नव्हते. कारण कोणालाच काय बोलावे हे सुचत नव्हते, हेच खरे. अर्जुन व द्रौपदी एकमेकांकडे पहात होते, पण त्याहीपेक्षा ते कृष्णाकडेच जास्त पहात होते. कारण त्यांची अपेक्षा साहजिकच कृष्णाकडूनच होती. कृष्णही त्या दोघांकडे पहात होताच आणि त्यालाही अर्जुन व द्रौपदी यांच्या नजरेतील अपेक्षा कळल्याशिवाय राहिली नाही. कृष्णही गंभीरपणे विचार करीत काही काळ स्वस्थच बसून राहिला आणि नंतर अर्जुनाच्या जवळ येऊन कृष्णाने त्याच्याशी बोलण्यास सुरुवात केली.

“अरे अर्जुना, खरे तर तुझा व द्रौपदीचा विवाह हा अत्यंत मंगलकारक व आनंददायी प्रसंग आहे. असे असतानाही त्यामध्ये अशी ही अचानक गुंतागुंत निर्माण व्हावी, याचेच मला अत्यंत वाईट वाटते. या प्रसंगात अनेकांच्या भावना गुंतल्या गेल्यामुळे हा प्रसंग अधिकच गुंतागुंतीचा होत आहे. पण हा प्रसंग, मुख्यत्वे करून तू व द्रौपदी यांच्यामधीलच आहे. ही मूलभूत गोष्ट जर लक्षात ठेवली तरच ही गुंतागुंत सुटण्याची शक्यता आहे. पण जर आपण अनेकांच्या भावनांचा विचार करून त्यांना महत्त्व देत राहिलो तर मात्र ही गुंतागुंत कधीच सुटणार नाही, उलट ती अधिकाधिकच वाढत राहील ही गोष्ट तू आधी निश्चितपणे लक्षात ठेव.


अर्जुना, धर्मशास्त्रात अनेक मार्गदर्शनपर तत्वे व नियम सांगितलेले असतात. परंतु कोणत्या प्रसंगात कोणता नियम लावावा हे ठरवताना केवळ शास्त्राचाच विचार करून चालत नाही. स्थळ, काळ, प्रसंग व

व्यक्ती या अंगांचाही विचार करून त्यांचा शास्त्राशी मेळ घालणे हीसुद्धा अत्यंत आवश्यक व महत्त्वाची गोष्ट आहे. असा मेळ घालणारी व्यक्ती ही धर्मशास्त्रातील अधिकारी तर हवीच. पण त्याचबरोबर ती व्यक्ती निरपेक्ष, निःस्वार्थी व निस्पृह असणे हेही तेवढेच जरूरीचे आहे. केवळ विशुद्ध अंतःकरणाच्या महात्म्यांचीच अशी अवस्था असते. त्यामुळे तेच सर्व गोष्टींचा योग्य मेळ घालू शकतात. पण जर कोणा सामान्य जनाने शास्त्रज्ञानाच्या कोरडेपणाने किंवा भावनेच्या भरात काही निर्णय घेतला तर तो निर्णय हा एकांगीच असणार आणि म्हणून चुकीचाच असणार ही गोष्ट निःसंशय आहे. शास्त्रज्ञान हे मुळातच अपुरे आहे. त्यात केवळ मार्गदर्शक तत्वे असतात, पण प्रत्यक्ष मार्गदर्शन मात्र असू शकत नाही. त्यामुळे कोणीही स्वतःच्या निर्णयाला शास्त्राधार शोधून काढू शकतो आणि स्वतःच्या वागण्याचे समर्थनही करू शकतो. परंतु चुकीच्या वागण्याला शास्त्राधार मिळाला म्हणून काही ते वागणे योग्य व शुद्ध आहे असे मात्र मुळीच होत नाही.

अर्जुना, येथे प्रश्न हा जसा द्रौपदीच्या भावनेचा आहे तसाच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त तिच्यासाठी नीतीमत्तेचा आहे हे तू विसरू नकोस. द्रौपदीसारखी एक कुलशीलवान व नीतीमान स्त्री तिचे सर्वस्व केवळ तिच्या पतीलाच अर्पण करू शकते, असे शास्त्रवचनही आहे. अशा परिस्थितीत काहीतरी धर्म-अधर्माच्या चुकीच्या कल्पनांचा आधार घेऊन किंवा त्यांचा सोयीस्कररित्या वापर करून द्रौपदीची जाणूनबुजून कुचंबणाच केली जात आहे. अशा वेळेस अर्जुना, द्रौपदीच्या भावना जाणून घेऊन व त्या योग्यच आहेत याची खात्री बाळगून तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहाणे आणि तिला साथ देणे, हे तुझे प्रथम कर्तव्यकर्म आहे, एवढेच नव्हे, तर तो तुझा धर्मच आहे. त्यासाठी कोणताही शास्त्राधार शोधण्याची मुळी गरजच नाही, एवढी ही गोष्ट सूर्यप्रकाशासारखी स्पष्ट आहे. द्रौपदी व अगदी मीसुद्धा तुझ्याकडे याच नजरेने व अपेक्षेने पहात आहे. यात आमची काही चूक आहे का?”

कृष्णाचे बोलणे लक्षपूर्वक ऐकत असताना अर्जुनाचा चेहरा अत्यंत गंभीरच झाला होता. कृष्णाचे बोलणे थांबले तरी अर्जुन काहीच बोलला नाही. किंवा कृष्णाच्या बिनतोड बोलण्यापुढे अर्जुन काही बोलूच शकत नव्हता. परंतु कृष्ण व द्रौपदी अर्जुनाकडे अपेक्षेच्या नजरेने बघत होते त्यामुळे अर्जुनाला शेवटी बोलणे भागच पडले. थोड्याशा नरमाईच्या सुरातच अर्जुनाने बोलावयास सुरूवात केली.

“अरे कृष्णा, तुझे सर्व सांगणे अगदी यथार्थ आहे याविषयी माझ्या मनात तरी काहीच शंका नाही. द्रौपदीच्या भावना मी पूर्णपणे समजू शकतो. एवढेच नव्हे, तर तिच्यावरती ओढवलेला प्रसंग पाहून मलाही अत्यंत वाईटच वाटत आहे. माझ्याठायी द्रौपदीविषयी पूर्णपणे सहानुभूतीच आहे. परंतु माझाही नाईलाजच होत आहे. ही गोष्ट कृष्णा, तू तरी समजून घ्यावीस आणि द्रौपदीलाही समजावून सांगण्याचे करावेस, एवढीच माझी तुझ्याकडून माफक अपेक्षा आहे. माझ्या दृष्टीने माझे कुटुंब व माझ्या कुटुंबाचे स्वास्थ्य अधिक महत्त्वाचे आहे. माझ्या कौटुंबिक जनांच्या मानसिक स्वास्थ्याला माझे प्रथम प्राधान्य आहे. माझे सर्व सामर्थ्य व माझा पराक्रम हा माझ्या कुटुंबाच्या सुखासाठीच आहे आणि त्यासाठी कौटुंबिक ऐक्य राखणे, ही माझी जबाबदारी आहे. आमच्या कौटुंबिक ऐक्याला जेणेकरून तडा जाईल अशी कोणतीही कृती माझ्याकडून कधीच घडणार नाही. तसा विचार जरी माझ्या मनात आला तरी ते माझ्यासाठी पापच आहे, असेच मी नेहमी समजतो. माझ्या कुटुंबाला सुखात ठेवणे हेच माझ्यासाठी कर्तव्यकर्मही आहे आणि तेच माझ्यासाठी पुण्यकर्मही आहे. वेळप्रसंगी माझ्या कुटुंबासाठी जरी मला कोणताही त्याग करावा लागला तरी त्यासाठी माझी तयारी आहे. मग भले त्यासाठी मला काहीही किंमत मोजावी लागो. मी कोणतीही तक्रारही करणार नाही आणि माझ्या कर्तव्यकर्मापासून कधीही मागेही हटणार नाही.



कृष्णा, मला माहित आहे की माझा व द्रौपदीचा विवाह व्हावा ही तुझी अगदी मनापासूनची इच्छा आहे. त्यासाठी तू स्वतः पुढाकार घेऊन ही सर्व योजना आखलीस हे मला द्रौपदीशी झालेल्या बोलण्यातूनही कळले आहे. त्यामुळे तुझ्या माझ्याकडून बऱ्याच अपेक्षाही आहेत आणि तेही अगदी साहजिकच आहे. तसा तुझा तो माझ्यावरील हक्कच आहे. तुझ्या सांगण्यावरून द्रौपदीच्याठायीही माझ्याविषयी केवढ्या तरी कल्पना व अपेक्षाही निर्माण झाल्या असणारच. त्या सर्वाला मी अत्यंत कमीच पडत आहे ही गोष्ट माझ्याही लक्षात येत आहे. परंतु माझ्यापुढे दुसरा मार्गच उपलब्ध नाही आणि असला तरी त्या मार्गाने जाण्याचे माझ्याठायी धैर्यही नाही ही गोष्ट खरीच आहे, ते मी कबूलही करतो. मला त्याचे काही समर्थनही करायचे नाही. त्यासाठी मी तुमची मनापासून क्षमाच मागतो आणि तशी ती तुम्ही कराल अशी खात्रीही बाळगतो.

कृष्णा, एक गोष्ट अत्यंत चांगली झालेली आहे की माझा व द्रौपदीचा अजूनही प्रत्यक्ष विवाह असा झालेलाच नाही. तिच्या स्वयंवराचा ‘पण’ मी जिंकलेला आहे. त्यामुळे तिच्याशी विवाह करण्याचा माझा हक्क आहे हे मला माहित आहे. परंतु तो हक्क मी स्वखुषीने सोडून देतो आणि द्रौपदीने माझ्याशीच विवाह करावा या बंधनातून तिला पूर्णपणे मोकळे करतो. म्हणजे तिच्यावर आता कोणतेही दडपण असे रहाणार नाही आणि तिचा निर्णय घेण्यासाठी तिला पूर्ण स्वातंत्र्य मिळेल. माझ्या अडचणी व मर्यादा द्रौपदीच्या लक्षात आलेल्या आहेतच. आता निर्णय तिनेच घ्यायचा आहे. पण एक गोष्ट खरी आहे की माझा स्वीकार करायचा झाल्यास द्रौपदीला तो माझ्या सर्व कुटुंबासह व परिस्थितीसह करावा लागेल, ही गोष्ट आता स्पष्ट झालेली आहे. आता काय तो निर्णय द्रौपदीनेच घ्यायचा आहे. तिलाच तो घ्यावा लागेल. अर्थात कृष्णा, तुझ्याशी बोलणे करूनच द्रौपदी निर्णय घेईल याची मला खात्री आहे आणि म्हणूनच मला कोणतीही काळजी नाही.”

अर्जुनाने त्याच्या मनातील सर्व सांगून त्याचे मन मोकळे केले. परंतु त्याच्या बोलण्याने त्यालाही समाधान झालेले नव्हते, हे त्याच्या अवनत मुखावरूनच लक्षात येत होते. अर्जुन कृष्णाकडे हळूच मधून मधून नेत्रकटाक्ष टाकून बघण्याचा प्रयत्न करीत होता खरा, परंतु कृष्णाच्या नजरेला नजर देण्याचे मात्र त्याला धाडसच होत नव्हते. द्रौपदीकडे बघणे तर अर्जुनाला शक्यच नव्हते. तशातच अर्जुन कृष्णाजवळ आला आणि त्याने कृष्णाशी हस्तांदोलन करून त्याचा खुणेनेच निरोप मागितला. कृष्ण काहीच बोलला नाही. त्याचा अर्थ अर्जुनाला समजला आणि मोठ्या खेदाने मान खाली घालून अर्जुन तेथून निघून गेला. निघताना अर्जुनाने द्रौपदीकडे पहाण्याचा एकदाच प्रयत्न केला. पण द्रौपदीच्या नजरेतील दुःखाच्या वेदना व अश्रूंनी भरून आलेल्या नेत्रांकडे पहाणे अर्जुनाला शक्यच झाले नाही. त्यामुळे जराही न थांबता हळूहळू पावले टाकीत अर्जुन तेथून बाहेर पडला.”

नारदाचे बोलणे होत असताना त्यामधून एक प्रकारची खिन्नताच व्यक्त होत होती आणि त्याचा परिणाम साहजिकपणे लक्ष्मीवरतीही होत होताच. बोलण्याचा ओघात नारदाने सहजपणे जेव्हा लक्ष्मीकडे पाहिले तेव्हा लक्ष्मीच्या मुखावर पसरलेली खिन्नता नारदाच्या लगेचच लक्षात आली आणि तो लागलीच बोलायचा थांबला. कारण लक्ष्मीच्या मनातील खिन्नता दूर झाल्याशिवाय तिचे मन श्रवणाकडे पूर्ण लागणे शक्य नव्हते आणि लक्ष्मीचे मन पुन्हा श्रवणस्थितीला येण्यासाठी तिने बोलूनच मोकळे होणे आवश्यक होते. नारद ही गोष्ट स्वानुभवाने पूर्णपणे जाणून होता. म्हणूनच नारद लक्ष्मीच्या बोलण्याची वाट पहात स्वस्थ राहिला. नारदाची ही अपेक्षा लक्ष्मीच्याही लक्षात आलीच. अर्थात लक्ष्मीचीही ती जरूरी होतीच. तिलाही बोलण्याची आवश्यकता जाणवत होतीच. त्यामुळे लक्ष्मीनेही बोलून तिचे मन मोकळे करण्यास सुरूवात केली.

“अरे नारदा, मला तर आता द्रौपदीची दयाच वाटत आहे. बिच्चारी, ‘करायला गेली काय आणि झाले काय?’ अशीच तिची मोठी विचित्र


स्थिती झालेली मला अगदी स्पष्टपणे दिसत आहे. विवाहासारख्या जीवनातील अत्यंत महत्त्वाच्या अशा मंगल व आनंदाच्या प्रसंगाचा तर अगदी विचकाच होताना पहाणे त्या द्रौपदीच्या नशीबातच होते असे दिसते. मला तर तिची झालेली दयनीय अवस्था पाहवतच नाही. द्रौपदीची जशी मला काळजी वाटत आहे तशी व तेवढीच किंबहुना थोडीशी जास्तच काळजी मला कृष्णाची वाटत आहे. त्याच्या मनाची स्थिती काय झाली असेल याची तर मला कल्पनाही करवत नाही. कृष्णाने किती विश्वासाने अर्जुनाचे नाव द्रौपदीला पती म्हणून सुचविले होते? आणि त्याचा अर्जुनावर किती भरवसा होता? परंतु अर्जुन मात्र कृष्णाच्या भरवशाला पात्र ठरू शकला नाही. त्याने ऐनवेळी अशी माघार घ्यावी, याचे कृष्णाला किती वाईट वाटले असेल बरे? त्याच्या मनाला किती क्लेश झाले असतील याची तर मला कल्पनाही करवत नाही. अर्जुनाचे प्रेम कमी पडले की श्रद्धा कमी पडली हेच समजत नाही. द्रौपदीच्या मनाची अवस्था पाहून कृष्णाच्या मनालाही यातना झाल्याच असणार हे तर नक्कीच आहे. कारण ती तर कृष्णाच्या अंतःकरणाची सहजावस्थाच होती.

हे नारदा, मला द्रौपदीच्या अवस्थेची थोडीशी भीतीच वाटत आहे. कृष्णाच्या प्रेमासाठी कृष्णावरती पूर्ण श्रद्धा ठेवून स्वतःच्या जीवनातील निर्णय घेणाऱ्या द्रौपदीच्या श्रद्धेवरही ताण आलाच असणार, याची मला अगदी खात्री आहे. त्यात तिची काही चूक आहे असेही म्हणता येणार नाही. अशा परिस्थितीत कोणाही सामान्याच्या श्रद्धेला तडा गेलाच असता. अर्थात द्रौपदी सामान्य नव्हती हे जरी खरे असले तरी तिच्या सहन करण्यालाही काहीतरी मर्यादा या असणारच आणि तशा त्या केव्हातरी येणारच ना? पण द्रौपदीची कृष्णावरील श्रद्धा कायम असणार अशी ग्वाही माझे मन मला देत आहे, कारण मी एक महत्त्वाची गोष्ट जाणून आहे, की द्रौपदीच्या कृष्णावरील श्रद्धेला व्यक्तिगत प्रेमाचीही जोड होती आणि त्यामुळे व त्यासाठी काहीही सहन करण्याची तिच्या मनाची तयारी होती. या प्रेमासारखे दुसरे बळ नाही ही गोष्ट तर सत्यच आहे.

हे नारदा, या सर्व पेचप्रसंगातून कृष्णाने काय व कसा मार्ग काढला, हाच आता महत्त्वाचा मुद्दा आहे. कृष्णाने द्रौपदीला काय मार्गदर्शन केले आणि कोणी कोणता मार्ग सुचवला हे जाणून घेणे हेच आता माझ्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण द्रौपदीने अर्जुनाचा पती म्हणून स्वीकार करायचा, तर तिला तो अर्जुनाच्या सर्व बंधूंसकटच करावा लागणार होता आणि एका स्त्रीच्यासाठी तर ती गोष्ट केवळ अशक्यच आहे. बरे, तसे न करावे तर अर्जुनाशी ठरलेला विवाह होणे हेही अशक्यच होणार होते आणि अर्जुनाशी ठरलेला विवाह जर झाला नाही तर मग द्रौपदीलाही दुसरा पर्याय तरी काय होता? कारण पुन्हा सामाजिक व शास्त्राच्या काहीतरी अडचणी निर्माण झाल्याच नसत्या अशीही खात्री देता येत नव्हती. किंबहुना तशा अडचणी कोणीतरी निर्माण करण्याचीच शक्यता जास्त होती. त्यामुळे द्रौपदीला पुन्हा व्यक्तिगत निंदेला तोंड द्यावे लागले असते ते असतेच आणि द्रुपद राजाचीही सर्वत्र नाचक्की झाली असती ती असतीच. खरेच, मला वाटते त्या प्रसंगात खरी कसोटी कृष्णाचीच लागत होती. नारदा, आता माझी उत्सुकता जास्त ताणली जाण्याच्या आधीच मला तू सर्व काही सविस्तरपणे सांगण्याचे कर बघू. कारण या सर्वांमध्ये कृष्णाचे अंतःकरण कळल्याशिवाय माझ्या मनाचे समाधान होणे शक्यच नाही, ही गोष्ट मीही जाणून आहे आणि तूही जाणून आहेस. होय ना?”

लक्ष्मीच्या बोलण्यातून प्रगटणारा कळवळा नारदाला जाणवल्याशिवाय रहाणे शक्यच नव्हते. कारण त्याच्याही अंतःकरणातील आर्तता तेवढीच वाढून राहिलेली होती. त्यामुळे जराही वेळ न गमावता नारदाच्या मुखातून शब्दप्रवाह बाहेर येऊ लागलाच.

“हे लक्ष्मी, तुझ्या ठायी द्रौपदीविषयी जो कळवळा निर्माण झालेला आहे तो अत्यंत साहजिक व योग्यच आहे. परंतु तुझ्या ठायी जी कृष्णाविषयी काळजी निर्माण झाली ती मला अधिक योग्य वाटते. कारण अर्जुन व द्रौपदी यांच्यावर जो मानसिक ताण येत होता त्या दोघांचाही



भार शेवटी कृष्णाच्या मनावरतीच येत होता ही गोष्ट लक्षात येणे, हे अधिक महत्त्वाचे आहे. कारण कृष्णाला अर्जुन व द्रौपदी हे दोघेही सारखेच जवळचे होते. त्यामुळे कृष्णाला त्या दोघांविषयीही वाईट वाटणे अगदी साहजिकच होते. पण कृष्णाला द्रौपदीविषयी अधिक वाईट वाटत होते हेही खरेच आहे. कारण अर्जुन व द्रौपदी यांचा विवाह जर झाला नसता तर अर्जुनाच्यासाठी काही फारसा फरक पडत नव्हता. परंतु खरी कठीण परिस्थिती मात्र द्रौपदीसाठीच निर्माण होत होती. कृष्ण हे जाणून असल्यामुळे त्याच्याठिकाणी द्रौपदीविषयी अधिक काळजी व थोडीशी चिंताही निर्माण झालीच. कृष्णाचे मनही थोडेसे अस्वस्थ झालेच. परंतु आत्मबळाने युक्त असलेला कृष्ण मनातून शांतच राहिला आणि निर्माण झालेल्या कठीण प्रसंगातून मार्ग कसा काढावा यापेक्षा, त्यातून द्रौपदीला कसे बाहेर काढावे या विचारात मग्न होऊन राहिला.


हे लक्ष्मी, एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घे की जरी कृष्णाला अर्जुन व द्रौपदी हे सारखेच जवळचे होते, तरीही अर्जुन व द्रौपदी यांना मात्र कृष्ण सारखाच जवळचा नव्हता. द्रौपदीसाठी जसा कृष्ण अत्यंत जवळचा म्हणजे, एकमेवच होता तसा अर्जुनाला मात्र कृष्ण तेवढा जवळचा नव्हता आणि त्याचे कारणही अगदी स्पष्ट व उघड होते. अर्जुनासाठी त्याची माता व त्याचे बंधू हेही जवळचे होते. किंबहुना, अधिक जवळचे होते. त्यामुळे कौटुंबिक घडी बिघडवून कोणताही निर्णय घेण्यास अर्जुनाच्या मनाची तयारी नव्हतीच. भले अगदी तसा निर्णय कृष्णालाही अपेक्षित का असेना, तो निर्णय घेण्यास अर्जुन कधीच तयार झाला नसता. अर्जुनासाठी कृष्णाचे सांगणे हा केवळ सल्ला होता. तसे बंधन मात्र त्याच्यावर मुळीच नव्हते. कारण कृष्णाच्या माहात्म्याची जाणीव अर्जुनाला नव्हती. अर्जुनाची ही मर्यादा कृष्ण जाणून होता. त्यामुळे अर्जुन त्याच्या या कौटुंबिक मर्यादेचे उल्लंघन करील अशी अपेक्षा करताच येत नव्हती आणि तशी अपेक्षा कृष्ण करीतही नव्हता. सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे, एवढे होऊनही कृष्ण व अर्जुन यांच्यातील

मैत्रीचे संबंध तसेच कायम रहाणार होते. त्या संबंधाला काहीच बाधा येणार नव्हती. त्याचे सर्व श्रेय अर्थातच कृष्णाकडेच जात होते कारण तो कृष्णाचा स्वभाव होता.

हे लक्ष्मी, द्रौपदीची अवस्था मात्र अगदी वेगळीच होती. तिच्याठायी असलेल्या कृष्णप्रेमाला कृष्णावरील श्रद्धेची जोड होती. किंबहुना द्रौपदीच्याठायी असलेले कृष्णप्रेम हे तिच्याठायी असलेल्या त्याच्यावरील अढळ श्रद्धेतूनच निर्माण झालेले होते. द्रौपदीला जरी कृष्णाच्या ईश्वरी माहात्म्यविषयी जाण नसली तरी तिने कृष्णाचे विशेषत्व अनुभवाने पूर्णपणे जाणले होते. कृष्णाच्या शुद्ध, प्रेमळ व सबळ अंतःकरणाची प्रचिती द्रौपदीला त्याच्या सहवासात वारंवार आलेली होती आणि म्हणूनच तिच्या जीवनात कृष्णाला कायमपणे घेण्याचा द्रौपदीचा निश्चयच झालेला होता, नव्हे, तिचा तर तो ध्यासच होता. द्रौपदीसाठी कृष्ण केवळ एक प्रेमाची व्यक्ती वा मित्र वा मार्गदर्शक नव्हता, तर तिच्यासाठी कृष्ण हा सर्वस्वच होता. कृष्णावरील या प्रेमासाठी व या श्रद्धेपोटी कृष्णाचे सांगणे हे द्रौपदीसाठी अंतिमच होते. मग त्यासाठी तिने तिच्या मातापित्यांच्या व इतर कुटुंबियांच्या भावनाही अगदी सहजपणे बाजूला सारल्या असत्या. द्रौपदीचा हा समर्पणाचा भाव कृष्ण जाणून होता. द्रौपदीने तिची सर्व जबाबदारी कृष्णावरतीच सोपवली होती आणि मुख्य म्हणजे ती जबाबदारी कृष्णाने स्वीकारलीही होती. कृष्ण त्याच्या धर्माला जागणार होता आणि द्रौपदी तिच्या कृष्णावरील भावाने जगणार होती.

* * *

हे लक्ष्मी, द्रौपदीच्याठायी जरी असे भावबळ असले तरी अर्जुनाने घेतलेल्या भूमिकेमुळे तीही थोडीशी बावरलीच. कारण द्रौपदीला तशी भूमिका अर्जुनाकडून मुळीच अपेक्षित नव्हती. परंतु द्रौपदी घाबरली मात्र अजिबात नाही किंवा तिची कृष्णावरील श्रद्धासुद्धा जराही कंप पावली नाही. हेच तर तिचे विशेषत्व होते. या परिस्थितीत कृष्णच योग्य ते मार्गदर्शन करील याची तिला पूर्ण खात्री होती आणि याच भरवशाने ती



कृष्णाकडे अपेक्षेने पहात मनातून शांत होती. द्रौपदीच्या या कृष्णावरील श्रद्धेची व विश्‍वासाची जाणीव कृष्णाठायीही पूर्णपणाने होती. पण त्याचबरोबर कृष्ण हेही जाणून होता की शेवटी द्रौपदीलाच तिचे प्रत्यक्ष जीवन जगायचे आहे. प्रत्यक्ष जीवनात केवळ भावनात्मक किंवा केवळ बुद्धीवादी असून चालत नाही, तर विवेकाने त्या दोहोंचा योग्य मेळ घालावा लागतो. त्यासाठीच द्रौपदीची मनःस्थिती तयार करून तिला उद्‌युक्त करणे आवश्यक होते. त्याच हेतूने कृष्णाने द्रौपदीशी बोलावयास सुरुवात केली.

“हे द्रौपदी, तुझ्या मनःस्थितीची मला पूर्ण कल्पना आहे. पण तरीही तू अत्यंत शांत आहेस याचे मला विशेष कौतुक वाटते. अर्थात तुझे मन थोडेसे चलबिचल झाले असणारच आणि तेही अगदी साहजिकच आहे. त्यात तुझा काहीच दोष नाही. कारण परिस्थितीच तशी विचित्र निर्माण झालेली आहे. पण खरे सांगायचे तर आणि ते तुझ्याही लक्षात येईलच की आता परिस्थितीचे चित्र अधिक स्वच्छ व स्पष्ट झालेले आहे. कारण सर्वांचीच मनःस्थिती व त्यांची त्यांची भूमिकाही उघड झालेली आहे. त्यामुळे निर्णय घेणे, म्हटले तर सोपेही आहे आणि म्हटले तर कठीणही आहे. सर्वांच्याच भावना राखायच्या ही गोष्ट तर अत्यंत कठीणच नव्हे तर अशक्यच आहे. कोणताही निर्णय घेतला तरी कोणाच्या ना कोणाच्या भावना या दुखावल्या जाणारच आहेत. बरे, धर्म-अधर्माचा खरा निवाडा करणे व लावणे हेही अशक्यच आहे. कारण धर्मशास्त्राच्या केवळ बौद्धिक ज्ञानाने कोणताही निर्णय हा शास्त्राच्या चौकटीत बसवणे व न बसवणेही अगदी सहज साध्य आहे. पण या सर्वांपेक्षा जर तू तुझ्या स्वतःच्याच हिताला व भावाला प्राधान्य व योग्य न्याय द्यायचे ठरवलेस, तर मात्र सर्व सरळ व सोपे आहे.

हे द्रौपदी, मला तुला एवढेच सांगायचे आहे की केवळ लौकिकाच्या दडपणाने किंवा बदनामीच्या भीतीने कोणताही निर्णय घेण्याचे करू नकोस. कारण नंतर मग जर पश्चात्तापाची पाळी आली तर वेळ व

हातातली संधी केव्हाच निघून गेलेली असेल. मग केवळ 'असे करावयास हवे होते' आणि 'असे करावयास नको होते' असे म्हणत रडत बसण्याचीच वेळ येईल. म्हणूनच भावना व बुद्धी यांचा योग्य मेळ घालून विवेकाने निर्णय घे. केवळ तात्कालिक सुखदुःख किंवा योग्यायोग्य यांचा विचार न करता, तुझ्या पुढील संपूर्ण जीवनाचा विचार करून दीर्घकालीन निर्णय घे. एक गोष्ट नीटपणे लक्षात ठेव की तुझा विवाह अर्जुनाशी झाला तरी जशी तुझी बदनामी आहे तशीच बदनामी, अर्जुनाशी ठरलेला तुझा विवाह मोडला म्हणूनही होणार आहेच. पण तुझ्या भावाची पूर्ती होण्यासाठी तू जर निर्णय घेतलास तर मात्र होणाऱ्या निंदेला घाबरण्याचे काहीच कारण नाही. कारण तुझे मन शुद्ध आहे व तुझा हेतू प्रामाणिक आहे. मग भीती कशाची व कुणाची?

द्रौपदी, आपण अजूनही एकाच गोष्टीचा भरवसा धरू शकतो आणि तो म्हणजे सर्वांच्या ठायी कमीजास्त प्रमाणात असलेल्या सद्भावाचा. तो भाव परिस्थितीमुळे व मनःस्थितीमुळे जरी झाकोळला गेलेला असला तरी त्या भावाला प्रेमाने किंवा थोडासा मोठेपणा देऊनही जर आवाहन केले, तर तो सद्भाव वरती येऊ शकतो आणि त्याचा प्रभाव पाडू शकतो. ही गोष्ट अत्यंत खरी आहे हे पूर्णपणे लक्षात ठेव. कारण त्या सद्भावाचाच तो गुणधर्म आहे. तेव्हा सद्भावाच्या या गुणाचाच उपयोग करून घ्यावयास हवा आणि आपला कार्यभाग साधावयास हवा. काही झाले तरी परिस्थितीला पूर्णपणे शरण जाण्याचे कारण नाही. पण परिस्थितीपुढे धोरणाने थोडेसे नमते घेऊन किंवा बाह्यांगाने घेतल्यासारखे दाखवून आपला हेतू साध्य करावयाचा आहे. दुसऱ्याच्या भावना राखताना त्याचबरोबर स्वतःचे स्वत्वही कायम राखावयाचे आहेच. पण त्या स्वत्वामुळेच तुझ्या भूमिकेत ताठरपणा न येता लवचिकता राहील, तर योग्य निर्णय घेणे तुला अगदी सहज साध्य होईल.

द्रौपदी, तुझी माझ्याकडून अशी अपेक्षा असेल की मी काय तो निर्णय घ्यावा आणि तुला तो सांगावा. म्हणजे त्याप्रमाणे तुझाही तोच

निर्णय होईल आणि तसे तू वागशील. पण तसे करणे योग्य नाही. कारण हा प्रश्न केवळ धोरणात्मक मार्गदर्शनाचा नाही तर तो तुझ्या प्रत्यक्ष जीवनाशी निगडीत आहे. हा निर्णय काही एका दिवसासाठीचा वा काही काळापुरता मर्यादित नाही, तर तो तुझ्या संपूर्ण जीवनाचा आहे. तू जे जीवन स्वीकारशील ते तुला झेपवायचे आहे आणि तुलाच निभावूनही न्यायचे आहे.


द्रौपदी, एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेव की आपण कितीही गोष्टी ठरवल्या आणि त्यासाठी आटोकाट प्रयत्नही केले तरी ईश्वराची नियती हीच सर्वश्रेष्ठ आहे आणि सर्व काही त्या नियतीनुसारच घडत असते. अर्थात त्या नियतीमध्ये मानवी प्रयत्नाला अगदी शेवटपर्यंत म्हणजे प्रत्यक्ष गोष्टी घडेपर्यंत पूर्ण वावही आहे. तेव्हा तुझ्या मनाचा निग्रह करून व बुद्धीचा निश्चय करून तूच निर्णय घ्यायचा आहेस. त्यासाठी जे प्रयत्न तुला करावे लागतील आणि त्याचे जे परिणाम तुला भोगावे लागतील त्यामध्ये माझी साथ व माझे साहाय्य तुला अखंडपणे लाभेल, हे माझे तुला वचन आहे. हा मी माझ्या अंतःकरणापासून दिलेला शब्द आहे आणि कोणत्याही परिस्थितीत मी माझा शब्द पाळीनच याची ग्वाही मी तुला देतो. अर्थात असे तुला मुद्दाम वेगळेपणाने वचन देण्याची मुळीच जरूरी नाही हे मी जाणून आहे आणि तूही जाणून आहेसच.

द्रौपदी, आता तू एक गोष्ट कर. सर्व परिस्थिती तुला कळलीच आहे. पण तरीही पुन्हा एकदा पांडवांच्या घरी जाऊन परिस्थितीचा पुन्हा एकदा नीट अंदाज घे. आपले येथे झालेले बोलणे अर्जुन घरी गेल्यावरती सर्वांना सांगणार आहे, हे तर गृहीतच आहे. मला एका गोष्टीची पक्की खात्री आहे की धर्मराज हा कोणातरी अधिकारी व्यक्तीकडून धर्म-अधर्मासंबंधीची माहिती करून घेणारच. कारण त्याचा तो स्वभाव आहे हे मी जाणून आहे. ती अधिकारी व्यक्ती म्हणजे दुसरी तिसरी कोणी नसून व्यास महर्षीच असणार, हेही मला पक्केपणाने ठाऊक आहे. धर्मराजाच्या दृष्टीने याबाबतीत व्यासांशिवाय दुसरी कोणीही अधिकारी व्यक्ती नाही,

एवढी त्याची व्यासांवरती श्रद्धा आहे. पण मला काळजी एकाच गोष्टीची वाटते की धर्मराज हा व्यासांना प्रश्नाच्या सर्व बाजू नीटपणे व व्यवस्थितपणे सांगेल की नाही? मला तरी ती शंकाच वाटते. बहुधा धर्मराजा हा त्याच्या स्वभावानुसार त्याचीच अडचण व्यासांना विचारेल आणि त्याच्या शंकेचे समाधान करून घेईल. व्यास त्यांच्या स्वभावानुसार जास्त काही न विचारता व न बोलता फक्त विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देऊन मोकळे होतील. धर्मराज मात्र व्यासांच्या सांगण्याचा त्याच्या मतीनुसार व थोडासा त्याच्या सोयीनुसारही अर्थ काढून बसेल आणि मनात तोच अर्थ धरूनही बसेल. म्हणूनच द्रौपदी तू पांडवांच्याकडे जाऊन पुन्हा एकदा प्रत्यक्ष बोलणे कर आणि मगच तुझा अंतिम निर्णय घे.”

द्रौपदी कृष्णाचे बोलणे अत्यंत लक्षपूर्वक ऐकत होती. कृष्णाच्या सांगण्यातील कळवळा जसा द्रौपदीच्या लक्षात येत होता तसाच कृष्णाठायी द्रौपदीविषयी असलेला आत्यंतिक आपलेपणाही द्रौपदीला जाणवत होता. त्यानेच ती अधिक भारावली. कृष्णाच्या बोलण्याचा विचार करीत द्रौपदी थोडावेळ तशीच स्वस्थ बसून राहिली. कृष्णाच्या सांगण्यातील मतितार्थ व भावार्थही तिला कळला होता. कृष्णाच्या बोलण्यातील मुख्य मुद्दाही द्रौपदीच्या लक्षात आला होता आणि तिला तो पटलाही होता. फक्त आता काय करावे व कसे करावे हाच विचार द्रौपदीच्या मनात प्रबळ झाला होता. त्यावरती तिच्याकडे एकच उपाय होता आणि तो म्हणजे पुन्हा कृष्णाशीच बोलणे. मग त्याप्रमाणे द्रौपदीने कृष्णाशी बोलावयास सुरुवात केली.

“अरे कृष्णा, माझ्या व्यथेने तुझे अंतःकरण अत्यंत व्यथित झालेले आहे हे तर मला जाणवत आहेच. तेच तर तुझ्या अंतःकरणाचे म्हणजेच तुझेच विशेषत्व आहे. तुझे अंतःकरण अत्यंत संवेदनशील आहे. स्वतःचे दुःख सहन करण्याचे जेवढे सामर्थ्य तुझ्या अंतःकरणाच्याठायी आहे, तेवढेच दुसऱ्याच्या दुःखाने कळवळण्याची संवेदनशीलताही त्या अंतःकरणाच्याठायी आहे. म्हणूनच तू एक असामान्य दैवी पुरूष आहेस



असा माझा दृढ निश्चयच झालेला आहे. माझी व्यथा ही जशी तुला तुझीच जाणवते तशीच तुझी व्यथा ही माझीदेखील व्यथा आहे. तेव्हा तुझी व्यथा दूर करणे म्हणजेच माझीच मी योग्य काळजी घेणे होय. प्राप्त परिस्थितीत योग्य असा निर्णय मीच घ्यायचा आहे जेणेकरून, तुझी माझ्याविषयीची काळजी तर दूर होईलच आणि तुझे अंतःकरणही प्रसन्न होईल. तेवढे भावबळ माझ्याठिकाणी निश्चितच आलेले आहे आणि तेही केवळ तुझ्यामुळेच आलेले आहे ही गोष्टही सत्यच आहे.


परंतु कृष्णा, त्याचबरोबर मला तुला एक विनंती प्रेमाच्या हक्काने करावयाची आहे. मी पांडवांच्याकडे जाताना तू माझ्याबरोबर हवासच. तुझी साथ व संगत ही मला अत्यंत आवश्यक आहे. ही माझ्या मनाची दुर्बल अवस्था नसून केवळ आपल्या प्रेमसंबंधामुळेच मला असे वाटत आहे. माझ्या जीवनातील अशा महत्त्वाच्या प्रसंगी तू माझ्या संगे असणे हे अत्यंत आवश्यक व सहजही आहे. जे काही घडायचे असेल ते तुझ्या उपस्थितीत व तुझ्या साक्षीनेच घडावे हीच माझी इच्छा आहे. तू नेहमीच जे सांगतोस त्याप्रमाणे माझे नशीब तर माझ्याबरोबर असणारच आहे. परंतु तुझ्या रूपाने असलेले माझे भाग्यही माझ्याबरोबर असावे असे मला अगदी मनापासून वाटते. अर्थात त्यानंतर माझे प्रयत्न ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे हे मी जाणून आहे. पण योग्य निर्णय घेणे मलाही तेव्हाच शक्य होईल जेव्हा मी तुझ्या प्रेमळ दृष्टीक्षेपात असेन. तुझ्या नजरेतील माझ्याविषयीचे प्रेम व विश्वास या गोष्टीच माझे सदैव प्रेरणास्थान आहेत. कोणत्याही परिस्थितीत तू माझ्या जीवनात मला प्रत्यक्ष हवा आहेस, हाच माझा निश्चय व ध्यास आहे आणि त्यासाठीच कोणतेही कष्ट सहन करण्याची माझी तयारी आहे. तुझ्या प्रेमामुळे त्याचे माझ्या मनाला काहीही क्लेश होणार नाहीत, मग मला कितीही त्याग करावा लागला तरी चालेल.”

द्रौपदीचे मन बोलत असता असताच कृष्णप्रेमाने भरून आले. तिला गहिवरून आले आणि तिचा कंठही सद्‌गदित झाला. तिचे नेत्रही अश्रूंनी

भरून आले. द्रौपदीची ती भावपूर्ण अवस्था पाहून मग कृष्णालाही राहवले नाही. तो त्वरेने द्रौपदीच्या जवळ गेला आणि त्याने प्रेमाने द्रौपदीला जवळ घेतले. द्रौपदीनेही अत्यंत आर्ततेने स्वतःला झोकून दिले आणि ती कृष्णामध्ये स्वतःला पूर्णपणे हरवून बसली. कृष्ण अत्यंत प्रेमाने द्रौपदीचे मस्तक कुरवाळून थोपटीत तिचे सांत्वन करीत राहिला. बऱ्याच वेळानंतर द्रौपदीने स्वतःला सावरले आणि ती कृष्णापासून हलकेच थोडीशी दूर झाली. परंतु तिने कृष्णाचे दोन्ही हात मात्र स्वतःच्या हातात धरून ठेवले होते. कृष्णाने द्रौपदीकडे पाहून मंदस्मित करून संमतीदर्शक मान डोलवली. द्रौपदीही समाधान पावली. तिनेही मान डोलवून कृष्णाला प्रतिसाद दिला आणि लागलीच कृष्ण व द्रौपदी हातात हात घेऊन तेथून निघाले.”

नारदाचे बोलणे लक्ष्मी जरी अगदी तन्मयतेने ऐकत होती तरीही श्रवणाच्या प्रतिक्रिया तिच्या मनात अगदी सहजपणे निश्चितच उमटत होत्या. त्यामुळे नारदाच्या बोलण्याचा वेग किंचितसा मंदावला आहे असे जेव्हा लक्ष्मीला जाणवले, तेव्हा तिने बोलण्याची संधी साधलीच.

“अरे नारदा, तू सांगत असलेला प्रसंग अधिकच गूढ होत चालला आहे आणि माझी आतुरताही अधिक वाढवत आहे. पण एका गोष्टीचा उल्लेख केल्याशिवाय मला राहवतच नाही. म्हणूनच केवळ मी बोलत आहे. कृष्णाने स्वतः काही निर्णय घेऊन तो द्रौपदीला न सांगता द्रौपदीलाच निर्णय घेण्यास सांगितले ही गोष्ट मला अत्यंत महत्त्वाची व सूचकही वाटते. त्याहीपेक्षा द्रौपदीने घेतलेल्या कोणत्याही निर्णयात तिला मनःपूर्वक व पूर्णपणे साथ देण्याचे आश्वासन कृष्णाने द्रौपदीला दिले ही गोष्ट अधिकच महत्त्वाची आहे. यातूनच कृष्णाचे अंतःकरण अगदी सहजतेने प्रगट झाले. त्यामुळेच द्रौपदीलाही तिचा निर्णय तिनेच घेण्याचे बळ घ्यावे लागले असणार आणि कृष्ण तिच्या सदैव पाठीशी आहे या विश्वासाने ते बळ द्रौपदीने निश्चितच घेतले असणार, याची मला पूर्ण खात्री आहे. अर्जुनाने द्रौपदीला साथ देण्याविषयी असमर्थता व्यक्त



केल्यावरती कृष्णानेही द्रौपदीला तिचा निर्णय तिने स्वतंत्रपणे घेण्यासाठी उद्युक्त केले. द्रौपदीच्या ठिकाणचा आत्मविश्वास जागृत करण्याचाच कृष्णाचा हेतू होता हे माझ्या लक्षात आले आहे आणि म्हणूनच मला कृष्णाचे माहात्म्यही विशेषत्वाने जाणवत आहे. कृष्णाच्या प्रेमीजनांनी कृष्णावरतीही का होईना, पण कायमचे अवलंबून राहून दुर्बल बनू नये, तर स्वतःच्या जीवनात कृष्णावरील प्रेमबळाने स्वावलंबी व्हावे हा कृष्णाठायीचा कळवळा मला अगदी स्पष्टपणे दिसत आहे. त्यातच मला कृष्णाची थोरवी जाणवत आहे. मात्र ते भावबळ द्रौपदीने कसे घेतले आणि स्वतःचे स्वत्व राखून तिने प्रत्यक्ष निर्णय काय व कसा घेतला, हे सर्व जाणून घेण्याची माझी आतुरता फारच ताणली गेलेली आहे. कारण जरी अर्जुन कृष्णाच्या त्याच्यावरील भरवशाला जागू शकला नाही तरी त्या भरवशाला द्रौपदी मात्र निश्चितच जागली असणार याची मला पूर्ण खात्री आहे. तेव्हा पुढील कथाभाग लवकरात लवकर सांगून माझ्या आर्ततेची पूर्ती करण्याची जबाबदारी नारदा, आता तुझीच आहे. आता मुळीच विलंब लावू नकोस.”

लक्ष्मीची आर्तता नारदालाही लगेचच जाणवली. कारण न बोलता स्वस्थ रहाणे हे नारदालाही शक्य होत नव्हतेच. लक्ष्मीच्या आर्ततेने नारदाचे अंतःकरण अधिकच उचंबळून आले आणि त्याचा वचनौघ अनावर होऊन वाहूच लागला.


“हे लक्ष्मी, तुझ्या मनात निर्माण झालेला कळवळा व तुझी झालेली आर्त अवस्था अगदी योग्यच आहे. कारण तुला कृष्ण व द्रौपदी या दोघांच्याही अंतःकरणातील व्यथा यथार्थपणे जाणवलेली आहे. ते दोघेही परस्परांच्या दुःखाने व्यथित झालेले होते. कृष्णाने ठरवलेल्या योजनेत कृष्णाच्या भरवशाचा असलेला अर्जुन केवळ कमीच पडला नाही, तर तो कृष्णाची व द्रौपदीची साथ सोडून बाहेरही पडला होता. त्यामुळे व्यथित झालेले कृष्णाचे अंतःकरण द्रौपदीने ओळखले होते, तर द्रौपदीच्या मनाची होत असलेली घालमेल कृष्णाला जाणवत होती. कृष्ण व द्रौपदी यांची

मने प्रेमाने एकमेकांशी जुळली असल्याचेच ते लक्षण होते. आता द्रौपदीचा विश्वास धरून कृष्णाने तिला पुढील मार्ग दाखवला होता आणि त्या मार्गाने आत्मविश्वासाने जाऊन द्रौपदीही कृष्णाचा तिच्यावरील विश्वास सिद्ध करणार होती. मुख्य म्हणजे ती तसे करेल आणि अगदी यशस्वीपणे करेल याची त्या उभयतांना पूर्ण खात्री होती.

हे लक्ष्मी, द्रौपदीने पांडवांच्या भेटीसाठी त्यांच्या घरी जाण्याच्या आधी तिचा पिता द्रुपद याची योग्यप्रकारे समजूत घातली. हतबुद्ध व दिग्मूढ झालेला द्रुपद हा खरे तर काहीही ऐकून वा समजून घेण्याच्या मनःस्थितीतही नव्हताच. अर्जुन व द्रौपदी यांच्या विवाहाविषयी काहीही विचार करण्याची आवश्यकताही द्रुपदाला वाटत नव्हती. द्रौपदीने पांडवांना जाऊन भेटावे आणि त्यांच्याशी विवाहासंबंधी काही बोलणे करावे हे तर द्रुपदाला मुळीच रूचतही नव्हते आणि त्याला ते मान्यही नव्हते. त्याच्या दृष्टीने त्यासंबंधीचा निर्णय झालेला होता आणि तो कायम होता. परंतु द्रौपदीचा निश्चयही ठाम होता. त्यामुळे मग द्रुपद स्वस्थ राहिला एवढेच, पण त्याची नाराजी स्पष्टपणे दिसत होतीच. त्याकडे दुर्लक्ष करण्यावाचून द्रौपदीलाही दुसरे गत्यंतर नव्हते.

त्यानंतर ठरवल्याप्रमाणे कृष्णाला बरोबर घेऊन द्रौपदी पांडवांच्या भेटीसाठी त्यांच्या घरी जाऊन दाखल झाली. गेल्याबरोबर तिने प्रथम कुंतीला वाकून नमस्कार केला व अर्जुनासह सर्व पांडवांना हात जोडून अभिवादन केले. थोडावेळ कोणीच काही बोलले नाही. कोणीतरी बोलेल याची प्रत्येकजण वाट पहात स्वस्थ राहिला होता. शेवटी कृष्णानेच त्या सर्वांनाच असह्य होत असलेल्या शांततेचा भंग केला आणि बोलावयास सुरुवात केली.

“हे कुंती, हे धर्मराजा, तुमच्या कुटुंबात तुम्ही मला जे आपलेपणाने स्थान दिले आहे त्यामुळेच मी तुमच्याशी मोकळेपणाने बोलण्याचे स्वातंत्र्य घेऊ शकतो, ही गोष्ट अगदी खरी आहे. त्याचबरोबर हा प्रश्न द्रौपदीशीही संबंधित असल्यामुळेच मी हा बोलण्याचा मोकळेपणा घेऊ




शकतो, ही गोष्टही तेवढीच खरी आहे. कारण मुळात जसा अर्जुन माझा परममित्र आहे म्हणून मला जवळचा आहे तशीच द्रौपदीही माझ्यासाठी तेवढीच जवळची आहे. ते उभयतां एकमेकांना अत्यंत अनुरूप आहेत त्यामुळे त्या दोघांचा विवाह व्हावा असे मला अगदी मनापासून वाटते. द्रौपदीला अर्जुनासारखा पती व असे तुमच्यासारखे कुटुंब मिळणे हे तिच्या भाग्याचेच लक्षण आहे. त्याचप्रमाणे अर्जुनालाही द्रौपदीसारखी पत्नी लाभणे हे त्याच्या दृष्टीनेही योग्यच आहे. तुमच्या सर्व कुटुंबात द्रौपदी निश्चितच सामावली जाईल याची मला अगदी खात्री आहे. तेव्हा मला तुम्हाला एकच गोष्ट मनापासून सांगायची आहे की तुम्ही सर्वांनी द्रौपदीला तुमच्या कुटुंबात सामावून घ्यावे आणि अर्जुन व द्रौपदी यांचा विवाह लावून द्यावा. त्यासाठी त्या विवाहासंबंधात ज्या काही भावनिक व मानसिक अडचणी निर्माण झालेल्या आहेत त्या विवेकाने प्रयत्नपूर्वक बाजूला कराव्यात. कारण अर्जुन व द्रौपदी यांनी एकमेकांना आधीपासूनच मनाने वरलेले आहे. म्हणूनच इतर दुसऱ्या गोष्टींना महत्त्व न देता अर्जुन व द्रौपदी यांच्या भावनेला प्राधान्य द्यावे, असे मला अगदी मनापासून वाटते.”

कृष्णाचे बोलणे थांबले तरीही त्यावर बराच वेळ कोणीच काहीच बोलत नव्हते. कृष्णाचे बोलणे कुंतीला पटलेले आहे हे तिच्या चेहऱ्यावरील भाव पाहिल्यावर लगेचच लक्षात येत होते. अर्जुनाचा चेहराही थोडासा खुलल्यासारखा दिसला. पण तो काहीच न बोलता स्वस्थच राहिला. धर्मराजाचा चेहरा मात्र अधिकच गंभीर झाला. कृष्णाचे बोलणे त्याला मानवले नव्हते ही गोष्ट लपून रहातच नव्हती. अर्जुनाचे इतर बंधू मात्र फक्त धर्मराजाकडेच बघत होते आणि त्याच्या प्रतिक्रियेची वाट पहात होते. सर्वजण धर्मराजाकडेच अपेक्षेने पहात आहेत ही गोष्ट त्याच्याही लक्षात आली आणि मग त्यानेही बोलावयास सुरूवात केली.

“अरे कृष्णा, तू आमच्या सर्वांच्याविषयीच्या आपलेपणानेच आमच्याशी बोलत आहेस हे मला माहित आहे. परंतु तुझ्या बोलण्याशी

मात्र मी सहमत होऊ शकत नाही. द्रौपदी आमच्या कुटुंबात येऊन सामावली जाणार असेल तर ती चांगलीच गोष्ट आहे. आम्ही सर्वच तिचे स्वागत करण्यास उत्सुक आहोत. परंतु आमच्या कुटुंबात सामावले जाण्यासाठीचे प्रयत्न मात्र, द्रौपदीलाच करावे लागतील. त्यासाठीचे जे काही बदल करावे लागतील ते तिलाच करावे लागणार आहेत. अर्थात आम्ही सर्वजण तिला आमच्या बाजूने पूर्णतः सहकार्य करूच, परंतु त्यासाठी आमच्या कुटुंबातील जे आमचे ऐक्य आहे ते मात्र आम्ही कोणत्याही परिस्थितीत सोडू शकणार नाही आणि आम्ही सोडणारही नाही. ‘आमच्या कुटुंबाचे ऐक्य हेच आमचे एकमेव प्राधान्य आहे’ ही आमची भूमिका आम्ही कधीच बदलणार नाही. तो तर आमच्या कुटुंबाचा पाया आहे. त्यामुळे द्रौपदीच्या आमच्या कुटुंबातील प्रवेशाबरोबरच आमचे ऐक्य हेही तितकेच महत्त्वाचे आहे आणि याचाच विचार द्रौपदीने करावयाचा आहे. तिच्या आमच्या कुटुंबातील येण्याने आमच्या कौटुंबिक ऐक्याला बाधा तर येणार नाही ना याची काळजी द्रौपदीने घ्यायची आहे. माझे हे सांगणे म्हणजे अर्जुनासह आम्हा सर्व बंधूंच्याच मनातील विचार आहेत याची मला खात्री आहे. अर्थात त्यांचे विचार मांडण्यासाठी त्यांना पूर्ण मोकळीक आहे. त्यासाठी माझ्या किंवा अगदी कुंतीमातेच्याही परवानगीची अजिबात आवश्यकता नाही.

हे कृष्णा, या प्रश्नामध्ये मुख्यतः दोन अंगे आहेत असे मला तरी वाटते. एक म्हणजे धर्म-अधर्माचा विचार आणि दुसरा अर्थातच द्रौपदीच्या भावनेचा विचार. त्यातील जो धर्म-अधर्माचा प्रश्न आहे त्यासंबंधी मी स्वतः व्यासमहर्षींची भेट घेऊन उलगडा करून घेतला आहे. त्यांनी मला निःसंदिग्धपणे सांगितले की धर्मशास्त्रानुसार ‘एका स्त्रीने एकापेक्षा जास्त पुरूषांना पती म्हणून वरावे’ यासंबंधी निश्चित असे काहीच मार्गदर्शन केलेले नसले, तरी त्या गोष्टीचा धर्मशास्त्राने निषेधही केलेला नाही. त्यामुळे बहुपतीत्व ही गोष्ट अधर्माची तर निश्चितच नाही. आता या प्रश्नाचे दुसरे अंग म्हणजे द्रौपदीच्या भावनांचे, जे तिच्या दृष्टीने



तिच्यासाठी अर्थातच अधिक महत्त्वाचे आहे आणि ही गोष्ट सर्वांनाच मान्य होण्यासारखी आहे. त्याविषयी दुमतच नाही. परंतु तो विचार आता द्रौपदीनेच करावयाचा आहे आणि तिचा निर्णयही तिनेच घ्यायचा आहे. त्यासंबंधी द्रौपदीचे बहुधा तुझ्याशी बोलणे झालेही असेल आणि तूही तिला योग्य ते मार्गदर्शन केलेच असणार याची मला खात्री आहे. परंतु आम्हा सर्व बंधूंचा पती म्हणून स्वीकार केल्यावरतीच द्रौपदीचा आमच्या कुटुंबात प्रवेश होणे शक्य आहे असे मला तरी वाटते. कारण तरच तो प्रवेश सर्वांनाच सुखावह होईल हे निश्चित. याविषयी माझ्या बंधूंना काही बोलायचे असेल तर ते बोलतीलच. त्याउपरही द्रौपदीचा निर्णय हाच अंतिम असेल हे मात्र नक्की आहे.”

* * * * *

# लेखक परिचय - श्रीपरमानंदस्वामी




श्रीपरमानंदस्वामी - श्री.अविनाश मोरेश्वर लिमये यांनी मुंबई विद्यापीठातून M.Sc. with Research ही पदवी घेतली. आय.आय.टी. पवई, मुंबई या सुप्रसिद्ध संस्थेत मेटॅलर्जिकल इंजिनिअरिंग या विभागात ते दीर्घकाळ सेवा करून निवृत्त झाले आहेत.

गृहस्थाश्रमात राहूनच भक्तिमार्ग कसा साधता येतो व सद्‌गुरु कृपेने ईश्वरप्राप्ती कशी करून घेता येते याचा आदर्श त्यांच्या जीवनाद्वारे प्रत्यक्ष साकार झालेला आहे.

त्यांनी प्रदीर्घ काळ, अखंडपणे व प्रेमभावाने त्यांचे पूज्य पिता व सद्‌गुरु श्रीअवधूतस्वामी यांची सेवा, भक्ती व त्यांचे कार्य करून तसेच स्वतःची साधना करून सर्वश्रेष्ठ असा आत्मानुभव घेतला.

श्रीअवधूतस्वामी यांच्या महानिर्याणानंतर श्रीपरमानंदस्वामी यांनी तरुण वयातच या दत्तपरंपरेच्या कार्याची धुरा अत्यंत समर्थपणे सांभाळली आणि सर्वसामान्यांना व भक्तांना अचूक मार्गदर्शन केले व आजही करीत आहेत.

श्रीपरमानंदस्वामी यांनी लिहिलेला प्रभूरामाच्या अंतःकरणाच्या अवस्थेचे दर्शन घडविणारा अनुभवसिद्ध ग्रंथ 'हा राम माझा' २००० साली व कृष्ण व राधा यांच्या भक्तिऐक्याचे स्वानुभूतीतून मनोहारी दर्शन घडविणारा ग्रंथ 'कृष्ण सखा माझा' २००४ साली प्रकाशित झाला. तसेच नारद व लक्ष्मी यांच्या संवादातून उलगडलेले कृष्णाच्या अंतरंगातील गूज प्रकटविणारा ग्रंथ 'कृष्ण परमात्मा' २००८ मध्ये प्रकाशित झाला. या ग्रंथास मराठी साहित्य परिषद, पुणे यांचा 'मृत्युंजय' पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच दत्तात्रेयांच्या अवतार मालिकेतील चरित्रांचे रहस्य प्रकट करणारा ग्रंथ 'दत्त हाचि अवधूत' २०१० साली प्रकाशित झाला असून, श्रीपरमानंदस्वामी यांच्या भक्तिकाव्यांचा संग्रह 'आनंदाचे डोही' २०११ मध्ये प्रकाशित झाला आहे. 'दत्तात्रेय वामन भिडे - एक शोध आनंदाचा' ही आध्यात्मिक कादंबरी २०१४ साली प्रकाशित झाली, तर त्याच आध्यात्मिक कादंबरीचा पुढील भाग म्हणजे 'दत्तात्रेय वामन भिडे - एक प्रवास आनंदाचा' हा २०१५ मध्ये प्रकाशित झाला आहे. त्यापुढील भागाचे लेखन श्रीपरमानंदस्वामी यांचेकडून घडतच आहे.



# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी पुस्तक वाचायला कुठे जायची गरज नाहीतुमच्या मोबाईलवर . आता हजार मराठी ईपुस्तके आहेत.

मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून या नंबर ला तुमचे नांव व गांव Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app.

https://play. google. com/store/apps/details? id=com. esahity. www. esahitybooks

या लिंकवर उपलब्ध आहे. ते download करा.

हे सर्व मोफ़त आहे. No terms. No Conditions.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य